## शेजारती

कोणत्याही देवळात त्या त्या दैवताची पाच वेळा आरती केली जाते. ही पाच वेळेला केलेली आरती पंचारती होय.

१) सकाळची काकडआरती २) ८।। वाजता केलेली अभिषेक आरती ३) मध्यान्ही नैवैद्य आरती ४) सायंकाळी सायं आरती व ५) शेजारती.

काकड आरतीने देवाला उठवतात, ८।। ला अभिषेक स्नान, दुपारी भोजन नैवैद्य, सायंकाळी करूणाष्टके, करूणात्रिपदी (दत्त), हरीपाठ (श्री विठ्ठल) वा त्या त्या देवतेची स्तोत्रे काहीच नसले तरी प्रवचन सेवा वा कीर्तनसेवा व रात्री शेजारती करून देवाला झोपवणे हे पंचोपचार करावेच लागतात. रामसंप्रदायी देवळातून वा मठातूनही ही प्रथा पाळली जाते. आपल्या घरच्या दैवताला पण असे पंचोपचार खरा साधक करीत असतो. श्री प्रल्हाद महाराज (साखरखेडी) ह्याबद्दल फारच जागरूक असत. रात्रीचे १० वाजले की त्यांचा राम झोपी जाणारच. मग देवळात भजन असो वा कीर्तन रात्री१० ला शेजारती होऊन राममंदीरातील दिवा हळूहळू मंदावत जाणारच ते कोणत्याही घरी मुक्कामाला असोत, त्यांचा राम त्यांच्या संगती असेच अकोल्याला श्री. पांडे यांचे घरी ते मुक्कामाला असताना, मला त्यांची शेजारती व काकडआरती सोहळा पाहण्याचा सुंदर योग आला.

सज्जनगडावरही, सांप्रदायिक उपासनेत, श्री समर्थ व श्रीरामाची शेजारती पाहण्याचा योग आला. विठ्ठलाची पंढरपूरला, कोल्हापूरला अंबाबाई देवळातही हा सोहळा पहाण्याचा सुयोग मला आला व अपूर्व समाधान प्राप्त झाले.

सज्जनगडावर रात्री दासबोध वाचन झाले की, शेजारती व प्रार्थना म्हटली जाते. त्याविषयी थोडेसे चिंतन श्रीसमर्थ कृपेने करण्याचा विचार मनी आला व गुरूकृपेने स्फूर्ति लाभून तो शब्दबध्द करावे वाटले, ती ही शब्दसुमनांजली, प्रभूचरणी वाहण्याचा हा छोटासा, धीट प्रयत्न मला स्वतःला व्याकरण शास्त्र, ललीत कला वगैरेचा गंधही नाही. पण भगवंताचे गुणगान गावे ही तीव्र इच्छा उत्पन्न झाली, म्हणून हे वेडे वाकडे विचार मांडण्याचे धैर्य करत आहे. शास्त्रोक्त पूजन जरी झाले नाही. तरी मनापासून देव पूजा करावी एवढीच मनीची इच्छा, ती प्रभू पूर्ण करून घेतील हा लडीवाळ हट्ट श्रीगुरू पूर्ण करतील हा विश्वास आहेच म्हणूनच हे साहस.

बाळा मुग्धा यौवना प्रौढा सुंदरी। रामा।
आरत्या घेऊनिया करी आल्या या नारी।।
श्यामसुंदर श्रीरामा चरणकमळी। रामा।
ओवाळूं आरती कनकगंगाजळी।।
चौघी म्हणती सुमनशेजे चला मंदिरा। रामा।
नव त्या इच्छिती सेवा श्यामसुंदरा।।
दास म्हणती सुमनशेजे चला हो श्रीहरी। रामा।
क्षण एक विश्रांती घ्या हो अंतरीं।।
सकळांसी तांबूल सकळां पुष्पमाळा। भक्तांचा सोहळा पुरलिा।।
स्वामी चला हो निजमंदिरा। सुखशेजेसी रघुवीरा।।
भक्तजन पालक ब्रह्मांडनायक। जय रघुकुळटिळक स्तविती दास।।
येऊनि जनकात्मजा आहो जी रघुराजा। तिष्ठतसे तुझा मार्ग लक्ष्मी।।
झाली वाड राती अहो रघुपति। मार्ग सोडविती बंदीजन।।
उठले जगज्जीवन सिंहासनावरून। वेणीने लिंबलोण उतरीले।।

अशी ही शेजारती आहे. श्रीरामाची झोपायची वेळ जवळ आली आहे. श्रीरामरूपी शरीरातील चैतन्य, जे सतत कार्यरत आहे, ते शरीराला विश्रांती द्यायला आता तयार झाले. दिवसभर काम करून मेहनत करून शरीर थकते. त्या शरीराला खरी विश्रांती झोपेनेच मिळते. झोप ही अज्ञानावस्थेतील समाधिच आहे. झोपेत मनाच्या साऱ्या वृत्ती एकवटून, त्या शांत होतात. निर्विचार स्थिती प्राप्त झालेली असते. पण ती प्राप्त झाल्याची जाणीव आत्म्याला होत नाही, म्हणून ती नेणीवेतील–

अज्ञानातील समाधी अवस्था. झोप पूर्ण होताच जाग येते व प्रसन्न वाटते. ही प्रसन्नता ती ब्रह्मस्थितीच देत असते. प्रसन्न वाटून ताजेतवाने वाटते व जीव पुन्हा कार्यरत होतो. दिवसभर निरनिराळ्या वृत्तीचे तरंग उठतच असतात. काही तरंग निर्माण होऊन लगेच विरतात ती वृत्ती बाळा. काहींना मनाने थोडी उभारी देऊन, ती कार्यात आणण्याच्या बेतात असतात. काही कार्यरतही होतात, काही कार्य करीत असतांना परिपक्व होतात, कार्याची फळे त्या वृत्तींना दिसू लागतात. त्या सर्व वृत्तीचे वर्णन सुरवातीलाच श्रीसमर्थ करत आहेत. बाल– नुकत्याच मनी फुटलेल्या, मुग्धा– ज्यांना आजून कार्य प्रवृत्तीचे अंकूर फुटले नाही, यौवना–कार्यरत वृत्ती तर प्रौढा कर्मफळाची प्रतिक्षा करणाऱ्या, सर्व प्रकारच्या मनातील वृत्ती ह्या जणू सुंदर दासी, त्या आता आरती हातात घेऊन श्रीरामांना ओवाळायला आल्या आहेत. म्हणजे आता ह्या बाल, मुग्धा, यौवना, प्रौढा (परिपक्व) सर्व वृत्ती मनामधे विलीन होऊन, ते मन आता प्रभूचरणी विसावा घेणार आहे. त्या वृत्ती जणू बाला, मुग्धा, यौवना, प्रौढा रूपातील सुंदरी बनून, हातात सोन्याचे ताट घेऊन, व सोन्याचे पात्रात, भगवंताला पिण्यासाठी पाणी हवे म्हणून, पाण्याचा तांब्या घेऊन सेवेला सज्ज झाल्या आहेत. ह्या सर्व वृत्ती जीवाची सतत सेवाच करत असतात. नित्य सेवा करत असतात. त्या आता भगवंताच्या पायाशी लीन झाल्या आहेत. व भगवंताला जणू ओवाळत आहेत.

त्यातील काही ज्ञानी आहेत. ज्ञान बुद्धी स्तरावर असते. नव म्हणजे नवविधाभक्ती, त्या नऊ जणी म्हणत आहेत, भगवंता चला, पुष्पशय्येवर शयन करा, शेजघरात चला, तेथे आम्ही वारा घालून, कीर्तनादी सेवेने, गायनाने आपणास रिझवू. चौघी म्हणजे चार वेदातील चार प्रमुख श्रुती–वाक्ये.

भगवत्प्राप्तीसाठी ज्ञानमार्गही आहे. शास्त्र चर्चा आहे. शास्त्रप्रचिती घेतघेत, त्या मार्गाने, सदाचाराने ही भगवंताजवळ जाता येते. त्या मार्गातील ह्या चार (वेद) व नऊ (नवविधाभक्ती, नवरसयुक्त वाणी) भगवंताची शयनमंदिरात जाऊन सेवा करण्यास तयार आहेत.

अशा सर्व सेवेकरी भक्तांचा मेळा प्रभूमंदिरात जमला आहे. शास्त्रचर्चा, कीर्तन, गायन आदि सेवेने भक्त–भगवंत ऐक्याचा रंग चढला आहे. हाच भक्तीचा विडा सर्व समारंभ झाला, भोजन झाले, की विडा देतात. हा ऐक्याचा विडा खाऊनच झोपी जायचे असते.

व्यवहारातही विडा खाल्ल्यांवर तोंड धुतले नाही तरी चालते विड्यामुळे अन्न पचन होते. तो विडा त्रयोदशगुणी असतो. असा भक्तीचा विडा भक्त व भगवंत दोघेही खातात. असा भक्तीचा सोहळा भक्त–भगवंत उपभोगत आहेत. सर्वांना तांबूल, पुष्पमाला देऊन सन्मान झाला आहे. आता झोपायची, विश्रांतीची वेळ झाली आहे, म्हणून श्रीसमर्थ श्रीरघुपतिंना विनंती करत आहे स्वामी चला आपल्या मंदिरी विश्रांतीला जाऊ, तिथे सुखाने निद्रा करावी. म्हणजेच आता सर्व कार्याला विश्रांती देऊन, त्यातून मनवृत्ती काढून घेऊन, शरीर–मन–वाणीला विश्रांती देण्यासाठी शय्येवर झोपण्यासाठी चलावे.

भजनादी सेवा, आरती, नैवेद्य झाल्यावर एक एक दिवा मंद करीत भगवंत आता झोपणार आहेत अशा अविर्भावातही आरती होते. पंढरपूरला तर देवीची वस्त्रे बदलवतात, पायघड्या घालत त्यांना शेजमंदिराकडे नेत आहेत असा भासच होत असतो. शेजघरापर्यंत पायघड्या घालतात. शेजघरात लाडूचा नैवेद्य व पाण्याचा तांब्या भरून ठेवला जातो. तसेच इथे श्रीसमर्थ म्हणत आहेत, अहो रामराया, महामाया सीतामाई शेजघरात जाण्यासाठी आपली केव्हाची वाट पहात आहेत. केवढी रात्र झाली आहे. निजायची वेळ झाली. श्रीराम सिंहासनावरून उठताच, बंदीजन जसे राजाचा मार्ग मोकळा करण्यासाठी, वाटेतील गर्दी दूर करण्याचा प्रयत्न करतात व राजा त्या मार्गाने पुढे पुढए चालू लागतो, तसे हे श्रीराम चैतन्य तत्वांचे बंदीजन, म्हणजे श्रीरामाच्या अधिपत्याखाली वावारणारी इंद्रिये, अंतःकरणातील सूक्ष्म इंद्रिय–मन –बुध्दी–अहंकारादी लहान मोठ्या वृत्ती तरंग, हे आपोआप चैतन्यापासून दूर सारले जाऊ लागतात. त्यांची कार्य थांबून जातात.

ही सारी कार्ये, ती महामायाच जीवाकडून करवून घेत असते. म्हणजे चैतन्याची क्रियाशक्ती, द्रव्यशक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानशक्तीच ही कार्ये जीवाकडून करवून घेत असते. ह्या चार शक्ती व नऊ इंद्रिये (खरी १० इंद्रिये पण जीभ दोन्हीकडे आहे म्हणून नऊ) त्यांची कार्ये थांबली जातात. ह्या चौघी व नऊजण भगवंताला विश्रांतीच्या कार्यात अशी मदत करून, जणू त्यांची सेवाच करणार आहेत.

चौघी म्हणती सुमनशेजे चला मंदिरा।
नव त्या इच्छिती सेवा श्यामसुंदरा।।

अशी सर्वांकडून विश्रांतीसाठी सेवा होताच, महामाया सीतामाई व श्रीराम म्हणजे माया व ब्रह्म एकरूप होण्यासाठी, झोपण्यासाठी शयनमंदिराकडे आले आहेत. राजमंदिरात येण्यापूर्वी राजाची दृष्ट काढली जाते. झोपण्यापूर्वी, शेजारतीपूर्वी, सगुण साकार देवाची दृष्ट काढतात कारण साकारालाच दृष्ट लागते. कोण कुठल्या भावनेतून पाहेल, याचा नेम नसतो म्हणून दृष्ट काढतात.

झोपण्यापूर्वी 'बह्म-माया' चा संवाद, हितगुज चालू असून सीतामाई भगवंताना विडा देत आहेत हा विडा ही आध्यात्मिक रूपाचा आहे.

पुढचे पद विड्याचे आहे. देवासमोर विडा, पाणी, लाडू वा फळे, खजूर आदी नैवैद्य ठेवला जातो.

-विडा-

विडा घ्या हो रामराया। महाराजराजया विडा घ्या ।।धृ।।
रत्नजडित पानदान। आली जानकी घेऊन।
विडा देते करूनिया। दीनबंधो रामराया।।१।।
सुगंधी गंगेरी पाने। मुक्तमोतियांचा चुना।
सुपारी कातगोळ्या। भक्तिभाव मेळविल्या।।२।।
जायपत्री जायफळ। विडा जाहला सुफळ।
सीता रामालागी देत। केशर कस्तुरीमिश्रित।।३।।
सीताराम विडा घेतां। ऐक्यभावे एकात्मता।
रंगली एकरंगी। रामदास पाया लागी।।४।।

रामदासी संप्रदायात म्टले जाणारे हे विड्याचे पद श्रीरामासारखे साधे सरळ सोपे आहे. सुगंधित गंगेरी पाने, त्यावर मोत्यासारखा शुभ्र चुना, सुपारी, कातगोळ्या, जायपत्री, जायफळ इत्यादी साहित्य घालून अत्यंत भक्तिभावाने सीतामाई श्रीरामांना विडा लावून देत आहे. विड्याचे साहित्य असणारे पानदान रत्नजडित आहे. पूर्वी घरोघरी अशी पानदाने असत. जेवणानंतर विडा, झोपतांना विडा खाण्याची पद्धत होती. जेवणानंतर विडा खाल्ला की अन्नपचनाला मदत होते. झोपतांना विडा खाणे ही शृंगाराची एक पद्धत, पतीपत्नीतील प्रेम, हा विडा रंगला की जगाला कळत असे. विडा रंगला ना! दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे असे मानले जाई. पति-पत्नी हे नाते अद्वैताचेच आहे. एक विचार दोन शरीरे. दोघे एक विचाराने संसाराचा गाडा पुढे नेतात, अशी त्यामागे भावना आहे. त्यामागील मुख्य कारण, स्त्रीचे समर्पण. ती सर्वस्व देऊन पतिशी एकरूप होते. म्हणून कांताभाव-मधुराभक्ती श्रेष्ठ मानली आहे. स्त्री-पुरूषामधील ऐक्य हा रंगलेला विडा दर्शवितो. अशी कल्पना, भावना पूर्वी होती. सीता राम दोघे दिसायला दोन जीव, पण आचार-विचार-उच्चारात दोघांत कांहीच फरक नव्हता. इतके ते एकरूप होते. एकरूप जोडपे म्हणजे जणू गोड साखरमिश्रित दूध. साखरेला दूधाची व दूधाला साखरेची चव प्राप्त होते. दूधातून साखर वेगळी काढता येणार नाही. दोन्ही मिळून वेगळीच चव त्याला येते. पण सरबतात लिंबू व साखर यांचा आंबटपणा व गोडी मिळून दोन्ही चवी चाखता येतात. अनुरूप जोडपे म्हणजे सरबत. दोघेही एकमेकांचा सन्मान करतात, पण स्वतःचे वैशिष्ट्य ही प्रखरतेने जाणवत असते. असो, जरा विषय बदल झाला.

श्रीकृष्ण-रूक्मिणी यांच्यावरही विड्याचे पद आहे. ते वारकरी संप्रदायात, कृष्णभक्तात, काल्याचे वेळी म्हटले जाते. त्यात विड्याचे आध्यात्मिक रूप दाखवले आहे. शांतीचे, विड्याचे नागवेलीचे पान, त्यावर अहंकार जाळून तयार केलेला चूना लावला आहे, वासनेची सुपारी फोडून तिचे चूर्ण केले आहे, महणजे ती बारीक कातरली आहे, त्यात भावार्थाचा कापूर घालून ती सुगंधित केली आहे, विवेकाचा काथ घालून, तोविडा चांगला रंगावा म्हणून तो चुन्यावर उत्तम तऱ्हेने लावला आहे. दयारूपी जायपत्री, सुबुद्धीरूपी वेलदोडे घालून, क्षमारूपी लवंगेने तो विडा बांधला आहे. असे सुंदर रूपक आहे.

थोडक्यात, शेजारती मधे विडा महत्वाचा. कारण हा विडा 'ब्रह्म-माया' ऐक्य दाखवतो. खरे पाहिले तर ते वेगळे नाहीतच. ब्रह्म कार्यरत झाले की त्यालाच माया म्हटले जाते. माया म्हणजेच मूळ संकल्प. तो संकल्पच कार्यरत असतो. मायाच

सर्व क्रिया ब्रह्माच्या अधिष्ठानावर घडवून आणते व कार्य संपताच पुन्हा ब्रह्मात विलीन होते. ही लीनता, विलय पावणे म्हणजेच ब्रह्म–माया ऐक्य ते ऐक्य साधले की, नुसती निरव शांतता. तेच ब्रह्मपद. हे ऐक्य साधण्यासाठीच शेजारतीतील, ही ऐक्याची आरती –

आरती ऐक्यभावें ओवाळूं। श्रीरामा तुम्हांसि ओवाळूं।
प्रकाश स्वयंज्योति निजतेजे ओवाळूं ।।धृ।।
परमात्मा श्रीराम महामाया जानकी।
विश्रांति पावली, गजर न कीजे सेवकीं ।।१।।
स्नेह ना भाजन नाही वाती पावक।
सबाह्य अभ्यंतरीं अवघा निघोर दीपक ।।२।।
ऐक्याचिया सुमनशेजे आत्माराम रघुपति।
वाचा परूषली शब्द न बोलवे पुढती ।।३।।
राम आणि दास दोघे पहुडले रामी। दोघे पहुडले रामी।
हेही बोलावया दुजा नुरेचि धामीं ।।४।।

हे ब्रह्म–माया ऐक्य, स्वतःमधेच साधकाला साधायचे असते. सर्व वृत्ती निर्वृत्त करून, आत्मारामामधे, निर्विकल्प, निर्विकार, निर्विचार अवस्थेत जायचे असते त्यावेळी सर्व अवयवाचे कार्य थांबलेले असते. अवयवे शिथिल होतात व माया
म ह ण ज `
चैतन्याचे सर्व कार्य, त्या निजस्वरूपात विश्रांतीला जाते. मग राहतो एक दिव्य प्रकाश. तो प्रकाश पाडण्यासाठी ना तिथे असतो दिवा, ना तेल, ना तेल, ना वाती, ना अग्नि. ते स्वयं तेज आपोआप प्रकटते. मात्र ती अवस्था सांगायला शब्द ही पांगळे होतात. वाचा उमटतच नाही. निशब्द अवस्था, अनुर्वचनीय अवस्था साधकाला प्राप्त होते. साधक म्हणजे दास आत्मारामात विलिन होतो. भक्त भगवंत एक होतात. ना तिथे भक्त राहतो, असते ते एकटे एक परब्रह्म तत्व. अहं जाते, ब्रह्मच राहते. "अहं गेले ब्रह्म ठेले" अशी अपूर्व अवस्था, ही अवस्था वर्णन करायलाही तिथे दुसरे कुणीच नसते. जिकडे तिकडे ते एकच तत्व भरलेले आहे "रिता ठाव या राघवेवीण नाही" ह्याचा पूर्ण अनुभव, शब्दावीण साधक अनुभवत असतो. हीच शेजारती. सर्वत्र तेच परब्रह्म भरलेले, तेही जणू मंचकावर शांत पहुडले आहे. तोच माझा रामराजा, साकार झालेला, त्यालाच जणू सर्वांनी मंचकावर झोपण्यास, विश्रांती घेण्यास, प्रवृत्त केले आहे. शयनमंदिरातील समया, रत्नज्योतींनी प्रकाशित झालेल्या, सेवक गण (हनुमंत–जांबुवंत) पुढे उभे, जानकी मातेच्या हातात ओवाळणीचे तबक, ती ही स्तब्धावस्थेत उभी. रामरायांना अर्पिलेली पंचखाद्य खजूर, खडीसाखर इत्यादी, द्राक्षादि फळे, तो नैवैद्य, सारे तसेच ठेवून, श्रीरामराय आत्मस्वरूपी विलीन झाले. श्रीरामांची जी अवस्था तीच दासाची अवस्था. श्रीराम आत्मचिंतनात विलीन तर साधकाला लाभलेली समाधी अवस्था दोन्ही एकच, ह्याच अवस्थेत साधकाने राहावे, म्हणजे तीच सहजसमाधी होते. व पुन्हा दुसरेदिवशी पहाटे काकड आरतीने त्याला उठवले, तरी तो ह्याच सहजसमाधी अवस्थेत कार्यरत राहतो. कार्य करूनही अकर्ताभाव त्याला साधतो. श्रीरामाशी ऐक्य साधावे म्हणूनच ही शेजारती, ऐक्यारती. ह्या आरतीने दिवसाची उपासना सुफल संपन्न होते.

## ।। चौपदी ।।

रामदासी संप्रदायात सायंउपासनेत ही चौपदी नित्य गडावर, घळीत म्हणण्याची प्रथा आहे. चौपदी म्हणण्यापूर्वी 'सवाया' म्हणतात. सवाया श्रीरामप्रभू–राजामहाराज–सिंहासनाधिष्ठीत–श्रीरामापुढे म्हणण्याची पद्धत आहे. पूर्वी राजे लोकासमोर, त्यांचे भाट–चारण, राजाची स्तुती करून, कांही मागत असत. राजाची स्तुती करताना, जे कवन म्हणत, त्यात पहिला चरण, दोनदा म्हणून ती ओवी वा चरण पूर्ण करत. ४ चरणांचे कवन पहिला चरण दोनदा म्हटल्यामुळे ४ सव्वा ५ वेळा होई, म्हणून ह्या प्रकाराला सवाई– सव्वापटीने गुणगान करणे, म्हणायचे. इथे गुणगान करण्यापूर्वीच मागणे मागितले आहे. हे समर्थांचे

मागणे आहे–

तुझा भाट मी वर्णितो रामराया।
सदा सर्वदा गाय ब्रीदे सवाया।
महाराज, दे अंगीचे वस्त्र आता।
बहु जीर्ण झाली, देहबुद्धी कंथा।।

श्रीसमर्थ काय मागत आहेत? अन्नधान्य, द्रव्य, राज्य, पुत्र, असले अशाश्वत नाशिवंत, ऐहिक सुखाचे ते कांहीच मागत नाहीत. रामदासी संप्रदाय हा विरक्त विवेकी महंताचा संप्रदाय आहे. त्यामुळे त्यांची मागणी, ती ही राजाधिराज प्रभू श्रीरामरायापुढे आहे, म्हणून ती आगळी–वेगळीच आहे. ते म्हणतात, हे राजा, मी तुझा भाट म्हणजे स्तुतीपाठक आहे, राजे महाराजे, त्यांची स्तुती ऐकून, अशा भाटाना, चारणाना, कांही बिदागी, खूप खूष झाले तर अंगावरील दागिना,वस्त्र देत असत. हे राजा, मला तुझ्या अंगीचे वस्त्र हवे आहे. तुझ्या अंगीचे वस्त्र म्हणजे आत्मबुद्धी दे. माझे अंगीचे वस्त्र, म्हणजे माझी देहबुद्धी, जीवभाव, किती जुना, त्यामुळे खूप जन्म घेतले. ही देहबुद्धी खूप जीर्ण, जुनी, नऊ ठिकाणी फाटकी अशी आहे. कंथा म्हणजे अंगावरील वस्त्र, देहरुपी वस्त्र, देहबुद्धी कंथा, ही जुनी झाली आहे, म्हणून मला ती टाकायची आहे. मला नवे वस्त्र, तेही, तुझ्या अंगीचे, म्हणजे आत्मबुद्धी हवी आहे. माझी देहबुद्धी जुनी झाली तरी सुटत नाही, तू आत्मबुद्धी दिलीस तरच ही सुटेल. त्या आत्मसाठी निरनिराळ्या 'सवाया' त्या महाराजापुढे म्हटल्यावर, खालील श्लोकाने सवायाची समाप्ती होते व चौपदीची सुरवात होते. तो श्लोक असा –

तुझा भिक्षकू, दातया रामचंद्रा।
सदा स्वस्थ चिंतितसे गा महिंद्रा।
प्रजाधीश, देशा अुरपूर्ण द्यावे।
भवदैन्य हे देशधाडी करावे।।

एवढीच इच्छा आहे की, हे प्रजाधीशा, लोकाभिरामा, श्रीरामा, हे महिंद्रा, दे भूपतिरामा, राजारामा, मी सारे स्वस्थ असावे, "सर्वेन सुखिना सन्तु सर्वे सन्तु निरामयः, अवघेचि सुखी असावे" हेच चिंतन सदैव करत असतो. सर्वाना निरामय आयुष्य लाभावे, म्हणून त्यांचे दैन्य, दारिद्र्य (मानसिक, वैचारिक) दूर करून त्यांना लागलेला हा 'भवरोग', या देशातूनच दूर जाऊ दे. त्या दैन्याला देशोधडीला लाव, त्याला तडीपार कर, त्याला हद्दपार कर हीच सर्वात्मक, करूणा, इच्छा, रामदासी संप्रदायात, उपासनेचे जे प्रमुख अंग, भिक्षेवर जगणे, त्या भिक्षेमागे आहे. महंताने ५ घरी भिक्षा मागून पोट भरावे. भिक्षा मागण्याचा त्याला शास्त्राने अधिकार दिलाच आहे. जो समाजासाठी कार्य करतो, समाजाला सुयोग्य वळण देतो, त्याच्या पोटापाण्याची व्यवस्था समाजानेच करावी, अशी शास्त्राज्ञाच आहे.

पोटापुरता पसा पाहिजे, नको पिकाया पोळी।
दोणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी।।

देणाऱ्याने खूप दिले, तरी, सूपभर आणले, तरी मूठभरच, पोटापुरतेच घ्यायचे असते, ते ही अन्न स्वरूपातच, किंवा धान्य स्वरूपात. द्रव्यस्वरुपातील भिक्षा, कधीच पोटभरीची होत नाही. कारण द्रव्य शेवटी अनर्थाकडेच नेते. म्हणून आता धर्मादाय संस्थानांमधून कांही ठिकाणी भ्रष्टाचार बाहेर येतो आहे. पोट भरण्यापुरते अन्न, आत्मा तृप्त करतो तृप्तीची ढेकर देतो, वतेच बळ पुण्यमार्गे दात्याला मिळते, अशी मूळ संकल्पना आहे. म्हणून अन्नदान श्रेष्ठ मानले आहे. श्रीसमर्थ भिक्षेला कामधेनू, चिंतामणी, अमरवल्ली संबोधून "भिक्षेसारखे नाही वैभव" असे म्हणतात. आर्ततेने, प्रभूचरणी अनन्य निष्ठा ठेवून मागितलेली भिक्षाच ह्या स्वरूपाची असते. नाहीतर भिक्षापात्र अवलंबिणे जळो जिणे लाजिरवाणे असे रोखठोक उत्तर, तुकाराम महाराज म्हणतात. लाचारी, लांडीलबाडी करुन मिळवलेली भिक्षा, हेच दैन्यवाणे जिणे आहे. श्रीसमर्थ, तुकाराम, दोघांनाही अशी भिक्षा अभिप्रेतच नाही, तर प्रभूकार्यासाठी जीवन जगतांना मागितलेली निरपेक्ष भिक्षाच दोघांना अभिप्रेत आहे. समाजासाठी कार्य करणाऱ्याचे पोट, त्याचा उदरनिर्वाह समाजानेच करायचा असतो, असा धर्मनिर्णयच आहे. मुख्य अशी भिक्षा खाल्ली तर, त्या अन्नातून मिळणारी शक्ती देवकार्यासाठीच वापरली जाते. मुख्य अशा भिक्षेमुळे, उरलेसुरले, त्याचे वाटप, त्यांचा नाश वगैरे चिंताच नाही. मुख्य त्यासाठी संसार, प्रपंच मांडलाच जात नाही. रोज नवी जागा, नवे लोक, जगमित्र होता येते. बंधन

रहीत, मुक्त जीवन कंठता येते, हे मुख्य भिक्षेचे फायदे आहेत. श्रीसमर्थांनी तर भिक्षेवर स्वतंत्र समासच दासबोधात घातला आहे.

दत्त संप्रदायातही, श्रीदत्तप्रभू स्वतः भिक्षा मागतात.त्यांच्या खांद्याला झोळी आहे. कोल्हापूरला श्रीदत्तप्रभू कुठल्याही रुपात येतील म्हणून १२ वाजता, प्रत्येक घरी १२ वाजता, भिक्षा वेगळी काढून ठेवली जाते. गाणगापूरलाही 'भिक्षा' कार्यक्रम आगळावेगळ्या स्वरुपात पहायला मिळतो. तो तिथला रोजचा परिपाठ आहे. हुमणाबादला, माणिकप्रभूंच्या 'गादी' ठिकाणी, जे 'यति' कार्यरत आहेत, त्यांनी ११।। ते १२ दरम्यान भिक्षेसाठी निघावे, त्यांची भिक्षा मागून झाली की, मग दत्ताना नैवेद्य होऊन, नंतरच साऱ्यांना प्रसाद मिळतो भोजनस्वरुपाचा. श्रीशंकरजी स्वतः जोगी स्वरुपात भिक्षा मागतात. त्यामुळे त्या पद्धतिनुसार जे यति, साधू आहेत त्यांचा निर्वाहही भिक्षान्नावरच असतो.

रामदासी संप्रदायात भिक्षेला फार महत्व आहे. उपासनेचे ते एक अंग आहे. संप्रदायात भिक्षेला निघतांना प्रथम 'गणाधीश' ह्या श्लोक प्रार्थनेने सुरवात करुन, झोळी रामरायापुढे ठेवून, तिला प्रार्थना करतात, तो श्लोक असा–

नवविध भक्तिच्या कोण्ड्या दिव्य जीला।<br>
निगमवेदचारी, शोभती पक्ष जीला।<br>
म्हणवूनी विनवितो, मुक्ति देई तू दासा।<br>
शरण तुज कामधेनू – सोडी संसारपाशा।।

ह्या झोळीला, नवविधभक्तीच्या, वेगवेगळ्या कोण्ड्या म्हणजे कप्पे आहेत. म्हणजेच ह्या भिक्षेतून मला नवविधाभक्तिरुपी धान्य मिळणार आहे. धान्य एकत्र होऊ नये म्हणून तिला आत कप्पे केलेले आहेत. त्या झोळीला चार पदर, जणू वेदाचे चार पदर आहेत, व ते चारी पदर मिळून ही झोळी तयार झाली आहे. म्हणून त्या झोळीला चौपदी–चार पदराची असे म्हटले आहे. ही झोळीच आमची कामधेनू, चिंतामणी वगैरे आहे. कारण असे भक्तिरसप्रधान अन्न भक्षण केले की, भवबंधनातून आमची सुटका ह्या ज्ञानदानाच्या कार्यामुळे होऊन, आपोआपच आम्हाला मोक्ष मिळेल.

ह्या भावनेनेच, श्रीरामरायाला "तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा" ह्या श्लोकाने प्रार्थना करुन, मग सद्गुरुस्मरण म्हणजेच शुकासारिखे हा श्लोक म्हणून ही झोळी उचलायची, व भिक्षेला निघायचे, अशी वहिवाट आहे.

अशी ही झोळी, चौपदी, चारपदराची, ती श्रीसमर्थ रामरायापुढे पसरत आहेत, त्या चौपदरीला चार भाग आहेत. हे चार भाग जणू संप्रदायाचे आधारस्तंभच, त्याचेच मुख्य आचरण, सर्व साधकांनी करायचे आहे. ते चार भाग असे– १) कोमल वाचा देरे राम, ज्यातून मृदु–मधुर–वाणी मागितली, जी लोकानुरंजन व लोकसंग्रहाला अत्यंत महत्वाची आहे. २) संगीतगायन दे रे राम– समाज प्रबोधनासाठी, कीर्तन–प्रवचन हे साधन. त्यासाठ गायन, वादन, नर्तन इत्यादि नाट्यकलेतील प्रमुख कला अवगत हव्यात. कीर्तन हे एकपात्री नाटकच असते. त्यात मुद्रा, अभिनय महत्वाचे असतात. ३) पावन भिक्षा दे रे राम – महंताचा चरितार्थ भिक्षेवरच आहे तसेच मठातील उत्सवही भिक्षेवरच चालणार, म्हणून ती पवित्रच हवी. अशा पावन भिक्षेमुळेच महंत स्वतः व श्रोते, शिष्य आदि परमेश्वराचे श्रेष्ठ उपासक होऊन भक्त होतील. जो विभक्त नाही तो भक्त. देवाशी जो जोडला गेला आहे. असा ब्रह्मानुभवी, अनन्यसेवक तयार व्हावा, वरील तिन्ही गुण अंगी येण्यासाठी अधिष्ठान पक्के हवे. ते म्हणजे रामकथा. ती रामकथा जनमानसात रुजवण्यासाठी चौथा पदर "श्रीरामनामावली" आहे. "सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जे करील त्यचे, परंतु तेथे भगवंताचे, अधिष्ठान पाहिजे". भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय , चळवळीला, कार्याला, यश येणार नाही, म्हणून रघुनाथ उपासना हा चौपदीचा चौथा पदर आहे, अशी त्या चौपदीची थोडक्यात माहिती.

प्रत्येक रामदासी साधकाने हे आचरणात आणायचे आहे, त्यासाठी प्रथम, पहिले रामदास 'श्रीशंकरजी' स्वतःचा अनुभव सांगत आहेत, तो ही आपल्या प्रिय पत्नीला, पार्वतीला सांगत आहेत की, हनुमंत स्वरुपात मला हे रामरहस्य, गुह्यज्ञान कळाले. वाल्मिकीने रामायण रचले, त्याची वाटणी करतांना अनुष्टुप छंदातील ३२ अक्षरांची मी त्रैलोक्यात समान वाटणी ३० अक्षरांची झाली व उरली २ अक्षरे. तेच 'राम' शब्द मी प्रसाद म्हणून सेवन केली. त्यामुळे मी जे समुद्रमंथनात उत्पन्न झालेले विष प्राशन केले होते, तो विषदाह एकदम शांत झाला. इतके हे राम रसायन प्रभावी आहे. भव विषशमनासाठी हे रामनामच उत्तम उपाय आहे. ते मी कंठातच ठेवले आहे. तुम्ही पण कंठातच म्हणजे मध्यमेतच हे रामनाम सतत ठेवा. मध्यमेत ठेवण्याचे कारण भवविष जर ओठी आले तर भांडणे होतीलल, पोटात गेले तर मत्सर, द्वेष उत्पन्न होतो. कंठात

रामनाम असले की, मौनावस्था प्राप्त होऊन , आपोआप शांती मिळेल. श्रीशंकरजींचा स्वानुभव विष पचवण्याचा आहे. साधकानीही भवविष शमविण्यासाठी हा प्रयोग अवश्य करावा. ते कृतार्थ झाले. तशी कृतार्थता साधकाला ह्या श्रीरामनामाने निश्चित मिळेल, म्हणून श्रीराम राम हे म्हणा. हे पद सायं प्रार्थनेत शेवटी म्हणून ती उपासना संपन्न होते. अशी ही 'सायंउपासना साखळी' समजावून घेऊ.

ह्या सायंउपासनेतील "चौपदी" हा भाग आपण विवरणाला घेत आहोत. तुझा भिक्षकू हा श्लोक म्हणून, रामरायापुढे, ही चौपदी पसरून भिक्षुक उभा आहे. त्यातील पहिला पदर– "कोमल वाचा" हा अभंग आहे.

कोमल वाचा दे रे राम – विमल करणी दे रे राम।।धृ।।

प्रसंग ओळखी दे रे राम – धूर्तकळा मज दे रे राम।

हीतकारक दे रे राम – जनसुख कारक दे रे राम।

अंतरपारखी दे रे राम – बहुजन मैत्री दे रे राम।

विद्यावैभव दे रे राम – उदासिनता दे रे राम।

मागोनेणे दे रे राम – मज न कळे ते दे रे राम।

तुझी आवडी दे रे राम – दास म्हणे मज दे रे राम।

सहा चरणांचा हा अभंग आहे, सुरवातीचेच मागणे आहे की, हे रामा, मला मृदु–मधुर–कोमल वाचा दे. संभाषणातूनच लोकमानस लोकसंग्रह साधायचा असतो. भिक्षामिसे दारी उभे राहिल्यावर, वाचा, वाणी नम्रच हवी. कर्कश मोठ्याने वोलले तर, लोकांना आवडत नाही. म्हणून आर्जव हवे. ऋजुता हवी. आर्जव, ऋजुता, ही मृदु–मधूर वाणीनेच उदधृत करता येते. भाषेचे प्रकार जाणून घ्यायला हवेत! ही गोड वाणी कशाकरिता हवी? माझ्या हातून विमलकरणी – शुद्ध क्रिया होण्यासाठी.माझ्या हातून शुद्ध–पवित्र असेच कर्म घडू दे. ज्या कर्मानुसार कोणीही दुखावला जाणार नाही, अशी सत्याधिष्ठित क्रिया म्हणजे विमल करणी. त्या करणीतून जनतेचे, माझे स्वतःचे हीतच घडेल.

शुद्धक्रिया होण्यासाठी–बोलण्यापूर्वी प्रसंगावधान हवेच. एखाद्या घरांत आनंदी वातावरण आहे, ते वृद्धींगत व्हावे, त्या घरातील सर्वांना आनंद मिळावा, अशीच वाणी–उच्चार हवेत. किंवा एखाद्या घरात दुःखद घटना घडली असेल, तर आपल्या बोलण्याने त्यांना धीर दिलासा मिळावा,त्यांची चिंता काळजी दूर व्हावी, असे उद्गार निघाले पाहिजेत. ह्यासाठी सर्वप्रथम कोणता प्रसंग आहे? ह्याचे भान येण्यासाठी, तो प्रसंग ओळखता आला पाहिजे. असे प्रसंगावधान हवेच. तेच मागणे पुढे आहे– प्रसंग ओळखी दे रे राम।

प्रसंग ओळखण्यासाठी, अंगी चातुर्य हवे. तेवढी धूर्तता हवीच. धूर्तकळा म्हणजे चातुर्य. अत्यंत चतुरतेने समोरच्या व्यक्तिचे अंतरंग ओळखता आले पाहिजे. माणसाची नजर व त्याचा चेहरा हा आरसा आहे. त्यांच्या हालचालीतूनच हे गुज कळू शकते. ९०% माणसाच्या चेहऱ्यावरून अंदाज बांधता येतो. एखादाच असा असतो की, काहीच थांगपत्ता लागू देणार नाही. मनुष्याच्या चेहऱ्यावरुन, नजरेवरुन अंदाज करीत त्याच्या हिताचेच बोलणे माझ्याकडून व्हावे, म्हणून पुढे म्हटले आहे, हीतकारक दे रे राम जनसुखकारक दे रे राम, अंतरपारखी दे रे राम, समोरील व्यक्तिचे हीत साधत त्याला सुख होईल, अशी बोली माझ्याकडून वदवण्यासाठी , मला त्याच्या अंतराची, मनाची उकल करण्याची कला प्रथम साधायला हवी. ते प्रसंगावधान, धूर्तकला, हीतकारक बोलणे, सारे अंतरंग मला उलगडता आले तरच साधेल.

प.दा.अ. चा प्रचार करताना, एकदा एक बाई, माझ्याकडे आल्या त्यांच्या स्वाध्यायातील कांही कागदट गहाळ झाले, कुठे पडले, हे त्यानाच कळाले नाही. स्वाध्याय पाहताच ते लक्षात आले. मला त्यांच्या घरची कांहीच माहिती नव्हती, मी म्हटले, अहो, पुन्हा लिहून द्या स्वाध्याय, होते असे कधी कधी, मुले हात लावतात, ती कागद इकडे तिकडे टाकतात, राहू द्या. पुनः लिहा तेवढाच तुमचा अभ्यास होईल. मी असे म्हणताच, त्या रडूच लागल्या. मला म्हणाल्या, अहे, मला मूलबाळ नाही, मी दुःखी आहे, म्हणूनच मन इकडे लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांचे दुःख बाहेर आले. त्याबाबत सांत्वनाचे चार शब्द त्यांच्याशी बोलले. त्यांचे हीत साधले गेले. असो थोडक्यात प्रसंगमान ओळखता आले पाहिजे. बोलण्यामुळे बहुजनाची मैत्री होते. जगमित्र बनता येते. म्हणून मागणे आहे, बहुजन मैत्री दे रे राम। पुढचा चरण "विद्या वैभव दे रे राम। उदासिनता दे रे राम।।"

विद्या वैभव असले की, उत्तम भाषाप्रभुत्वाने जगावर छाप पडून जग जिंकता येईल, असे समजू नये. समर्थ म्हणतात– "विद्या उदंडचि शिकला प्रसंगमान चुकतचि गेला, तरी मग त्या विद्येला काय म्हणावे?" विद्यावैभव मिळाले, तरी त्याबद्दल गर्व, ताठा नसावा. वृत्ति उदासिन म्हणजे नेहमी भगवंतचरणीच लीन असावी. उदासिनता दे रे राम. प्रभुचरणी वृत्ती लीन असली की, तोंडातून दंभ–दर्पयुक्त शब्द येणारच नाहीत. श्रीसमर्थ सोप्या भाषेत सांगतात. अरे म्हटले की कारे असेच उत्तर येईल. अहो म्हटले की काय हो? असे बोलण्यासारखेच उत्तर येते. तरी मग वाईट बोलावे, काय निमित्य" अशीच समर्थांची कळकळीची वाणी आहे. कठोर कर्कश, कर्णबधिर अशी भाषाच नसावी.

भगवंतावर निष्ठा असली की, कांही मागण्याची, हवेहवेसे वाटण्याची बुद्धी होणारच नाही. म्हणून पुढे म्हणतात– तुझी आवडी दे रे राम मागो नेणे दे रे राम, मज न कळे ते दे रे राम. मला माझ्याकरिता असे कांही हवे, ही वृत्तीच नसावी. मी मागतो आहे, ते जनसेवेसाठी. म्हणून मला 'मज न कळे' ते आत्मज्ञान दे. मला कळत नाही, मी अज्ञानी आहे एवढे ज्ञान तू आम्हाला दिलेच आहेस, मी अज्ञानी आहे, मला आत्मज्ञानी कर. तुझी भक्ती माझ्या हृदयात चिरंतन राहू दे. तुझे नाम साऱ्यांनी घ्यावे साऱ्यानी सुखी असावे, हीच ईच्छा धरून, मी भिक्षा मागतो आहे. मला त्यासाठीच मृदु–मधुर–कोमल वाणी, प्रसंग ओळखी, व चातुर्य हवे आहे. दासबोधात वाणीवर, चातुर्यावर, प्रसंगमान कसे ओळखायचे? ह्यावर विस्तृत विवेचन आहे. समासामधून त्यावर स्पष्ट विवेचन आहेच. ते समास अभ्यासल्यावर समर्थानी "आधी केले मग सांगितले" हे सिद्ध होते. समर्थ संप्रदाय वाढवायचा असेल तर प्रथम सूत्र आहे– कोमल वाचा. 'मुख मे राम बगलमे छुरी' नको. म्हणून पुढील सूत्र त्याला लगेच जोडून आहे. विमलकरणी दे रे राम. कार्य करतांना हेतू शुद्धच हवा. हेतू शुद्ध असेल तरच कार्य सिद्धीस जाते.

समर्थानी अशी भिक्षामिसे घरांची घरे, म्हणजे त्यातील माणसे शोधली. त्यांना आपल्या कोमल–मृदु वाणीने दिलासा दिला. सन्मार्गाला लावले. छत्रपतिंच्या स्वराज्य कार्याला, गुप्तपणे असा हातभार लावला. साऱ्या भारतभर मठांचे जाळे पसरवले. भिक्षामिसे हिंडून मिळालेली, गुणी बालके, असहाय विधवा ह्यांना तर महंतपदी नेऊन बसवले. हे सारे ह्या, पहिल्या पदरातून गुणी माणसे महंतपदी आरूढ झाली, व समर्थ व छत्रपतिच्या निर्याणानन्तरही, २७ वर्षे निर्नायक स्थितीत राष्ट्र असतांना, त्यांचे मार्गदर्शन ह्याच महंताच्या कार्यामुळे झाले. ते ह्या झोळीच्या चार पदराद्वारेच.

दुसरा पदर आहे– संगीत गायन दे रे राम.

संगीत गायन दे रे राम – आलाप गोडी दे रे राम।।धृ।।
धातमाता दे रे राम – अनेक धाटी दे रे राम।।१।।
रसाळ मुद्रा दे रे राम – जाड कथा मज दे रे राम।।२।।
दस्तक टाळी दे रे राम – नृत्यकला मज दे रे राम।।३।।
प्रबंध सरळी दे रे राम – शब्द मनोहर दे रे राम।।४।।
सावधपण मज दे रे राम – बहुत पाठांतर दे रे राम।।५।।
दास म्हणे रे सद्‌गुण धाम – उत्तमगुण मज दे रे राम।।६।।

हा ही अभंग ६ चरणाचा आहे. संप्रदायाचा 'कीर्तन' हा महत्वाचा खांब आहे. मठात दररोज देवापुढे कीर्तन वा प्रवचन झालेच पाहिजे असा नियम होता. कीर्तन, प्रवचनामुळे श्रवणासाठी मठात लोक येत असत. पर्वकाळी, उत्सवात, निमित्ताने मठात कीर्तन हमखास व्हायचेच. कीर्तन हे समाज प्रबोधनाचे मुख्य अंग आहे. ती कला आजतागायत चालूच आहे. कीर्तनाला अजुनही लोक आवर्जून येतात. कीर्तनात गायन महत्वाचे. गायनात ताल सर, वाद्ये यांचे ज्ञान हवेच.

गीत एकट्याने म्हणता येते. भजनही आपण एकटे करु शकतो. तिथे दुजा लागत नाही. पण कीर्तनासाठी श्रोता हवाच. श्रोता–वक्ता–श्रीराम रंगी रंगला, दोघे एक विचाराचे असले की, कीर्तन रंगात येते. म्हणून कीर्तन रंगावे म्हणून "श्रोता–वक्ता–श्रीराम–समर्थ" म्हणण्याची प्रथा कीर्तनात सुरवातीलाच असते.

कीर्तनाला टाळ, मृदंग, वीणा, पेटी, तबला ही कमीत कमी वाद्ये लागतातच. वाद्यवृंदमेळा मिळुनच संगीत तयार होते.संगीतातील प्रमुख अंग गायन, गायनासाठी स्वरज्ञान हवे. गायन तालबद्ध, सुस्वर व मुख्य लयीत हवे. म्हणजेच स्वर–ताल–लय हे गाण्याच्या प्रमुख भागाचे थोडे बहुत तरी ज्ञान कीर्तनकाराला हवे. त्यासाठी गाण्यातील सप्तस्वर, कोमल, तीव्र

मिळून १२ स्वर, पुनः मंद्र, मध्य, तार ह्या सप्रकाची जुजवी माहिती त्याला पाहिजेच. कारण कीर्तनातील पदांची बांधणी ह्या सुरातूनच करावी लागते. आलापताना घेऊन गायन रंगवता, खुलवता येते. संगीताला, कीर्तनाला, एकापेक्षा जास्त हवेत. पेटी, तबला, टाळकरीसह खुद्द कीर्तनकार असे कमीतकमी ४ लोक तरी हवेतच. वारकरी संप्रदायात मृदंगवादक, वीणावादक व टाळकरी हे मुख्य कीर्तनकारासह असतातच.

कीर्तन हे त्यावेळचे प्रबोधनाचे मुख्यअंग म्हणून समर्थांनी मागणे मागितले आहे. संगीतगायन दे रे राम– कीर्तनकाराचा आवाज गोड–मधूर–रसाळ असला की, कथेला रंगत येते. संगीतीमध्ये आलाप ताना महत्वाच्या. म्हणून दुसरा चरण आहे,– आलापगोडी दे रे राम. आलाप तानामुळे ते पद, तो राग छान आळवता येतो. त्याला तालाची उत्तम साथ हवी. तालाचे सुयोग्य ज्ञान हवे. म्हणून पुढचा चरण आहे – धातमाता दे रे राम. तबल्यातील ताल, त्रिताल, एकताल, झपताल, केरवा, रुपक, ह्यांच्या मात्रा ठरलेल्या आहेत. त्यांचे ज्ञान हवेच. धातमाता शब्दाचा अर्थ असा आहे की, 'धात' म्हणजे प्राचीन–पुराणातील, वेदकाळातील कथा, तर मात म्हणजे ऐतिहासिक, सत्यकथा, बोधकथा दृष्टांतादाखल सांगत, मूळ आख्यान, कथानक सुंदर रंगवता आले पाहिजे. त्यासाठी उपनिषदे, गीता, भागवत, रामायण आदिंचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे.

पुढचा चरण आहे, अनेक धाटी दे रे राम– धाटी म्हणजे पद्धत पदे, दोहे, आर्या, श्लोक म्हणण्याची विशिष्ठ पद्धत असते. त्या अनेक पद्धतीचे ज्ञान हवे. 'आर्या' म्हणण्याच्याही दोन वागवेगळ्या पद्धती आहेत. तसेच तराणा, पोवाडा, फटका म्हणण्याची लकब वेगवेगळी आहे. पदाच्या त्या रागातील बांधणीतूनही. तो राग म्हणण्याचा 'काळ' ठरलेला असतो. कांही राग सकाळी, कांही संध्याकाळी, रात्री चांगले रंगतात. कोणत्या सुरातून कोणता भाव दृग्गोचर होईल, ह्याचेही ज्ञान हवे. करुणरसासाठी आर्ततेसाठी कोमलस्वर लागतात. त्यांची योग्य निवड करता आली पाहिजे. नवरसयुक्त कथा असावी, म्हणून मुद्राही त्या रसाला पोषक अशीच हवी. मुद्राभिनगाने कथानक जास्त रंगते. कीर्तन हे एकपात्री नाटक आहे. त्यामुळे पुढचा चरण असा आहे– रसाळ मुद्रा दे रे राम – आळवणी चालू आहे अन् त्यावेळी कठोर मुद्रा केली तर काय कामाचे? म्हणून कीर्तन नवरस, नवविधाभक्तीनी, रसाळ असेच हवे.

कथा रंगवताना, ती गूढार्थाने भरलेली, बोधप्रद असेल तरच जनमानसात भक्तीचा त्यागाचा ठसा बिंबवता येतो. प्रबोधन उत्तम होते म्हणून पुढचा चरण आहे– जाड कथा मज दे रे राम. अशा गूढार्थाच्या कथा रंगवून उकल करण्याचे ज्ञान मला दे. कथा रंगवताना मधून मधून सामुदायिक भजनही घ्यावे लागते. त्यासाठी पुढचा चरण आहे– दस्तक–टाळी दे रे राम– दस्त म्हणजे हात. हाताने टाळी वाजवून भजनाचा गजर करणे. स्वतः टाळ्या वाजवायच्या, श्रोत्यानाही वाजवायला लावायच्या. टाळ्याचा कडकडात व भजनाचा गजर ह्यामुळे वातावरण निर्मिती होते. जणू देवच अवतरला इतके भक्तिमय वातावरण निर्माण होते. इतकी तल्लीनता येते, ऐक्य निर्माण होते की, श्रोते व मुख्य कीर्तनकारही नाचू लागतो. लहान मुलावर असा वातावरणचा परिणाम चटकन होतो. ते सहज नाचू लागते, तालही धरते, म्हणून पुढचा चरण आहे– नृत्यकला मज दे रे राम. कथेकऱ्याच्या पायात घुंगरु असतात. उद्धवस्वामीच्या कथेत स्वतः मारुतीराय तल्लीन होऊन नाचत असत. नामदेवाच्या कीर्तनात पांडुरंग प्रत्यक्षच नाचत असत. इतके भक्तिरसपूर्ण त्यांचे कीर्तन होई. श्रोता इतका तल्लीन होऊन बसला की, उठतच नसे. अलिकडच्या काळात अशी तल्लीनता, देगलूरकर, बाबामहाराज सातारकर, आफळेबुवा, मकरंदबुवा , रमेशबुवा असी नामावलीच देता येईल. त्यांच्या कीर्तनाला अफाट जनसमुदाय असतो. त्याचे कारण त्यांची कथा मांडण्याची, सांगण्याची पद्धत शब्दरचना अत्यंत मनोहारी, मनाचा ठाव घेणारी, असून अतिशय सोपी साधी रचना. शब्दोच्चारात अत्यंत सावधपणा, प्रसंगावधान, मधून मधून माफक विनोदाची झालर असते. त्यानुसारच पुढील चरणात प्रबंधसरळी, शब्दमनोहर, सावधपण हे शब्द योजले आहेत.

कीर्तनकाराला पाठांतर हवेच. तिथे कागद समोर ठेवून गाता वा सांगता येत नाही. म्हणून बहुत पाठातर हा शब्द आहे. मुख्य तो भाग वेळेवर आठवला पाहिजे. पाठांतर आहे, पण वेळेवर आठवलेच नाहीतर तर फजिती होते. पाठांतर हवेच, पण ते प्रसंगी आठवून, त्या रसाला पोषक आशा आवाजात ती सब्दफेक साधली, तरच कथा रंगते. नाहीतर रटाळ वाटते. हे सर्व सद्‌गुण आहेत. कीर्तनकाराला ते हवेतच श्रीराम तर 'अगणित गुणखण' असे आहेत. अनेक गुणांची खाण असलेल्या हे श्रीरामा, संगीताला पोषक असे सर्व सद्‌गुण, मला हे रामा, तू द्यावेस.

दासबोधात कीर्तन लक्षणाचे पाच–सहा स्वतंत्र समास आहेत. कीर्तन कसे करावे? ह्याचा उत्तम पाठ, क ते ज्ञ

पर्यंतच्या बाराखडीतून शब्दमाधुर्याची बरसात करीत, त्यांनी किती हसत हसत हा पाठ दिला आहे. कीर्तनाला साधक, बाधक दोन्ही गोष्टीचे मार्गदर्शन त्यात आहे.

आता संगीत शब्दाचा गूढार्थ पाहूया. दासबोधात "संगीत केला तरी तो व्याप–नाहीतर अवघा संताप" असे वचन आहे. संगीतामध्ये जसा वाद्यमेळाचा सुसंवादच लागतो. एखादे वाद्य बेसूर झाले, तर ते मूळ स्वराशी लावून घ्यावे लागते, तसे राजकारणात, कार्यात, सर्वांची मने जुळालेलीच हवीत. सर्वांच्या मनाच्या तारा जुळालेल्याच हव्यात, तरच ते कार्य निर्विघ्न होते. एकाच्याही मनाचा कौल वेगळा आला तर कार्य अपयशी होते. त्याला फाटे फुटतात, व जुळणी करायला कष्ट पडतात. संगीतात जसे वादी–संवादी सूर असतात, त्यांना महत्व देऊनच तो राग आळवावा लागतो, राग विस्तार त्यामुळे उत्तम होतो. तसेच कार्यातही सर्वाना समान वागणूक देऊन चालत नाही. मने सर्वांची सांभाळायची, पण ज्याचा जसा अधिकार, कुवत तसेच काम त्याला सांगावे लागते. संगीतात जसे कांही स्वर वर्ज असतात, ते गाळूनच तो राग आळवावा लागतो, तसे कार्यात काहींना वगळावे लागते, तरच तो व्याप योग्य होतो. म्हणून तिथे "असंगीत चालला तरी तो व्याप" असा शब्द घेतला आहे. ते संगीतही श्रीसमर्थांना राजकारणासाठी हवे आहे.

सुगृहीणीच्या तोंडी सुद्धा, स्वयंपाकासाठी 'संगीत' शब्द येतो. आज कसा " साग्रसंगीत स्वयंपाक झाला." म्हणजे षड्‌रस पक्वान्नानी युक्त, चटणी, कोशिंबीर, भजे, वडे, दोन्ही प्रकारच्या भाज्या, मुख्य पक्वान्न, भातांचे प्रकार, पोळ्यांच्या प्रकारानी ताट सजवले जाते. असे ताट पाहूनच मन प्रसन्न होते. चार घास जेवण जास्त जाते. इथे 'संगीत' म्हणजे सर्व रसयुक्त, मिष्टान्नाचे इष्ट भोजन असा व्यापक अर्थ, संगीत शब्दाचा होतो. समाजही असाच असावा. सर्वांची एकजूट, "अनेकी सदा येक देवासी पाहे" अनेक रसाचे, गुणाचे पदार्थ जसे ह्या ताटात एकत्र आले आहेत, तसा सर्व जनसमुदाय एकत्र व्हावा, संगीतात जसा, सर्व स्वरांशी सुसंवाद साधून स्वर मिळणी असते, तसा एक दिलाचा समाज असावा अशी व्यापक, विशाल मागणी इथे आहे.

भजनात, गायनात, कीर्तनात, अनेक मतांचे लोक, केवळ ईश्वर भक्तीच्या एका धाग्याने एकत्र आलेले असतात. ते एकत्र येतात, भजनानंद लुटतात, आगळे वेगळे आत्मसुख अनुभवतात तसे सुख सर्वाना मिळावे, हीच ह्या मागण्यामागची खरी तळमळ आहे.

आता तिसरा पदर आहे– पावन भिक्षा दे रे राम.

पावनभिक्षा दे रे राम – दीनदयाळा दे रे राम। ।।धृ।।<br>
अभेदभक्ती दे रे राम – आत्मनिवेदन दे रे राम। ।।१।।<br>
तद्रूपता मज दे रे राम – अर्थारोहण दे रे राम। ।।२।।<br>
सज्जनसंगती दे रे राम – अलिप्तपण मज दे रे राम। ।।३।।<br>
ब्रह्म अनुभव दे रे राम – अनन्यसेवा दे रे राम। ।।४।।<br>
मजवीण तू मज दे रे राम – दास म्हणे मज दे रे राम। ।।५।।

श्रीसमर्थाना भिक्षा तर हवी आहे, पण ती पावन भिक्षा हवी आहे. "महाराज,दे अंगीचे वस्त्र आता" ही मुख्य मागणी आहे. आत्मस्थिती, आत्मबुद्धी हवी आहे. भिक्षेला निघताना झोळीची पूजा झाली आहे. ती झोळी कशी आहे? नवविधा भक्तीचे तिला कप्पे आहेत, आगम–निमण–चारीवेद उपनिषदे, वेदान्ताचे चार पदर तिला आहेत, ह्या ज्ञानाच्या सहाय्याने मुक्तिप्रत जायचे आहे. तुझ्या अंगीचे वस्त्र दे, आत्मबुद्धी दे, ही मुख्य मागणी आहे. आमची देहबुद्धी–कंथा–जुनी, जर्जर, फाटकी आहे. तिला नऊ ठिकाणी भोके आहेत. आमच्या देहरुपी वस्त्राला नऊ द्वारे आहेत. त्यांना ठिगळे लावल्याशिवाय, ती सलग दिसणार नाही. त्यासाठी अति कष्ट सोसावे लागतील. ज्ञानेश्वर माऊली म्हणते, भगवंतालाच विचारते, "देवा, तुझी घोंगडी चांगली–आम्हास कां दिली वांगली". आमची घोंगडी–फाटकी–नऊ ठिकाणी – भोके असलेली, नवद्वारातून बुद्धी सतत विषयाकडे, बाहेरच धावते. ती अंतर्मुख होतच नाही. नऊ ठिकाणी दगा देणारी आहे. वृत्ती सदा बाहेरच विहार करतात. विषयच धांडोळतात. त्यामुळे भेदवृत्तीच उत्पन्न होते. विषय सेवनात नित्य द्वंद्व, द्वैत असतेच. विषयचिंतन न होता, भगवत्–चिंतन व्हावे, म्हणून प्रथम तुझी करुणा भाकतो. कारण तू दीनाच्या बाबतीत अत्यंत दयाळू आहेस. तू अनाथनाथ आहेस. पतितपावन आहेस. दृश्य जगाला सत्य मानून, आम्ही त्यात रमणारे, पोटापाण्यासाठी, जीवन जगण्यासाठी, ह्या दृष्य

जगातूनच 'अन्न' भक्ष मिळवणार आहोत. नुसते पोटासाठीच पावन–भिक्षा, पवित्र भिक्षा समर्थ मागत नाहीत. प्रत्येक इंद्रियाला त्याचा त्याचा भोग लागतोच, तो ही पावन असावा. डोळ्यानीच चांगलेच पहावे, कानानी चांगलेच ऐकावे, नाकानी चांगलीच हवा आत घ्यावी, प्रत्येक इंद्रियाची–भूक–भिक्षा–वेगळी आहे. तुझी भक्तीच आम्हाला ही पावन भिक्षा देईल. तुझ्याशिवाय आम्हाला कुणी नाही, कुणाचा आधार नाही, म्हणजे जे आम्हाला भिक्षा देतील, ते ती तुझ्यासारखेच पवित्र, पावन आहेत, अशी आमची धारणा झाली पाहिजे.

जो भिक्षा घालतो, त्यातील त्याचे पाप–पुण्याचा वाटा, भिक्षा घेणाऱ्यालाही दानरुपाने मिळतो. घेणाऱ्याला ते भोगावेच लागते. म्हणून जी भिक्षा मिळेल, ती तुझ्यासारखीच पावन–पवित्र हवी, ह्यासाठी पावन–भिक्षा हा शब्द आहे. दृश्य जगतात–भिक्षेकऱ्याने, जरी दात्याला श्रीराम स्वरुपात मानले, तरी त्याची 'भेददृष्टी' नाहीशी झाली, अशी कल्पना असली, तरी ती भिक्षा पावनच करून घ्यावी लागते. म्हणजे अन्नाची भिक्षा असली, तर गंगेत (नदीत,पाण्यात) बुडवून ती रसहीन करावी, असा नियम आहे. कलीयुगी 'अन्नमय' प्राण असल्यामुळे त्यांत अन्नाच्या मागील वासनेमुळे त्रास होतो, तो असे रसहीन भिक्षा करून घालवला जातो. आज देवस्थानातून जो भ्रष्टाचार दिसतो, त्यामागे देवस्थानला मिळत असलेली धान्य स्वरुपात, द्रव्य स्वरुपातील भिक्षा, ही शुद्ध भावाने दिलेली असते, ह्याची खात्री नाही. पैशाला काळ्या धंद्याचे सावट असतेच. म्हणून त्याठिकाणी तशी प्रवृत्ती निर्माण होत असावी.

इथे मला माझ्या गुरुमहाराजाकडील 'दत्त यज्ञाची' आठवण आली. यज्ञ सर्वांचा म्हणून साऱ्याकडून १–१ रुपया वर्गणी घेऊन, यज्ञाला हातभार लावावा, ह्या सदिच्छेपोटी वर्गणी गोळा करणे सुरु झाले. घरोघरी जाऊन, कार्यकर्ते सांगत, व त्या घरातील व्यक्तीचे नांव व पुढे वर्गणीचा आकडा असे कार्य सुरु झाले. एका घरी गेले असता, माझा यज्ञावर विश्वास नाही, पण तुम्ही आला आहात, म्हणून वर्गणी देते, असे त्या बाई म्हणाल्या. मी वर्गणी घेतली, ते पैसे बाजूला ठेवले. महाराजाच्या कानांवर ही हकीगत घातली. ते पैसे बाजूला ठेवण्यात आले. पुढे यज्ञ यथासांग उत्तम पार पडला.नंतर महाराजानी ज्यांनी ज्यांनी मदत केली, त्या सर्वाना श्रमभोजनास बोलावले. त्या बाईना पण निमंत्रण दिले, त्या आल्या. जेवणाचा थाट पाहून म्हणाल्या, अहो आम्ही तर एक रुपयाच दिला. पण महाराजानी ५ रु. चे हे ताट आम्हाला प्रसादादाखल दिले. तिने प्रसादाची किंमतही बोलून दाखवली. मात्र मनोमन खजीलही झाली होती. अशी माणसे असतात. त्यांना न दुखवता कार्य करावे लागते. पण दान देण्यामागे शुद्ध हेतू नसेल तर ते सर्व व्यर्थच जाते. दानामागेही हेतू शुद्ध असावा. सत्पुरुष अशांची भिक्षाही स्विकारुन, त्यांना पावन करतात. श्रीसमर्थांच्या अंगावर 'पोतेरे' फेकण्याची गोष्ट प्रसिद्धच आहे. समर्थानी ती भिक्षा स्वरुपात स्विकारली, ते पोतेरे स्वच्छ केले. त्याचे काकडे केले. रामरायाला त्यानी ओवाळले व इकडे त्या बाईचे मन शुद्ध झाले. तिच्यावर आलेली आपत्ती समर्थकृपेने दूर झाली. ती समर्थांची निस्सीम भक्त झाली. नव्हे नव्हे पुढे महंतपदी पोचली. व तिने इतराना पावन केले. पोतेऱ्याच्या स्वरुपात, संसारात लिडबिडलेली ती स्त्रीतिच्या जीवनाचे सार्थक झाले. भिक्षामिसे हिंडून श्रीसमर्थांनी, जनहृदयातील 'राम' जागृत केला. व परकीय सत्ता असताना, त्यांनी चाफळला श्रीराममंदीर स्थापना लीलया केली. आज स्वराज्य मिळाले आहे, तरी आपल्याला अयोध्येला, रामजन्मभूमीत मंदीर बांधणे अवघड जाते आहे. याचे कारण हेच, जनहृदयातील 'राम' जागृतच होत नाही. असो.

असाच आणखी एक प्रसंग. एक गृहस्थ होते. धार्मिक विचारांचे, परमार्थ मार्गात कार्य करणारे, एका संस्थेचे अध्यक्ष. त्या संस्थेमार्फत, गीता उपनिषदे ह्यावर श्रेष्ठ संतांची प्रवचने आयोजली जात. भव्य प्रमाणात कार्यक्रम होत असत. शुद्ध हेतूनेच सारे कार्यरत होते. अशा कार्यक्रमाला पैसाही मिळत असे. एका अत्यंत भ्रष्टाचारी पुढाऱ्याने ह्या संस्थेला देणगी देण्याचे कबूल केले. हा पैसा घ्यावा की नाही? ह्यावर खूप वादविवाद चर्चा झाली. लक्ष्मी कोणत्याही मार्गाने येवो, ती शुद्धच असते, असा दावा करणाऱ्यांच्या बाजूने मत झुकू लागलेले पहाताच, त्या गृहस्थानी सरळ राजीनामा दिला. पुढे कांही दिवसांनी ती संस्थाही खिळखिळी झाली. तिचे कार्यच मंदावले. आपण आजकाल पहातो, उत्सव धुमधडाक्यात होतात, पण त्यामागील हेतू शुद्ध असतो कां? ती 'पावन भिक्षा' होईल कां? धर्माबद्दल जनमानसात जी नावड, अनुत्साह, दिसतो त्यामागे हे ही एक कारण आहे. भगवंताचे खरे 'दर्शन' त्यात नसतेच. ते प्रदर्शनच असते. सात्विकवृत्तीचे लोक त्यात भागच घेत नाहीत. सारा रज–तमोगुणचा धिंगाणाच असतो. समाजात बोटावर मोजण्याइतके चांगले कार्यक्रम पहायला मिळतात. बाकी सारा धिंगाणाच. प्रदर्शनच जास्त. असो.

हा सारा काळाचा महिमा आहे. समाजात खरी जागृती, तळमळ अनन्यनिष्ठा, श्रद्धा ह्यावरच अवलंबून आहे. त्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी लागते. एकदा एकावर संपूर्ण विश्वास टाकला, तर त्याच्यासाठी जीव देण्याचीही तयारी हवी. समर्थांना अभिप्रेत असलेली भिक्षा, त्यामागचे ध्येयनिष्ठ लोक, त्यांच्यामध्ये अभेदभक्ती म्हणजे, एका परमेश्वराशिवाय इतर सर्व व्यर्थ असा भाव, समर्फण भावनेतून, आत्मनिवेदनातून देणारी अशी अभिप्रेत आहे. भगवंताशी तादाम्यता पावलेल्या साधू, संताकडूनच असे अलौकिक कार्य होऊ शकते, श्रीसमर्थ, शेगावीचे गजानन महाराज, शिर्डीचे साईनाथ, आजचे किशोरजी व्यास, श्रीशंकर अभ्यंकर,देगलूरकर महाराज आदि मंडळी पाहिली की, माथा त्यांच्या चरणी चटकन झुकला जातो.

माझ्या पहाण्यातही अशा दोन व्यक्ती आहेत. लातूर येथे श्रीसमर्थ राममंदीर बांधणारे, तेथील कार्याला मार्गदर्शन करणारे, अगदी लहान वयाचे असे श्री. पद्मनाभ व्यास, स्वतः वारकरी पंथाची दिक्षा (भानुदास दगलूरकर महाराजांचे शिष्य) घेतलेली असूनही रामदासी पंथाचा धडाडीने प्रचार करणारे, अहोरात्र मेहनत करत आहेत. त्यांचे कार्य पाहून खूपच कौतुक वाटते. तसेच गेली ३० वर्षे मी ज्यांच्या सहवासात आहे, ते श्री. सुनीलजी चिंचोलकर समर्थ संप्रदायासाठी जीवापाड कष्ट करत आहेत. रामदासी संप्रदायाची ही चारही अंगे ते जगून दाखवत आहेत. मृदु–मधुर–हृदयाचा ठाव घेणारी वाणी आहे, सारा महाराष्ट्र, भारत, नव्हे परदेशातही प्रवचने देऊन भक्तीमार्गाची कणखर वाट तरुणांना दाखवत आहेत. निस्पृहता इतकी, की मिळालेले धन जिथल्या तिथे वाटून तेही योग्य व्यक्तीच्या पालनपोषणानिमित्त खर्ची पडेल असे बघून, ते पुढची वाटचाल धरतात. रामकृष्ण मठ पुणे येथे गेली १८–२० वर्षे त्यांची प्रवचने श्रावणात होतात. त्याचे मानधन ते निस्पृहपणे मठालाच देऊन टाकतात. अत्यंत साधी रहाणी. किती तरी तरूण, त्यांच्या मार्गदर्शनाकरिता उत्सुक, पण कुठेही "श्रीगुरु" म्हणून मिरवणे नाही, गाजावाजा नाही, डामडौल नाही. अशा व्यक्ति पाहून धन्य वाटते. त्यांनी आपल्या वर्तणुकीतूनच , अभेदभक्ती, आत्मनिवेदन, तद्रुपता अर्थारोहण, हे शब्द सहज उलगडून दाखवले आहेत. शब्दरचनेशिवाय त्या शब्दांचा अर्थ, त्यांच्या वागणूकीतून कळतो. सज्जनगडावर मला श्रीसमर्थांचा सहवास घडला हेच माझे खरे धन, असे ते गौरवाने सांगतात. श्रीसमर्थांची 'सज्जनसंगती' त्यांना लाभली. व त्यातूनच त्यांचे अलौकिक 'अलिप्तपण' अनुभवायला मिळते.

इतरही असे अनेक सत्पुरुष असतील, पण अगदी जवळून ह्या २ व्यक्तींचे अलौकिक दर्शन मला होते आहे. चिंचोलकरांची प्रवचने मी ऐकते आणि पहातेही. रामाप्रती त्यांची असलेली तन्मयता, त्यांच्या मुखकमलावरील प्रसन्नतेतून स्पष्टपणे जाणवते. माझे सद्गुरु 'श्रीरामचंद्र सरस्वती' हे तर साक्षात दत्तच आहेत. दत्त अवतार असूनही, साधी एखाद्या साधकासारखी त्यांची रहाणी त्यांच्यातही, हे अलिप्तपण, ब्रह्मअनुभव, आत्मनिवेदन, तद्रुपता, हे शब्द त्यांच्या आचरणातून, वागण्यातून, बोलण्यातून, साधकाना, भक्ताना तर क्षणोक्षणी जाणवतात. दत्तजयंतीच्या उत्सवात तर, ते देहभावात नसतातच. त्यांच्यातील "रा.ना.कुलकर्णी" हा देहभाव लुप्तच झालेला असतो. ते 'दत्तगुरु'च भासतात. त्यांचा हा आविर्भाव दत्तजयंति सोहळ्यात, सारे भक्तगण अनुभवत असतात. भक्ताना जणू तीच दिवाळी दसरा आनंद–महोत्सव असतो. त्याचे ते तेज, तो सोहळा, भक्ताना पुढील वर्षापर्यंत जणू एखाद्या बॅटरी–चार्जनुसार असतो. ब्रह्मानुभव ते अनुभवतात, व त्यांची भक्तांसाठी लयलूट करतात. त्याचे कारणही हेच की, त्यांची सारी करणी, "मी केलेच नाही, भगवंतच सर्व करतो" ह्या भूमिकेतूनच असते.

रामाकडून साधकाला 'पावनभिक्षा' प्राप्त करून घ्यायची असेल तर, अभेदभक्ती, अलिप्तपण, 'मी'चे विसर्जन, तादात्म्यता, अनन्यता, अढळ निष्ठा, हे प्रमुख गुण लागतील. त्या गुणाचे विश्लेषण शाब्दिक भाषेत करताच येत नाही. ते गुण अनुभवावेच लागतात. तेंव्हा त्याचे महत्व पटते. हे सर्व साधण्यासाठी प्रथम हवी सज्जनसंगती. व त्यानी सांगितलेल्या गोष्टीचा योग्य अर्थ समजून घेणे.

बहुतेक श्रेष्ठ संत, असे कांही गूढ शब्दात बोलतात, गूढ भाषेत वा कृतीतून प्रश्नाचे उत्तर देतात, की त्यातून योग्य अर्थ साधकाला काढणे अवघड जाते. श्रीगुरुच्या बोलण्याचा योग्य अर्थही काढता आला पाहिजे. हेच 'अर्थारोहण' अद्वैतग्रंथातून असे गूढ शब्द खूप वापरले आहेत. त्याचा उलगडा सद्गुरु मुखातूनच करून घ्यावा लागतो. "मुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्यासी" ह्या मुक्ताईच्या वचनातून गूढ सदंगुरु मुखातूनच ऐकायला हवे. शब्दशः अर्थ घेतला तर, त्यातून विपरीत ज्ञानच मिळेल. मुंगी सारखे सूक्ष्म आत्मतत्व, मन विशाल केले तर, सूर्यमंडळाचा पण वेध घेऊ शकते. हा अर्थ सद्गुरुच सांगतात. शाब्दिक ज्ञानी–पंडीत नाही सांगू शकणार.

एकदा एका भक्ताला त्यांच्या गुरुनी, हातावर साखर दिली, व म्हटले, 'पश्चिमेस जा' तो अनभिज्ञ शिष्य गोंधळला. त्याला वाटले पश्चिम दिशेकडे त्याचे शुभ आहे. पुनः विचारण्यासाठी गेल्यावर, 'ध्यान प्रक्रियेत तो शब्द पहा' असा निर्देश दिला. तुकारामाचा एक अभंग आहे. "टाळ वीणा दक्षिणेकडे– आम्ही जातो पश्चिमेकडे" दक्षिण दिशा कर्माची तर पश्चिम दिशा वैराग्याची. थोडक्यात "कर्ममार्गात आता गुंतु नका, विरक्त व्हा" हा आशय गुरुना सांगायचा होता तो त्यांनी गूढभाषेत सांगितला.अर्थ उलगडा झाला. पुढील साधनेची वाट सोपी झाली. त्यासाठी "अर्थारोहण दे रे राम" हा शब्द इथे घातला आहे. पुराणातील बहुतेक कथा अशा गूढार्थाच्याच आहेत. सत्संगाचा महिमाच इतका अगाध आहे की, त्यायोगे अलिप्तपण ब्रह्मानुभव व अनन्यसेवा हे गुण विनासायास अंगी येऊ लागतात. त्यासाठी समर्थांनी पादसेवन भक्तीमध्ये एक महत्वाची ओवी घातली आहे.

संगत्याग आणि निवेदन – विदेहस्थिती अलिप्तपण।

सहजस्थिती, उन्मनी विज्ञान – हे सप्तही येकरूप ।।४–४–८।।

यातील सप्तसंकेत वचनाचे स्पष्टीकरण, श्री हंसराजस्वामीनी आपल्या आगमसार नामक ग्रंथात पुढील प्रमाणे केले आहे संग म्हणजे मी पण–जे मुक्तपणाचे बंधन–तेही सोडिल्यावाचून– संगत्याग कैचा.।।१४।। अहं ब्रह्म हे प्रतिती–तेचि त्रिपुटीते दाविती – ते त्रिपुटी जेथे विलया जाती–अधिष्ठान शेषाते (अधिष्ठान राहूनही)।।१५।। दीप कापुरा मिळणी – कापूर जाता जळूनि –ज्योति काजळी दोन्ही–किमपी उरेना।।१६।। तैसे आज्ञान स्वानुभवज्ञाने– जाऊन आपण लया जाणे – अनुभवेवीण जे कां असणे – हाची संगत्याग।।१७।। मीपणासहित तूपण गेले – मी ब्रह्म हेही विराले – उपरी जे कां निःसंग भरले – ते चि विज्ञान।।१८।। मी देह की मी ब्रह्म – वृत्तीने सांडिला हा भ्रम – केवळ ब्रह्मी उपरम – विदेहस्थिती।।१९।। जळी जैसे कमळ भिजेना–आकाश वायूने हलेना–वृत्तीवीण तैसे आपणा–सदृढ केले।।२०।। संपूर्ण उपाधि असता–परिपूर्ण असे अलिप्तता–हे चवथे लक्षण तत्वता–समाधानाचे।।२१।। जैसे प्रारब्धे देह व्यापारे–तैसे वर्तेनी का बा रे–होय नव्हे करणे सरे–हे सहजस्थिती।।२२।। मन सांडून एकीकडे–आपण ओतप्रोत चहुकडे– वृत्ति सहीन मन बुडे–हेचि उन्मनी बा।।२३।। ज्ञान निःशेष हरपले–अखंड परिपूर्णचि उरले–यासीच विज्ञान बालिजे–लक्षण सातवे।।२४।। वृत्तिसहित जे समाधान–निवडूनिया ज्ञान–अज्ञान संकेत देका भिन्न भिन्न–परि ते एकरुप ।।११–१–१४ ते २५।।

पादसेवन भक्तीतील हे सप्तसंकेत, संकेतकुबडीत श्री हंसराज स्वामीनी उलगडून दिले आहेत. त्यातील सहजस्थिती–दशक नववा, उन्मनी–द.१०वा, अलिप्रपण–दशक ११वा, आत्मनिवेदन–द.१२वा, विदेह स्थिती–दशक १३वा, विज्ञान–द.१४वा, व संगत्याग–हा १५व्या दशकात स्पष्ट केला आहे. तशा ओव्याच संकेतकुबडीमध्ये आहेत. हे सप्त गुण, नित्यमुक्त, विदेहमुक्त जीवनमुक्त यांच्या अंगी कसे आहेत? हे ही त्यांनी पुढे स्पष्ट केले आहे. त्या सप्तसंकेतातील बहुतेक गुण ह्या "पावनभिक्षा दे रे राम" ह्या अभंगात समर्थांनी मागितले आहेत.

तात्पर्य, एक पादसेवन भक्ती, म्हणजे गुरुसेवा–अनन्यसेवा स्वीकारली की हे गुण साधकाच्या अंगी सहजतेने येऊ लागतात. त्यासाठी फक्त गुरुसेवा, गुरुसंगती हे महत्वाचे. अनन्यसेवेमुळे, केवळ पादसेवन भक्तीमुळे बसल्याजागी, आत्मज्ञानप्राप्ती अशी कितीतरी उदाहरणे आहेत. मुख्य उदाहरण कल्याणस्वामींचे घेऊ यात् "बुंध्याकडे तोंड करून फांदी तोड" असे समर्थ मुखीचे वचन त्यांनी अक्षरशः पाळले. फांदीसकट विहिरीत पडले. पण त्यातील गूढार्थ त्यांना स्पष्टपणे आकलन झाला होता. तोंड बुंध्याकडे म्हणजे वृत्ती परब्रह्मपदी असू दे, ती टिकवण्यासाठी ही संसारवृक्षाची फांदीच तोडून टाक. संसार विचाराचा समूळ त्याग झाला. तो मनातूनच काढून टाकला, की आत्मस्थितीभाव तिथे प्रथमपासून आहेच, तो प्राप्त होईल. "प्रपंचात मन असावे, पण मनांत प्रपंच नसावा" हे श्री. सुनीलजींचे एका प्रवचनातील वाक्य, मनात खोलवर रुजले आहे. कल्याण म्हणजेच अंबाजी, फांदी सकट विहिरीत पडले, पण तिथेच त्यांना आत्मज्ञानाची प्राप्ती झाली, 'कल्याण' नाम प्राप्त झाले. स्वामींच्या शब्दावर अंतःकरणपूर्वक विश्वास ठेवला. त्या शब्दाचा कीस पाडून त्याचे वेगवेगळे अर्थ काढत, फाटे फोडत बसले नाहीत. गुरु–आज्ञा–प्रमाण ही अनन्यभक्ती, म्हणून त्यांचे मीपण पार गेले. व मजवीण तू मज दे रे राम हे शब्द त्यांना सहज उलगडले. त्यांनी ते कृतीतून दाखवले. श्रीसमर्थांना अशा सद्‌गुणांची खाण असलेली , पावन भिक्षा अभिप्रेत आहे. 'महाराज दे अंगीचे वस्त्र आता' ह्या मागण्यात, ह्या सद्‌गुणासह, भगवंताची आत्मस्थिती, आत्मस्थितीभाव, ब्रह्मानुभव, तादात्मता

ऐक्यता, हे सर्व अभिप्रेत आहे. 'मी नाही, तूच सर्वत्र आहेस' म्हणून ते फक्त त्या रघुपतीचाच जयजयकार करतात. दोनदा करतात. एकदा तो भेटला, त्याने स्वीकारले म्हणून, व दुसऱ्यांदा त्याने दिले म्हणून. देणेही कसे अमोल? आपल्या सारखेच त्या समर्थ रामाने, श्रीरामदासानाही समर्थ केले. दोघे एकरुपच म्हणूनच त्या जयजयकारात दोघांचे ऐक्य आहे. आपण सारे समर्थसेवक 'जय जय रघुवीर समर्थ' ही गर्जना करतो. जयघोष करतो. संप्रदायाचे ते घोषवाक्य आहे, त्यावेळी त्या दोघांनाही एकदमच आभिवादन होते. भक्तिमध्ये हे द्वैतातीत अद्वैत असते. म्हणून साऱ्या संतांनी हा भक्तिमार्ग चोखळला आहे. व फक्त भगवंताचेच अधिष्ठाण मान्य केले आहे. तो भगवंत कसा आहे? त्याचे गुणगान पुढच्या चौथ्या पदरात "श्रीरामनामावली" उच्चारणात आहे.

चौथा पदर = ।। श्रीरामनामावली ।।

ही नामावली १०८ नामानी विभूषित नाही, तर १२१ नामानी सजली आहे. ११x११ = १२१. श्रीसमर्थांना ११ आकडा फार प्रिय आहे. ११ वा रुद्र जो 'महान्' त्याचा अवतार, श्रीमारुतीराय, चिरंजीवपदप्राप्त, बुद्धीमान, सामर्थ्यशील असूनही सदैव विनम्र,म्हणून दासबोधातही ११व्या दशकास 'भीम' दशक नाम देऊन श्रीसमर्थांनी त्यांना गौरविले आहे. ११०० मठाची भारतभर श्थापना करून श्रीसमर्थांनी त्याकाळी खरोखरच 'आक्रित' म्हणजे आश्चर्यजनक कृतीच केली. श्रीसमर्थ त्या मारुतीरायाचेच अवतार, त्यांनी असे अद्‌भूत कार्य केले की, ते कोणाला कळू शकले नाही, इतकी गुप्तता राखून. ह्या मठपतीनी पुढे, शिष्यसंप्रदाय वाढवून, श्रीशिवाजी, संभाजी राजाराम ह्यांच्या निर्याणानन्तरही पुढे २७ वर्षे बलाढ्य मोगलशाहीशी योग्य ती टक्कर देत, ह्या वीर मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावले. 'गर्वसे कहो हम हिंदू है' म्हणायला ही संस्कृती अद्यापही टिकून आहे. कारण ती सनातन आहे, तिच्यात जसे सामर्थ्य आहे, तसेच मार्दवही आहे. सर्वसमावेशकता आहे म्हणून ती टिकून आहे. त्या ११व्या रुद्राचे, श्रीमारुतीरायाचे, ११०० मठाधिपतींचे स्मरण म्हणून १२१ नामांची ही नामावली हरिदासस्वामीनी रचली आहे. १२१ नामातून सूत्रात्मक एकेक गुणवर्णन करीत संपूर्ण रामायणच ह्यातून कथन केले आहे.

त्याकाळच्या सर्वच संतांनी भयभीत समाजापुढे, सामर्थ्यशील, पण मृदु स्वभावाचा, गंभीर राजारामाचा आदर्श ठेवला होता. श्रीरामरायाचा पराकाष्टेचा प्रयत्नवाद, दैवालाही वाकवण्याचे कसब ह्या गुणांचे वर्णन करीत, जनमानसात आत्मविश्वास निर्माण केला होता. 'रघुनाथ–उपासना' हे समर्थसंप्रदायाचे मूळ बीज आहे.

स्वरुपसंप्रदाय, अयोध्यामठ – जानकीदेवी, श्रीरघुनाथ दैवत
मारुती उपासना नेमस्त – वाढविला परमार्थ रामदासी ।।

१२१ नामामधून श्रीराम अवताराचे प्रमुख गुण दाखवले आहेत. निगुर्ण परब्रह्मरुप श्रीरामानी, धर्मसंस्थापना व दुष्ट निर्दालन करुन, अधर्माची पाळेमुळेच खणून काढली. रामायणातील प्रत्येक व्यक्ति 'आदर्श' स्थापनेसाठीच जणू जन्माला आली. मानवाच्या मर्यादेचे आदर्श पालन, ह्या अवतारात प्रभूनी दाखवले. श्रीराम आदर्श पुत्र, पति, बंधू, राजा, मित्र होते. १२१ नामातून हे सर्व गुण सुत्रात्मक दाखवले आहेत. "रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी" ही श्रीसमर्थांची शिकवण म्हणून ही श्रीरामनामावली. हा ह्या झोळीचा चौथा पदर अत्यंत महत्वाचा आहे. १२१ नामांचा हा सुमनहार गुंफत गुंफत सारी रामकथा, सप्ताह, महिना, वा उत्सवकाळी सुंदर उलगडता येते. निर्गुण रुप जय जय राम ते हरिहर पावन जय जय राम अशी ही १२१ नामे आहेत. नाम हे परमेश्वराचे निर्गुणरुप आहे. ते चिरंतन असते. सगुण साकार, सृष्टी नियमानुसार विलय पावते. पण नाम अविनाशी आहे. ते कीर्तिरुपात रहाते. विस्तारभयास्तव हा भाग थोडक्यातच घेत आहे.

'श्रीरामनामावली' नंतर इथे चौपदी संपते. १) कोमल वाचा २) संगीत गायन ३) पावनभिक्षा ४) श्रीरामनामावली. ह्या चार प्रमुख आधारस्तंभावर रामदासी संप्रदाय उभा आहे. अजूनही ह्या चार प्रमुखाचा अवलंब करीत रामदासीसंप्रदाय कार्य करतोच आहे.

चौपदी नंतर 'श्रीराम राम हे म्हणा' हे पद म्हटल्यावरच सायंकाळची उपासना समाप्त होते. ते पदही घ्यावयाचे मुख्य कारण हे 'राम'नाम प्रत्यक्ष शंकरानी घेतले. त्याचा त्यांनी अनुभव घेतला. त्या नामा महिमा, ते आपली पत्नी 'उमा' हिला तिने त्याबद्दल उत्सुकता प्रदर्शित केली, तिची आर्तता, जिज्ञासा पूर्ण करावी म्हणून आपल्या मनीची खूण, तिला सांगण्याचे निमित्त करून, साऱ्या सामान्य जनतेलाच जणू सांगत आहेत, की तुम्ही फक्त 'राम'नाम घ्या, तुम्ही हा भवसागर सहज पार करून जाल. सुंदर पद आहे.

सुरेन्द्र चंद्रशेखरु – अखंड ध्यातसे हरु।
जनासी सांगते खुणा – श्रीराम राम हे म्हणा।।
महेश पार्वती प्रती – विशेष गुज सांगती।
सलाभ होतसे दुणा – श्रीराम राम हे म्हणा।।
विषे बहुत जाळिले –विशेष अंग पोळिले।
प्रचित माझिया मना – श्रीराम राम हे म्हणा।।
विशाल व्याळ व्यस्तकी – नदी खळाळ मस्तकी।
ऋषि भविष्य कारणा – श्रीराम राम हे म्हणा।।
अपाय होत चुकला – उपाय हा भला भला।
नसे जयासी तुळणा – श्रीराम राम हे म्हणा।।
बहुत प्रयत्न पाहिले – परंतु सर्व राहिले।
विबुध पक्ष रक्षणा – श्रीराम राम हे म्हणा।।
विरामध्ये विरोत्तमु – विशेष हा रघोत्तमु।
सकाम काळ आंकणा – श्रीराम राम हे म्हणा।।
बहुत पाहिले खरे – परंतु दोन्ही अक्षरे।
चुकेल येम यातना – श्रीराम राम हे म्हणा।।
मनी धरुनी साक्षपे – अखंड नाम हं जपे।
मनांतरी क्षणक्षणा – श्रीराम राम हे म्हणा।।
देहे धरुनी वानरी – अखंड दास्य मी करी।
विमुक्त राज्य रावणा – श्रीराम राम हे म्हणा।।

श्रीसमर्थ रामदासस्वामी कृत हे पद – त्याचा थोडक्यात अर्थ असा आहे, सुरेन्द्र म्हणजे देवाधिदेव श्रीमहादेव,, ज्यांच्या मस्तकी चंद्र आहे, ते हर–महादेव, सगळ्या जनानाही त्यांच्या मनीची खूण सांगत आहेत, की, तुम्ही, ही माझ्यासारखे फक्त 'राम' नाम घ्या, तुम्ही हे भवविष सहज पचवू शकाल. मी तर हलाहल विष पचविले आहे. रामनामाच्या बळावर तुम्ही हा भवसागर सहज पार कराल. सतत रामनामात दंग असणाऱ्या महादेवाना प्रत्यक्षच पार्वतीमातेने 'रामरहस्य' विचारले. त्यांनी तिची जिज्ञासा पूर्ण करताना संपूर्ण 'राम'रहस्यच समजावून दिले. वेदव्यासानी, अध्यात्म रामायणात, हा उमा–महेश संवाद सविस्तर दिला आहे. त्या स्तोत्राला 'रामरहस्य'च असे म्हणतात. तिला हे रहस्य सांगितलेच, पण सामान्य जनाना पण ते ग्वाही देत आहेत, की समुद्र मंथनात जे हलाहल विष निघाले, ते मी विबुधपक्षरक्षणा– म्हणजे देवांच्या रक्षणासाठी, कोणताही विचार न करता ते चटकन प्राशन केले. त्यामुळे माझ्या कंठाची खूपच आग होऊ लागली. गळा, कंठ हा शरीराचा विशेष भाग, विशेष अंग, प्राण तिथेच घुटमळतो. माझ्या शक्तीने ते विष तिथेच अडवले गेले, त्यामुळे माझा नाश (मृत्यु) झाला नाही. पण कंठ निळा निळा झाला आग असह्य होती. त्यासाठी मी विशाल व्याळ म्हणजे थंडगार, मोठे मोठे, सर्प, नाग अंगावर खेळवले. डोक्यावर गंगा (नदी खळाळ) झेलली. दोन्हीमुळे मला शांतता वाटेल, असे वाटले होते. तेवढ्यापुरते बरे वाटले पण खरा उपाय मला वाल्मिकी ऋषिंच्या रामायणाच्या वेळी मी त्रैलोक्याला ते वाटून दिले, त्यावेळी आला. ३२ अक्षरातील अनुष्टुप छंदातील श्लोक, ३० अक्षरे समान वाटली, उरली दोन अक्षरे 'राम' ती मी प्रसाद म्हणून ग्रहण केली. व मला एकदम शांती मिळाली.

राम म्हणजे सार, सर्वस्व, त्यातील गोडी, रसास्वाद, अर्कच जणू. रामायणातून 'राम' काढला, तर काय होईल? सारा चोथाच राहील. तो रस मी चाखला. आपण कशात गोडी, रस नसेल तर सहज म्हणतो, त्यात काही 'राम' नाही. राम हे नाम सतत, सुखात व दुःखातही घेतले जाते. कांही चांगले घडले, की लगेच 'रामकृपा' झाली असे म्हणतो. उत्तम राज्याला 'रामराज्य' म्हणतात. रामायणातील प्रत्येक व्यक्तिरेखा आदर्शभूत आहे. त्यांत सर्वश्रेष्ठ राम आहेत. हे श्रीराम जसे पराक्रमी आहेत, तसेच सहृदय, दयाळू शांत आहेत. 'र' हे अक्षर अग्निबीजाचे–सामर्थ्याचे प्रतिक. ते दीर्घ आहे. 'रा' त्याजबरोबर 'म'

पृथ्वीतत्वाचे शांतभाव, क्षमाशीलताही त्यांच्याजवळ आहे. म्हणून त्या नामात एक आगळीवेगळी गोडी, रस आहे. हे नाम मला ते शतकोटी रामायण त्रैलोक्याला वाटणी करताना लाभले व माझा दुहेरी फायदा झाला. ज्ञानरुपी गंगा माझ्याजवळ आहेच व शांती देणारा चंद्रही आहे पण खरे समाधान देणारे हे रामनामच आहे. त्याबद्दल एक श्लोक आहे.

नामाचा महिमा उमापति म्हणे, ऐके प्रिये साजणी।
हालाहाले कंठ करपला – यत्ने करी औषधी।
गंगा चंद्र शिरावरी, धरुनिया, निःशेष मी भागलो।
नामाचा शतकोटी ग्रंथ बघता – दो अक्षरी वागलो।।

ह्या श्रीरामापुढे मृत्युसुद्धा थरथरा कापतो. श्रीराम हे काळावरही सत्ता चालवणारे. 'हरिश्व' ऋषिचे, त्यांनी यमाला धाक दाखवून त्यांचे रक्षण केले अशी कथा आहे. आर्ततेने हाक देणाऱ्याचे काळापासून रक्षण करतात.(सकाम काळआंकणा). दुष्टाना शासन करणारे व पतिताना पावन करणारे, पतितपावन असे ब्रीद मिरवणारे, हे श्रीराम, माझे आराध्यदैवत आहे. हनुमंतरुपात, मी त्यांचा दास असताना, मला हे 'राम'रहस्य प्रत्यक्ष श्रीराम व सीतामाईकडून समजले असे हे माझे स्वामी परब्रह्मस्वरुप आहेत, हे त्यावेळी मला समजले.

खरे तर, रावण माझा महान भक्त, त्याने मला प्रसन्न करून, खूप मोठे ऐश्वर्य मिळविले. पण एका कामविकारामुळे, व मुख्य, अहंकार, दंभ, दर्प या आसुरी संपत्तीमुळे बेफाम होऊन त्याने देवांनाही बंदीवासात टाकले. त्या रावणाच्या बंधनातून देवानांही, माझ्या रामाने सोडवले, मुक्त केले, म्हणून मी हे रामनाम अत्यंत आवडीने घेतो आहे.

रामदासी संप्रदायात 'मारुती उपासना' ही परंपरेने पाळली जाते. गडावर समर्थांना अभिषेक करताना मारुतीची मूर्तिच त्यावर समाधीवर ठेवून अभिषेक केला जातो. त्याच्या माध्यमातूनच श्रीरामरायाचे ध्यान करतात. मारुतीरुपातील श्रीमहादेव, हे पहिले रामदासी. त्यांनी 'दास्यभक्ती' स्वीकारली. तीच दास्यभक्ती स्वीकारत प्रत्येक रामदासी सिंहासनाधिष्ठित श्रीरामरायापाशी भिक्षा मागतात. त्याचा गाढ विश्वास आहे की, श्रीरामच खरा दाता. "आम्ही काय कुणाचे खातोरे, तो राम आम्हाला देतो रे" ही अनन्यभक्ती, दृढभक्ती. त्यामुळे त्याच्यापुढेच झोळी पसरली आहे. व भिक्षेतून 'भवदैन्य हे देशोधडी करावे' ही विश्वव्यापक, विश्वकल्याणकारी मागणी केली आहे. 'अवघेची सुखी असावे' ही संतकळकळ, संतहृदयीचा हा कळवळाच, फक्त त्यामागे आहे.

स्वतः श्रीशंकरजी श्रीरामाचे अखंडध्यान, नामचिंतन करतात. साऱ्या जगताला हाच उपदेश करतात. म्हणून त्यांच्या मुखीच्या ह्या "श्रीरामराम हे म्हणा" ह्या पदाने ही "सायंउपासना" पूर्ण होते.

अशी ही सायंउपासनेतील "चौपदी" श्रीसमर्थापुढे तीच पसरून, विश्वकल्याणाची मागणी करीत, समर्थांनी घालून दिलेल्या मार्गाने,वाटचाल करण्याची सद्बुद्धी, साऱ्या रामदासीयांना प्राप्त होवो. अशी प्रभूचरणी नित्य प्रार्थना करूयात्. सर्वस्थ हृदयस्थ परमेश्वराला वंदन करून हे शब्दपुष्प श्रीरामचरणी अर्पण करू यात् ।।

।। श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ।।
।। श्रीसद्गुरुनाथ महाराज की जय ।।
।। जय जय रघुवीर समर्थ ।।

सौ. लीला वसंतराव गाडगीळ.

– सवाया –

श्रीसमर्थ संप्रदायात सायं उपासनेत, करुणाष्टकानंतर 'सवाया' म्हटल्या जातात. करुणाष्टकेसंपली की, सवाया सुरू करण्याच्या पूर्वी खालील श्लोक म्हणत. उठून, उभे राहून सवाया म्हणण्याची पद्धत आहे. प्रत्येक सवाई झाली की, "म्हणावा जय जय राम" असे म्हणून श्रीरामाला मुजरा करण्याचा अविर्भाव करत असतात. जमीनीवर वाकून, त्या पृथ्वीसह त्या

पृथ्वीपतीला तो प्रणाम असतो. सवाई खड्या आवाजातच म्हणतात. सवाईतील चार चरणापैकी १ला चरण, दोनदा जरा जोर देत देतच म्हणण्याची पद्धत आहे.

श्रीरामाचा राजदरबार भरला आहेव त्या राजदरबारात राजाचे भाट–चारण त्यांच्यापुढे येऊन, त्याची स्तुती, त्याचे पराक्रम म्हणजेच बिरादे–ब्रीदे, यांचे वर्णन गाऊन त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न, हे भाट–चारण करीत असतात. पूर्वीचे काळी राजे महाराजासमोर असेच त्यांचे भाट–चारण राजाची स्तुती गात. स्तुती–पराक्रमवर्णनपर कवने रचत. राजा खुष होऊन मग त्यांना काही बिदागी, खूपच खूष झाला तर अंगावरील दागिना, वस्त्र ही देत असे. यवनराजासमोर त्यांची खोटी स्तुती गाऊन, त्यांना कां खुष करावे? आपणा सर्वांचा दाता, राजा श्रीराम सिंहासनाधिष्ठित आहे. त्याचे समोर उभे राहून, त्याची स्तुती करावी. "दाता एक रघुनंदन" असतांना, इतरापुढे कां वाकायचे? ही भक्तीची शिकवणही ह्या स्तवनातून आहे.

चार चरणाचा हा भाग, पहिला चरण दोनदा म्हटला की, पांच चरणांचा होतो. ४ सव्वा ५ होते म्हणून ह्या पद्धतीला "सवाई" असे म्हटले आहे. "शेरास सव्वाशेर" अशी थोडीशी अहमहिकाही त्यात असू शकेल. सवाई म्हणण्यापूर्वी खालील श्लोक म्हणून, म्हणणाऱ्याने उभे राहून, श्रीरामापुढे येऊन सवाई म्हणण्याची पद्धत आहे. सवाई संपली की, मुजरा करून बाजूला व्हायचे, मग दुसरा भाट –चारण पुढे येतो व तसेच वर्तन करीत, पुढील सवाई म्हणतो. सवाई म्हणणे झाले की वाराची सवाई म्हणायची, त्यानंतर सामुदायिकरित्या, शेवटची सवाई, सर्वांनी म्हणून मग " जोहाराचे" पद म्हणायचे व ते झाले की, ही सवाई " उपासना पध्दती" संपते. व नंतर खाली बसून सर्व मिळून " चौपदी" म्हणतात. सुरवातीला म्हणण्याचा श्लोक असा आहे –

तुझा भाट मी वर्णितो रामराया – सदा सर्वदा गाय ब्रीदे सवाया।
महाराज, दे अंगीचे वस्त्र आता – बहु जीर्ण झाली देहेबुध्दी कंथा।।

त्याचा थोडक्यात अर्थ असा आहे.

हे महाराजा, श्रीरामा, रामराया, मी तुझा भाट, तुझ्यापुढे तुझी ब्रीदावली पराक्रम, गुणवर्णन गाणार आहे. तुझे गुणवर्णन मी नित्य करतोच पण तुझ्यापुढे करण्यात, एक आगळीवेगळी भक्ती आहे. तू आमचा रक्षक, राजा अन्नदाता, पालन–पोषणकर्ता आहे. माझी सर्व चिंता कुला आहेच. त्यानुसार मी तुझ्यापाशी निःसंकोच मागतो आहे. मी तुझा भाट–स्तुतीपाठक आहे. मला ऐहिक सुखातले, अन्न, वस्त्र, निवारा, पैसा, पद असे कांहीच नको आहे. मी तुझा भक्त आहे. मला 'आत्मबुद्धी' हवी आहे. संसारात अडकल्यामुले, माझी ही जीर्ण देहबुद्धी, अनेक जन्म घेऊनही, जुनी, जर्जर, फाटकी असली तरी ती सुटतच नाही. माझ्या अंगावर असलेली ही देहबुद्धी रूपी कंथा(वस्त्र) मला सोडायची आहे व मला तुझ्या अंगावरचे वस्त्र, म्हणजे आत्मबुद्धी हवी आहे. देहबुद्धीत स्वार्थ, मतभेद, विकार असतात. आत्मबुद्धीत निष्कामता, निस्वार्थता, अभेदभाव व निर्विकार स्थिती असते. भगवंताची वृत्ती तशी असते. तो सर्व कार्य करून ही 'अकर्ता' भावात, साक्षीभावात असतो. म्हणूनच तो पूजनीय होतो.

जीवात्म्याच्या देहरूपी कंथेला–वस्त्राला नऊ ठिकाणी भोके आहेत तर भगवंताची घोंगडी अखंड आहे. श्री ज्ञानदेव महाराज ही म्हणतात –

"देवा तुझी घोंगडी चांगली – आम्हास कां दिली वांगली"

नऊ ठिकाणी फाटकी असणारी ही घोंगडी, नऊ ठिगळे लावू तेव्हा थोडी धड दिसेल. ही नऊ द्वारे बंद करणे सोपे आहे कां? नऊही इंद्रिये विषयसेवनासाठी नित्य हपापलेली, सदैव बाह्य दृष्टी असलेलीच आहेत. त्यांना आत वळवून 'अंतर्यात्रा' करणे अवघडच आहे. गो म्हणजे इंद्रिये. गो म्हणजे= गाई. एकवेळ गाई वळवणे सोपे. पण इंद्रिये अंतर्मुख करणे फार कठीण. म्हणूनच गाई कशा वळवायच्या, हे सांगणारा, तो गोपाळ, गोविंद आत बसला आहे. त्याच्याकडे दृष्टी ठेवायची. हे शरीर इंद्रियाचा समुदाय आहे. गोकुळ आहे, असे समजून त्याच्या आहारी जायचेच नाही. त्यासाठी, त्या गोपालाची, गोविंदाची उपासना. हे रामा, तू तसा आहेस. तुला 'अतर्योगी' होता आले आहे. म्हणून मला तुझी ती 'आत्मबुद्धी', तुझ्या अंगीचे वस्त्र हवे आहे. एवढी विशाल दृष्टीची मागणी, समर्थ संप्रदायात, सारे रामदासी, ह्या उपासनेद्वारे करत आहेत.

"सवाया" म्हणण्याची पण एक पद्धत आहे. श्रीगणपती, श्रीमारूति,श्रीराम, श्रीमारूति (हनुमंत)व श्रीसमर्थ ह्या पहिल्या ५ सवाया, त्याच क्रमाने म्हणाव्या लागतात. त्यानंतर वेळेनुसार इतर सवाया म्हणतात. कमीत कमी ह्या पांच, वाराची सवाई व जोहार म्हणावाच लागतो. त्यातील पहिली सवाई श्रीगणपतीची आहे –

।। श्रीगणपति ।।

वंदिला गजवदन, सुख सुखाचें सदन।
जेणे जाळिला मदन, त्याचे अंतर धरा ।।१।।
राम राम राम, जन सज्ञन विश्राम।
साधकांचे निजधाम, हित आपुलें करा ।।२।।
अखंडीत निजध्यास, धरा अंतरी अभ्यास।
बोले भागवत त्यास, हरिभजने तर ।।३।।
धीर उदार सुंदर, कीर्ती जाणतसे हर।
सोडविले सुरवर, वरदायक खरा ।।४।।
म्हणावा जय जय राम ।।

कोणत्याही कार्यारंभी गणेशाला वंदन असते. त्या परिपाठानुसार श्रीसमर्थही प्रथम गणपतीला वंदन करतात. "येक गुरू, येक देव–कोठेतरी असावा भाव" ह्या उक्तीनुसार श्रीसमर्थांना सर्वत्र 'रामदर्शनच' घडत असे. दासबोध वाचनाच्या सुरवातीलाही ते हेच म्हणतात की,

गणेशः शारदा चैव सद्‌गुरूः सज्ञनस्तथा।
आराध्य दैवतं गुहयं सर्वं मे रघुनंदनः।।
गणेश शारदा सद्‌गुरू। संत सज्ञन कुळेश्वरू।
सर्वहि माझा रघुवीरूं। सद्‌गुरू रूपे।।

इथे ही त्याच भावनेने श्री गणपतिला नमस्कार असून लगेच पुढे म्हणतात. आत्मसुखाचे सुखधाम, असलेला माझा राम, कुठे राहातो आहे? ज्याने मदन जाळला, त्या शंकराच्या अंतरी तो नित्य रहातो. श्री शंकर हे श्री गजाननाचे पिताजी, गौरीकुमार विघ्नहर्त्या गणपतीला, श्री शंकरांनीच गजमुख लावले आहे. गौरीने स्वबळावर पुत्र निर्माण केला. त्याला आपल्या रक्षणाची कामगिरी दिली. त्या कामगिरीवर असताना, प्रत्यक्ष पित्यालाही त्याने मातेकडे जाण्यापासून अडविले. अशी बुध्दी काय कामाची? म्हणून श्रीशंकराने त्याचे मस्तकच उडवले प्रकृतीपासून निर्माण झालेले भौतिकज्ञान शेवटी घातकच ठरते. त्यात सारासार विचारच नसतो. सुरवातीला जीवाच्या कल्याणासाठी उत्पन्न झालेले ज्ञान, जीवाचा नाश करणाऱ्या प्रवृत्तीकडे वळले जाते. भौतिकज्ञानात, उत्पत्तीतच विनाशबीजे असतात. म्हणून त्याचे उच्चाटनच करावे असा त्यामागील खरा हेतू असतो. पण पुढे गौरीच्या हट्टासाठी, त्यांनी जो प्रथम सजीव, जीव दिसेल त्याचे मस्तक घेऊन या, अशी विष्णूना आज्ञा झाली. विष्णू व पार्वती बहिण भावाच्या नात्याने, एकमेकांना साहाय्य करतात. देवी पुराणात त्यांच्या जन्माची कथा आहे. प्रथम हत्ती दिसला, त्याचेच मस्तक आणले व तेच श्री शंकरानी मुलाच्या धडावर ठेवले स्वतः शिवतत्वानेच ते बसवले असल्यामुळे ते गजाननरूप, शिवासारखेच साऱ्यांना मंगल–कल्याणप्रद झाले. त्याच्या बुध्दीत आपोआपच विश्व कल्याणाचेच विचार येऊ लागले. सृष्टीमध्ये नुसते भौतिकज्ञान उपयोगाचे नाही. तिथे आध्यात्मिक – पारमार्थिक ज्ञानही हवेच. सुरवातीचा विघ्नेश्वर गणपति, विघ्नहर्ता झाला. कार्यात कोणतेही विघ्न निर्माण होऊ नये, म्हणून त्या विघ्नहर्त्याची प्रथम पूजा करतात आपल्या बुध्दीचापल्यामुळे त्याने हा प्रथम माता–पित्याला तीन प्रदक्षिणा घालून, पृथ्वी प्रदक्षिणा स्पर्धेत, तो सर्व देवात पहिला आला. म्हणून त्याला प्रथम पूजेचा मान मिळाला आहे. अशा रितीने त्याला, त्याच्या परमपूज्य पित्याला स्मरून, त्यांच्या हृदयात असलेल्या आपल्या आराध्यदैवताला श्रीसमर्थांनी प्रथम वंदन केले आहे. व श्रीरामच माझे सुखनिधान आहे, हे पण सांगितले आहे.

श्रीराम सहस्त्रनामावलीची सुरवातही, गणपतीसाठी, श्रीशंकरानी ही नामावली गायली आहे, असा उल्लेख आहे. विष्णुसहस्त्रनामासारखीच ही श्रीरामांची सहस्त्रनामे आहेत. त्यातून श्रीरामांचा, रामनामाचा महिमाच गायला आहे. तेच राम नामकसे श्रेष्ठ आहे हे दुसऱ्या कडव्यात सांगतात.

राम राम राम, जन सज्ञन विश्राम।

साधकांचे निजधाम, हित आपुलें करा।।

हे रामनाम सामान्यजन, सज्ञन, संत ह्यांचेही खरे विश्रांतीस्थान आहे. ते नाम तिन्ही लोकी घेतले जाते.त्रिकाली, सुख, दुःख अंत्यसमयी ही घेतले जाते. कारण शेवटी तेच साऱ्यांचे खरे घर आहे. साधकांनी तर ते आवर्जून घ्यावे. मानवाचे चार प्रकरात समर्थ वर्गीकरण करतात. बध्द, संसारपाशातून सुटावे अशी इच्छा असणारा, पण तसा फारसा प्रयत्न न करणारा मुमुक्षु, मोक्षाची इच्छा आहे, पण तशी वाटचाल सुरू करीत नाही तो मुमुक्षु संसार बाजूला सारून, ईश्वर भजन मार्गाला प्राधान्य देणारा- साधक व फक्त ईश्वरच आम्हाला तारणारा ही दृढभावना असलेला आपल्या साधनेला, दैवताला प्रथम प्राधान्य देणारा सिध्द असे चार भाग श्रीसमर्थांनी मानवाचे मानले आहे. सिध्द असूनही विनम्र सिध्द, शेवटपर्यंत साधकाप्रमाणेच साधना करीत असतो. ज्या सिध्दाने साधना सोडली त्याचे अधःपतन एकदम बध्दावस्थेतच होते. असा इशाराही समर्थांनी दासबोधात दिला आहे. म्हणून इथे 'साधकाचे निजधाम' असा शब्द वापरला आहे. सर्व साधकांचे खरे विश्रांतीचे स्थान, त्याचे स्व-धाम हा 'राम' च आहे. त्याची 'आराधना' करणे हेच त्याच्या हीताचे आहे. हीत ही दोन प्रकारचे. हीत - आत्महीत. ऐहीक सुख हवे असेल तर, वाम मार्गानेही हीत साधून, तात्पुरते सुख-संपत्ती मिळवता येईल. पण श्रीसमर्थ 'हीत' शब्द आत्महीत ह्याच अर्थाने वापरत आहेत. अंतीम हीत, जन्ममृत्यूचक्रातून सुटून, नराचा नारायण होणे हेच आहे. ते हीत साधायचे असेल तर 'राम' नामच तुम्हाला तारेल. श्री शंकराजी ह्या नामाची ग्वाही साऱ्यांना देत आहेत श्रीशंकरांनी त्या श्रीरामाला आपल्या 'हृदयातच' स्थान दिले आहे. श्रीराम- श्रीशंकरांनी ह्यांचे संबंध फार आगळेवेगळे आहेत. दोघे एकमेकांचे गुरू, आराध्य देवत, श्रीशंकरांनी श्रीरामाला अंतरी धरले तर श्री रामरूपी श्री विठ्ठलाने त्यांना डोक्यावरच घेतले आहे.

" विठोने शिरी वाहिला देवराणा - तया अंतरी ध्यास रे त्यासी नेणा।

निवाला स्वये तापसी चंद्रमौळी - जिवा सोडवी राम हा अंतकाळी।।८४।।"

ह्या म. श्लोकातून श्रीसमर्थांनी ते स्पष्टच केले आहे. म. श्लोक ८२ ते ८६ पर्यंत राम नाम कसे श्रेष्ठ आहे, तेच तुझे खरे ' निजधाम' आहे. हे मनाला सांगत आहेत. इथे ही पुनः साधकाना ही तळमळीची, हीताचीच गोष्ट पुनः पुनः सांगत आहेत. रामनाम हेच साधकाचे खरे निजधाम, ते स्वहित साधून घ्या.

तिसऱ्या कडव्यात पुढे म्हणतात,

अखंडित निजध्यास- धराअंतरी अभ्यास। बोले भागवत व्यास - हरिभजने तरा।।

श्री शंकरासारखाच अखंडीत निजध्यास साधकाने धरावा तोच अभ्यास करावा. ह्या हरिभजनासाठी, व्यासांचे भागवतही वाचावे. भागवतात, हरिभजनाने तरून गेलेल्या श्रेष्ठ भक्तांच्या- भागवतांच्याच कथा वर्णन केल्या आहेत. भक्त ध्रुव भक्त प्रल्हाद, सूर्य वंश, चंद्रवंशातील राजे थोर थोर ऋषीमुनी व मुख्य भागवतातील गोप- गोपिका सारे एका हरिभजनामुळे जीवनमुक्त झाले. चिरायु-चिरंजीव झालेत. भागवतात भगवंताने वेळोवेळी भक्तासाठी अवतार घेतले त्यातील प्रमुख २४ अवताराच्या कथेतून ही हरिभक्तीच द्विगुणीत केली आहे. नवविधाभक्तीचे प्रकारही त्यात स्पष्ट केले असून, कोणत्याही एका भक्तीचे अनुसरणाचा अभ्यास सतत केला तर जीव भवसागरातून तरून जाईल, ह्याची खात्री श्री व्यासमुनी देत आहेत. भागवतात श्रीराम चरित्र इतके सुंदर रित्या मांडले आहे की, प्रसिध्द भागवतकार श्री डोंगरे महाराज म्हणतात, ज्याला श्रीराम चरीत्र समजले, त्यालाच श्रीकृष्ण चरित्राचा, अद्भुत उलगडा, जो भागवतात रंगवला आहे, तो कळेल. आधी रामतत्व अंगी बाणवण्याचा अभ्यास केला तरच श्रीकृष्णाचे अद्भुत चरित्र व त्यातील तथ्य समजेल, अन्यथा सामान्यजन त्या लीलांना चमत्कारच समजतील. साधकाने श्रीरामाचे प्रयत्न व श्रीकृष्णाचे चातुर्य दोन्ही अंगी आणायला हवेत श्रीसमर्थ दोन्ही गुणांनी समृध्द होते. म्हणूनच त्यांनी इथे व्यासांचा उल्लेख केला आहे. साधकांना हीच अभ्यास दिशा इथे दिली आहे. माझा राम कसा आहे? ते पुढील कडव्यात सांगतात -

धीर उदार सुंदर कीर्ति जाणतसे हर।
सोडविले सुखर–वर दायक खरा।।

श्रीसमर्थ म्हणतात, माझा राम धीर–उदार–सुंदर आहे. धैर्याचा जणू तो मेरूच अफाट धैर्य त्याच्या अंगी आहे. दैवाचे कितीतरी आघात श्रीरामावर झालेत पण त्यांनी दैवावर विजय मिळवला माझ्या प्रारब्धातच असे होते, असे म्हणत हातपाय गाळले नाही. प्रयत्नांची पराकाष्ठा केली. उदार तर इतके की, वनवासाला जातांना, आपली सर्व संपत्ती त्यांनी दान करून टाकली होती. रामराज्यातही, ज्याला जे हवे, ते राम त्याला मिळवून देत. रघुवंशाची उदारता त्यांच्या अंगी पूर्ण मुरली होती. श्रीराम इतके सुंदर की, श्रीसमर्थ त्यांचे वर्णन, राजस सुकुमार, मदनाचा पुतळा, लावण्यांचा गाभा, सुकोमल काया असलेले वगैरे शब्दात वर्णन करतात. श्रीशंकरांनी सुकोमल मदनाला, लावण्याचा पुतळा असलेल्या कामदेवाला जाळले, पण तसेच रूप असणाऱ्या श्रीरामाला, अंतरात स्थान दिले. त्यातील मुख्य मेख ही की, मदन हा कामाचा पुतळा, प्रत्यक्ष कामदेव, त्याच्या सहवासात 'कामना' च उत्पन्न होणार पण श्रीराम कसे, ते 'निष्काम' आहेत.

"मुखी राम, त्या काम बाधूं शकेना"

जिथे राम तिथे काम उत्पन्नच होत नाही, इतके वैराग्य, विरक्ती, निरिच्छा जणू मूर्तिमंत रूप धारण करून आलेली,म्हणून श्रीशंकरांनी त्यांना हृदयात स्थान दिले. श्रीरामाचे चरीत्र निष्कलंकच, ती किर्ति श्रींशंकरांना माहिती आहे. श्रीरामाचा मोठेपणा, त्यांचे परब्रह्म रूप ते पूर्ण जाणून आहेत. ज्या शंकराने रावणाला वर दिलेत, ब्रह्मदेवाने वर दिले, नव्हे, नव्हे जे देव फक्त 'वरदायक' वर देण्याचेच काम करतात, त्या सर्व देवांना, रावणाने बंदीवासात टाकले होते. देव हा भक्ताधीन, तसेच मंत्राधीन आहे. कुणीही मनःपूर्वक त्याची भक्ती केली, तप केले की, त्यांना प्रगट होऊन वर द्यावाच लागतो. तिथे भेदभाव करताच येत नाही. म्हणून बहुतेक असूर वृत्तीचे लोक, शंकर वा ब्रह्मदेवाला प्रसन्नकरून म्हणजेच राजस वा तामस उपासनेतून वरप्राप्ती करून घेत व शिरजोर, उद्दाम बनत असत. फक्त श्रीविष्णू हे विवेकाचे सागर असल्यामुळे युक्तीने ते त्यातून मार्ग काढतात. श्रीराम हे विष्णूचेच, परब्रह्माचेच अवतार म्हणून त्यांनी वरदायक सुरवरा सोडविले. ही कीर्ती सर्वश्रुतच आहे. रावणाने अतुल सामर्थ्याने त्रैलोक्य जिंकले व सर्व देवांना वेठीस धरले म्हणजेच त्यांचेकडून कामे करवून घेऊ लागला सर्व देव रावणाचे बंदीवान झालेत. प्रथम हनुमंताने सीताशोधनाचे वेळी पाहिले. ह्याच देवतानी हनुमंताना वर दिलेले होते. त्याची उतराई त्याने आपल्या धन्याला हे वर्तमान सांगून, श्रीरामाकडून त्यांची बंदीवासातून रावणवधानंतर सुटका केली. सर्व देवांनी श्रीरामाची स्तुती केली आहे. रामायणात तसा उल्लेख आहे. त्या रामायणाची कीर्ति श्रीशंकरांना माहिती आहे. श्रीराम त्यांचे आराध्य दैवत आहे. श्रीरामांचा मोठेपणा ते जाणतात, त्या श्रीरामाचेच तुम्ही नांव घ्या. 'म्हणावा जय जय राम' म्हणून ही सवाई पूर्ण होते.

ह्या सवाईत श्रीगणपति, श्रीशंकर, श्रीराम, सर्वदेव, व्यास, सर्व भागवतभक्त ह्यांचे स्मरण करत, सर्वांना जणू वंदन केले आहे. मदनाचे पुतळे असे श्रीराम, श्रीकृष्ण ह्यांचा कणखरपणा पराक्रम, चातुर्य, धैर्य ह्यांचेही सूत्रात्मक शब्दात वर्णन करून त्यांचा महिमा गायला आहे. चार कडव्याचेच हे काव्य, पण केवढा मोठा अर्थ त्यांत आहे. मदनदहनानिमित्त "शिवमहिमा" हरिकीर्तने तरा शब्दातून, त्यास भागवतमहिमा, 'वरदायक सुरवर सोडविले' ह्यातून सर्व देवांचा महिमा सांगून श्रीरामाचा मोठेपणा वर्णन केला आहे.

।। श्रीमारूति ।।

रामदूत वायुसूत – भीमगर्भ जुत्पती।
जो नरात वानरात – भक्तिप्रेम वित्पती।।
दासदक्ष–स्वामीपक्ष – नीजकाज सारथी।
वीर जोर शिरजोर – धक्कधिंग मारूती।।
म्हणावा जय जय राम।।

दोनच कडव्यांची ही सवाई. श्रीमारूतीरायाच्या पराक्रमाचे व गुणाचे वर्णन करणारी आहे. मारूतीराय हे रामाचे दूत म्हणून लंकाशोधनाच्या कार्याला, सीताशोधनाच्या कार्याला निघालेले आहेत. सीतामाईपाशी त्यांनी मी रामाचा दूत आहे.

अशीच ओळख करून दिली आहे. रामसेवक कसा असावा? ह्याचा आदर्शच त्यांनी घालून दिला आहे. चारी दिशांना सीताशोधनासाठी वानरदल पाठविले गेले पण श्रीरामाची अंगठी फक्त हनुमंतानाच दिली गेली. मी तुमचाच दूत आहे, हे माईना कसे सांगू, कांहीतरी खूण द्यावी अशी पृच्छा फक्त मारूतीरायच करतात. त्यांच्या बुद्धीचातुर्याने त्यांनी सीतामाईना धीर दिला, आपली ओळख पटवून दिली व धन्याचा दरारा पण आपल्या पराक्रमाने दाखवून दिला. म्हणून रामायणात त्या भागाला 'सुंदरकांड' हेच नाव दिले गेले. रामकार्यासाठी हा सदैव सिद्ध आहे. श्रीसमर्थांनी दासमारूती व वीरमारूती अशा स्वरूपातच सर्वत्र मारूती स्थापन करून मंदीरे उभारली होती.

श्रीमारूतीरायाच्या जन्माची कथा ही अद्‌भूत आहे. श्रीशंकराच्या अंशातून त्यांचा जन्म , पण वायुदेवाला ही अंजनीबद्दल आपुलकी,प्रेम म्हणून मारूतीरायाना वायुसूतही म्हणतात. वायुदेवही अंजनीवर प्रसन्न होते. मारूतीला ते आपलाच पुत्र मानत. जन्मतःच सूर्यबिंबाला फळ समजून ते धरायला मारुतीने उड्डाण केले. इंद्राने वज्र फेकले. हनुवटीला मार बसून, ते बालक बेशुद्ध पडले. तेव्हा वायुदेवाना वाईट वाटले, राग आला व त्यांनी समस्त ब्रह्मांडातील वायुचा निरोध केला. जग कासावीस झाले. तेव्हा सर्वांनी वायुदेवांची प्रार्थना केली. सर्व देवानी मारूतीरायाला वर दिले. अफाट सामर्थ्य दिले.बालवयात त्याचे महत्व मारूतीरायाना आकलन झाले नाही. ऋषीच्या सामर्थ्याने विस्मरणात सर्व पराक्रम गेला. जांबुवतानी आठवण करून देताच ते सामर्थ्य परत प्राप्त झाले. अशी थोडक्यात कथा आहे.

'भीमगर्भ' शंकराचा अवतार म्हणून हे नाव आहे. मारूतीरायांना 'बलभीम' म्हणतात. शंकराच्या अकराव्या रूद्रावताराच्या अंशातून मारूतीरायाचा जन्म झाला आहे. ११ वा रूद्राचा अवतार, म्हणून दासबोधातील ११व्या दशकाला 'भीमदशक' नाव दिले गेले आहे. ११वा दशक 'अलिप्तपण' दर्शक आहे. भरपूर विरक्ती असल्याशिवाय, निष्काम निस्पृह असल्याशिवाय अलिप्तपण येत नाही.पादसेवन भक्तीत अलिप्तपण अत्यंत महत्वाचे. म्हणून त्यांच्या गुणवर्णनपर 'भीमगर्भ जुत्पती' हे शब्द घालून मारूतीरायाचे जन्माख्यान 'वायुसूत, भीमगर्भ जुत्पती' ह्या दोन शब्दातून समर्थांनी केले आहे.

मारूतीराय सर्वश्रेष्ठ भक्त आहेत. "शरण शरण हनुमंता" ह्या तुकारामाच्या अभंगात "काय भक्तीच्या त्या वाटा–मज दावाव्या सुभटा" ह्या चरणाने ते व्यक्त केले आहे. दास्यभक्तीसाठी मारूतीराय अग्रक्रमात आहेत. भक्ती म्हणजे 'अनन्यभाव' जो विभक्त नाही तो भक्त. देव भक्ताचे अतुट नाते. भक्तिप्रेम याचे मूर्तिमंत प्रतिक म्हणजेच मारूतीराय. श्रीरामासमोर हात जोडून, रामकार्याला मी सतत तयार आहे, अशा अविर्भावातच ते असतात.

रामदक्ष–सेवकाने अत्यंत सावध असले पाहिजे. धन्याचा तो रक्षक असतो. धन्याला कोणतेही कष्ट पडू नयेत, म्हणून तो तत्पर असतो. सीतामाईंना पण हनुमंत म्हणाले चला मीच तुम्हाला इथून घेऊन जातो, त्यावर सीतामाईंनी जे उत्तर दिले, ते पतिव्रतेला साजेसेच होते. माझा धनी किती पराक्रमी आहे, ह्याची चुणुक मात्र लंकादहनातून मारूतीरायांनी दाखवून दिली व एक दूत एवढा पराक्रमी तर धनी केवढा मोठा असेल? ही दक्षता, आपल्या स्वामीचा पक्ष कसा उज्वल आहे हे त्यातून दाखवले. रामकार्याची थोडक्यात पताकाच झळकवली. व आपले कार्य सफल करून ते परतले.

मारूतीरायाचे सीताशोधनाचे कार्य, वाल्मिकींनी वीर रसात वर्णन केले आहे. मारूतीरायाना चढलेले स्फुरण, त्यांची गगनात छलांग, समुद्र पार करताना मधे आलेले अडथळे दूर करणे, लंकादेवीचा पुराभव, सीतेला रामकथा गाऊन दिलासा देणे, त्यानंतर रावणाच्या राजदरबारातील प्रसंग, लंकादहनाचा कल्लोळ व सीतामाईचा चुडामणि घेऊन परत येणे. साराच पराक्रम स्फूर्तिदायी, आनंददायीच आहे.

पुढे प्रत्यक्ष युद्धकांडात त्यांच्या पराक्रमाचे वर्णन वाचून मन खरोखर थक्क होते. लक्ष्मणाला शक्ती लागली तेव्हा द्रोणागिरी आणणे, रामलक्ष्मणांना अहिमहिरावणाने पाताळात नेले. तेथे जाऊन रामलक्ष्मणाची सुटका वगैरे प्रसंग वाचतांना ऐकतांना वाचकाची, भाविकाची मति खरेच चकीत होते. व आपोआपच मारूतीरायाचा पराक्रम खरेच धक्कधिंग करणाराच अशी खात्री पटते.

मारूतीरायाची अशी सुरेख शब्दात भक्तियुक्त स्तुती करण्याचे कारण की, समर्थचरित्रात, श्रीरामरायांनी अनुग्रह करून, नारायणाला मारूतीरायाच्या स्वाधीन केले आहे.

स्वधामासी जाता महारामराजा। हनुमंत तो ठेविला याचि काजा।
सदा सर्वदा रामदासासी पावे। खळी गांजिता, ध्यान सांडूनि धावे।।

अशी स्तुती त्यांनी एका श्लोकात केली आहे. मारूतीरायांनी श्रीसमर्थांना राम आज्ञेप्रमाणे खरोखर सांभाळले आहे. परकीय सत्ता असतांना, ह्या अफाट कार्य करणाऱ्या धर्मप्रेमीला, यवनराजानी त्रास कसा दिला नाही? ह्याचे सामान्यांना आश्चर्य वाटते. त्याचे खरे कारण, मारूतीराय त्यांचे रक्षक. तशी वेळ येऊच दिली नाही. म्हणून निर्भयतेने ते भारतभर हिंडू शकले. "मारूती उपासना नेमस्त- वाढविला परमार्थ रामदासी" मारूतीची उपासना म्हणू मारूतीरायाच्या दोन सवाया आहेत. त्यातील ही पहिली त्यांच्या गुणवर्णनाची व दुसरी रूपवर्णनाची. पहिली चिरंतन सद्गुणाची, निर्गुणरूपाची तर दुसरी लगुण साकाराची.

तिसरी सवाई श्रीरामप्रभूची आहे ती अशी -
नाम श्रीरामसुंदर - ध्याती उमा महेश्वर।
सिंहासनी रघुवीर - अंकी सीता शोभली।।
लक्ष्मण महावीर - भरत शत्रुघ्न धीर।
हनुमंत जोडी कर - देवर्षि गायिला।।
ज्याचे ध्यानी रामदास - तेच ध्यान कल्याणास।
बंधु दत्तात्रेयास - रामप्रेमा लाधला।।
वर्णू राघवाचे यश - श्रीगुरूचा नामघोष।
पूर्व पूण्य हे विशेष - लक्ष पायी ठेविला।।
।। म्हणावा जय जय राम ।।

श्रीरामाचे हे सिंहासनाधिष्ठित राजारामाचे वर्णन आहे. तिसऱ्या कडव्याच्या अनुषंगाने विचार केल्यास ही सवाई 'कल्याणस्वामी' रचित असावी असे वाटते. बंधू दत्तात्रय, श्रीगुरूंचा नामघोष व पूर्वपुण्य हे विशेष ह्या शब्दांद्वारे, त्याला पुष्टीच मिळते. मसूरला व शिरगावला श्रीरामाची स्थापना श्रीसमर्थानी केली होती. शिरगाव मठात दत्तात्रय-कल्याणांच्या बंधुंना मातेसह ठेवून, तेथील व्यवस्था पाहण्यास सांगीतले होते. मसूरच्या रामनवमी उत्सवातच अंबाजीचे कल्याण नामात रूपांतर, त्यांना तिथे लाभलेला आत्मबोध, आत्मसाक्षात्कार व आपणासारखे करिती तत्काळ 'असा श्रीगुरूचे अनुग्रह' त्याना तिथेच लाभला होता. ते सिंहासनाधिष्ठित श्रीरामाचे वर्णन करत आहेत.

श्रीरामाचे नाम तर अलौकिक आहेच, पण स्वतः श्रीराम सगुण साकार रूपात सौदर्यांचा जणू पुतळाच आहेत. सिंहासनावर राजा राम बसले आहेत. डाव्यामांडीवर जानकी माता आहेत. राजपत्नी डाव्या बाजूला असते. मुलगा असल्यास युवराज उजव्या बाजूला बसवतात. तिन्ही भावंडाचे रामराजावर अतोनात प्रेम आहे. लक्ष्मण उजव्या बाजूला उभा असतो. छत्र-चामर धरून भरत- शत्रुघ्न सेवेसाठी सज्ज असतात.

श्री ब्रह्मचैतन्य महाराजांनी आपल्या 'रामपाठात' हे रूप सुंदर वर्णन केले आहे.

गुप्त ठेविले निर्गुण-प्रगट केले सगुण स्वरूप।
श्रीराम अवतार घेऊन, धर्म स्थापिला स्वहस्ते।।
अयोध्या पुण्यनगरी - तेथे श्रीराम राज्य करी।
तपोनिधी महाक्षत्री - सिंहासनी विराजे।।
शेषे धरीले छत्र - भरत शत्रुघ्न वारिती चामर।
भक्त प्रार्थिती वारंवार - जयजयकारे गर्जती।।
नलानील जांबुवंत - अंगद, सुग्रीव, बिभीषण भक्त।
निरिच्छ वायुसुत - सदा निमग्न रामरूपी।।

अशा श्रीरामासमोर हनुमंत हात जोडून सेवेसाठी तयार आहे. नारदादि ऋषिवर स्तुतीपाठ गाण्यासाठी सज्ज आहेत. श्रीप्रभूची स्तुती हा तर त्यांचा आवडता छंद आहे. ते नित्य त्या भजनातच दंग असतात.

इथे लक्ष्मणाला 'महावीर' तर भरत शत्रुघ्नाला धीर असे विशेषण दिले आहे. लक्ष्मण हा श्रीरामांचा बहिश्चर प्राणच आहे. त्यांनी श्रीरामाची पाठ कधीच सोडली नाही. श्रीरामाच्या रक्षणासाठी ते सदैव तत्परच आहेत. एका कविनेही लक्ष्मणाचे वर्णन छान केले आहे. "सौव्य भागी सौमित्र उभा जो – राजाज्ञेची वाट पहातो"

श्रीरामाचे आज्ञापालन तिन्ही भावंड मनापासून करतात. दैववशात भरत–शत्रुघ्न यांना श्रीरामापासून दूर राहावे लागले. विरहाची व्यथा त्यांनी धैर्यानी सोसली व अयोध्येच्या राज्यपालनाचे कार्य उत्कृष्ट करून दाखवले म्हणून 'धीर' हा शब्द चपखल बसला आहे.

तिसऱ्या कडव्यात कल्याणस्वामी म्हणतात, सर्वच रामाचे दासाचे ध्यानी मनी 'श्रीराम' च असतात. रामदास म्हणजे कल्याणांचे 'श्रीगुरू' त्यांना तर 'रघुनाथ उपासना' प्राणापलिकडे प्रिय होती. सारी करूणाष्टके, आळवणी, अभंग, पदे, स्फूट काव्ये ह्यातून श्रीसमर्थांची श्रीरामभक्ती ओतप्रोत भरलेली दिसते.

"तुझिया वियोगे जीवित्व आले" ह्या चरणाने सुरवात असलेले करूणाष्टक "तुजवीण रामा मज कंठवेना" ह्यातून श्रीसमर्थांनी सामान्य बध्द जीवांनी, कीती आर्ततेने 'राम आळवणी' करावी ह्याचे मार्गदर्शनच केले आहे. तसेच प्रेम त्यांनी आम्हा बंधूना करावयास शिकवले आहे. त्याच मार्गाने आम्ही शिष्यगणही जाऊ तोच मार्ग आम्हाला रामाप्रत नेणारा आहे. आम्ही तो मार्ग अनुसरला आहे व कृतार्थ झालो आहोत. असेच जणू तिसऱ्या कडव्यात कल्याणस्वामी सांगतात. आत्मसाक्षात्कार झाला की, गुरूशिष्य भेद रहातच नाही. शिष्य गुरूपदी पोचतो. पण गुरू जसे स्वतःला 'रामदास' च म्हणवतात, तशीच लीनता, नम्रता शिष्यात असते. आम्हा दोन्ही भावांना हे रामप्रेम लाभले, हे आमचे पूर्वपुण्यच होय. श्रीसमर्थासारखे श्रीगुरू लाभले, रामोपासना मिळाली, मग त्या राघवाचे यश गुण गातांना आम्हा भक्तांना भरते येणारच म्हणून विशेष आनंदाचे म्हणत आहेत.

वर्णू राघवाचे यश – श्रीगुरूचा नामघोष।<br>
पूर्वपुण्य हे विशेष – लक्ष पायी ठेविला।।

श्रीसद्‌गुरूच्या जयजयकारासमवेत, त्या रघुरायाच्या पराक्रमाची यशोगाथा गाऊ यात पूर्वपुण्य लाभले म्हणूनच असे श्रीगुरू व हा परमार्थाचा मार्ग मिळाला. त्यांनी एकच गोष्ट सांगितली सर्व लक्ष रामाप्रत ठेवावे.

दाता येक रघुनंदन –वरकड लंडी देईल कोण?<br>
तया सोडोनी आम्ही जन – कोणाप्रती मागावे।।<br>
म्हणौनि आम्ही रामदास – श्रीरामचरणी आमुचा विश्वास।<br>
कोसळोनि पडो हे आकाश – आणिकाची वास न पाहू।।

त्या श्रीरामप्रतिच सर्व लक्ष, निष्ठा, प्रेम, भक्ती ठेवून, सर्वजण त्यांचा जयजयकार करूयात.

।। म्हणावा जय जय राम।।

सवाई ४ ।।श्री मारूती।।

नयनी पाहता हनुमंत – ज्यासी वर्णिती महंत।<br>
ज्याचा महिमा अनंत – मुख्य प्राण रामाचा।।<br>
स्वामी रामाचे वहन – केले लंकेचे दहन।<br>
त्याची कीर्ति गहन – बलभीम नामाचा।।<br>
सदा बांधुनिया माज – करी रामाचे निजकाज।।<br>
ज्याचे शिरी रघुराज – सेवक पूर्ण कामाचा।।<br>
सर्व देवाचा वरिष्ठ – वारी दासाचे अरिष्ट।<br>
रामदास एकनिष्ठ – मारूती हा नेमाचा।।

।। म्हणावा जय जय राम ।।

ही सवाई सगुणसाकार मारूतीरायांची आहे. श्री हनुमंताचे रूप कसे आहे? श्री मारूतीरायाचे वर्णन श्रीसमर्थांनी भीमरूपी स्तोत्रात उत्तम केले आहे. १५ श्लोकाचे चे स्तोत्र आहे. एकेक शब्दातून त्यांचे रूपवर्णन करत मारूतीरायाचे शब्दचित्रच उभे केले आहे. त्यातील एक चरण सुंदर आहे.

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू

चपळांग पाहता मोठे, महाविद्युल्लते परी।।

पर्वतासारखा भरदार शरीरयष्टीचा, म्हणजे योग्य प्रमाणात असलेला शरीराचा मांसल भाग, लवलवीत, थलथलीत असा नाही, तर भरगच्च असा पिळदार स्नायुचा असूनही, सडपातळ, नेटका बांधा व शरीराची चपळाई तर अशी की विजेसारखी शरीर अत्यंत लवचिक, सहज कुठेही बाक देऊ शकणारे, असे शक्तिमान सारखे स्वरूप ज्याला पाहताच, वीररस, भक्तीरस, दास्यभाव आपोआप उचंबळून येतो. असे मनोहर रूप जे पाहताच मनाला एक प्रकारचा धीर, आधार वाटतो. मारूतीचे वर्णन, त्याच्या एका श्लोकात रामरक्षेत आहे. "मनोजवं –मारूततुल्यवेगं, जितेंद्रियम्– बुध्दीमतां वरिष्ठम वातात्मजं, वानरयुथमुख्यम् श्रीरामदूतम् शरणं प्रपद्ये" मनाच्या वेगाने जाणारे, ब्रह्मचारी, बुध्दिमान, वानरदलातील प्रमुख, पराक्रमी असून लीन, रामकार्यात अग्रणी हे प्रमुख गुण असे अनंत गुण त्यांच्या अंगी आहेत. म्हणूनच महंत त्यांचे वर्णन करतात मुख्य तो श्रीराम व भक्त ह्यांच्यामधील दुवा साखळी आहे.

मारूती आपल्या बुध्दीचातुर्याने श्रीरामांचा लाडका झाला आहे. रामायणातला मारूती– श्रीराम प्रथमभेट वर्णन अत्यंत अभ्यसनीय आहे. प्रत्यक्ष श्रीरामांनी लक्ष्मणापाशी त्याचे कौतुक त्यावेळी केले आहे. त्याने श्रीरामाकरिता इतकी सेवा दिली आहे की, पुढे राज्याभिषेकानंतर श्रीरामानी सर्वांना काही ना काही बक्षिस दिले. पण मारूतीरायांना ते एवढेच म्हणाले की, मी तुझा उतराई होऊच शकत नाही. इतके तुझे ऋण मला झाले आहे. तू जणू माझा प्राणच श्रीराम–लक्ष्मणाचा प्राण खरोखरच हनुमंताने वाचविला होता. नागपाशानी त्यांना बांधले गेले, त्यावेळी गरूडाला आणून त्यांची सुटका हनुमंतांनीच केली आहे. अशा किती गोष्टी सांगाव्यात एकाच शब्दात श्रीसमर्थ म्हणतात, त्याचा महिमा अनंत आहे किती गोष्टी सांगाव्यात. त्याचा महिमा अनंत आहे किती वर्णन करू, अवर्णनीयच.

श्रीरामांना जर 'आत्माराम' स्वरूपात जाणले, तर त्यांचा कारभारी 'वायु' आहे. वायुतत्वाचे श्री हनुमंत, जणू श्रीरामाचा प्राणच कलेवरात प्राण असतो, तेव्हा त्याला चैतन्ययुक्त जीव समजतात. म्हणूनच वायुस्तवनात श्रीसमर्थांनी हनुमंताचा महिमा गायला आहे.

असा हा श्रीहनुमान श्रीरामाचे 'वाहन' ही झाला आहे. ऋष्यमुक पर्वतावर सुग्रीवभेटी पुर्वी हनुमंत–श्रीराम भेट झाली. प्राथमिक बोलणी झाल्यावर पर्वतावर कसे जायचे? असा प्रश्न पडला असता, राम – लक्ष्मणाना हनुमंतांनी खांद्यावर घेऊन उड्डाण केले आहे. अहिमहिरावणाच्या लढाईचे प्रसंगी ही पाताळातून त्या दोघांना त्याने असेच वाहून आणले होते. श्रीरामाच्या वतीने, त्यांचे प्रतिनिधीत्वच जणू त्याने लंकाशोधनात केले व आपल्या बुध्दीचातुर्याने, पराक्रमाने सर्वांना चकीत करणारे, थक्क करणारे, लंकादहनाचे अद्‌भूत कार्य केले. त्या हनुमंताची कीर्ति काय सांगू? खूप मोठी आहे. इथें 'गहन' शब्द वापरला आहे, त्याचे विश्लेषणच करता येणार नाही असा पराक्रम त्यानी केला आहे. त्याचे नावच 'बलभीम' आहे. भीम हे नाम अतुल पराक्रमाचेच प्रतिक आहे. भीम–खूप मोठे. पराक्रमात खूप मोठा म्हणून बलभीम. बलभीम हे मारूतीचेच नांव आहे. पंचपांडवामध्येही वायुकुमार 'भीम' हेच नाव आहे. तो वायुदेवाचा अंश आहे.

असा हा हनुमान, सदा रामकार्यासाठी सर्वदा सज्जच असतो. बसतो तो ही अशा स्थितीत की चटकन उठता यावे अशीच बैठक. आंडामांडा घालून प्रशस्त कधीच बसणार नाहीत. एकतर उभा किंवा 'खोखो' खेळतांना जसे बसतात तसे. चटकन उठून धावता, पळता, चालता येईल अशी स्थिती. त्याच्या डोक्यात सदैव रामरायांचेच विचार, ज्यांच्या मस्तकी रामरायाचा वरदहस्त आहे असा, श्रीरामांनाही त्याचा एवढा विश्वास की, सीताशोधनाला जातांना आपली अंगठीची खूण त्यांनी हनुमंताला दिली आहे. हनुमानाची कामगिरी नेहमी फत्तेच होणार. कीर्तनकार मजेची गोष्ट सांगतात की, आमचे सेवक 'सांगकामे,' 'ओनामे' असे असतात. हाक मारली, फक्त ओ देतील. सांगितलेले कामही नीट करणार नाहीत. नाही समजले तर स्वतःची बुद्धी वापरणारच नाहीत. तसा हनुमान नाही. औषधी वनस्पती कळाली नाही, संपूर्ण द्रोणागिरीच उचलून आणला. रिकाम्या हाती आला नाही. हे बुद्धीचातुर्य त्याच्या जवळ आहे.

मारूतीराय, हे देवांचेदेव,महादेव यांचे अवतार आहेत. श्रीमहादेव हे देवांचे देव–महादेव आहेत. ते एकनिष्ठ प्रथम रामदास आहेत. त्यांची रामनिष्ठा अनन्य आहे. त्यांच्याच अंशावताराला मारूतीरायांना इथे सर्व देवांचा वरिष्ठ, श्रीरामासारखेच वाखाणले आहे. बंदीवासातील देवांना प्रथम मारूतीरायांनी पाहिले. व त्यांचे विघ्न हरण झाले. हे सर्व देवही त्या परमदेव श्रीरामांचे सेवकच आहेत. परब्रह्माच्या आज्ञेनुसार सारेजण कार्य करतात. अगदी तिन्ही गुणावतारी देव सुद्धा त्यातून सुटलेले नाहीत. म्हणून इथे परब्रह्मरूप श्रीरामांना 'सकल' देवांचा वरिष्ठ असे प्रथम संबोधून मारोतीरायही त्याच तोडीचे आहेत, कारण सर्व दासांचे अरिष्ट नाहिसे करण्याचे परमदेव श्रीरामाचेच कार्य तू करत आहेस. प्रधान राजाचे काम करतो. सर्व कार्यकारी सत्ता प्रधानामार्फतच कार्य करते. तसे मारूतीरायांना भक्तलोक गाऱ्हाणे सांगतात व त्याच्या मार्फत भक्ताचे काम सहज साध्य होते. श्रीसमर्थांनी आपल्याला होणारा असह्य ताप मारूतीरायांजवळ सांगितला आहे. उदा. कफाची व्यथा ही गोष्ट. लहानपणीच रामरायाकडून नारायणाला अनुग्रह मिळाला, त्या वेळीही श्रीरामरायानी नारायणाला मारूतीच्या स्वाधीनच केले होते. देव आणि भक्ताचा मारूतीराय जणू मध्यस्थच. म्हणून रामदासाची एकनिष्ठभक्ती, जितकी श्रीरामावर तितकीच त्यांच्या बहिश्चर प्राण असलेला मारूतीरायावर आहे.

श्रीब्रह्मचैतन्य महाराज, हे पुढे रामदासांचेच अवतार मानले जातात. त्यांनी पण आपल्या भक्तांना सांगितले आहे की, तुम्हाला काही अडचण, दुःख आले, मनातले गुह्य सांगायचे असेल तर, मारूतीच्या देवळात जा, त्याला सांगा, म्हणजे ते माझ्यापर्यंत म्हणजेच माझ्या हृदयस्थ रामापर्यंत ती कैफियत पोचेल. ह्यातील मर्म एकच भक्त, मध्यस्तमारूती, श्रीराम सारे एकाच भावाचे श्रीराममय व्हायला हवेत.

लग्नाला जातांनाही नवरदेव, मारूतीरायाच्या दर्शनाला जातो व त्या ब्रह्मचारी मारूतीरायाच्या साक्षीने प्रपंचाला सुरवात करतो. तसेच मानवाच्या अंत्यक्रियेनंतरही, मारूतीरायाचे दर्शन घेऊनच, लोक आपाल्या घरी जातात. सुख–दुःखात दोन्ही वेळेला, मनाला विश्रांती, समाधान, दिलासा देणारा हा मारूतीराय, सर्वांना सखा वाटतो. तो ह्याच कारणामुळे. म्हणून श्रीसमर्थांनी 'सवाया' मध्ये, त्याही पहिल्या मुख्य पांच सवायामध्ये मारूतीरायांसाठी दोन सवाया रचल्या आहेत. तो जसे अखंड रामनाम घेतो तसेच "म्हणावा जय जय राम" म्हणत, श्रीरामरायाला मुजरा करत ही सवाई संपन्न करू यात.

पुढची सवाई "श्रीसमर्थ (५) अशी आहे. त्यांचे वर्णन अप्रतिम आहे. श्रीसमर्थ सद्‌गुरू रामदासस्वामी व श्री समर्थ म्हणजे प्रत्यक्ष रामराजा, ज्याला 'स्वामी' समर्थ म्हणत. त्यांचाच जयजयकार करीत. त्या जयजयकारामुळे रामदासस्वामींनाच लोक समर्थ म्हणू लागले. देव भक्त दोघांचे नांव एकच झाले. त्या ऐक्याचे प्रतिकच जणू ही सवाई आहे.

श्रीसमर्थ (५)

श्रीसमर्थ मुख्यप्राण – सच्चिदानंदाची खाण।<br>
जगदोध्धारासी ठाण – मांडिले जेणे ।।<br>
अविद्येची ताणाताण – ममतेची दाणादाण।<br>
अभिमानाचा पाषाण – फोडिला त्वरे ।।<br>
जीव अत्यंत अजाण – तेचि झाले सुजाण।<br>
क्वचित घेता आडरान – मार्गी लाविती त्वरे।।<br>
वचन जेवि रामबाण – कदा नव्हे अप्रमाण।<br>
निश्चयेसी समान – राम राम बोलणे ।।<br>
।। म्हणावा जय जय राम ।।

श्रीरामराय, श्रीसमर्थांचे सद्‌गुरू आहेत. त्यांच्या कडूनच त्यांना अनुग्रह मिळाला आहे. आपली गुरूपरंपरा सांगताना श्रीसमर्थ म्हणतात –

नमो आदिबोधात्मरूपा परेशा, नमो हंसनारायणा निर्जरेशा।<br>
नमो ब्रह्मदेवा–वसिष्ठी श्रीरामा, नमो मारूती रामदासाभिरामा।।

हंसरूपाने ब्रह्मदेवांना परब्रह्मानी बोध केला. ब्रह्मदेवानी वसिष्ठांना, वसिष्ठांनी श्रीरामाला, श्रीरामांनी रामदासांना, रामदासांनी कल्याणाला, त्या कल्याणाच्या शिष्य परंपरेतीलच ब्रह्मचैतन्य महाराज. तिथेही ही गुरूपरंपरा नामावली नित्य म्हटली जाते. सांगायचे तात्पर्य, श्रीरामरायरूपी, श्रीसमर्थरूपी, सच्चिदानंदरूपी ही गुरूची सवाई आहे. म्हणून सुरवातीसच म्हणतात –

"श्रीसमर्थ मुख्य प्राण" श्रीसमर्थ रामरूपी सद्‌गुरू हे आमच्या शरीराचे मुख्य प्राण आहेत. प्राणही पांच प्रकारचे, त्यांना पंचप्राण म्हणतात. प्राण–अपान–उदान–समान–व्यान ५ही मिळून शरीर चालवतात. त्यात मुख्य 'प्राण' आहे. प्राण आणि जीवचैतन्य एकच कार्य करते. शरीरातून प्राण जातांना जीवचैतन्यही त्याचे सोबत जाते. म्हणून "जीवापलिकडे, प्राणापलिकडे मी जपले" असे म्हणतात. जीवंत राहण्यासाठीचा मुख्य घटक प्राण, थोडीशी धुगधुगी असली तरी, जीव वाचवण्याचे शर्तीचे प्रयत्न होतात. इतके महत्व प्राणाला आहे. असे हे आमचे सद्‌गुरू–श्रीसमर्थ, श्रीरामराय हे मुख्यप्राण, सच्चिदानंदाची खाण आहेत.

सच्चिदानंद शब्दात तीन शब्द एकत्र आहेत. सतं–चित्–आनंद. हे परब्रह्माचे वर्णन आहे. सत् म्हणजे तिन्ही काळी असलेले, पूर्वी–आता–नंतर, ते तिन्ही भूत–वर्तमान–भविष्य काळात अखंड असतेच असते ते सत् रूप होय. तसे चित् ते असेपर्यंत त्याची सतत जाणीव भासत असते. ती जाणीव, 'मन–बुद्धी' या सूक्ष्म रूपातही, ती प्रकर्षाने जाणवते भासते. ती पण त्रिकालाबाधीत आहे. व 'आनंद' शब्द असा आहे की, त्याला विरोधी शब्दच नाही. नित्य प्रसन्नता शुद्धता. परब्रह्माची प्रत्येक कृती आनंद दायिनीच असते. पंचमहाभूतेही तो निर्भेळ आनंद सर्वत्र समान रित्या पसरवत असतात. नतद्रष्ट तमोगुणी मानवच आपल्या कृत्यानी त्यात बाधा निर्माण करतो. नाहीतर वृक्ष, वेली, नदी, पर्वत, सारा आसमंत समभावाने सर्वांना 'आनंद'च देत असतो. क्षणिक सुखाने मनुष्याच्या आनंदाच्या कोटीपट हा देवाचा आनंद–परमानंद आहे त्याला तुलनाच नाही. ह्या आनंदाचे मोजमापच करता येत नाही. इतका तो अमाप, अमोघ आहे. तुकाराम महाराज म्हणतात, "आनंदाचे डोही, आनंद तरंग, आनंदची अंग–आनंदाचे" त्या आनंदाचे वर्णन शब्दात कसे होणार? असा हा माझा सद्‌गुरू, श्रीराम हा सच्चिदानंदाची खाण आहे. सारे समर्थसेवकही हेच म्हणतात 'श्रीसमर्थ' सच्चिदानंदाची खाण आहेत. त्यांनी खरे 'आत्मधन' रामदासीयांना दिले आहे. इतके अगणित गुणसंपन्न असूनही, त्यांनी जगाच्या उद्धारासाठी अवतार घेतला. 'ठाण' म्हणजे साकार रूप. मुळात निर्विकार, निराकार असणारे हे तत्व, "निराकार मूर्ती कैसी आकारा आली, सर्वाघटी व्यापक माझी सद्‌गुरू माऊली" जगाच्या कल्याणासाठी, दुष्टांच्या निर्दालनासाठी, धर्मसंस्थापनेसाठी आकार घेते.

त्यांच्या साकार रुपातील कार्यातून पहिले काय साधले जाते? तर "अविद्येची ताणाताण–ममतेची दाणादाण" मी–माझे ह्या मायेच्या जाळ्यात अडकलेल्या जीवांचे बंधन सद्‌गुरु तोडतात. ही 'अविज्ञा' इतकी लवचिक असते की, कितीही ताणले तरी ती लवकर तुटत नाही. ताण दूर होताच पुनः जवळ येते. क्षणिक वैराग्य उत्पन्न होईल पण पुनः माया जाळ्यात अडकवते. इतकी ती अनाकलनीय आहे. जीव कसा कुठे कोणात गुंतेल व कार्य करेल, कांही समजत नाही. पण सद्‌गुरू परमार्थाचा मार्ग दाखवत, शिष्याला ओंजारत– गोंजारत, ह्या मायेतून त्याची सुटका करतात व ही सारी फसवी 'ममता' आहे, हे शिष्याला समजते. हे 'मी – माझे' नष्ट करण्यासाठी, श्रीकृष्णाना रणांगणात अर्जुनाला गीता सांगावी लागली. रामायणात तर रामप्रभूनी मातेला, भावाला, बिभिषणाला, वालीला, साऱ्यांना सुंदर उपदेश केला आहे. आदर्श मानवाने कसे वागावे? ह्याचे उदाहरणच घालून दिले आहे. श्रीसमर्थ रामदासस्वामींनी ही जनतेला शिष्यांना योग्य बोध करत, सन्मार्गाला लावले आहे. प्रसंगी 'अभिमानाचा पाषाण' ही फोडला आहे. (दगडातील बेडूक व तिथे असलेले पाणी) ही गोष्ट प्रसिध्द आहे. वामन पंडित, सदाशिव शास्त्री, वेणाबाईंचे निंदक अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. मुर्तिमंत 'अहंकार' म्हणजेच 'रावण' अत्यंत पराक्रमी, बुध्दिमान, त्रैलोक्याधिपती म्हणून मिरवणारा, पण त्याचाही अभिमान रूपी पाषाण श्रीरामांनी फोडला. ह्या एका कडव्यात अशी कितीतरी आख्याने सांगितली आहेत. श्रीसमर्थ सूत्ररूपात सांगतात. हेच त्यांचे वैशिष्ट्य.

सद्‌गुरूचे मुख्य कार्य " बध्दास मार्ग दावी" अजाण– अडाणी अज्ञानी लोकांमधे जागृती उत्पन्न करणे. नरदेहामध्ये केवढी शक्ती आहे? तो नराचा नारायणा" होऊ शकतो. त्याच्यातच 'भगवंताचे बीज' आहे. हे ज्ञान, ज्याच्या त्याच्या अधिकारानुसार सद्‌गुरू समजावून देत असतात. सदगुरूकडे सर्व प्रकारचे लोक येतात. त्यांच्या त्यांच्या कुवतीनुसार, शक्तीनुसार, बुध्दीनुसार सद्‌गुरू त्यांना वळण लावतात. कुणी आडमुठे असतील तर त्यांनाही चतुराईने वळवतात. "क्वचित

घेता आडरान" ह्या शब्दाने ते व्यक्त झाले आहे. फुलातून सुगंध आपोआप येतोच, त्यातून अत्तर काढणे सोपे आहे, पण संत, सद्‌गुरू मातीतूनच अत्तर काढतात. हेच त्यांचे वैशिष्टय संत सज्जन – सद्‌गुरू हे परब्रह्माचे अवतार, मग परब्रह्म अवतार श्रीरामरायाची वर्तवणूकही तशीच असणार. श्रीरामाना सर्व जातीचे, वर्णाचे मित्र होते. ते जगन्मित्र होते. रामायणात अशा कथा आहेतच. गुहक, जांबुवंत, नल, सुग्रीव, बिभिषण ही त्यातलीच प्रमुख नावे. अयोध्येची जनता तर राममयच होती. इतका तो लोकप्रिय होता.

श्रीराम एकवचनी होते. " वचन जेवी रामबाण" ह्या वचनानुसार श्रीरामांचा बाण एकदा सोडला की, काम फत्ते करूनच कार्य संपन्न व्हायचे सोडलेला बाण बोललेला शब्द, गेलेला काळ कधीच परत घेता येत नाही. आता नेते लोक वारेमाप 'मुक्ताफळे' उधळतात, व आम्ही तसे म्हटलेच नाही असे धादान्त खोटे बोलतात तसे श्रीरामाचे वचन नाही, सद्‌गुरूचे पण नाही त्या शब्दात सामर्थ्य होते. रामवाणी कधी असत्य ठरणार नाही, "अष्टपुत्रा सौभाग्यवतीभव" हा सती जाणाऱ्या स्त्रीला दिलेला आशीर्वाद, वचन श्रीरामांना खरा करून दाखवावा लागला त्या सतीच्या पतीला जीवनदान मिळाले. त्यामागील निश्चय एकच, माझ्या मुखातून 'रामच' बोलले ते खरे करण्याची किमया भगवंताला सृष्टीचक्र उलटे फिरवून करावी लागली. इतका रामावर, सद्‌गुरूवर श्रीसमर्थांचा विश्वास होता. ते रामराय ते श्रीसमर्थ सद्‌गुरू आम्हाला, तोच नामजप देऊन, आम्हाला अभयदान देऊन, निर्धास्त करत आहेत. त्यांची अपार करूणा, वरदहस्त, तसाच आमचे शिरी राहू दे, हीच नम्र विनंती करीत आम्ही रामरायाचा जयजयकार करतो.

।। म्हणावा जयजय राम।।

इथे मुख्य म्हणावयाच्या ५ सवाया समाप्त होतात. वेळेनुसार 'सवाया' उपक्रम राबवला जातो पैकी ह्या ५, वाराची, शेवटची व जोहार हा भाग म्हणावाच लागतो. त्यात काटछाट करता येत नाही. हा नित्यपरिपाठ आहे. सवायामध्ये ही निरनिराळ्या शिष्यांनी रचना करीत भर टाकली आहेच. घळीमध्ये घळीची सवाई पण म्हणावी लागते. तर ब्रह्मचैतन्य संपद्रायातीलच प्रल्हाद महाराज रामदासी यांच्या परंपरेत श्रीसद्‌गुरूची एक वेगळीच सवाई म्हटली जाते. श्री सद्‌गुरूच सर्वश्रेष्ठ हा त्यातील भाव आहे. " सबसे बडा कौन"

अ) इतर सवाया (१)

सिंहासनापर बैठे राम – कपि आये जो तमाम।
पिछे ठाडे हनुमान। करे या नोकरी।।
कपि कहत रघुराज। बडा हुआ अपना काज।
निहाल करोजी महाराज। फुकट क्या नोकरी।
सुग्रीवकु दिया गाँव। भरतकु दिया भाव।
हनुमानुक दिया नावं। कुछ मतलबसे।
देनेवाले रघुवीर। क्योंव होय दिलगीर।
व्यास भये फकीर। अजगरका दाता राम।

ही हिंदी रचनेतील सवाई आहे. श्रीसमर्थांना ५६ भाषा येत होत्या व त्यांनी अनेक नावांनी लिखाण केले आहे. त्यातलेच अजगर, फकीर हे शब्द आहेत. अजगर फकीर या शब्दातून सन्यासी, जागी वृत्तीच दर्शवली जाते. भारतभर ११०० मठाचे जाळे, प्रत्येक मठात रामराय, मारूतीची स्थापना असणारच व तेथेही परिपाठ चालवला जात असे.

वरील सवाईत रामराज्याभिषेकाला सारे वानरदळ आले आहे. त्या प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. राज्याभिषेक सोहळ्यानंतर रामरायांनी आलेल्या प्रत्येकाची आदर पूर्वक संभावना केली आहे. सर्व वानरदल त्या बक्षिसामुळे खूष आहे. वा छान आहे. रामराया, आपले काम पूर्ण झाले व आमचा ही आयोध्यानगर पाहण्याचा हेतू सफल झाला " बडा हुआ अपना काज" ह्या शब्दातून व्यक्त झाला आहे. सुग्रीवाला त्याचे राज्य परत दिले, जे सुग्रीवाने श्रीरामचरणी अपर्ण केले होते. रामरायामुळेच तो राजा झाला होता. "सुग्रीव को दिया गॉव" ह्या चरणात ती कथा व्यक्त होते. भरताला भाव, प्रेम दिले. लक्ष्मण पाठीसारखा १४ वर्षे बरोबरच होता. पण भरताला खरे ओळखले फक्त श्रीरामानीच रामायणात प्रत्येक जण भरताविषयी संशयच घेतो

त्याच्या मनीचा भाव, लक्ष्मणालाही जाणता आला नाही. कैकयी पुत्र म्हणून सुरवातीला सर्वांनी, श्रीराम वनवास गमनानंतर त्याच्याकडे संशयानेच पाहिले आहे. त्याचे निर्व्याज प्रेम फक्त श्रीरामानीच ओळखले म्हणूनच म्हणतात " भाऊ असावा भरता सारखा" लक्ष्मणाने श्रीरामावर डोळे झाकून प्रेम केले आहे. रामासाठी तो काहीही करायला तयार असे. पण भरताचे प्रेम विवेकी आहे. आंधळे प्रेम नाही. राजनितीमधे तो श्रीरामा इतकाच तरबेज आहे. श्रीराम वनवासात तापसी वेषात, तर हा ही अयोध्येपासून थोडे दूर नंदीग्रामी तापस वेषातच राहिला. "बाळशास्त्री हरदास" ह्यांच्या रामायण पुस्तकात त्यांचे भरताविषयीचे विचार खरोखरच अभ्यसनीय व चिंतनीय आहे. अशा भरताला भाव म्हणजे शुध्द प्रेमाचा अमोल ठेवाच तुम्ही दिलात हे " भरतकू दिया भाव" ह्या चरणात आहे.

"हनुमानकू दिया नांव" ह्या चरणाने हनुमंताची उत्कट भक्ती दाखवली आहे. तुला देण्याजोगे माझ्याजवळ कांही ना, "मी तुझा कसा उतराई होऊ" ह्या विचारात श्रीराम होते. तेव्हा आपले 'गुणगान' अखंड ऐकायला मिळो ही मारूतीरायाच्या मनीची इच्छा, त्याला अमर, चिरंजीव करून गेली कारण "आचंद्र सूर्य नांदो" अशी ही रामकथा आहे. रामकथा आणि हनुमान ह्यांचा अतूट संबंध आहे. म्हणून रामायण कथा सांगताना, मारूतीरायासाठी, एक पाट, त्यावर आसन घालून ठेवावे लागते. मारूतीराया कथा ऐकायला येतात ही त्यामागे भावना असते. सद्यकालातही कांही लोकांना, त्याचा अनुभव आलेला आहे. श्रीसमर्थ, रामायण सांगत तेव्हा मारूतीराया तेथे बटू रूपात, वृध्दरूपात हजर असत, अशी आख्यायिका आहे.

असा ज्याला जे हवे ते देणारा हा रघुवीर, सिंहासनावर विराजमान असतांना मी (अजगर, फकिर) कां संकोच करू असा उद्‌गार श्रीसमर्थ ह्या सवाईच्या ४ थ्या चरणातून व्यक्त करीत आहेत. मी स्वतः एक फकीर, जोगी पण रामराया, तू मला महंताचा महंत (व्यास) केलेस, ही तुझी केवढी कृपा (व्यास भये फकीर) तूच खरा आमचा दाता, तुला त्रिवार वंदन असो.

।। म्हणावा जय जय राम।।

सवाई २

धन्य सूर्यनारायण। ज्याचे वंशी रघुनंदन।
भक्त जनांचे मंडण। त्याचे चरण वंदावे।।
एक चक्रीं ज्याचा रथ। अरूण सारथी शोभत।
मेरू प्रदक्षिणा करीत। धन्य समर्थ सविता तो।।
त्यांचे घेतां दर्शन। रूद्र विष्णु हनुमान।
सर्वा घटीं तो रघुनंदन। परिपूर्ण भरला असे।।
दास म्हणे येक्या भावे। निजनिष्ठे नाम घ्यावे।
सद्‌गुरूसी शरण जावें। तेणे पावे सुखासी।।

।।म्हणावा जय जय राम।।

ज्याच्या वंशात श्रीरामरायांचा जन्म झाला, त्या सूर्यनारायणाच्या गौरवार्थ ही सवाई आहे. श्रीरामरायांनी सूर्यवंशात जन्म घेऊन त्या वंशाला धन्य केले. ब्रह्मदेवाचा प्रथम पुत्र मनु–स्वायंभुवमनु. त्याचे पासून मानव निर्माण झाला. सृष्टी उत्पत्ती बरोबरच काळाचीही उत्पत्ती झाली. व कालगणना सूर्यामुळे सुरू झाली. चंद्र सुर्य, बुध, आदि ग्रह, नक्षत्रे, अरपाल वगैरेची निर्मिती एकदमच झाली आहे. परब्रह्माच्या एका स्फूरणेतून, इच्छामात्रे निर्मिती झाली. मनुचा वंश सूर्यवंशच मानला जातो. भागवतात चंद्रवंश, सूर्यवंश यांच्या राजांची कथानके विस्तृत आहेत. सूर्याला जगताचा पिता व पृथ्वीला माता मानले जाते. सूर्योपासनेमुळे अंगी उर्जा, तेज, बल व मुख्य 'साक्षी' भाव अंगी यावयास हवा. तशा भक्तगणाच्या चेहऱ्यावर सूर्यासारखेच तेज असते. त्याच्या चेहऱ्यावरूनच ते तेजस्वी, कांतीमान आहेत हे कळते माझे आराध्यदैवत 'श्रीराम' हे तर रघुवंशाचे कुलदीपक, साऱ्या भक्तजनाचे पूज्य, आराध्यदैवत, त्या श्रीराम उपासने बरोबरच सूर्योपासना ही महत्वाची आहे हे पहिल्या कडव्यात सांगितले आहे.

सूर्याच्या रथाला एकच चाक आहे, अशी आख्यायिका आहे. रथाला, वाहनाला कमीत कमी २ चाके हवीतच म्हणजे तो स्थिर राहू शकतो. दुचाकी वाहनाला स्टॅण्ड लागतो. एक चाकी वाहन स्थिर नसतेच. सूर्याचा एकचक्री रथ म्हणजे, सूर्याचे काम चालूच आहे, त्याला खंड नाही. सूर्याला क्षणभरचीही विश्रांती घेता येत नाही. "अखंड कार्य चालू ठेवणे" म्हणजे 'एकचक्री रथ' हा, यातील गुह्यार्थ, तसेच सूर्याचा सारथी अरूण हा पांगळा आहे मुख्य सूर्यालाही पाय नाहीत. अरूण हा त्यांचा मोठा भाऊ त्वष्टाची ही मुले असे पुराणात वर्णन आहे. एका चाकाचा रथ, सारथी पांगळा तरी अखंड कार्य सूरू आहे. तेजस्वी ध्येय असले की, असे कार्य अखंड चालू असते. हा त्यातील भावार्थ सूर्यासमोर किती घडामोडी होतात, हा 'साक्षी' आलिप्त राहून ते पाहतो. पण त्यात गुंतत नाही.

विज्ञान दृष्ट्या पृथ्वी स्वतःभोवती प्रदक्षिणा घालते. स्वतःभोवती १ दिवसात व सूर्याभोवती १ वर्षात ती प्रदक्षिणा घालते. पण आपण म्हणतो सूर्य पूर्वेला उगवतो, पश्चिमेला मावळतो. म्हणजे तो मेरू पर्वताला प्रदक्षिणा घालतो. २४ तासांचा दिवस व ३६० दिवसाचे दोन अयनाचे, उत्तारायण व दक्षिणायन मिळून १ वर्षाचा काल धरला जातो. असा हा सूर्यनारायण खरोखरच धन्य होय. सूर्याची ही बारा नावे आहेत. वेगवेगळ्या अर्थाची, कार्याची आहेत. पहाटेच्या उगवत्या सूर्याला 'सवितृ' सविता शब्द आहे. नंतर त्याला सूर्य, भानू, मित्र, रवि आदि नावांनी संबोधले जाते. श्री शंकर अभ्यंकर यांच्या 'उपासना' खंडात 'सूर्य' उपासनेवर विस्तृत माहिती आहे असो.

सप्तती म्हणजे सूर्य व अन्वय म्हणजे वंश सप्तती अन्वय ह्या १६ व्या दशकात, श्रीसमर्थांनी त्या दशकालाच सूर्यवंशाचे नाव दिले असून, तो 'आत्मारामच' सर्वत्र कसा कार्यरत आहे हे स्पष्ट केले आहे. त्या आत्मारामाचे शब्दचित्र रेखाटणाऱ्या रामायणाच्या अदिकविलाच त्यात प्रथम वंदन असून नंतर सूर्यस्तवनाचा समास आहे. दिवाकराची कार्यानुसार नांवे देत देत तोच साऱ्या जगताचा पिता म्हणून संबोधले आहे. त्याचेच पुढे स्थूलाकडे रूपांतर होणाऱ्या अग्नि, वायू, पृथ्वी हे त्या अंतरात्म्याच्याच कार्याचे सहकारी देह जसा साऱ्या अवयवांनी नटतो, अवयवांना वेगळे अस्तित्व नसते, तसेच ही पाच भूते त्यांचेच अवयव आहेत. थोडक्यात त्या परब्रह्म श्रीरामाच्याच ह्या सहाय्यकांना निमित्त करून, त्या आत्मारामाचीच स्तुती इथे केलेली आहे. रूद्र म्हणजे श्रीशंकरजी संहार करतात, विष्णु पालन करतात, तर मारूती ज्याचा पुत्र तो वायु तर आत्मारामाचा खरा कारभारी वायु–प्राण असेल तरच चैतन्याची जाणीव होणार म्हणून तिसऱ्या कडव्यात त्यासर्वाघटी व्यापक आत्मारामाचे वर्णन आहे. "रिता ठाव या राघवेवीण नाही" "नभासारखे रूप या राघवाचे " ह्या शब्दातून श्रीसमर्थांनी म. श्लोकातून त्याचे वर्णन केलेच आहे.

असा हा सूर्य भगवंत, तोच रूद्रात, विष्णुत, मारूतीरायात 'देव' रूपात विलसत आहे. परब्रह्म स्वरूप श्रीरामच ह्या रूपाने प्रगट झालेले आहेत. सूर्यासमान त्यांचे तेज आहे. परब्रह्मरूप श्रीराम 'सर्वाघटी' भरलेले आहेत. मग ते रूद्र, विष्णू, हनुमान रूपातही असणारच त्यांचे ते अवतार आहेत. काही जमले नाही तर, निदान सूर्य, रूद्र, विष्णू, हनुमान यांना वंदन करावे. तसा श्लोकच आहे.

शंकरः शेषशायीच मार्तंडो मारूतीस्तथा।
एतेषाम् दर्शनम् पुण्यम् नित्यनेमे विशेषतः।।
पशुपती, श्रीपती आणि गभस्ती। यांच्या दर्शने दोष जाती।
तैसाचि नमावा मारूती। नित्यनेमे विशेष।।४।६।६।।

अशा माझ्या रामाचे स्वरूप सर्वत्र पहावे. तो येकला सर्वत्र नटला आहे, कार्यानुसार, कालानुसार त्याला वेगवेगळी नावे आहेत पण खरे पाहता "अनेकी सदा एक देवास पाहे" असा भाव श्रीसमर्थांचा असल्यामुळे ते सांगतात, येकावर भाव ठेवावा. सद्गुरूंनी जे नाम दिले आहे, त्या नामावर निष्ठा ठेवावी. 'निजनिष्ठा' शब्द आहे. प्रत्येक जीवाला 'मी आहे' हा भाव असतो. त्याचे सर्वात जास्त प्रेम स्वतःवरच असते. स्वतःच्या आत्म्यावर जितके प्रेम असते, तितके प्रेम आपल्या आराध्य दैवतावर करावे, सद्गुरूवर पूर्ण निष्ठा ठेवावी श्रीसमर्थाचे सद्गुरू श्रीरामच स्वतः आहेत त्यांचा रामरायावर पूर्ण विश्वास, निष्ठा आहे. त्यांना जसे पूर्ण सुख प्राप्त झाले, तसेच दासांनाही मिळावे, म्हणून त्यांचा जयजयकार करावा –

।।म्हणावा जय जय राम।।

सवाई ३

धन्य क्षेत्र पंढरपूर। तेथे यात्रा मिळाली चूर।
चंद्रभागा रम्य तीर। नावेवरी बैसती।।
येऊनिं पैलतिरीं जाण। पाहती पांडूरंग निधान।
निज जनांचे समाधान। परोपरी होतसे।।
सभा मंडपाचा थाट। गाती साधुसंत भाट।
ज्याचे नामाचा बोभाट। विणे टाळ वाजती।।

श्रीक्षेत्र पंढरपूरचे वर्णनाची ही सवाई आहे. कलीयुगात हा देव विटेवर उभा राहून, साऱ्यांना मौनावस्थेतच, पण खुणावून सांगतो आहे काळजी करू नका, हा भवसागर फार खोल नाही कमरे इतक्या पाण्यातून चाललात तर पैलतीर अवघड नाही. भवसागर कमरे इतकाच खोल आहे. हरिभक्तीच्या बळावर आपण तो सहज तरून जाऊ शकाल, हा पंढरीनाथ म्हणजेच बालकृष्ण साऱ्या संताना त्यांनी त्या रूपात दर्शन दिले आहे. श्री समर्थांनाही त्या गोपाळकृष्णाचे दर्शन झाले. पण समाजाच्या चिंतेमुळे एका श्रीरामाशिवाय तरणोपाय नाही, ह्या एकाच विचाराने, ते प्रत्येक दैवतात 'श्रीराम' रूप पहात असतात. "येथे का रे उभा श्रीराम " ह्यां त्यांच्या अभंगात पंढरपूरचे व अयोध्येचे, गोपाळकृष्णाचे व श्रीरामाचे अगदी मोजक्याच पण योग्य शब्दात सुरेख वर्णन आहे. भारतभर, यात्रेत देशाटणात श्रीसमर्थांनी तीर्थाची, क्षेत्राची दर्शने घेतली आहेत.

पंढरपूरच्या वारीचा महिमा श्रीसमर्थांना ठाऊक होताच, लाखो भक्त ह्या देवाला भेटायला, आषाढी, कार्तिकीला व एकादशीला, तसेच माघात व चैत्रात येतात ती परंपरा अजूनही चालू आहे. सर्व काही त्या देवकृपेनेच घडते. पण तो स्वतःच 'अकर्ता' भावात असतो. कडक उन्हाळ्यानंतर मृगसरी पडून जातात. शेताची मशागत, परण्या झालेल्या असतात. पुढे शेतकऱ्यांना भरपूर काम असते. पण शेतात सोने पिकणार हे त्याच्याच कृपेने ह्या श्रध्देने भक्त त्याच्या भेटीला येतात. व मी काहीच करणार नाही. आता विश्रांती घेतो, म्हणून म्हणून आषाढीला 'शयनी एकादशीला' देव झोपी जातात. दक्षिणायन म्हणजे देवांची रात्र सुरू होते. कार्तिकीला देव जागे होतात. त्याला प्रबोधिनी म्हणतात. खरी कामे या चार महिन्यातच असतात. पण सर्व करून तो झोपेचे सोंग घेतो व मी काहीच करत नाही, हे तुमच्याच श्रमाचे मोल आहे, हे तो भक्तांना जणू सांगत असतो. पण भक्त इतके निष्ठावान की, देवा ही तुझीच कृपा, ह्या भावनेने पुनः कार्तिकीला भेटायला येतात किती सुंदर भाव त्या मागे आहे. आषाढीला चंद्रभागा दुथडीभरून वाहते.

एका तीरावर पंढरपूर, दुसऱ्या तिरावर गोपाळपूर, गोपाळपुराला काला होतो. भीमा नदी इथे चंद्राकार वाहते म्हणून तीला चंद्रभागा म्हणतात नावेत बसून पूर्वी गोपालपूराला जावे लागे आता पूल झाले. दळणवळणाची सोय झाली. पैलतीरी पांडुरंग दर्शनाला नावेतून बसून यावे लागत असे.

हा पंढरपूरचा विठोबा, वाळवंटात भक्तगणासाठी येतो. तिथे कीर्तन भजनाचा आनंद भरून सांडत असतो. भक्तासवे हा पांडूरंग नाचतो. तो सोहळा अनुपम्यच असतो. प्रत्येकाच्या मुखी, जय जय राम कृष्ण हरि किंवा जय जय विठ्ठल जय हरि विठ्ठलाचा गजर असतो. प्रत्येकजण त्या नामातच दंग असतो.

तुकाराम महाराज म्हणतात, पंढरपूरला जणू नामाचाच बाजार भरलेला असतो. ज्याचे त्याचे तोंडी तेच नाम, नामचि घेता, नामचि देता, होतो कुळउद्धार.

विठ्ठलाला कीर्तन फार प्रिय. टाळ, विणा, मृदंगाच्या तालावर भक्तगण पायी वारी करतात तरी उल्हासित असतात. ह्या विज्ञान युगातसुद्धा त्या शक्ती भक्ती संचाराचा अद्‌भूत परिणाम पहायला देशोविदेशीचे लोक पंढरीला येतात. त्याचे रहस्य एकच आहे. त्या साऱ्यांचा एकच भाव, त्या सर्वांमध्ये तो परमेश्वरच वसलेला आहे त्यामुळे जाति–भेद, स्त्री–पुरूष, वर्णभेद तिथे नसतोच. एकमेकांच्या पाया पडतात व त्यांच्या हृदयातील रामाला अभिवादन करतात.

पंढरीचा महिमा एवढा आहे की, "पंढरपूरला जाऊ" असे नुसते नांव घेतले तरी भक्ती उत्पन्न होते. जो पंढरपूरला जायला निघतो, त्याची भिती यमालाही वाटते कारण, त्याच्या नगरीत तो पुण्यात्मा जाणारच नाही. प्रत्येक संताचे पंढरीचे महात्म्य वर्णन करणारे असे सुंदर अभंग आहेत. "माझे माहेर पंढरी" एकनाथ, "नित्य ही दिवाळी, तया पंढरपुरी"– संत

नामदेव, "पंढरीस जाऊ म्हणती-यम थोर चिंता करिती", "यारे नाचो ब्रह्मानंदे विठ्ठल नामाचिये संगे" ह्या तुकारामाच्या अभंगात तर पंढरीचे वर्णन इतके बहारीचे आहे की, तुका म्हणे नाही जाणे। अखंड पंढरिये रहाणे।।

हे सर्व संत कृष्ण काळातील भक्तीसाठी पुनः पुनः जन्म घेतात व भक्ती धारा अखंड चालू ठेवतात. "नामा तेथीचा रहिवासी- आला स्थापाया भक्तीसी" असे एका अभंगात नामदेवच म्हणतात. इतका हा पंढरीचा महिमा अगाध आहे. श्रीसमर्थांनीही ह्या सवाईत पंढरीचे यथार्थ वर्णन केले आहे. त्यांनी पंढरीला विठ्ठलात 'श्रीराम' पाहिला. पंढरी 'अयोध्या' झाली. त्यांना रामदर्शन झाले व पनः भक्तासाठी तो विठोबा पंढरीत स्थानापन्न होऊन, आजतागायत तो महिमा सारे संत गात आहेत. "जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर" अशी पंढरीची व "अयोध्या मनुनिर्मित नगरी" अशी अयोध्या नगरीची ख्याती आहे. ज्या क्षेत्री श्रीरामरूपात विठूरायाने, श्रीसमर्थांना दर्शन दिले त्या पावनभूमीला व श्रीसद्गुरू रामदास स्वामींना त्रिवार वंदन.

।। म्हणावा जय जय राम ।।

सवाई (४)

राजनके राज महाराज। दीन दासके काज। व्रजमो अवतार लियो है ।।१।।
कंसकु तोड डाले। शिशुपालकी शिरे। कांचनकी नगरी सुदामदेवकु दियो है ।।२।।
द्रौपदीकी लाज राखे। भाजीके पान चाखे। विदूरके घरके चारू हाथसे। कण्या उठायके पेट भरभर लेते है ।।३।।
ऐसे तुम दीन दयाल। पांडवके प्रतिपाल। रामदास के हिमायती ।।४।।

ही हिंदी भाषेतील सवाई कृष्णाच्या स्तवनाची आहे. परब्रह्मरूप श्रीराम व परब्रह्मरूप श्रीकृष्ण दोघेही एकच. दोघेही परब्रह्माचे अवतार. अलिकडेही, श्रीरामकृष्ण परमहंस आपल्या शिष्यांना सांगतात, अरे जो राम, जो कृष्ण, तोच मी रामकृष्ण. वारकरी संप्रदायातही "जय जय राम कृष्ण हरी" असेच म्हणतात. म्हणजे राम आणि कृष्ण वेगळे नाहीतच. कालानुसार त्यांचे कार्य भिन्न दिसत असले तरी, धर्मसंस्थापना, दुष्टनिर्दालन, सज्जन तारण हे कार्य त्यातून दोघांनीही साधले आहे म्हणूनच श्रीरामापुढे कृष्णस्तुती चालू आहे. हे श्रीरामा, तुम्हीच राजांचे राजे, महाराज असून, तुम्हीच दीनानाथ, पतितपावन, दयाळू, कृपाळू असल्यामुळे, गोकुळवासी जनांना आनंद देण्यासाठी, त्यांना 'बाललीला' दाखविण्यासाठी गोकुळात अवतरीत झालात. जन्म जरी मथुरेत, वसुदेव-देवकी पोटी, कारागृहात झाला असला तरी, खरा जन्मोत्सव गोकुळातच केला जातो. व तोही नवमीलाच कारण श्रावण वद्य अष्टमीचा जन्म असला, तरी नंदाला पुत्र जन्माची वार्ता, नवमीला पहाटे समजली आहे. कृष्णाष्टमीची सुट्टी सुद्धा नवमीला असते नवमी तिथी दोघांनीही आपलीशी केली आहे. कारण "नव-मी" मी नित्य नवा, "नव-मी" मी नाहीच, ह्याच भावनेने कार्य करतो व दोघांनाही आत्मनिवेदनभक्ती-ज्ञानोत्तरभक्ती-ज्ञानीभक्त प्रिय आहे. म्हणून दोघेही एकच आहेत.

स्वतःच्या मामालाच, त्याच्या दुष्ट कृत्यासाठी, कृष्णाने मारले आहे. दुष्ट व्यक्ती, नात्यातील असली तरी तिला शासन झालेच पाहिजे. ही कृष्णनीति आहे. पुढे नातेवाईकांच्या प्रेमाने आसक्त व मोहित झालेल्या अर्जुनालाही गीता सांगून 'क्षत्रियकर्म' शिकवले आहे. 'शिशुपाल' कृष्णाचा आतेभाऊ, आत्याला त्याचे शंभर अपराध माफ करीन म्हणून कृष्णाने वचन दिले होते. शिशुपालाचा मृत्यू कृष्णाच्या हातूनच आहे, हे शिशुपालाच्या आईला माहिती होते. तिने कृष्णाकडून वचन घेतले व शक्यतो शिशुपालाला अपराध करण्यासाठी, कृष्णासमोर येऊच दिले नाही. पण शेवटी काळ व वेळ प्रत्येकाचीच असते.मृत्यूपासून दूर जाताच येत नाही. भरसभेत शिशुपालाने कृष्णाला १०० शिव्या दिल्या. व्यासरचित त्या ओव्या दोन्ही अर्थी आहेत. म्हटले तर बाह्यार्थाने शिवी, पण अंतर्गत अर्थाने स्तुतीच आहे. १०१वे उच्चरले गेले व श्रीकृष्णाने चक्राने शिशुपालाचा वध केला. मस्तक धडावेगळे झाले व शिशुपालाची आत्मज्योत श्रीकृष्णात विलीन झाली. साऱ्यांनी हा चमत्कार पाहिला. 'जय-विजय' ह्या द्वारपालांना मिळालेल्या शापानुसार, शिशुपालाचा हा तिसरा जन्म होता. पहिल्या जन्मात ते दोघे, हिरण्याक्ष-हिरण्यकश्यपु झाले. दुसऱ्या जन्मात रावण-कुंभकर्ण झाले व तिसऱ्या जन्मात शिशुपाल-दंतवक्र झाले आहेत.

शिशुपाल म्हणजे पोरकट–बालिश वृत्ती. म्हणून तिचा शिरच्छेद आहे. तशी बुद्धीच नसावी.

तिसरी कथा आहे सुदाम्याची. सुदामा कृष्णाचा वर्गमित्र. गुरूकुलातील मैत्री. एका झोपडीत राहात होते. बलराम कृष्ण व सुदामा. आताच्या भाषेत ,रूममेट, क्लासमेट म्हणूयात. ६०दिवसातच विद्या हस्तगत करून, बलराम–कृष्ण स्वगृही परतले. गुरू दक्षिणा म्हणून 'गुरूपुत्र' आणून दिला. हे दिव्य काम केले तरी, 'मी मोठा' हा भाव कुठेच नाही. निरोप घेताना, "माझ्या घरी केव्हाही ये, तुला आमंत्रण देऊन ठेवतो" म्हणून सुदाम्याचा निरोप घेतला आहे. महाभारतात मैत्रीच्या दोन कथा, द्रुपद व द्रोण हे पण गुरूबंधू पण त्यांची कथा, मत्सराने, द्वेषाने भरलेली, भेदाने भरलेली, तर कृष्ण सुदामा पण गुरूबंधू पण मित्रप्रेमासाठी कृष्णाने सुदाम्याला आपल्याच सारखी 'नगरी' दिली. 'सुदामनगरी' म्हणून ती प्रसिद्ध आहे. त्याचा उल्लेख दुसऱ्या कडव्यात आहे. कीर्तनकार ही कथा ७–७ दिवस रंगवतात. इतकी भक्तीरसप्रधान आहे.

तिसऱ्या कडव्यात, द्रौपदीची, विदुराची कथा आहे. देव कसा दीन दयाळू, भक्ताचा कनवाळू आहे, भक्तसखा आहे, हे त्यात दाखवले आहे. भरसभेत, द्रौपदीचे वस्त्र दुःशासन ओढत होता, त्यावेळी तिच्या लज्ञा रक्षणासाठी, ५ पति, रथी, महारथी, राजे, महाराजे भरसभेत असूनही, पतिव्रतेची लाज राखावी असे एकालाही वाटले नाही. धर्मबंधनाच्या खोट्या चालीरितीत सर्वच निष्प्रभ झाले होते. परंतु श्रीकृष्णाने 'वस्त्रावतार' धारण करून, तिची लाज राखली. व मग सर्वजण खजिल झाले. कठीण प्रसंगी फक्त भगवंतच मदत करतो इतर सर्वजण नुसते बघे असतात. हे कटु सत्य आहे.

पांडवांना त्रास देण्यासाठी, त्यांना वनवासातही दुर्योधनाने छळले आहे. दुर्वासाची मनोभावे सेवा करून, त्यांना पांडवाकडे मुद्दाम पाठविले. अशावेळी की सूर्याने दिलेल्या थाळीमुळे, पांडव वनातही अन्नदान करून धर्म पाळत होते. साऱ्यांची भोजने झाली व तेव्हा दुर्वास आले. ती थाळी एकदाच कार्यरत असे. धुवून ठेवली की मग तीतून अन्न मिळत नसे. नेमके तेव्हाच दुर्वास आलेत. श्रीकृष्णही भुकेजूनच आले होते. खायला दे म्हणत आहेत. थाळीला, एक भाजीचे पान चिकटले होते. तेच भगवंताने खाल्ले, व तृप्तीची ढेकर दिली. स्वतः भगवंतच तृप्त झाल्यावर, दुर्वास व त्यांच्या बरोबरीच्या ऋषिंचीही क्षुधा तृप्त झाली. युधिष्ठिराला आशीर्वाद देतच सर्वजण परतले. भगवंताची किमया अगाध आहे. तो काहीही करू शकतो. फक्त 'भाव' दृढ हवा. 'भाव' अनन्य असला की, अगदी शेवटच्या क्षणीही कांहीही घडू शकते.

कृष्णशिष्टाईसाठी कृष्ण धृतराष्ट्राकडे पांडवांची बाजू सांगण्यासाठी गेले होते, त्याला कैद करण्याचा कुटील डाव दुर्योधनाने रचला होता. वरकरणी त्याच्याकरता भोजन समारंभही आयोजला होता. पण कृष्ण तिकडे गेला नाही, तर विदुराच्या घरी गेला. व त्याने तिथल्या कण्या म्हणजे गरीबाघरचे अन्न मोठ्या चवीने खाल्ले. देवाला डामडौल नको. भाव हवा असतो. महाभारतातील एक एक कथा अशी बोधप्रद व भक्तीवर्धिनी आहे.

अशा, भक्ताभिमानी रामा, तू कृष्ण अवतारातही अशा लीला दाखविल्यास. पांडवांच्या रक्षणासाठी, अर्धा अधिक काळ, त्यांच्या समवेतच घालविला. हरिपाठात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात "असा हा द्वारकेचा राणा पांडवा घरीच" असतो.

ज्ञानदेव म्हणे– व्यासाचिये खुणे। द्वारकेचे राणे – पांडवाघरी ।।

त्या पांडवांचा जसा रक्षणकर्ता, तसाच रामदासी मंडळींचा पण रक्षणकर्ता आहेस आमचा तसा विश्वास आहे म्हणून तुला त्रिवार वंदन.

सवाई (५)

जगदंब जगदेश्वरी। श्रीराम अयोध्याविहारी।
भक्तजनांसी उद्धरी। पार करी भवासी ।।१।।
शिवशक्तीचा विचार। साधु जाणती सारासार।
अंतरी स्मरावा रघुवीर। येकभावें करोनी ।।२।।
देवो देवी अवघा येक। याचा करावा विवेक।
नदी नद्या पुण्यदायेक। सागरी उदक येकचि।।३।।
दास म्हणे सत्य वचन। येकची देव रघुनंदन।

अवघा व्यापक आपण। साधुसंत जाणती।।४।।

।। म्हणावा जय जय राम।।

सुरवातीलाच जगदंबा जगदेश्वरीचा जयजयकार केला असला तरी ही सवाई पण श्रीराम वर्णनाचीच आहे. गणपतीच्या सवाई प्रमाणे पहिले–चरण, त्यादेवतेचे, पण ती देवताही श्रीरामाचेच एक रूप आहे, हे समर्थ पुनःपुनः सांगतात. ब्रह्माच्या अधिष्ठानावर मूळमाया, सर्व क्रिया करते. जगातील ही नानाविधकरणी त्या मायेचाच प्रभाव आहे. त्रिगुणात्मक माया असल्यामुळे, हा सारा विचित्र पसारा आढळून येतो. तिन्ही गुणाचे सामस्य विविध प्रकाराने विलसते. म्हणून त्या प्रभूच्या मायेला जगदंब–जगत् अंबा– जगाची माता, जगाची प्रमुख म्हटले आहे. माता सदैव कृपाळूच असते. म्हणून दासबोधातही "त्याचा महिमा न कळे कोणाला–माता वाटून कृपाळू झाला। जगदीश जगताला–प्रत्यक्ष रक्षितसे।।" असे म्हचले आहे. प्रत्येक घरात 'आईच्या' रूपात तो आहेच आई ९ महीने पोटी सांभाळते, मग लहानपणी पालनपोषण, त्याचे आजार, दुखणी तीच काढते. तरी ती कधी कंटाळत नाही. अत्यंत मायेने शुश्रुषा करत असते. देवही ह्या जगदेश्वरी – जगताची ईश्वरी म्हणजे पालन पोषण कर्ता आहे. घरात जशी आईची सत्ता, तीच प्रमुख, पित्याचे अधिपत्य असते, पण कर्तृत्व जास्त प्रमाणात आईचेच असते. म्हणून ती गृहस्वामीनी असते.

अशा ह्या विश्वाच्या घरावर माझा श्रीराम, अयोध्येत राहात असला, त्याचे जन्मस्थळ अयोध्या असले, त्याने अयोध्यापती म्हणून राज्य केले असले, तरी परब्रह्मरूप श्रीरामाचे साऱ्या जगावर अधिपत्य आहे. तोच साऱ्या जगाचा आई बाप आहे म्हणून.

माता रामो मत्पिता रामचंद्रः। स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः।

सर्वस्वं मे रामचंद्रो दयार्लुः । नान्यं जाने नैव जाने न जाने।।

अशी श्रीरामापुढे शरणागती, अनन्यता सर्व रामदासी दाखवतात. देवालाही भक्तावाचून चैन पडत नसते. तो वैकुंठात, देवळात वगैरे वसतीला नसतोच, तर भक्तांच्या हृदयात वास करतो. त्यांना कष्ट पडू नये, भवसागरातून त्याना पार नेण्यासाठी,तो त्यांच्या देहरूपी नौकेचा नावाडी बनतो.

"ही रामनाम नौका भवसागरी तराया"

अशी भक्त हृदयी ठाम समजूतच असते, अढळ निष्ठा असते, खात्री असते.

ब्रह्म आणि माया एकाच नाण्याच्या दोन बाजू कार्यरत ब्रह्म म्हणजे माया व लीन, लय पावलेली माया म्हणजे ब्रह्म दोघे वाटतात भिन्न पण, दोघांचे कार्य एकच एकरूप आहेत. तेच ब्रह्म या जगतात नटले आहे, मायेमुळेच ते दिसते, विलसते, पण तोच नानाप्रकारांनी नटतो म्हणून त्याला 'लीलानाटकविहारी' असे म्हणतात. सर्वत्र तोच खचाखच भरला आहे. तो नाही अशी जागाच नाही. "जहा देख तहाँ राम ही राम" अशी कबीरांची अवस्था "नभासारखे रूप या राघवाचे" – समर्थ "हरि येथे रे, हरि तेथे रे" ज्ञानदेव, सोपान साऱ्याच संतांची ही भावना आहे आपापल्या परी ते जगताला सांगत असताता. जे जे दृष्टीस पडते, ते ,र्व नाशिवंत, मायेचे रूप आहे हे असार आहे, त्यात गुंतू नको, माया ममता, लोभ ठेव नका. जगात सार फक्त ते एकच तत्व आहे ते म्हणजे ईश्वर–भगवंत, परब्रह्मपद. साधू लोक हे 'सार असार' जाणून आहेत. म्हणूनच ते विरक्त आहेत व मुख्य भगवद् भक्त आहेत. त्यांची भक्ती निष्काम निरासक्त आहे ते जसा आपल्या हृदयात सदैव तो श्रीरामच भजतात तसा सर्वांनी त्या एका भगवंताचेच नाव घ्यावे.

त्यासाठी पुढील उदा. देतात की, अनेक प्रकारच्या देवता, त्यांची कार्ये, त्यांचे स्थान महात्म्य वेगवेगळे दिसत असले तरी, ते सर्व एका परब्रह्माचीच रूपे आहेत. दासबोधात अनेक देवता, त्यांची स्थाने, त्यांचे नैवैद्य, त्यांचा महिमा जरी वर्णन केला असला, तरी समर्थ शेवटी असे सुंदर उदा देतात, तेच इथे दिले आहे.

आकाशात् पतितम् तोयम्, यथा गच्छति सागरम्।

सर्व देव नमस्कारः केशवम् प्रति गच्छती।।

आकाशातून पडलेले पर्जन्याचे पाणी नाले, नद्या, मोठे मोठे नद (प्रचंद नदी) ह्यातून वाहिले तरी, ते शेवटी सागरातच जाऊन मिळते तसे कोणत्याही देवतेला नमस्कार केला तरी, तो परब्रह्माप्रतच जातो. कारण त्या परब्रह्माच्या मूळ स्फूरणेतूनच हे जग उत्पन्न झाले आहे.

म्हणून पुनः पुनः सांगतो, "येक गुरू येक देव, कोठेतरी असावा भाव" कुठालाही देव पुजा, तो ह्या रघुत्तमाचाच अशं आहे तोच सर्वत्र भरलेला आहे ह्या परब्रह्माने साक्षात श्रीराम-रघुनंदन रूपात अवतार घेऊन, आदर्श मानव कसा असावा हे स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले आहे. तोच सर्वव्यापी, सर्वरक्षक आहे, हे सर्व साधुसंत जाणतात. सर्वांचे इथे एकमत आहे.

तसे पाहिले तर, त्या ईश्वराला १७६० नावे असली तरी ती एक जगत् रक्षक शक्ती अस्तित्वात आहे त्याची प्रत्येक जीवाला (मानवाला) जाण आहेच. त्यांचा तो भाव, व्यवस्थित मार्गक्रमणाकडे वळेल, एवढी दक्षता साधूसंत घेतात. अगदी कुशल डॉक्टरही ऑपरेशन करताना म्हणतो, मी प्रयत्न जरूर करेन, यश देणे त्या भगवंताच्या हाती आहे.

"मी कर्ता ऐसे म्हणसी-तरी तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ति प्रताप।" हेच भक्तांनी लक्षात ठेवायचे आहे व आपली भक्ती वृध्दींगत करायची आहे ही भक्तीच वृध्दींगत व्हावी म्हणून, त्या रामरायाला पुनः पुनः त्रिवर वंदन

।। म्हणावा जय जय राम।।

सवाई ६

धन्य धन्य रामदास। त्रिभुवनी ज्यांचा वास।
कलीमाजी धर्म रक्षावयास। सदा सज्ज राहिले।।१।।
शंकासुरासी करूनि दूर। तदभिमानी केले चूर
दुःख नासून सुखाचा पूर। पर्वतोपरी पातला।।२।।
सुख होतांचि कर्म विसरे। यामुळे ते अंतरे।
पुढे इच्छेत भरे। प्राणिमात्रा सकळिकां।।३।।
जीवास ज्याची आस। तीच पुरवी विश्वेश।
तो सज्जनगडी विशेष। देव गुरू वंदिला।।४।।

ही सहावी सवाई श्रीसमर्थ रामदासांना उद्देशून आहे. श्रीसमर्थ व श्रीराम भिन्न नाहीतच. "राम आणि दास दोघे पहुडले रामी हे ही बोलावया दुजा नुरेच ते धामी" असे 'ऐक्याचे आरतीत' चरण आहे. शिवाय सद्गुरू हे परब्रह्म रूपच असतात.व श्रीरामही परब्रह्मरूप आहेत, म्हणून दोघेही एकच, ह्या उद्देशाने गुरूस्वरूप श्रीरामाची ही सवाई आहे.

श्रीसमर्थ आत्मनिवेदन भक्तीचे अग्रणी, त्यांनी परब्रह्मपद ह्या नरदेहीच प्राप्त केले ते अजरामर झाले, म्हणून त्यांचा गौरव "धन्य धन्य" शब्दांनी सुरवात करून केला आहे. परब्रह्मरूप श्रीसमर्थाचा श्रीरामासारखाच तिन्ही लोकी वास आहे. कलीयुगात धर्म-रक्षणासाठी त्यांना प्रभूनीच अवतार घ्यायला लावला, संत हृदयातील अपार करूणा, कळकळ, कळवळा जपून, त्यांनी जनमानसातील 'शंका' रूपी असूराला दूर केले. म्हणजेच जनमानसातील शंकांना, संशयांना दूर सारले. जनतेला निःशंक, निःसंशय बनवले. आत्मनिर्भर बनवले जे शंका घेत होते, त्यांचा अभिमानही दूर केला, ते ही स्वतः कष्ट न घेता, परस्पर अशाकडून, मनोमनी ते अभिमानी चूर होऊन जावेत. खजिल होऊन, त्यांना त्यांची चूक उमजली जावी.

जनता इतकी गांजली होती की काय करावे? कोठे जावे? काहींच कळत नव्हते. त्याकाळी शिवरायांच्या पाठीशी समर्थपणे उभे राहून अत्यंत गुप्त पध्दतीने धर्मराज्य स्थापण्यासारखी परिस्थिती त्यांनी निर्माण केली. जनतेत विश्वास आला. दुःख दूर झाले. सर्वांना सुख-समाधान प्राप्त झाले. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

चार दिवस सुखाचे प्राप्त होताच, मानव थोडा ढिला होतो. पाळावयाची विहित कर्मे शिथिल होतात. पण कर्म केले नाही तर प्रयत्न तोकडे पडतात, "प्रयत्नांती परमेश्वर" या उक्तीप्रमाणे परमेश्वर दूर जातो. सुखदुःखाच्या लाटा चालूच असतात. दुःख झाले की पुनः त्या ईश्वराचे स्मरण होते. तसे होऊ नये म्हणून सदा सर्वकाळ सावध राहण्याचा इशाराच श्रीसमर्थांनी आपल्या वचनातून दिला आहे. सुखाचे दिवस आल्यावर, तर डोळ्यात तेल घालून ते समाधान जपले पाहिजे.

जशी भौतिक सुखात ही स्थिती होते, तशी ती पारमार्थीक समाधानात ही आहे. भगवत् –प्राप्तीच्या प्रयत्नात, भगवंत भेटी होईपर्यंत, गुरू भेटेपर्यंत अथक प्रयत्न होता. थोडीशी समाधानाची चुणुक अनुभवली की आपण कृतार्थ झालो समजून 'साधना' सुटते व सर्व प्रयत्न वाया जातात. पुनः पहिल्यापासून प्रयत्न करावे लागतात म्हणून किती अनमोल विचार इथे मांडला आहे की,

।। सुख होताचि कर्म विसरे – त्यामुळे ते अंतर।।

साधना अखंड नित्यच हवी. सिध्दानेही म्हणून साधकासारखेच आचरण ठेवायचे आहे. श्रीसमर्थ सिध्द पुरूष, परब्रह्मरूप ब्रह्मर्षी असूनही, शेवटपर्यंत रामउपासनेत निमग्न होते. म्हणून शेवटच्या चरणात म्हटले आहे की,` श्रीरामस्वरूपी श्रीसमर्थ रामदास, सज्जनडावर जागृत आहे. तिथे आमचे आराध्य दैवत श्रीराम प्रभुही आहेत, ज्यांची स्थापना प्रत्यक्ष श्रीसमर्थांच्या प्रेरणेने झाली आहे. त्यामूर्ति एका अंध–कारागिराने, समर्थांनी दिव्य दृष्टी दिली, त्यानुसार बनवली आहे त्या मूर्तितून त्याला इतके समाधान झाले होते की, त्याने नंतरही अंधत्व पत्करले. माझ्या मनःचक्षुसमोर हीच मूर्ती राहू दे ही त्याची इच्छा शिवाय सज्जनगडी श्रीरामदास स्वामींनी देह ठेवला तिथे त्यांची जागृत समाधी आहे. जी तिसरे दिवशी दहनस्थानातून आपोआप वर आली आहे. त्याच समाधीतून दिव्य देहरूपात कल्याणांना त्यांनी दर्शन दिले. त्या विशेष सज्जनगडावर हे दोघेही जे मुळातच एकरूप आहेत. ते जागृत आहेत. त्या पवित्र स्थळाला, तिथल्या आराध्या दैवताला, परमगुरू श्री समर्थ स्वामींना त्रिवार वंदन

"म्हणावा जय जय राम"

सवाई ७

जय जय सद्गुरू रामदास। कीर्ति जयाची अविनाश।
ज्ञान पाहता सर्वोत्कृष्ट। महामेरू वैराग्याचा।।१।।
भाळी शोभे आवाळू। हुरमुजी गळां मेखळा।
वरी गौरवर्ण मस्तकी। चिरा भरजरीचा।।२।।
काव्य ज्यांचे दासबोध। आबाल वृध्दांस केला बोध।
दोनशे पांच मनबोध। भक्ति ज्ञान वैराग्य ठसवी।।३।।
समाधि सज्जनगडी पाही। चाफळामाजी राम विदेही।
यांचा दासानुदास लागे पायी। म्हणावा जय जय राम।।४।।

ही सवाई समर्थ रामदास स्वामींना उद्देशून आहे शिष्योत्तमापैकी कुणी तरी केलेली असावी, ज्याने श्रीसमर्थांना प्रत्यक्षही पाहिलेले आहे. श्री सद्गुरू रामदासाचा सुरवातीलाच जयजयकार केला आहे. खऱ्या शिष्याला आपले सद्गुरू "गुरू साक्षात परब्रह्म"च वाटत असतात. परब्रह्मासारखीच त्यांची कीर्तिही अविनाशी आहे. देहधारी सद्गुरूची कीर्ति, त्यावेळी कर्णोपकर्णी होईल. पण सद्गुरू विदेही झाले की, त्यांची कीर्ति दिवसेंदिवस वाढतच जाते. स्थूलापेक्षा सूक्ष्मरूपात त्यांचे कार्य जलद होते. श्रीसमर्थ स्तुतीपर एक प्रसिद्ध श्लोक आहे.

शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा।
नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।

त्यांच्या ज्ञानाला, वैराग्याला तुलनाच नाही. त्यांची प्रत्यक्ष मूर्तिही किती देखणी, त्यांच्या कपाळावर एक आवाळू म्हणजेच टेंगूळ होते. झाडावरून नदीत सूर मारताना, कपाळावर ते आलेले होते. भगव्या रंगाची छाटी गळ्या भोवती व डोक्याला भरजरी वस्त्राने बांधलेले, अशी लोभस, रूबाबदार मूर्ति पाहिली की, ऊर भरून यावा अशी पाहणाऱ्याची स्थिती

होत असे. तुकाराम महाराजांनी त्यांच्या एका अभंगात श्रीसमर्थांचे असेच सुंदर वर्णन केले आहे. अभंग सुंदरच आहे.

हुर्मुजी रंगाचा उंच मोतीदाणा। रामदासी बाणा या रंगाचा।
पीतवर्ण कांती तेज अघटित। आवाळू शोभत भृकुटीमाजी।
काष्ठाच्या पादुका स्वामीच्या पायात। स्मरणी हातात तुळशीची।
रामनाम मुद्रा द्वादश हे टिळे। पुच्छ वळवळे करी माजी।
कौपिन परिधान मेखला खांद्यावरी। तुंबा कुबडी करी समर्थाच्या।
कृष्णा तटाकी जाहले दर्शन। वंदिले चरण तुका म्हणे।

दिसायला देखणे, गौरवर्णी तर आहेतच, पण काव्यसृष्टी ही विपुल आहे. त्यातील मुख्य दासबोध. एका दासाने उत्तम दास होण्यासाठी आपल्या दासाला केलेला बोध ज्यात आबाल, वृध्द साऱ्यांनाच उपदेश आहे. लहान मुलांपासून वृध्दांपर्यंत, सर्वांनी कसे वागावे? ह्याचे उत्तम मार्गदर्शन कधी हळूवार शब्दात, तर कधी विनोदाने, कधी किंचीत व्यंगार्थानेही केले आहे, काही वेळला अगदी रोख ठोक भाषाही आहे.

तो ग्रंथ समजला नाही, तर त्याहून सोप्या भाषेत २०५ मनाचे श्लोक रचना करून त्यातून भक्ति, ज्ञान, वैराग्याचे धडे दिलेले आहेत.

चाफळला त्यांनी श्रीरामाची स्थापना केली. तेथील रामजन्मोत्सव उत्तरोत्र चढत्या वाढत्या वैभवात साजरा केला गेला. श्रीरामाचे महत्व वाढते राहावे म्हणून सज्जनगडी समाधिस्थ झाले. शिष्य लोक गुरूच्या मोठेपणात, खऱ्या देवाचे महत्व कमी करतील. चाफळचे महत्व कमी व्हायला नको हाच, त्यामागे हेतू होता. चाफळ हा मुख्य मठ असल्यामुळे, समर्थांचे वास्तव्य तेथे विदेही रूपातही जाणवतेच. मुर्ति पहाताच, श्रीसमर्थाचे सारे त्यामागचे चरीत्र सहज ध्यानात येते. सगुणमूर्ती रामाबरोबरच त्या विदेही रामदास स्वामींना नकळतच हात जोडले जातात.

कोयनेच्या भूकंपानंतर चाफळचे राममंदीर पूर्णपणे बदललेले आहे. समर्थ काली त्याची बांधणी वेगळी होती. तो सारा इतिहास आता आपण ग्रंथातूनच वाचतो.

अशी उदंड कीर्ति करून, जे अजरामर झाले, त्या श्रीसमर्थांचा मी दासानुदास त्यांच्या पायी नित्य नतमस्तक होऊन त्यांना त्रिवार अभिवादन करतो.

।। म्हणावा जय जय राम ।।

सवाई ८

ब्रह्मचारे प्राणनाथा। त्रिभुवनी तुझी सत्ता।
दासां भेटी रघुनाथा। तुझे चरण लाधल्या।।१।।
भूतमात्र तुझे कूळ। मूळमायेसी तूंचि मूळ।
तुझेचि बल बा अतुल। रामसुखे सुखावला।।२।।
उत्पत्तिरूपेंचि कर्ता। स्थिती रूपेचि धर्ता।
संहार कारक हर्ता। तूचिं एक महाभला।।३।।
नाम घेताचि पावसी। भक्त संकटे नाससी।
ऐसा तू रामदासी। पूर्वपुण्ये लाधला।।४।।

।। म्हणावा जय जय राम।।

ही सवाई मारूतीरायांना, तसेच परब्रह्मरूप श्रीसद्गुरूंना– श्रीसमर्थांनाही उद्देशून घेता येईल. श्रीसमर्थांना मारूतीरायाचाच मुख्य आधार होता. व सर्व समर्थ भक्तांना श्रीसद्गुरूचा समर्थांचाच आधार आहे. श्री मारूती राय हे वायूसूत आहेत. पंचीकरणात वायुतत्वाला अत्यंत महत्व आहे. वायुला दासबोधात 'अतुल कारभारी' म्हटले आहे.

ह्या सवाईत या सर्वांचा उल्लेख सूत्ररूपाने छान साधला आहे श्रीसमर्थ सर्व रामदासीयांचे वतीनेच जणू ही सवाई म्हणत आहेत, असा भास होतो. श्रीसद्गुरूंना सर्व भूतमात्रांची काळजी असते. त्यांचे विचार सर्व व्यापक असतात श्रीमारोतीरायांना उद्देशून श्रीसमर्थ, तर सद्गुरूंना उद्देशून सर्व रामदासी मंडळी असे म्हणत आहेत की,

हे ब्रह्मचारी प्राणनाथा, मारोतीराया, तुझी सर्व त्रिभूवनावर सत्ता आहे. श्रीसमर्थ हनुमंताना रामदासी संप्रदायाची कुळवल्ली, मूळ मानतात. श्रीमारूतीराय व श्रीसमर्थ दोघांचेही ब्रह्मचर्यव्रत अतुलनीय आहे. जो अखंड ब्रह्मविचारातच असतो, त्याला ब्रह्मचारी म्हणतात. दोघेही तसेच आहेत. सीताशोधनासमयी सीतेचा शोध मारूतीरायानी सर्वत्र केला. अगदी रावणाच्या अंतःपूरातही ते सूक्ष्मरूपाने जाऊन आले. पण त्यंचे मन विचलित झाले नाही. ती परीक्षा ही त्यांनी आत्मचिंतनाने स्वतःच स्वतःची घेतली. इतके ते निर्मळ मनाचे होते. रामकार्याव्यितिरिक्त त्यांच्या मनी दुसरा ठावच नव्हता. तसेच सारा भारत फिरतांनाही श्रीसमर्थांनी विदारक दृश्ये पाहिली. जीवनात दुःखी अबलाही येऊन गेल्या, पण त्यांना मोह झाला नाही. श्रेष्ठ व त्यांच्यात झालेल्या संवादातूनही हा भाग आपल्यासारख्या रामदसीयांना समजून येतो. त्या प्रसंगीचे काव्य ही थोडक्यात ते वर्णन करून आजही सर्वसामान्यापर्यंत आलेले आहे. असे हे दोघेही ब्रह्मचारी.

मारूतीरायांना श्रीराम स्वतःच स्वतःचा प्राण समजत होते. लक्ष्मण व मारोतीराय दोघेही श्रीरामाचे बहिश्चर व अंतर्गत प्राण आहे. स्वतःच्या प्राणाइतके ते दोघेही श्रीरामांना प्रिय होते. त्यातील मारूतीरायांना तर त्यांनी वायू सारखेच अजरामर चिरंजीव करून टाकले जोपर्यंत रामकथा भूमंडळी आहे, तोपर्यंत मारूतीराय आहेतच. मारूतीराय व रामनाम हे अतुट नाते आहे. जीवाला पंचप्राण जसे महत्वाचे, त्यातही 'प्राण' वायू महत्वाचा तसे श्रीरामांना रामपंचायतन प्रिय होते, पण त्यात मारूतीराय महत्वाचे सगुण साकार श्रीरामाबरोबर इतरही विलिन झाले. पण निगुर्ण रामतत्व व मारूतीराय अजरामर झाले.

मारूतीरायांनी मध्यस्थी केली, म्हणूनच नारायणाला श्रीरामराय भेटले, अनुग्रह मिळाला, मारूतीरायाचे चरण त्यांनी घट्ट पकडले होते. म्हणूनच पुढील प्रक्रिया घडली.

हनुमंत आमुची कुळवल्ली, स्तोस्त्रात, "स्वधामासी जाता महारामराजा, हनुमंत तो ठेविला यांचि काजा, सदासर्वदा रामदासासी पावे, खळी गांजिता ध्यान सांडून धावे" असा जो उल्लेख आहे तो ह्याच अर्थी आहे. मनाच्या श्लोकातूनही हनुमंताची स्तुती आहेच. "काही व्यथा झाली तर मारूतीरायांना सांगावी, त्यांच्यामार्फत ती आम्हा पर्यंत येते" हे श्री ब्रह्मचैतन्य महाराजाचे वचन आहे. ते ही रामदासाचे म्हणजेच, मारूतीरायाचे अवतार आहेत व मारूतीरायाच्या अंतर्यामी वसलेल्या श्रीराम परब्रह्म तत्वापर्यंत ती आर्त हाक जाते हा त्याचा परीणाम आहे.

आमुचे कुळी हनुमंत हनुमंत आमचे मुख्य दैवत।
तयावीण आमुचा परमार्थ सिध्दीते न पवे सर्वथा।।
साह्य आम्हासी हनुमंत, आराध्य दैवत श्री रघुनाथ।
श्रीगुरू श्रीराम समर्थ, काय उणे दासासी?।।

श्री हनुमंताच्या मध्यस्थीमुळेच दास–श्रीगुरू भक्त–देव भेट होते. हे पहिल्या कडव्यात स्पष्ट केले आहे.

श्रीमारूतीरायांची त्रिभुवनी सत्ता कशी? तर निर्गुण– साकार, किंवा सगुण–निराकार अव्यक्त पण जाणवतो, त्या वायुरुपामुळेच सर्व देवदेवता भूते हे अव्यक्त रूपातच आहेत. मंत्रामुळे देव प्रगट होतात. मंत्र हे शब्दातील सूक्ष्म अर्थ म्हणजे अव्यक्तस्वरूपातीलच. मूळमायेतच जाणीव व वायू ही दोन रूपे आहेत. परब्रह्माची पहिली स्फुरणा म्हणजे मूळमाया, ती इच्छाशक्तीच, मूळ संकल्प हे ही निगुर्ण वायुचेच रूप, तेच पुढे क्रिया–ज्ञान द्रव्यशक्तीत रूपांतरीत होते. म्हणून त्याची सत्ता महत्वाची वायु तत्वामुळेच प्राण पंचकाचे महत्व त्या प्राणाला धरूनच अंतरात्मा, जीव, साकार होऊन कार्यरत होतो. म्हणून तेथेही तुझीच सत्ता वायुतत्वातुनच पुढे अग्नि, पाणी, पृथ्वी, ही व्यक्त रूपे साकारली व पंचभूतात्मक सृष्टीमुळे मूळेमायेचे कार्य सुरू झाले म्हणून "मूळमायेसी तूचि मूळ – तुझे सामर्थ्य अतुल" तुलना करता येणारच नाही, असे वर्णन 'वायुलक्ष्मण' समासातून दाखवले आहे. व त्या समासात हनुमंताची पण स्तुती केली आहे. आपल्या कर्तृत्वामुळे त्याने श्रीगुरू श्रीरामांना सुखी केले. तसेच कार्य जीव शिवतत्वापर्यंत जावे हीत त्यामागची संत कळकळ आहे.

श्री मारूती रायाला इथे ईश्वररूप मानले आहे. त्या गुणावतारात तिन्ही गुणसमान आहेत. रजोगुणी ब्रह्मदेव उत्पत्ती

कर्ता होऊन, उत्पत्तीचे काम–सृष्टीरचनेचे काम करतो. स्थितीरूपाने सत्वगुणी विष्णू, जगताचे पालन करतो. पालनकर्ता असल्यामुळे जगतरक्षणासाठी वेळोवेळी अवतार ही घेतो तर प्रत्येक निर्मितीला नाश आहे, "यद् दृष्टम् तत् नष्टम्" ह्या सिध्दांतानुसार तमोगुणी शंकर संहाराचे लयाचे कार्य करतो घरात वारा वाहण्यासाठी समोरासमोर दारे खिडक्या ठेवतात. वारा वाहिला व निघून गेला, तरच घरात चैतन्य खेळते. तरच उत्पती लय समतोल साधला गेला, तरच जग व्यवस्थित चालते. पर्यावरणाचा समतोल बिघडला की सर्वच यंत्रणा बिघडते. हे समतोलत्व 'वायु' तत्वामुळेच साधते, कमी दाबाचा पट्टा निर्माण होताच वारे वाहू लागतात. हे आपण विज्ञानातूही पाहतोच हेच कार्य वायुस्वरूप हनुमंत करतो हनुमंत उपासनेने बल व विवेक दोन्ही लाभतात, अन्यायाचे परिमार्जन बलाने, सामर्थ्याने, तर दुःखिताचे दुःख दूर करून, त्यांना दिलासा, समाधान, विवेकाने सद्बुध्दीने, चातुर्थाने देता येते म्हणूनच ही हनुमंत उपासना आहे.

ह्या तिन्ही देवतांचे कार्य, केवळ तुझ्या उपासनेमुळे, जीवाला, अंतरात्म्याला, साधकाला, भक्ताला मिळावे म्हणूनच आम्ही सारे तुझी उपासना करतो. त्यामुळे प्रयत्न करण्याचे बळ मिळून, अन्याय निवारण शक्ती प्राप्त व्हावी, हीच सदिच्छा श्रीसमर्थांची होती. त्यासाठीच गावोगावी मारुती मंदिरे स्थापन झाली. बलोपासनेसाठी आखाडे, व्यायामशाळा निघाल्या. तर सद्बुध्दीसाठी उपासना आरती पुजा ही पध्दती सुरू झाली. भावबळामुळे ईश्वरीशक्ती जागृत होऊन लोकांना प्रचितीही येऊ लागली. म्हणूनच ह्या सवाईतून शेवटच्या चरणात ते म्हणतात की,

देवा आमचे पूर्वपुण्य चांगले म्हणूनच, तुझ्या सारखा श्रीगुरू–मध्यस्थ सांभाळकर्ता आम्हाला लाभला. कित्येक भक्तांची संकटे तू दूर केलीस. लोकांमध्ये भाव–भक्ती, आत्मशक्ती जागृत झाली. आत्मशक्ती जागृती म्हणजेच आत्माराम–उपासना तो राम जागृत झाला की, सर्व काही सुकर, सुलभ होते. आत्मविश्वास, आत्मशक्ती जागृती हेच रामदासी संप्रदायाचे मुख्य ध्येय होते. व ते आजही मारूती उपासनेच्या माध्यमातून चालूच आहे. कालानुसार कर्तृत्व वेगळ्या पध्दतीने समजावले जाईल पण भाव, भक्ती आत्मविश्वास व गुरूप्रती, ध्येयाप्रती असलेली निष्ठा फक्त हनुमंत उपासनेतूनच जागृत होते. हे त्रिवार सत्य आहे. त्यासाठीच त्याला त्रिवार वंदन.

।। म्हणावा जय जय राम।।

उपासनेच्या पुस्तकात पुढील १२ सवाया प.पू. श्रीधर स्वामीकृत आहे. असा उल्लेख आहे. त्यांचा अभ्यास स्वतंत्ररित्या वेगळाच करावा, अशी इच्छा, म्हणून आता ह्या पुढे 'सावाई' उपासनेचे शेवटचे चरण, म्हणजे वारांच्या सवाया, ह्या भागाकडे वळण्याचा विचार आहे. ७ वाराच्या ७ सवाया स्पष्ट आहेत. त्या त्या वारी, ज्या दैवताचे महत्व, त्याच्या माध्यमातूनच श्रीरामाची उपासना, ही त्यामागील मध्यवर्ती कल्पना अव्दैतमत प्रतिपादनार्थ, व्दैत मताची पायरी प्रथम घ्यावीच लागते. "सगुणाचेनि आधारे – निगुर्ण पाविजे निर्धारि" ह्या सूत्रानुसार, अनेक देवदेवतांची स्तुती,स्तोत्रे, प्रत्यक्ष श्रीमत् शंकराचार्यानाही रचली आहेच. शनिवार हा मारोतीरायाचा वार समजला जातो. 'शनि' हा वक्रगतीने चालणारा ग्रह, तो प्रत्येकाला काही ना काही त्रास, साडेसाती द्वारा देतोच. सर्व देवांना त्याच्यापासून थोडाफार त्रास झाला. फक्त मारूतीराय त्यातून सहीसलामत सुटले. अत्यंत शांत डोक्याने, ते सामोरे गेले, म्हणून शनिदेव प्रसन्न झाले व त्यांनी मारूतीरायांना वर दिला तुझ्या डोक्यावर तेल घातले तर मी, प्रसन्न होईल, त्या भक्ताला त्रास देणार नाही. म्हणून 'शनि' चा शनिवार मारूतीरायांना मिळाला आहे. शनिवारच्या सवाईत त्याचेच वर्णन आहे. शनिवार मारूतीरायंना 'तेल' वाहण्याची पध्दत आहे. सद्गुरूच्या कार्यात मग्न असणाऱ्यांना, घातकी ग्रह ही काहीच करू शकत नाहीत. अडचणींवर सहज मात, केवळ चातुर्यानेच करता येते. श्रीरामारायांच्या अत्यंत अडचणीच्या वेळी, म्हणजे लक्ष्मणाला शक्ती लागली असता, कसे मनोवेगे हनुमंतानी कार्य केले, ह्याचे वर्णन ह्या सवाईत आहे. महंतासाठी, साधकासाठी शुध्द आचरणाचा, चातुर्याचा, प्रयत्नाचा मोठा आदर्शच ह्या कथेतून मिळतो. ती सवाई अशी आहे.

शनिवार (वारांच्या सवाया)

हरी गिरीपरी ठाण। वळे चालिले फुराण।
वरी घेतले किराण। अंतराळ जातसे।।१।।

कपी लागवेगे धावे। मागे लांगूळ हेलावे।
वैरसंमंध आठवे। वज्रदाढा खातसे ।।२।।
मनोवेगे झेपावला। द्रोणागिरीस पावला।
हात घाली ओषधीला। आटघाट होतसे।।३।।
गिरी उत्पाटिला बळे। सळे बांधिला लांगुळे।
मागे फिरे अंतराळे। लंकेवरी येतसे।।४।।
।।म्हणावा जय जय राम।।

हरी म्हणजे वानर, हनुमंत वानर योनीतले, त्यांचे 'ठाण' म्हणजे शरीरसौष्ठव कसे, गिरीपरी, एखाद्या पर्वतासारखे कणखर, अचल, निश्चल, मजबूत, शक्तीमान, हनुमंताचा श्वास कसा चालू आहे. "बळे चालिला फुराण" झेप घेण्यापूर्वी घेतलेला दिर्घश्वास, उच्छवासाची क्रिया म्हणजे फुराण काही उचाट काम करायचे असेल तर, श्वास कोंडून अंगात भरपूर ताकत जमा करावी लागते. लक्ष्मणाला शक्ती लागली आहे. सूर्योदयाचे आंत द्रोणगिरीवरील औषधी मिळवायची आहे. नुसती शोधायची नाही, ती लंकेत आणून, सुषेणाकडून त्याचा विनियोगही व्हायला हवा. दमछाक भरपूर होणार, तस श्वास रोधायला हवा, तेवढी ताकद हनुमंतात आहे. म्हणून उड्डाण घेण्यापूर्वीचे जे रूप आहे, त्या हनुमंताच्या रूपाने हे वर्णन आहे. पर्वताप्रमाणे वज्रदेही, कणखर, हनुमंतानी एक दीर्घ श्वास घेऊन, अंतराळात झेपावण्यासाठी, किरण म्हणजे दीर्घ झेप घेतली. विशिष्ट दिशेने घेतलेली झेप, श्रीलंका दक्षिण दिशेला, द्रोणागिरी उत्तरेला, बरोबर विरूध्द दिशा आहे.

भीमरूपी स्तोत्रात याचे सुरेख वर्णन आहे. तिसऱ्या कडव्यात, ते हनुमंताला, "दिनानाथ, हरीरूपा, सुंदरा, जगदंतरा" असे म्हणतात. तर उड्डाण घेते वेळीचे वर्णन – "ध्वजांगे उचले बाहु, आवेशे लोटिला पुढे" अशा शब्दात साकारले आहे. डोळ्यातील आवेशाची, क्रोधाची लाली, उड्डाण घेतानाची त्याची शरीरयष्टी, "पुच्छ ते मरडिले माथा किरीटी कुंडले वरी" असे म्हणत, "ठकारे पर्वता ऐसा, नेटका सडपातळू। चपळांग पाहता मोठे महाविध्रुल्लते परी" ह्या सर्व चरणाची आठवण, सवाईच्या पहिल्या चरणातून आपल्या मनी साकारते. ह्या सवाईचे पहिले कडवे व भीमरूपी स्तोत्रातील हनुमंताचे त्यावेळचे वर्णन दोन्ही शब्दचित्राची न कळतच तुलना होते व वर्णनातील साम्यता, सूत्ररूपात, नेमक्या शब्दात श्रीसमर्थ कसे वर्णन करतात? हे पाहून मन आश्चर्यचकीत होते.

हनुमंताची ती धाव, झेप कशी मोजक्या शब्दात वर्णन केली आहे. "लागवेगे धावे" मनी, अंतरी निश्चित कार्याते खुणगाठ बांधून, केलेली तातडीची धावपळ, ह्या दोन शब्दातून स्पष्ट झाली आहे. मनातील इंद्रजिताबद्दचा शत्रुचा व्देष, त्यावेळी रागाने दात ओठ खाणे झपाट्यात गती घेणे, त्यावेळी जे मुख्य अस्त्र शेपूट, जे हालते, त्याला सुंदर बाक देऊन, ते डोक्यावर घेणे वगैरे सुंदर शब्दचित्र समोर उभे राहते.

मनोवेगे तिथे पोचला आहे. वाटेतील अडसर ही दूर केले आहेत. रामायणात, युध्दकांडात, ह्या भागाचे सुरेख वर्णन,सर्वच रामायणकारांनी केले आहे. क्षणार्धात त्यांचा विमोड करणे, सामान्यांना शक्यच नाही. फसवी, भोंदूगिरी, बनवाबनवीने दिशाभूल करणे, हे प्रयोग सध्याही होतात परंतू मारूतीचे चातुर्य, प्रसंगावधान चातुर्य दाखवून, धर्मस्थापना, राज्यस्थापना झाली. ती केवळ अशा भक्तीयुक्त कथानकातून केलेल्या मार्गदर्शनामुळेच त्यांना साधले. संकटावर मात करून ध्येयापर्यंत पोचल्यावरही, बुध्दीचातुर्याचा उपयोग करावा लागतो.

द्रोणागिरीवर पोचला औषधी शोधू लागला. मग विचार केला, वेळ घालविण्यात अर्थ नाही. द्रोणागिरीलाच उपटला, हातावर घेतल व मनोवेगे परतला औषधी सर्वांनाच उपयोगी होईल अशा भावनेने कार्य केले. स्वामी कार्यात असे प्रसंगावधान हवे नाहीतर आज कालची मुले, काही आणायला सांगितले तर वेळेवर आणणार नाहीत, सतरा कारणे सांगतील, काम होणारच नाही, आज्ञापालन म्हणायला साधा शब्द, पण त्यामागे केवढी तपश्चर्या, विचार आहे हे ह्या कथेतून कळते. कथेतला भावार्थ न घेता, तसे आचरण न करता, राम खरेच झाले का? हनुमंत असे वागले कां? ही काल्पनिक कथा आहे, इथपर्यंत आजकालच्या मुलांची मजल गेली आहे. इसापनितीतले लांडगे, कोल्हे, बोललेले ह्यांना चालते, पण इतिहास सांगणारे, रामायण, महाभारतातील विचार अंगीकृत करायलाही आजची पिढी तयार नाही. "कौन बनेगा करोडपति, होम मिनिस्टर" अशा कार्यक्रमातून, आजकालच्या मुलांची वैचारीक झेप स्पष्ट दिसते. असो, धर्माचरण, सदाचरण कालबाह्य होऊ लागल्यावर,

समाज अवनतिकडे झपाट्यात जाईल, ही काळ्या दगडावरची रेघ आहे, असो.

शास्त्रीय पुराणे केवढा मोठा संदेश देतात, हे त्याचे सखोल चिंतन केले तरच लक्षात येईल असो. विषयाला कलाटणी नाही, तर त्यातील नुसती परंपरा जपून, अर्थहीन आचरण न व्हावे, ह्यासाठीच हा खटाटोप पुराणातील कथा सांगून समाजाला वळण लावणारे सर्व संत परंपरेला धक्का न लावता, त्याचा मतीतार्थ सुलभ भाषेत उकलून देतात, ते हरिकथेतूनच म्हणून मुख्य "हरिकथानिरूपण" हे समर्थ संप्रदायाचे ब्रीद.

हनुमंतानी तो द्रोणागिरी उपटला, हातावर घेतला, व क्षणही न गमाविता श्रीरामापाशी ते लंकेत आले. स्वामीकार्य कसे करावे? हे सांगण्यासाठी, राज्यातील सेवेकऱ्यांनाही त्याच भावनेने कार्यरत होऊन त्यांनी 'राजसेवा' करावी हा त्यामागील हेतू आहे. म्हणूनच शनिवार पासून आठवड्याला सुरवात करून ७ वारांपैकी १ ला वार शनिवार घेऊन ह्या वारांच्या 'सवाया' तयार झाल्या. रामसंप्रदायाचे मूळ, कुळवल्ली, हनुमान आहेत. त्यांना प्रथम वंदन करून, त्यांचा त्रिवार जयजयकार करूयात.

।। म्हणावा जय जय राम ।।

## रविवार (वारांच्या सवाया)

शनिवार नंतर रविवार. रविवार हा सूर्याचा, तेजाचा, पराक्रमाचा द्योतक, रविवार हा खंडोबाचाही दिवस आहे. खंडोबा हा शिवाचा शंकराचा अवतार, बहुसंख्य लोकांचा कुळस्वामी, कुलदैवत. वारच्या सवायात श्रीसमर्थांनी महाराष्ट्रातील ही मुख्य कुलदैवतेच घेतली आहेत. जनमानस वळवायचे असेल तर, त्यांच्या परंपरा, चालीरिती, कुलधर्म, कुळाचार ह्यांना धक्का न लागता, राज्यकारभार करावा लागतो. हिंदू धर्मात, सर्वधर्मसमभाव रक्तातच भिनला आहे. त्यातूनच सहिष्णूता निर्माण झाली. सर्वाप्रतीआदर, ज्या राज्यात असतो, ते राज्य लोकप्रिय आघाडीवर असते. तो राजा आपला वाटतो. निधर्मीराज्यात धर्मच नको (तो ही फक्त एकाच विशिष्ट संप्रदायाचा) हा भाव वाढत चालला आहे. अल्पसंख्यांकाच्या नावाखाली, इतर धर्मीयाना, पंथियाना प्राधान्य देऊन, बहुसंख्यांकाचा छळ म्हणजे निधर्मीवाद. निजामाच्या राज्यात, रामनवमी, कृष्णाष्टमी, दसरा ह्याला सुट्ट्या होत्या. आता सुट्या कमी करण्याच्या नावाखाली मुख्य हिंदु सणांना सुटीच नसते. अजब कारभार, स्वतंत्र हिंदुस्थानात चालू आहे. असो. सांगायचा मुद्दा, खंडोबा हे महाराष्ट्राचे प्रमुख दैवत. त्याचा उत्सव जोरात व्हायचा. त्या खंडोबाची ही सवाई आहे. सूर्यनारायणाची स्वतंत्र सवाई समर्थांनी रचलेली आहेच. त्यामुळे रविवार खंडोबाचा, म्हणून ही सवाई प्रमुख दैवत म्हणून घेतली आहे. उत्सवातून लोकमानस जागृती उत्तम होते. कथेतून परंपरेतून धर्मप्रचार, म्हणजे कर्माचरण, कर्तव्यकर्म शिकवता येतात. आता उत्सवानाही विपरीत वळण लागले आहे. परकीय संकल्पना, उत्सव साजरी करण्याची पध्दती, ह्याची सरमिसळ होऊन, मुख्य घडीच विस्कटली आहे.

लग्नात समई, चौघडा ह्यांचा मंजुळ नाद आता बाजूला पडला, त्या सुरातून प्रसन्न वातावरण निर्मिती होते. आता बँड आले. कर्कश ध्वनी, सोज्वळताच नाहिशी झाली. त्याच्या पुढची पायरी डि.जे. च्या तालावर नाचणे साऱ्या संसाराचाच नंगा नाच होतो. दूरगामी परीणाम होतो. जे पवित्र संस्कार न कळत व्हायला हवेत, ते होतच नाहीत असो. विषयांतर झाले तरी, संत वर्तणूक कशी, संस्कारक्षम, दूरगामी, परिणामकारक हाच मुद्दा इथे स्पष्ट करायचा आहे असो. आता मुख्य विषयाकडे वळू ही खंडोबाची सवाई आहे.

नाम जेजुरीगड सुंदर। तेथे नांदे म्हाळसावर।
संगे भैरवगण अपार। पूर्ण अवतार शिवाचा।।१।।
पीत अश्वावरी स्वार। हाती घेऊनि तलवार।
करी मणिमल्लसंहार। करी उध्दार जगाचा।।२।।
चंपाषष्ठीचा उत्सव थोर। यात्रा मिळती अपार।
येळकोट नामाचा गजर। भक्त आनंदे करिताती।।३।।

दास म्हणे रामराव। राम तोचि खंडेराव।
जेथे भाव तेथे देव। लक्ष पायीं जडलिया।।४।।
।।म्हणावा जय जय राम।।

जेजुरीगडावर खंडोबाचे स्थान. जेजुरीला कऱ्हा नावाची नही आहे. खंडोबाला खोबरे (डोल)व भंडारा (हळद) वाहण्याची पध्दत आहे. म्हणून सर्वदूर उधळलेला भंडारा म्हणून पिवळेपणच दिसते. म्हाळसा देवीचा हा खंडोबा नवरा, म्हणून त्याला म्हाळसावरही म्हणतात. शिवाच्या बरोबर भैरवगणाचा गराडा. शिवपुराणातही गोष्ट आहे. "येळकोट येळकोट जय मल्हार" चा सर्वत्र गजर-बेलभंडारा वाहण्याची पध्दत म्हणून प्रत्येकाच्या हाती त्याची पिशवी, गडावर उंचावर, अश्वारूढ खंडोबाची मूर्ति आहे. तसेच मुख्य देवालयात पितळी शिवलिंग व खंडोबाची मूर्ति आहे. अश्वारूढ हाती तलवार घेतलेली ही मूर्ती. आपले देव आपल्यासाठी सदैव शस्त्र सज्ज आहेत. देव, देवतांच्या हाती शस्त्र आहेत ते पराक्रमाचे द्योतक आहे. आम्ही अन्याय सहन करीत नाही. 'जशात तसे' उत्तर देणाऱ्याचे हे रक्त आहे. विनाकारण कुणी त्रास देऊ लागला, तर त्याचा संहार होणारच. शिवशंकर संहाराची देवता. ही देवता जितकी शांत, तितकीच क्रोधी-रागीट आहे. दुष्टांचा संहार करून जगत् पालनाचे कार्य ते करतात. व भक्ताला दिलासा देतात, मी तुझ्या पाठीशी आहे. राष्ट्राचे रक्षण, राजाद्वारे व्हावे असा शास्त्र नियम आहे. संकट निवारणे काम राज्य कर्त्याचे असते. ते केले नाही तर असहाय जनताही हाती शस्त्र धरते. जेव्हा त्यांच्या अंतरीचा शिव जागृत होतो तेव्हा कुणाच्या तरी हृदयी तो प्रगट होईल व तो जगत् रक्षणाचे देवाचे कार्य करेल मग तो साऱ्या जनतेचा देव होतो. अंतरीचा देव जागृत होणे महत्वाचे आहे. सामर्थ्य जागृती देव -दानवात दोघातही होईल पण एकाचे कार्य निस्वार्थी जगत कल्याणाचे, सर्वांना घेऊन चालण्याचे, तर दानवाचे स्वार्थाचे, फक्त स्वतःच्या फायद्याकडे वृत्ती ठेवणारे आप्पलपोटेपणाचे असते. सत्याचाच विजय होतो. हेतू शुध्द, सरल, निष्कपट असेल तर, त्या कार्याला यश येतेच हेच आमची शस्त्रधारी देवता सांगते. तसा हा खंडोबा हाती तलवार घेतलेला आहे. अश्वारूढ आहे. त्याचा घोडा पीतवर्णी आहे. पिवळा रंग रजोगुणाचा, कर्मयोगाचा आहे. भक्तीचा आहे.

खंडोबाचा उत्सव चंपाषष्ठीला असतो. कांदा-वांग्याचे भरीत व जोंधळ्याचा रोडगा (जाड भाकरी) असा साधासुधा नैवैद्य आहे. पावसाळ्यात कांदा, वांगे दोन्ही प्रकृतीला इष्ट नसतात. म्हणून भगवंताला नैवैद्य दाखवूनच, हिवाळ्यात सुरवात करून, पुढे ८ महिने ते खाता येतात. आपल्या धर्मात वातावरणाला खूपच महत्व आहे. त्याप्रमाणे देवाचे नैवैद्य, उत्सव आहेत. पर्यावरण, आयुर्वेद व धर्माचरण ह्यांची सुखेरव सांगड घातली गेली आहे. देवळाचा परिसर दगडांचा पण कुठेही हिंडताना थकवा जाणवत नाही. उंच गडावर स्थान आहे. मूर्ती जवळ जाऊन पूजा करू शकतो. गच्चीवर तळी उचलण्याचे स्थान आहे. बल भंडार वाहून तळी उचलायची. कित्येक लोकांचा हा कुळाचार आहे. यात्रेला गेल्यावर तळी उचलतात. तेथील पुजारी सर्व क्रिया मंत्रोच्चारात करून घेतात.

श्रीसमर्थांनी, सर्व देवतांचे दर्शन त्यांच्या तीर्थाटनात, देशाटणात घेतले आहे. प्रत्येक देवतेने त्यांना मूळ रूपात, टीरामरूपात दर्शन दिले आहे. म्हणून ते म्हणतात, हा खंडोबाही माझा श्रीरामच आहे. कार्यपरत्वे श्रीरामानेच हा अवतार घेतला आहे. त्या मागील एकच भावना, सर्वांच्या हृदयात तो एकच आत्माराम बसला आहे. जसा भाव असेल तसा तो दर्शन देतो. व भक्तासाठी धावून येतो. लाखो लोकांना त्यांना त्यांच्या कुलदैवतपूजनात ठेवून, त्यांचे मन श्रीसमर्थांनी भक्तिमार्गाकडे वळवले. व धर्मस्थापनेचा मार्ग सुकर केला. त्या श्रीरामरूपी खंडोबावर लक्ष ठेवले तरी, तो साह्यभूत होतो. हेच इथे सांगितले आहे.

।। म्हणावा जय जय राम ।।

## सोमवार (वारांच्या सवाया)

सोमवार हा चंद्राचा वार-सोम म्हणजे चंद्र. त्याने श्रीशंकराची मनोभावे अर्चना केली व सासऱ्याकडून मिळालेल्या शापाचे परिमार्जन करून पुनःशक्ती मिळवली. सोम म्हणजे चंद्र. चंद्र ही शीतलता देणारी देवता. ही शीतलता, समुद्रमंथनातून निघालेल्या चंद्र रत्नामुळे श्रीशंकराना लाभली. त्यांच्या डोक्यावर ते चंद्रकोरी सारखे-हिरे मोती माणकानी युक्त असे रत्न

आहे. चंद्राने श्रीशंकराची जिथे तपस्या-अर्चना केली ते प्रसिद्ध ज्योतिर्लिंग म्हणजे सोमनाथ प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातही १२ ज्योतिर्सिंगापैकी काही ज्योतिर्लिंगे आहेत त्याचा उल्लेखही ह्या सवाईत आहे. सोमवार हा श्रीशंकराचा मानला जातो. सोमवारी आलेला प्रदोष-सोमप्रदोष नावाने ओळखला जातो. श्रीविष्णू इतकीच श्रीशंकराची पूजाअर्चा सर्व भारतात-नव्हे जगतात होते. त्याचे हे वर्णन येथे आहे. भूतगणांचा अधिपती श्रीशंकर- सर्व गुणांचे लोक ह्याची आराधना करतात. पण ते चुकलेल्याला क्षिाही देतात. त्यांची ही सवाई आहे.

धन्य कैलासभुवन। शुभ्र शंकराचे ध्यान।
पुढे नाचे गजानन। सिंहासनी बैसला ।।१।।
वाचे उच्चारितां हर। त्यासी देतो महावर।
करी पातकांचा संहार। अंकी गिरजा शोभली ।।२।।
कृष्णा गोदा भागीरथी। ज्याचे जटेंतून निघती।
पावन त्या त्रिजगतीं। स्नानपाना लाधल्या ।।३।।
भैरवादि समुदाय। रामनाम नित्य गाय।
भवभ्रम सर्व जाय। लक्ष पायी ठेविल्या ।।४।।

श्रीशंकराचे मुख्य स्थान हिमालयात कैलास शिखरी जो शिवपदी लीन होतो, त्याला बहुमानाने 'कैलासवासी' झाला असे आपण म्हणतो. कारण प्रत्येक जीव, शिवात विलिन होऊन मुक्त होण्याचा प्रयत्न करत असतो. अध्यात्मात जीव-शिवमीलन महत्वाचे मानतात. त्याचे मुख्य स्थान कैलास. हिमालयात कैलास पर्वत आहे. शुभ्र बर्फाने आच्छादिलेले, सर्वात उंच ठिकाण. तिथे कर्पुरगौर शुभ्र श्रीशंकराचे वसतीस्थान आहे. वास्तविक श्रीशंकर तमोगुणाचे अधिपती. तमोगुणाचा रंग काळा. तर सत्वगुणाचा रंग पांढरा. पण विष्णू हा शामल, काळ्या रंगाचा तर शिवशंकर गौरवर्णाचे. ही किमया कशी झाली? दोघांची एकमेकांवर अत्यंत प्रीति आहे. त्यामुळे त्यांनी आपापला मूळ रंग दुसऱ्याला दिला. दोघेही एकमेकांचे गुरू व दोघेही एकमेकांचे शिष्य. श्रीविष्णूने म्हणजेच पंढरीनाथाने श्रीशंकराना मस्तकावर स्थान दिले तर श्रीशंकरानी-श्रीविष्णूला हृदयात श्थान दिले इतकी दोघांची एकमेकांवर प्रीति. म्हणून समर्थ ह्या सवाईत वर्णन करतात, त्या कैलासभुवनाचे काय वर्णन करू? तिथे कर्पुरगौर श्रीशंकराचे राज्य आहे. तिथे ते आपली पट्टराणी गिरीजा पार्वती हिला आपल्या अंकावर-मांडीवर घेऊन विराजमान झाले आहेत. व त्यांचा पुत्र श्री गजानन त्या सभेत, त्यांच्या सेवेसाठी नर्तन करतो आहे.

श्रीसमर्थांना नर्तक गणरायच आवडतो. दासबोधात गणेश स्तवनात सुंदर वर्णन आहे. नर्तक हा खरा आत्मनिवेदन भक्ती जगत असतो. बाह्याकारे संपूर्ण नटलेला, पण स्वतःचा तोल अंतर्यामि असा सांभाळतो की, तो उपाधीत गुंतलेला वाटतो. नाचताना त्याने धारण केलेला, कही अलंकार तुटत नाही, गळून पडत नाही. खूप गिरक्या घेतो, पण तोल सावरत उभाच असतो. लय साधतांना आपल्या साथीदारांना हुंकाराने प्रोत्साहन देत त्यांना ही सांभाळतो. महंताचे कार्य कसे असावे? हेच या रूपातून स्पष्ट झाले आहे. त्याच्या नाचामुळे ईश्वर सभेला शोभा येते. म्हणजे आपल्या धन्याचे, राजाचे कार्य तो कसे करतो, खऱ्या अर्थाने शोभायमान कार्य त्याचे कडून होते. व ईश्वर प्रसन्न होतो. राजाने प्रजानुरंजन, सेवकाने धन्याचे काम अशा रितीने करावे. म्हणजेच राजा सिंहासनी सुखाने बसू शकतो.

हा महादेव देवाधिदेव किती उदार आहे? केवळ त्याचे नाव उच्चारले, तर तो भक्ताला प्रसन्न होतो व भक्ताची इच्छा पूर्ण करतो. वरप्राप्तीसाठी भक्त उपासना करत असेल, तर मनीषा श्रीशंकर चटकन पूर्ण करतात. काही वेळेला ह्या स्वाभामुळे ते संकटातही पडतात. श्रीविष्णू त्यांचे गुरू, त्यावेळी ते त्यांना सावरतात. अशा ही कथा आहेत. महावर देतांना त्यांचा हेतू शुध्दच असतो. पण दानव भक्तांनी त्या वरचा गैरफायदा घेतलेला आहे. श्रीरामरायापुढे ही सवाई वर्णन चालू आहे. शिवाच्या अंतरातील श्रीराम सदैव जागृत असल्यामुळे, श्री शंकराच्या वराचा दुष्परीणाम जगतावर होऊच शकत नाही. कारण दोघांचा एकमेकांवर गाढ विश्वास आहे. त्यामुळे जगतात ही दोन्ही दैवते, श्रीविष्णु व श्रीशंकर प्रिय आहेत.

श्रीविष्णूच्या पायापासून निघालेली गंगा, श्रीशंकरांनी डोक्यावर घेतली आहे. त्यांचा जटेत त्यांनी तिचा ओघ सांभाळून, तिला सामावून घेऊन, जगत कल्याणासाठी, तिला कार्यरत ठेवले आहे. भगीरथाने गंगा भूवर आणली, ती शंकराने जटेत पेलली व तिला योग्य मार्ग दिला. तसेच गोदा व कृष्णा ह्या नद्यांच्या निर्मितीचाही इतिहास आहे.

गौतम ऋषिच्या तपश्चर्येने गंगा, दक्षिणदिशेला कार्य करण्यासाठी पवित्र करण्यासाठी अवतरली. ब्रह्मगिरी पर्वतावर उगम पावलेली गोदा – तीन जटा आपटून श्रीशंकरानी पश्चिमवाहिनी होणाऱ्या गोदावरीला, पूर्ववाहिनी केले. प्रसिध्द क्षेत्र त्र्यंबकेश्वर जवळ हा चमत्कार पहायला मिळतो, ब्रह्मगिरीच्या पश्चिम भागाला गोदावरी – गंगेचे उगमस्थान असून ती एकदम त्र्यंबकेश्वरी गोमुखातून पडताना दिसते. श्री शंकरानी तिथेही त्या नदीला जटेत सामावलेले आहे. अशीच कथा महाबळेश्वर जवळ कृष्णा नदीची आहे. कृष्णा, कोयना, वेण्णा, गायत्री, सावित्री ह्या पाच नद्या गोमुखातून पडताना तिथे दिसतात. त्यातील कृष्णेलाही शंकरांनी अशीच दिशा दिली आहे. व दक्षिण महाराष्ट्र पावन झाला आहे. श्रीसमर्थांनी भारत विहारात हिमालयात भ्रमण केले. त्यावेळी श्रीरामांनी त्यांना कृष्णा काठी कार्य करावे ही आज्ञा दिली. गोदावरी तीरी, नाशिकला पंचवटीच्या नजीक, टाकळीला त्यांनी तपश्चर्या केली. त्र्यंबकेश्वर, महाबळेश्वर ही तीर्थक्षेत्रे, श्रीसमर्थ कार्याची प्रमुख ठिकाणे म्हणून तिसऱ्या चरणात, त्यांनी श्रीशंकराच्या स्तुतीतून ह्या तिन्ही नद्यांचे नाव व शिवकृपा अगदी मोजक्या–नेटक्या शब्दात व्यक्त केली आहे.

मुसलमानी अमलात, उजळ माथ्याने हिंदू–समाजाला, भक्ताला स्नानपान वगैरे विधिही करता येत नव्हते. रामकृपेने, श्रीकृपेने शिवराज्य स्थापन झाले. "उदंड जाहले पाणी – स्नानसंध्या करावया" अशा शब्दात त्यांनी रामरायाजवळ कृतज्ञता व्यक्त केली आहे.

श्रीखंडेरायाने–म्हणजेच भैरवगणाचा अधिपत–श्रीशंकराने रामरूपात समर्थांना नाम दिले आहे. श्रीशंकरजी रामनामाचाच महिमा गातात, स्वतःच्या पत्नीला, गणाना, अनुयायांना त्याचा महिमा सांगतात, ते स्वतः पहिले रामोपासक, स्वतः उपासना करतात. इतरांनाही सांगतात. ज्या रामनामामुळे भवभ्रम दूर झाले. त्याच्या पायीच विश्वास ठेवावा. सज्जनगडावर श्रीसमर्थांना महारूद्राभिषेकानंतर जी मानसपूजा म्हटली जाते, ती श्री शंकराचीच म्हटली जाते. दासनवमी उत्सव माघ वद्य १ पासून सुरू होतो, तरी यात्रा, महाशिवरात्रीपर्यंत असते. कारण श्रीसमर्थ महादेवाचेच अवतार आहेत. शंकराच्या ११व्या रूद्राचा अवतार मारोती व मारोतीचा अवतार श्रीसमर्थ अशी परंपराच आहे म्हणून अशा शिवपूजनतही लक्ष ठेवले तर, पर्यायाने तो श्रीरामच प्रसन्न होईल. हा भावार्थ ह्या सवाईतून व्यक्त करताना, शेवटी असे म्हणणे जास्त संयुक्तित होईल.

।।म्हणावा जय जय राम।।

## मंगळवार (वारांच्या सवाया)

मंगळवारची सवाई तुळजाभवानीला उद्देशून आहे. तुळजाभवानी ही महाराष्ट्राची शिवाजीराजांची व समर्थाची पण कुलदेवता. तिच्या दर्शनाला गेले असता, तू संकटहारिणी, मग आत्ताच अशी गप्प कां? तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाची देखता अशी विनवणी समर्थ करतात. शिवाजी राजांना प्रत्यक्ष मातेने 'भवानी तलवार' दिलेली आहे. हिला रामवरदायिनी असेही म्हणतात. सीताशोधनात दक्षिणेचा मार्ग हिने रामरायांना दाखविला. व त्याच्या सहाय्यार्थ अष्टमीला चौसष्ट योगिनीसह युद्धभूमिवरही अदृष्य रूपात हजर होती. तिची सर्व देव स्तुती करतात. हे पार्वती मातेचेच रूप म्हणून हिच्या मंदीरासमोरच श्रीशंकराचेही देऊळ आहे. इथला नवरात्रोत्सव व चैत्र महिन्यातील उत्सव प्रख्यात आहे.ही क्षत्रियाची तशीच ब्राह्मणाची पण कुलदेवता म्हणून दोन्ही पद्धतीची पूजा इथे होते. इथली मूर्ती चल आहे. भाद्रपद वद्य अष्टमीला देवीला उठवतात व ८ दिवस ती पलंगावर विश्रांती घेते. त्यावेळी सर्व देऊळ पुन्हा रंगरंगोटीने स्वच्छ केले जाते. अश्विन शुद्ध १ला वाजत गाजत मिरवणुकीने पुनः तिची स्थापना होते. मूर्ति सुंदर आहे. अभय देणारी माता व पाठीमागे लढणारी माता अशा स्वरूपात ही मूर्ति आहे. त्या तीर्थक्षेत्राचे इथे वर्णन आहे.

खोलगट भागात हे स्थान असल्यामुळे बऱ्याच पायऱ्या इथे उतराव्या लागतात. वाटेतच बाहेरील तीर्थावर स्नान, मग गोमुखाखाली स्नानाची व्यवस्था आहे. नवसाला पावणारी असल्यामुळे, तऱ्हेतऱ्हेचे नवस इथे केले जातात. त्यात लोटांगण घालणे हा प्रकारही प्रकर्षाने दिसतो सकाळी दही, केळे, पंचामृताने स्नान भोग असतो. दुपारी अलंकारयुक्त देवीचे छान दर्शन होते. इथे अखंड यात्रेकरू येतच असतात. अलोट गर्दी असते. मंगळवार, शुक्रवार, पौर्णिमेला जास्त गर्दी असते. असे हे सुंदर तीर्थक्षेत्र

धन्य तुळजापूर सुंदर। माता नांदे घरोघर।
तेहतीस कोटि सुरवर। उभे असती त्या ठाया ।।१।।
यात्रा येतसे अपार। उदो बोलाचा गजर।
गोंधळ पोत निरंतर। चमत्कार पावती ।।२।।
येथे येता रामदास। श्रीराम चरणी दृढ विश्वास।
अंतरी धरोनी आस। रामध्यान करीतसे ।।३।।
रामरूपी देवी झाली। शिवशक्ति आकारली।
नामे अंतरी निवाली। लक्ष पायीं ठेविल्या ।।४।।
।। म्हणावा जय जय राम ।।

तुळजापूर तीर्थक्षेत्र, तुरंत पावणारी म्हणून तुळजा. तिला तुकामाई पण म्हणतात. तुका आई? असा प्रश्न श्रीरामरायांनी तिला विचारला होता. सीतेच्या वेषात जाऊन श्रीरामरायांची परीक्षा सती मातेने घेतली, पण ह्या शंकरवल्लभेला रामरायांनी ओळखले, व तू एकटीच कशी? आमचे पिता कोठे आहेत? तू कां आई? तुकाई ह्या नावाने ती तेथेच स्थिर झाली. व तिने श्रीरामरायांना पुढचा मार्ग दाखविला, ते ठिकाण व तेथील मूर्तिही दाखवली जाते. असे हे धन्य तीर्थक्षेत्र. ही महाराष्ट्रातील बहुतांश लोकांची कुलदेवता म्हणून "माता नांदे घरोघरी" असा उल्लेख आहे.

१२आदित्य, ११रूद्र, अश्विनीकुमार व अष्टवसु असे प्रमुख ३३ देव नित्य हिच्या सेवेत असतात. म्हणजे ह्या मूळमायारूपी भवानीच्या आज्ञेत ते वागतात.

इथे पौर्णिमा (अश्विनी व चैत्री) ला मोठा उत्सव असतो. दोन्ही नवरात्रे होतात. अश्विनात जास्त गर्दी असते. दिवाळीच्या दिवशी सर्वत्र मंदीरात 'दीपोत्सव' असतो. अशी सतत यात्रा आहेच. नवसासाठी, नवसपूर्तिसाठी, कुळाचारासाठी अखंड यात्रा व भक्तांची रीघ असतेच. हा सर्व मतितार्थ 'यात्रा येतसे अपार' ह्या शब्दांतून व्यक्त झाला आहे.

अशा भक्तांच्या तोंडातून सतत 'अंबाबाईचा उदोकार' गर्जत असतो. अंबाबाईपुढे गोंधळ, पोत उजवणे हा प्रकारही तिथे नित्य चालतो. त्यालाही विशिष्ट पद्धत आहे. त्या विशिष्ट पद्धतीला कुळधर्म व आचरणाला कुळाचार म्हणतात. पूजा पद्धतीत पोत कसा ठेवायचा? कुठे ठेवायचा? ह्या पद्धतीला 'धर्म' तर प्रत्यक्ष कृतीला 'आचार' म्हणतात. व त्या वातावरण निर्मितीमुळे मनःकामना पूर्ण होताच त्याला आपण चमत्कार म्हणतो. अशा नवसाला पावणाऱ्या मातेच्या ठिकाणी अपार भक्त येतात.

श्रीसमर्थही तीर्थाटनणात व नंतर श्रीछत्रपतींसाठी नवस बोलायलाही आले आहेत. ही रामवरदायिनी असल्यामुळे व त्यांची रामरायावर दृढ श्रद्धा असल्यामुळे, रामरूपात देवीने त्यांना दर्शन दिले आहे. रामराज्य व्हावे ही मनीची आस,तुळजाभवानीने छत्रपतीद्वारा पूर्ण केली आहे. त्यावेळी तिला मोत्याचा चौकडा वहाण्यासाठी समर्थ स्वतः आले आहेत. ही कथा प्रसिद्ध आहेच. शिवशक्ती माताभवानी, कार्यरत झाली. शिवशक्ती, जगतज्योती म्हणजेच आत्मशक्ती, राष्ट्रातील अस्मिता, शक्ती जागृत झाल्यामुळेच राज्यस्थापना झाली व सर्वत्र "जय जय रघुवीर समर्थ" नाम दुमदुमु लागले. प्रत्यक्ष शंकरानी माता पार्वतीला रामतत्व समजावून दिले असल्यामुळे, ती पण ते नाम अंतरी सदैव स्मरत असते. ते ही अत्यंत आदरपूर्वक घेते व तिलाही श्रीशंकराप्रमाणे शांती समाधान प्राप्त झाले. तिच्या अंतरी वसत असलेल्या श्रीरामानाच तिच्या माध्यमातून हा प्रणाम करत ही सवाई संपन्न होते. म्हणून तिला व श्रीरामरायाला त्रिवार वंदन हे सर्व तिच्या चरणी चित्त ठेवले तरच लाभेल.

।। म्हणावा जय जय राम ।।

बुधवार (वारांच्या सवाया)

ही सवाई पंढरपूरच्या तीर्थक्षेत्री असलेली पंढरीरायाची आहे. पांडूरंगाचे हे रूप, बालकृष्णाचे रूप मानले जाते. प्रत्येक संताला त्या रूपात ह्या परब्रह्मरूप विठ्ठलाने दर्शन दिले आहे. पंढरपूर चंद्रभागेतीरी वसले आहे. पुंडलिकाच्या भक्तीमुळे हे

परब्रह्मरूप इथे उभे ठाकले आहे. गेली २७ युगे झाली, ह्या अठ्ठाविसाव्या युगातही हे तीर्थक्षेत्र आहे. हे ७ वे मन्वंतर. प्रत्येक मन्वंतरात ४ युगे होऊन जातात. ७ व्या मन्वंतरातील हे कलीयुग चालू आहे. ७x४ = २८ ह्या अठ्ठाविसाव्या युगात कर कटावर ठेवून ह्या मौनी अवस्थेत (उगा)उभा आहे. पण नुसत्या दर्शनाने तो भक्तांना दिलासा देतो. चालू कलीयुगातील संतांनी ह्या तीर्थक्षेत्री भक्तिच्या जोरावर, तिचा महिमा वाढवत, खूपच चमत्कारीक वाटतील अशा अघटित घटना घडवल्या आहेत. कलीयुगात भक्ती उत्पन्नच होत नाही. ती उत्पन्न व्हावी म्हणून, संताचे सतत प्रयत्न चालू आहे. भक्तीला प्रदर्शनाचे रूप लवकर येते. मूळ दर्शनाचा भाव फारच थोड्या भक्तात असतो. तरी अशा भक्ताचे हे श्रध्दास्थान आहे. भोळ्या भाबड्या वारकऱ्याचे हे विश्रांतीस्थान आपापले कर्म करून, कर्मभक्तीद्वाराच, ते ह्या पांडूरंगाची पूजा करतात.

सर्व संत म्हणजे, गोकुळातील बालगोपाळ. त्यांनी यमुनेच्या काढी 'काला' केला. खरी भक्ती दाखवली भक्तिला जात, पात, वयोमर्यादा, ज्ञान इत्यादीची गरजच नसते. फक्त भाव हवा. म्हणून गोपाळात आंधळे, पांगळे, बोबडे, तोतरे, लंगडे सगळे प्रकार असल्यामुळे, पुढे संतानी त्याचा अवलंब करून, दाखवून दिले की, भक्तिला फक्त निर्मळ अंतःकरण हवे अशा भक्तालाच इथे दिलासा देत, हा पांडूरंग भवसागर फक्त कमरे इतक्या पाण्याचाच आहे. तो सहज पार करता येतो. हे कमरेवर हात ठेवून सांगतो आहे.

हे हरि व हर ऐक्याचे प्रतिक. श्री. ज्ञानदेव, नामदेव हे मुळात नाथपंथी लोक आहेत. त्यांनी ही भक्ती केली. विठ्ठलाच्या शिरावर शिवलिंग आहे. हरिहर ऐक्य असलेले हे परब्रह्मरूप श्रीसमर्थांना विठ्ठलांनी रामरूपात दर्शन दिले. सारी पंढरी अयोध्या झाली. बडवे लोक घाबरले. पण समर्थांच्या विनंतीवरून, स्थान महात्म कायम रहावे म्हणून, पुनः मूळ रूपात पांडूरंग अवतरले मोठी मनोरंजक कथा आहे. ती सूत्ररूपात ह्या सवाईत आहे.

सर्व कार्य भगवंतच करतो. पण सर्व 'अकर्ता' भावनेतून पावसाळा सुरू होतो. नांगरणी, पेरणी महत्वाची कामे असतात. पण सर्व तोच करतो ही भक्ताची भावना, तर मी काहीच करत नाही ही देवाची वृत्ती तो झोपी जातो. ती शयनी एकादशी आषाढीला शेतकऱ्याला, कामकऱ्याला ह्या ४ महिन्यात भरपूर काम असते. पिके हाती येतात. अश्विनी पौर्णिमेला ती नवान्न पौर्णिमा सर्वांचे भरण पोषणाचे कार्य भगवंत ह्या अकर्ता भावनेतून करतो. व झोपेतून उठलो असे कार्तिकीला भासवतो ती प्रबोधिनी एकादशी खऱ्या अर्थाची जागृती भगवंत सर्वकर्ता, ही जागृती पुढे ८ महिने भगवंतात टिकवण्याचे कार्य हा भगवंत करतो.

खरीप पिकासाठी कार्तिकी, तर रब्बी पिकासाठी माघी यात्रा ते चैत्री यात्रा असा सुंदर मेळ इथे घातला आहे. अशा या पंढरपूरचे महात्म्य जे कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमेवर आहे, त्या क्षेत्राचे आहे. दोन्ही कडील भक्त इथे येतात. वैष्णव व शैवाचा सुंदर मिलाफ ह्या वारकरी संप्रदायात आहे. असे हे पंढरपूर त्यातील पांडूरंग, विठ्ठल या दैवताची ही सवाई आहे.

नाम विठ्ठल सुंदर। ब्रह्मा विष्णु आणि हर।
गुणातीत निर्विकार। शुकादिकी गायिला।।१।।
चंद्रभागा रम्य तीर। तेथे उभा कटिकर।
दिंड्या पताका अपार। यात्रा घोष जाहला।।२।।
तेथे येता रामदास। दृढ श्रीरामी विश्वास।
रूप पालटोनी त्यास। रामरूपी भेटला।।३।।
पुनःविठ्ठल रूप। राम विठ्ठल एकरूप।
पूर्व पूण्य हे अमूप। लक्ष पायी ठेविल्या।।४।।
।। म्हणावा जय जय राम।।

"नामाचा बाजार–पंढरी नामाचा बाजार नामचि घेता– नामचि देता होतो कुलउध्दार" असा पंढरीत नामाचा महिमा आहे. विठ्ठल ह्या नामात, विष्णु व शिव दोन्हीचाही समावेश होतो. विठू= विष्णू व स्थल= स्थाणू –शिव असा सुंदर मिलाफ ह्या नामात आहे. श्रीकृष्ण परमात्म्याचे हे नाव श्रीकृष्ण हा प्रत्यक्ष परब्रह्म अवतार, म्हणून तो गुणातीत, तिन्ही गुणावताराच्या पलिकडील असल्यामुळे तिन्ही देव त्यांचे गुणवर्णन करतात गुणातीत असल्यामुळए तो निर्विकार आहे. व निर्विकार श्रेष्ठ मुनी शुकाचार्यांनी ह्याची महति भागवतात गाईली आहे. ते ह्या सगुण अवतारात रमले त्यांनी त्यातून भक्तिचा रसास्वाद आकंठ

पान केला.

पंढरपूर क्षेत्र इतके पवित्र की ह्या ठिकाणी भीमानदी ही चंद्राकार वळण घेत वहाते आहे. म्हणून तिला चंद्रभागा भीवराही नामभिधान आहे. भक्तांच्या भक्तिचा जल्लोष ह्या चंद्रभागेच्या वाळवंटात दिंड्यापताका घेऊन वारकरी येतात. नामाचा भजनाचा, कीर्तनात जल्लोष चालतो. वारकरी लोकांची कीर्तने ३–३ तास चालतात. कीर्तनात भगवंताचे अधिष्ठान असल्यामुळे, कुणीही जागेवरून उठत नाही. तसा अलिखित पायंडाच आहे. वृन्दावनात, जसा बालपणी श्रीकृष्णानी गोपगोपी समवेत भक्तिची परिसीमा गाठली तोच आनंद इथे पंढरपूरातही मिळतो. नामदेवांनी एका अभंगात हे स्पष्ट केले आहे. की आम्ही भगवंताचे सवगंडी–गोपाळ "नामा तेथीचा रहिवासी आला स्थापाया भक्तिसी" तोच जल्लोष त्यांच्या कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंग नामदेव समवेत कीर्तनात नाचत त्यांना सांभाळत असत.

अशा वारीला चलावे, म्हणून खूप लोकांनी श्रीसमर्थांना आग्रह केला. प्रत्यक्ष विठूरायाने ब्राह्मणरूप घेऊन, त्यांना पंढरीला हा सोहळा पाहण्यासाठी आणले. पण श्रीरामरायावर अत्यंत अनन्यनिष्ठा विठुरायाचे दर्शन घेताना, मनीचा श्रीराम पुढे आला, व त्यालाच श्रीसमर्थ विचारू लागले. इथे कारे उभा श्रीरामा? तुझे चापबाण, वानरमेळा, सीतामाई, शरयुनदी कोठे गेली? इथे तू निशस्त्र करकटावर ठेवत, मौनावस्थेत शांत उभा आहेस. मोठा सुंदर अभंग आहे. पंढरी व अयोध्या, श्रीराम व श्रीकृष्णरूप विठ्ठल ह्यांचे साम्य व तुलना सुरेख स्पष्ट झाली आहे. त्यांच्या आर्तभावामुळे, सारे चित्र बदलले. पंढरीचे महात्म्य जाईल, म्हणून बडवे धास्तावले भक्ताभिमानी श्रीराम पुनः विठ्ठल रूपात अवतीर्ण झाला. अशी सुंदर कथा, आजही कीर्तनकार २–२ तास रंगवतात. त्यातून श्रीराम व विठ्ठल भक्ती स्थापन करता. वारकऱ्यांचे घोषवाक्य, "जय जय राम कृष्ण हरी" असेच आहे. जो राम, जो कृष्ण तोच इथे हरि रूपात आहे. म्हणू त्याची स्तुती ही हरिपाठातून गाईली जाते.

अशा प्रसिध्द तीर्थक्षेत्राचे वर्णन ह्या बुधवारच्या सवाईत श्रीसमर्थ गातात. पूर्वपूण्य असेल तरच, ही भक्ती ह्रदयात रूजली जाईल. "बहुत सुकृताची जोडी म्हणून विठ्ठली आवडी" विठ्ठल भक्तितून राम कृष्ण दोन्ही अवताराचे महत्व कळते. वारकरी संप्रदायातील सर्व संतानी रामायणाचा अभ्यास केला आहेच, असे हे वैभव, त्यांचे पायी लक्ष ठेवल्यासच लाभेल असे सांगून त्या दैवताला त्रिवार वंदन करून, श्रीसमर्थांनी ही सवाई संपन्न केली आहे.

## गुरूवार (वारांची सवाई)

गुरूवारच्या सवाईत कोणत्याच तीर्थक्षेत्राचे वर्णन नाही. पण सर्व वर्णन श्रीसद्‌गुरूचे आहे. इथे श्रीराम, श्रीसमर्थ दोघे सद्‌गुरूरूपातच आहेत. व ते वर्णनही मुख्य सद्‌गुरूबोधाचे आहे. हा सद्‌गुरूबोध संतसंगती, सद्‌गुरूमुखे मिळालेला आहे. व त्या आत्मबोधाने जीवाचे कल्याण साधले जाऊन, जीव शिव ऐक्य साधता येतं. म्हणून त्या बोधानुसार वागून, सद्‌गुरू समीप जाण्याचा प्रयत्न करण्यासाठी ही सद्‌गुरूना– सद्‌गुरूस्वरूप–बोधाचे स्मरण ह्या सवाईतून व्हावे, असा भावार्थ आहे. "जिकडे तिकडे सद्‌गुरू भरला" अशा अवस्थेत, त्या परब्रह्मस्वरूप श्रीरामाचे स्मरण, श्रीसमर्थांनी गुरूवारच्या ह्या सवाईत केले आहे. परब्रह्मरूप श्रीरामाचेरूप, गुरूवारी, नव्हे प्रत्येक क्षणी त्यांना सर्वत्र दिसते. श्रीदत्तात्रयाचा वार ही गुरूवार आहे. ज्यांना 'गुरू' भेटले नाही, त्यांनी दत्तोपासना करावी. श्रीदत्तगुरू नेहमी पाठीशी असतातच. गुरू म्हणजेच सद्‌गुरू, कोल्हापूरला भिक्षाटनाला निघताना श्रीदत्तात्रयानी श्रीसमर्थांना पादुका दिल्या आहेत. कुबडी दिली आहे. दत्तात्रयाचा, श्रीगुरूचा प्रसाद म्हणून, त्या सज्ञनगडावर समाधीवर ठेवून मगच त्यावर अभिषेक होतो. "पादुकावरी शेष शोभत असे–दोन्ही कडे आरसे" असे वर्णन, प्रत्यक्ष श्रीदत्तगुरूनी दिलेल्या त्या पादुका, पितळी मंजुषेत ठेवलेल्या आहेत. श्रीसद्‌गुरू महावाक्याचा बोध देतात. सद्‌गुरूचा वार गुरूवार म्हणून इथे सद्‌गुरू बोध महावाक्याचे विवरणातूनच समजतो. श्रीसद्‌गुरू परब्रह्मरूप आहेत, ते नित्य आहेत, निराकार आहेत, ही अनूभूति फक्त सद्‌गुरूमुखश्रवणानंतरच अभ्यासाने शिष्याला लाभते. अनन्य सद्‌गुरूभक्तीवीना आत्मज्ञान होत नाही. "गुरूकृपेवीण–नाही आत्मज्ञान" असे संतवचन आहे. त्या श्रीसद्‌गुरूचे व त्यांच्या महावाक्याचा (तत्वमसिचा) निर्देश ह्या सवाईत आहे.

सारासार नीतिन्याय – मुख्य भक्तिचा उपाय।
संतसंगेवीण काय – वाया जाय सर्व ही ।।१।।

आधि कर्माचा प्रसंग - शुद्ध उपासना मार्ग।
ज्ञाने उद्धरती जन। येथे संदेह नाही ।।२।।
देहे निरसन करावे। महावाक्य विवरावे।
तेणे संसारी तरावे। काळ नासतो आहे ।।३।।
ज्यासनाही येणे जाणे। नाही जन्म ना मरणे।
सद्य पाविजे श्रवणे। दास म्हणे हे सही ।।४।।

अध्यात्ममार्गात ज्या मुख्य संकल्पना आहेत. त्या ह्या सवाईतून स्पष्ट झाल्या आहेत. सारासार विचार, नित्यानित्यविवेक, आत्मानात्मविवेक, शाश्वत-अशाश्वतविवेक, सद्-असदंविवेक असे अध्यात्मात चिंतनाचे विषय आहे. मुख्य भक्तीचा मार्ग असला तरी, ज्यावर श्रध्दा, विश्वास ठेवायचा, त्याचे संपूर्ण ज्ञान भक्ताला असले तरच, ती भक्ती यशदायी होते. 'भोळाभाव मला पाव' असे सुरवातीला असले, तरी, भक्तीमध्ये शार-असार निवाडा करताच आला पाहिजे. वर्तणुकीतही, नीती-अनीति, न्याय अन्याय ह्याचा समग्र विचार करायलाच हवा. खऱ्या खोट्याचा निवाडा संतसंगती शिवाय कळतच नाही. 'दिसते तसे नसते, म्हणून जग फसते' हा न्यायच बहुतांशे दिसून येतो.

संतांच्या संगतीतूनच हे कळते म्हणून अध्यात्मात पहिली पायरी-सत्संग आजकाल सत्संग म्हणजे भजन हा रूढार्थ झाला आहे. संत सामान्यांना योग्य मार्ग दाखवतात.

मानव रजोगुणी आहे. कर्म केल्याशिवाय त्याचा क्षणही जात नाही. कांहीच कर्म न केले, तरी तो श्वासोश्वास घेण्याचे कर्म करत असतोच. मग शास्त्रानुसार शुध्द विहित कर्म कोणते? निषिध्द कोणते वगैरेची जाण, त्याला शास्त्रे शिकवतात. शास्त्रानुसार प्रत्येक कर्माचे वर्गीकरण केले आहे. कर्म केल्याशिवाय, कोणताच प्राणी रहात नाही. म्हणून अध्यात्मशास्त्रात कर्ममार्गाला प्रथम स्थान दिले आहे. अधिकारानुसार कर्माची क्रिया वेगळी होईल. पण कर्म करावेच लागते साधी देवपूजा करायची म्हटली तरी ती, कशी करावी? ह्याचे ज्ञान आहेच. शास्त्रोक्त कर्म आचरूनही 'भक्ती' साधता येते. म्हणून अध्यात्मात 'कर्ममार्गा' ला प्रथम स्थान आहे.

कर्मातून श्रध्दा, विश्वास, निष्ठा, प्रेम निर्माण होते. व त्यानुसार इष्ट देवतेची उपासना भक्त करू लागतो. त्यात तो रममाण होतो. कर्ममार्गानंतर उपासना मार्ग आहे. उपासनेचे खूप प्रकार आहेत. शुध्द उपासना म्हणजे आपल्या इष्ट दैवताचे, अधिकाधिक चिंतन, मनन, त्याच्या गुणानुसार स्वतःचे आचरण, इष्ट दैवताला आदर्श मानणे, त्यांच्या पूजनात, सानिध्यात जास्त राहणे. उप म्हणजे जवळ आसन म्हणजे बैठक त्या दैवताच्या सर्वांगाने पूजन, अर्चन, गुणवर्णन म्हणजे उपासना त्या दैवताच्या समीप पोचण्याचा प्रयत्न.

कर्म, उपासना कसे करावे? ह्याचे ही शास्त्रोक्त ज्ञान आहे. ज्ञानाचेही दोन प्रकार व्यावहारिक, आध्यात्मिक. प्रत्यक्ष पूजा अर्चा हा व्यवहाराचा मार्ग त्यातही सकाम-निष्काम उपासनेतून मिळणारा लाभ वेगळा. कर्मानुसार, गुणानुसार आचरण, मग त्याचा परिणाम फलभोग.

दुसरा मार्ग तत्वविवरणाचा. आत्मज्ञानाचा आत्मज्ञानाने विरक्ती लवकर येते. आत्मज्ञान झाले की, आसक्ती कमी होते. आसक्ती कमी होताच विरक्ती येते. व ह्या विरक्तीतून शुध्द विवेक साधता येतो. म्हणून कर्म उपासना ज्ञान ह्या त्रिकांडाचा अभ्यास साधकाला हवाच. हा बोध दुसऱ्या कडव्यात आहे.

आधि कर्माचा प्रसंग। शुध्द उपासना मार्ग।
ज्ञानी उध्दरती जन। येथे संदेह नाही।।

एकदा ज्ञानमार्गातून तत्वनिरसन कसे करावे? हे समजले की, चारी देहाचे स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण ह्यांचे निरसन करणे, अध्यात्मात गुरूबोधानुसार आचरण अत्यंत महत्वाचे आहे. सद्गुरूंनी शिष्याला आपलेसे केले की, ते त्याच्या पात्रतेनुसार त्याला अनुग्रह देतात. सद्गुरू शोधन शिष्याला आपल्या कर्मातून-शुध्दाचरणामुळे सुलभ जाते. गुरू आपैसे भेटतात, मंत्र -अनुग्रह देतात. ५ व्या दशकात दासबोधात हा सर्व भाग आला आहे.

"ऐक शिष्या येथीचे वर्म, स्वये तूची आहेसी ब्रह्म।"

'तत्वमसि' महावाक्याचा बोध सद्गुरूमुखातून होतो. व आचरणातून शिष्याने सोऽह, 'अहंब्रह्मास्मि' हे दाखवून

द्यायचे असते. 'अयं आत्मा ब्रह्म' हे ज्ञान शास्त्राभ्यातून सद्गुरू शिकवतात तर सर्व खलु इदम् ब्रह्म ही अनुभुती शिष्य मिळवून, दोघेही समान होतात. महावाक्याचे मननातूनच हा अर्थ काढण्यासाठी, शिष्याला जन्मोजन्मी आराधना करावी लागते. तो अनुभव सहज मिळणारा नाहीच.

देहे निरसन करावे ह्या चरणातून सारे अध्यात्मशास्त्रच व्यक्त केले आहे. चारी देहाचे निरसन, ३२ तत्वाचे निरसन, सोपे नाही. हा संसार विषयाकडे ओढणारा बहीर्मार्गी आहे. देव मिळवण्यासाठी अंतर्यात्रा करावी लागते. ती तपश्चर्या सोपी नाही. "घटिका गेली, पळे गेली, तास वाजे ठणाणा" असा आयुष्याचा काळ पुढे सरकतच असतो. ज्यावेळी जाग येते, त्यावेळी शक्ती, बुध्दी कामाला येत नाहीत. नरदेह हा ईश्वर प्राप्तीसाठी आहे. हे निरंतर सत्यच फक्त सद्गुरूच सांगतात. हे तिसऱ्या व चौथ्या चरणातून स्पष्ट केले आहे.

चार चरणच पण प्रचंड प्रबोधात्मक प्रबंध तयार होईल, इतका विशाल अर्थ, ह्या सद्गुरूबोधात आहे.

अत्यंत कळवळ्याने श्रीसमर्थ ह्यातील चौथ्या चरणातून सांगत आहेत की, ज्याला येणे नाही, जाणे नाही, असा परब्रह्मरूप सद्गुरूरूपी श्रीराम परब्रह्मतत्व आपल्या गवसले आहे. त्याचा फायदा सत्शिष्यांनी अवश्य घ्यावा. सद्गुरूंनी अफाट ग्रंथरचना केली आहे. त्या शास्त्राभ्यासातून, प्रत्यक्ष गुरूमुखातून ती वचने समजावून घ्यावीत व जन्म सार्थकी लावावा. काहीच समजले नाही, तर निदान मनोभावे उपासना करावी. ती सुरू झाली की, हळू हळू विवरता, विवरता विशेषातील विशेष, विशेषाविशेष कळू लागले. हे त्याचे वचन आहे. ह्या वचनावर विश्वास ठेवून, त्यांच्या चरणावर नतमस्तक होऊन म्हणूयात.

।।म्हणवा जय जय राम।।

## शुक्रवार (वारांच्या सवाया)

शुक्रवार हा महालक्ष्मीचा वार त्यामुळे ह्या सवाईत महालक्ष्मीचे व तीचे मुख्य ठिकाण कोल्हापूर ह्यांचे वर्णन आहे. महालक्ष्मीचे महात्म सर्व देव, देवता, प्रमुख ऋषी, मुनींनी गाईले आहे. ही विष्णूची आदिशक्ती. तिन्ही देवात श्रेष्ठ कोण? ह्याची परीक्षा भृगु ऋषींनी सर्व ऋषींच्या आग्रहाखातर ते जेष्ठ म्हणून, त्यांनी घेतली. त्यावेळी त्यांनी श्री विष्णूना सर्व श्रेष्ठ दैवत म्हणून पसंती दिली. ब्रह्मा, शंकर यांची परिक्षा घेताना, दोघांनी एकमेकांना दूषणे दिली आहेत. स्वभावानुसार ऋषींनी त्या देवांनाही शाप दिले पण देवांनी तो राग गिळला, मात्र तो व्यक्त झाला होता. पण योगनिद्रेतल्या महाविष्णूंना भृगूंनी छातीवर पायच मारला तर विष्णूंनी त्यांचे पाय धरून क्षमाच मागितली. ब्राह्मणांनी असा अपमान केला, म्हणून लक्ष्मीदेवी चिडल्या, त्यांनी ब्राह्मणांना असंतुष्ट व दरिद्रीच साहाल म्हणून शाप दिला व त्या रागाने वैकुंठ लोक त्याग करून इथे, कोल्हापूरात अवतीर्ण झाल्या. ज्या जागी प्रगट झाल्या तिथे आता ' श्रीयंत्र' आहे. विधिवत महालक्ष्मीची स्थापना कोल्हापूरला झाली. आपल्या आराध्यदैवताला म्हणजे शिवलिंगाला हिने ही मस्तकी धारण केले. आहे व शिवाय, महालक्ष्मीच्या मंदिराच्या गच्चीवर श्रीशंकराचे भव्य मंदीर व शिवलिंगही आहे. तिथेच पुढे दीपमाळही आहे. कार्तिक महिन्यात, काकड आरतीचे वेळी, भक्त त्या दीपमाळेवर आवळ्यावर दिवे लावतात. अत्यंत मन प्रसन्न करणारा तो देखावा असतो. आमचे कुलदैवत ही 'महालक्ष्मीच' आहे. त्यामुळे तिची शेजारती, काकडआरती, हा दीपसोहळा, अभिषेक स्नान वगैरे समग्र दर्शनाचा लाभ मिळाला आहे. ललीता पंचमीचा उत्सवही दणक्यात होतो. पालखी निघते. अंबाबाईला तिरूपती बालाजीकडून आहेर येतो. रघुजीराजाची ही कुलदेवता त्यांनी केलेली परंपरेनुसार पुजा ही दर्शनीय असते. विस्तीर्ण सभामंडप खूप खांब जे मोजतात येत नाहीत, त्यांचे वरील नक्षीकाम, चारी दिशांचे दरवाजे, सर्व देवालयच प्रेक्षणीय आहे. त्याचे वर्णन ह्या सवाईत आहे. केल्हापुरातच श्रीसमर्थांना अंबाजी व वेणाबाई ही दोन अमुल्य रत्ने मिळाली. अंबाबाईच्या देवळात त्यांची कीर्तन सेवा चालू असताना ज्ञान, क्रिया, द्रव्यशक्तीची सर्व प्रचिती समर्थांना इथे लाभली आहे. अशी ही आदिमाया, आदिशक्ती, महालक्ष्मी सवाई –

जय जगदंब सौख्यदानी। लक्ष्मी माय जगज्ननी।
जय करवीर निवसिनी। नारायणी भगवती।।१।।

मूळमाया वैष्णवी। अनंत ब्रह्मांडे नाचवी।
नाना नाटकें लाघवी। परब्रह्मशक्ति।।२।।
शास्त्रें पुराणें वेदस्मृति। अखंड जियेचे स्तवन करिती।
जे अव्यक्त पुरूषाची शक्ति। चिद्रपिणी।।३।।
विस्तारे वाढली इच्छाशक्ति। चराचरी जियेचि व्याप्ति।
प्राणिमात्राची ज्ञानज्योती। जगन्माता।।४।।
रामदासाचा किंकर। सदा झाडी महाद्वार।
रामनाम अलंकार। कंठी हर्ष नाचतो.
।।म्हणावा जय जय राम।।

ही कोल्हापूरची अंबाबाई म्हणजे विष्णुकांता लक्ष्मी तो साऱ्यांचा पालनकर्ता, म्हणजे ही साऱ्या जगताची आई– म्हणून तिला जगत्–जननी म्हटले आहे. लक्ष्मी माता, श्री व भूदेवी स्वरूपात नित्य विष्णुसान्निध्यात असते. ती वैभवाची दात्री आहे. संपत्ती, आचरण, धनधान्य, सर्व विपुलता, दास, दासी, गाई, घोडे, हत्ती, रथासह ती वैभवदान करीत असते. धान्य स्वरूपात, शेतातील पिकांच्या रूपाने, ते सोने चांदी रूपातही आपल्याला दिसतही असते. श्रीसूक्तात ह्या वैभवाचे सुरेख वर्णन आहे. ही नारायणाची स्फूर्ति देवता, भार्या, शक्ती म्हणून तिला नारायणी म्हटले आहे.

दासगणूंनी लक्ष्मीस्तोत्रात हिचे छान वर्णन केले आहे. "विष्णूच लक्ष्मी झाला" मुळात दोघे एकच पण त्याच्या अधिष्ठान तत्वावर ही सारा कारभार करते, सृष्टीचा खेळ हिच्यामुळेच दिसतो. हिच्याशिवाय म्हणजे प्रकृती त्वताशिवाय त्या चैतन्य पुरूषाला आकार प्राप्त करता येत नाही. व पूजा अर्चा करायची तर साकार देवता हवी म्हणून ही त्याची मुलगी, भार्या, शक्ती, जननी ह्या रूपाने त्याला मदत करते. पण दोघे एकच आहेत. ळक्ष्मीचे वर्णन दासगणूच्या प्रासादिक शब्दातून सुंदर शब्दबद्ध झाले आहे. वाचतांनाच मनी भाव प्रगट होतो. ही परब्रह्मशक्ती, त्याची मूळ शक्ती,म्हणून तिला वैष्णवी म्हटले आहे. दुसऱ्या कडव्यात हे हे वर्णन समर्थांनी नेमके व नेटके मांडले आहे. दासगणूंनीही अशा शब्दात, तूच सगळ्या जगाचा पसारा मांडून, त्याला लीलानाटक, देहधारी बनवले आहेस असे वर्णन आहे. मुळातूनच ते स्त्रोत्र वाचनीय आहे.

तिसऱ्या कडव्यात हिला अव्यक्त पुरूषाची, चिद्रूपिणी शक्ती, म्हटले आहे. मूळ शक्तीशिवाय कुणी ही कांहीच करू शकत नाही. "धकाधकीचा मामला – कैसा घडे अशक्ताला" सारे जगत, एकाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचवायला, तितकेच सामर्थ्य, चातुर्य, कलानिपुणत्व लागते. ते सर्व ही देते. चारी वाणीला सामर्थ्य दिच्या मुळेच, त्यामुळे वेदश्रुती, स्मृति, शास्त्रे, पुराणे तयार झाली. ह्या शिवशक्तीची स्तुती गाऊ लागली पण ह्याची सत्ताच एवढी अगाध, अपार की, शेवटी शब्दही निशब्द होतात व वाचा मौनावली की, तिचे रूप अनुभवता येते. पण ते शब्दाने व्यक्त करायला, द्वैतावस्थेत येताच, ते अपुरे आहेत, हे समजते. म्हणून हिच्या सामर्थ्याशिवाय, कृपेशिवाय ते पद आकलनच होत नाही. सर्व संत तिचा पदर धरूनच, तिच्या समवेतच परब्रह्मात लीन होतात. व परब्रह्मपदी जातात.

हीच परब्रह्माची आदिशक्ती, जाणीव व चैतन्य. ज्ञानशक्तीच्या रूपाने जाणीव स्पष्ट होते. वायुस्तवनात मुळमायेची ही दोन रूपे स्पष्ट केली आहेत. इच्छाशक्तीने कल्पनेचा विस्तार व ज्ञानशक्तीने त्याची जाणीव अशी तिची दोन रूपे, तर क्रियाशक्ती, द्रव्यशक्तीच्या रूपाने तिचे व्यक्त रूप स्पष्ट दिसते. अस्ति, भाती, प्रिय रुपाने अव्यक्त, तर नामरूपाने ती व्यक्त होते. दासगणू महाराजही आपल्या लक्ष्मीस्तोत्रात हेच म्हणतात –

जया जगाचे जगाचे दिसणेपण – तेच तुझे स्वरूप पूर्ण।
नामरूपा लागून – तुझ्यावीण गती नसे।।
अस्ति, भाति, प्रिय भले – नाम रूपे कळून आले।
म्हणून आहे आगळे – नाम रूपाचे महत्व।।
ब्रह्म आणि प्रकृतीची – निवड होणे नाही साची।
गूळ आणि गोडीची – स्थिती जी तीच येथ।।

सूर्य आणि प्रभा, हे जसे वेगळे नाहीत, पण प्रभेमुळे सूर्य कळून येतो, तसेच तुझ्या ज्ञान व इच्छा शक्तीमुळे ईश

ज्ञाताला कळून येतो. तू परब्रह्माला आकाराला आणतेस, म्हणून तुझा महिमा आगळाच आहे. म्हणून तू आदिमाया, आदिशक्ती, अनादि, निर्गुण अशी अंबामाता आहेस. हाच भाव तिसऱ्या कडव्यात श्रीसमर्थांनी व्यक्त केला आहे.

अशा या अंबामातेची महती, सर्व थोर थोर संतांनी, ऋषीमुनींनी, देवदेवतानी गाईली आहे. त्या परब्रह्मरूप श्रीरामाचा महिमा अगस्ति, मुनी, प्रत्यक्ष शंकर,इंद्रादि देव सर्व जाणून आहेत. ज्यांनी श्रीरामांना अंतरी स्थान दिले, त्या शिवशंकराना तू डोक्यावर स्थान देऊन त्यांचा सन्मान केला आहेस. तुझे रूप कसे आहे?

रूप सर्वांगसुंदर – चतुर्भुज मनोहर।

शिवलिंग मस्तकावर – धारण तुवा केलेस।।

त्या थोर रामदासाचा, श्रीशंकराचा मी, एक सामान्य सेवक, इतकी लीनता, कमीपणा, श्रीसमर्थ आपल्याकडे घेऊन म्हणत आहेत, अग अंबामाता, मी एक सामान्य सेवक, तुझ्या महाद्वारी आलो आहे व तुझ्या महाद्वाराची मी सदैव झाडलोट करत राहीन. तुझा सेवक होईन. श्रीसमर्थ कोल्हापूरला आपल्या भिक्षाटणात वारंवार येत असत. त्याच वेळी त्यांना वेणाबाई, अंबाजी सारखे रत्ने मिळाली व त्यांना त्रास देणाऱ्या लोकांनाही त्यांच्या शिकवणीमुळे खूप मिळाले. त्यांचे वाईट विचार त्यांनी झाडून टाकले आहेत. समाज स्वच्छ केला आहे. महाद्वारी झाडलोट ह्या शब्दात, सेवा व स्वच्छता, समाज परिवर्तन हे अर्थही आध्याहृत आहेत. ज्या रामनामाच्या अलंकारानी आम्ही भूषित आहोत ते 'रामनाम' ह्या दोन शिष्यांनी जगवून, दाखवून, राम हा खराच 'बंधविमोचक' आहे, हे साऱ्या जगाला दाखवून दिले आहे. अशी वैभवशाली रत्ने, तुझ्या दरबारातूनच मिळाली. म्हणून आई, तुझा त्रिवार जयजयकार!

## - सवाई शेवटची –

शनिवार ते शुक्रवार पर्यंत सप्ताह–आठवडा पूर्ण होतो. प्रत्येक वाराची सवाई आहे. आता शेवटची सवाई साऱ्यांनी मिळून मोठ्याने म्हणतात. म्हणून हिला 'सवाई शेवटची' म्हटले आहे. ही म्हटली की लगेच 'जोहाराचे' पद म्हणावयाचे मग ही 'सवाया' उपासना संपन्न होते. ही सवाई हिंदी भाषेत आहे. साऱ्या भारतभर ही भाषा बोलली जाते. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा पण आहे. अखंड भारताचे हे प्रतिक आहे. सर्वांना घेऊन जाणारा आमचा सर्वसमावेशक सहिष्णु समाज आहे. सिंधू नदीच्या काठापासून म्हणजे "खैबरखिंड" ओलांडून परदेशी भारतात येतात. त्यावेळी ह्या भाषेतूनच त्यांना भारत समजतो. सिंधू वरून दिंदू, हिंदूंची भाषा हिंदी. जे हिंदी बोलतात ते सर्व हिंदूच आहेत. व त्यावरूनच हे परप्रांतीय भारताला हिंदुस्थान म्हणू लागले. आता परिस्थिती अशी आहे की, हिंदू म्हणवून घेणे, भारतातील जनतेला लाजिरवाणे वाटते. इतकी जनता इंग्रजाळलेली आहे असो. पण महाराष्ट्रात जसा भक्तीचा, श्रीरामाचा प्रसार झाला, तसा साऱ्या भारतभर त्याकाळी श्रीसमर्थ रामदासांनी केला होता. म्हणून ह्या शेवटच्या सवाईला जास्त महत्व. भारतातील सर्व मठातून ती एकाच भाषेत म्हटली जावी हा त्यामील मूळ उद्देश. आपला मान आपणच राखून घ्यायचा असतो.

मध्यंतरी एका धर्म सभेला हजर राहण्याचा योग आला. प्रख्यात वक्ते जमले होते. एकाहून एक सुंदर व्याख्याने चालू होती. दक्षिणेतील एक वक्ता शंकराचार्यांचे एक स्तोत्र, ते ही षड्चक्राबद्दल माहिती असणारे समजावून देत होते. सुरवात हिंदीतून केली, पण त्यांना शेवटी इंग्रजीचा आश्रय घ्यावाच लागला. धर्म प्रसारकच असे, मग त्या हिंदुस्थानची वाट लागणारच हे सांगायलाच नको. सांगण्याचा मुद्दा, शेवटची सवाई हिंदीतच कां म्हणायची? हे स्पष्ट करण्यासाठी आहे. सवाई अशी आहे.

श्रीसद्‌गुरुंनी जे आत्मज्ञान दिले आहे, जी विशाल दृष्टी दिली आहे, त्या दृष्टीकोनातून भाव, भक्ती, ज्ञान, समता, समबुद्धी देत देत, त्यांनी महावाक्यापर्यंतचे ज्ञान, अनुभूति दिली आहे. त्या ब्रह्मज्ञानाचे, ते दान करणाऱ्या सद्‌गुरूचे वर्णन आहे. अत्यंत श्रेष्ठ दाता म्हणजे सद्‌गुरी. ते शब्दज्ञानापासून, ब्रह्मज्ञानापर्यंत लीलया नेतात. "करी वृत्ती जो संत, तो संत जाणावा" ही त्यांचीच शिकवण आहे.

"फोडूनी शब्दाचे अंतर – वस्तू दावी निजसार" अशा सद्‌गुरूच्या स्तवनाची ही सवाई आहे. "मूढमति कहे जसवंत" ह्या शब्दावरून, ही शिवाजी महाराजांनी केलेली सवाई असावी, असे मला वाटते. श्रीसमर्थ शिवरायांना 'श्रीमंत योगी' "कै

पक्षी परमार्थी राजा" असे वाखाणत असत. श्री समर्थांनीही अनेक नावांनी काव्य केले आहे. त्याचा पाढा ही रचना असू शकते. असो सत्‌शिष्याचा निर्मळ भाव, कृतज्ञता ह्यात वर्णन केली आहे. ती ही अत्यंत लीनतेने नम्रतेने केली आहे.

– सवाई शेवटची –

साचा उपदेश देत। भली भली मति देत।
समता समबुद्धि देत। कुमतीक हरत है ।।१।।
मार्गकू दिखाव देत। भाव देत भक्ति देत।
प्रेम की प्रचीत देत। आभार भर भरत है ।।२।।
ग्यान देत ध्यान देत। आत्मकू विचार देत।
ब्रह्मकू बताय देत। ब्रह्ममय करत है ।।३।।
मूढमति कहे जसवंत। ना हे जन कछू देत।
श्रीगुरू निशिदिनी देत। की देवोहि करत है ।।४।।
।। म्हणावा जय जय राम ।।

श्रीरामानी, श्रीसमर्थावर व सद्‌गुरू श्रीसमर्थांनी त्यांच्या शिष्यावर कशी कृपा केली? ह्याचे वर्णन शब्दाने करताच येत नाही. "आता सद्‌गुरू वर्णवेना" ह्या शब्दांनीच सद्‌गुरू स्तवन सुरू होते. दासबोधात, तर अभंगामध्ये श्रीसमर्थ वर्णन करतात.

राम सद्‌गुरूंची कृपा – जेणे दाखवी स्वरूपा।।धृ।।
तो हा गुरू परब्रह्म – जेणे केले स्वयंब्रह्म।
धरा सद्‌गुरू चरण – जेणे चुकती जन्मचरण।
राम सद्‌गुरू तोचि देव – दास म्हणे धरा भाव।

श्रीसद्‌गुरूप्रति कृतज्ञता व्यक्त करताना, शब्द अपुरे पडतात. कारण त्यांनी जे दान दिले आहे, त्यायोगे शिष्य परसमाधानी, खऱ्या अर्थाने 'परम – अर्थी' परमार्थी होतो. "परमार्थी तो राज्यधारी"

हे परम–अर्थ – परम लाभ कोणी हिरावू शकत नाही. उलट ते देत राहिल्यास, त्यात वरचेवर वाढच होत राहते असे अमुल्य दान श्रीसद्‌गुरू आपल्या उपदेशातून, अनुग्रहातून शिष्याला देतात साधे दिसायला दोन अक्षरी नाम, पण "ज्याचे नाम घेसी तोचि तू आहेसी" ह्या पदापर्यंत जाण्याचा मार्ग दाखवतात. साचा उपदेश = शिष्याचे श्रेय साधून देणारा अनुग्रह, उपदेश "वाट पुसल्यावीण जाऊ नये" अशी साध्या सरळ शब्दातील शिकवण, परमार्थातील वाटचाल, सद्‌गुरूंनी दाखवलेल्या उपासनेच्या मार्गानेच करावी लागते. त्यासाठी मति–बुध्दी शुध्द ठेवावी लागते. ती शुध्दमतिही सद्‌गुरू देतात. जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोन, आपला चष्माच बदलून टाकतात. मग साधक–बाधक विचार करण्याची शक्ति अंगी येऊ लागून, सर्वामधे तेच एक तत्व भरलेले आहे, गुणानुसार कृती भिन्न भिन्न होते आहे. मग प्रसंगाला कसे सामोरे जायचे? ह्याची बुध्दीही तेच देतात व हातून अशी क्रिया होते की, त्यामुळए साऱ्यांचे कल्याण होईल. मनातून वाईट विचार निघून जातील. तो विवेकाचा भाग पकडून, तीच संधी साधून मार्गक्रमणा केली की, यश येतेच, हे श्रीसमर्थांनी अनुभवातून कृतीतून दाखवले आहे. त्यांच्या शिष्य चरित्रातूनही आपल्याला ह्याचे मार्गदर्शन होते.

मात्र त्यासाठी सद्‌गुरूवचनावर अनन्य निष्ठा, विश्वास हवा. त्या निष्ठेमुळेच देव आहे, तो माझा पाठीराखा आहे, मी एकटा नाही, तो सतत माझ्या सोबत आहे, हा विश्वास प्राप्त झाला की, भाव, भक्ति, प्रेम ह्या चढत्या पायऱ्यांची प्रचिती येते. भावामुळे देव कळतो. भाव म्हणजे देव आहे ही भावना, त्या भावनेमागे आपुलकी असते. त्या आपुलकीतूनच त्याच्याबद्दल ओढ निर्माण होते. ती ओढ म्हणजेच भक्ती. ती भक्ति दृढ झाली की तो प्रेमास्पद होतो, त्याच्यावाचून अन्य गती नाही तोच. आपले निधान ही श्रध्दा निर्माण होऊन तिथे खरे प्रेम निर्माण होते. "मनी नाही भाव अन् देवा मला पाव– देव बाजारचा भाजीपाला नाही रे" देव असा चटकन मिळणारा नाही. त्यासाठी सद्‌गुरूसारखा वाटाड्या, मार्गदर्शक हवा. त्यांनी हाती आपले बोट धरले की, मग 'चिंता' हा शब्दच नसतो. मग अखंड त्याचेच चिंतन, त्यांचा जिव्हाळा, प्रेम ह्या बद्दल

विचार येऊ लागतात. किती देतात? "घेता किती घेशील दो कराने" अशी शिष्याची अवस्था होते. कारण तो दाता, अनंत हस्ताचा कमलाकर आहे. "छप्पर फाडके वह देता है" त्याचे आभार तरी कसे मानायचे? उच्चारतानाच उर भरून येतो, कंठ सद्‌गदीत होतो, अवरूध्द होतो, वाणी अबोल होते.

सद्‌गुरूंनी किती द्यावे? ते ज्ञान म्हणजे आत्मज्ञान देतात. भौतिक ज्ञान अशाश्वत आहे. संसार मुळातच नाशिवंत आहे तो कधी ना कधी नष्ट होणारच, त्यात आसक्ती न ठेवता,तो ध्यानात न ठेवता, भगवंताला ध्यानात ठेवावे, तो भगवंत म्हणजेच आत्माराम, तो तुझ्याजवळ आहे. असे अध्यात्मज्ञान देऊन, त्या आत्मतत्वाचेही सखोल विवरण शिकवितात. जीव-शिव-आत्मा-ब्रह्म अशा चढत्या पायऱ्याचे ज्ञान केवळ त्याचे संगती मुळेच कळू लागते. त्याची जाणीव होते, नव्हे नव्हे, एक वेळ अशी येते की, शिष्यच ब्रह्ममय होऊन जातो. सोलीवसुखातून श्रीकल्याणस्वामींनी ह्याची ग्वाही दिलेली आहे. "पाया पडू जाता तेव्हा मी चि मी एकली" हा अद्वैताचा अनुभव माऊलींनी शब्दातून व्यक्त केला आहे. तो कानडा कोणालाच न कळणारा विठ्ठल साधकाला, शिष्याला केवळ सद्‌गुरूच्या 'साचा उपदेश' म्हणजे साच-सत्य, खरे-श्रेयस्कर-सद्‌गुरूच्या दृष्टीने हितकर, कारण सद्‌गुरू फक्त शिष्याचे हितच पाहतात. म्हणून 'साचा' शब्द उपदेशामागे घातला आहे.

श्रीसद्‌गुरूचा हा उपदेश शिष्याला सन्मार्गावर नेतो. मुळात शिष्य अज्ञानी, अनभिज्ञ, मूढमति, आपले हित कशात आहे? हे न कळणारा असा असला तरी, सद्‌गुरू उपदेशानी, शिष्याला कसे ज्ञान होते? ते ह्या शब्दातून व्यक्त केले आहे. हा मार्ग सद्‌गुरूचा, रात्रंदिवस, सतत, जवळ राहून दिलासा देत, धीर देत असा काही ठेवा देतात की, इतर जनाकडून ते मिळणारच नाही. हा अलभ्य लाभ आहे. तो सद्‌गुरूंनी मला दिला आहे. असा की, मी देव शोधायला निघालो होतो तो, मीच देव आहे हेमला कळले. महावाक्याचे खऱ्या अर्थाने, प्रचितीने ज्ञान झाले. सद्‌गुरू म्हणतात, तूच ते तत्व आहेस. 'तत्वमसि' शिष्याला ते उमजते. चारी अर्थांनी शब्द, वाच्य, लक्ष्य, गूढ सर्व अर्थानी त्याला ते आकलन होते व तो म्हणतो, "अहं गेले - ब्रह्म ठेले" असे हे माझे सद्‌गुरू श्रीरामरायाच्या स्वरूपात सिंहासनावर अधिष्ठित आहेत. त्यांना त्रिवार प्रणाम. त्यांचे रूप कसे आहे? ते पुढील 'जोहार' ह्या पदातून व्यक्त झाले आहे.

पुढचे पद जोहाराचे आहे. घरातला कामकरी, कष्टकरी, घरगडी, आपल्या धन्याला भेटल्यावर, खाली वाकून मुजरा करतो. त्याला जोहार म्हणतात. शिवाजीराजानी जोहार मायबाप म्हणण्याची ही पद्धत बदलून, एकमेकांना दोघांनी 'राम राम' म्हणावे अशी पद्धती सुरू केली.

मुसलमानी राज्यात 'जोहार' करावाच लागे. वरिष्ठाला केलेला तो कृतज्ञतेचा किंवा किंचित लाचारीचाही तो प्रणाम होता. प्रणाम छातीवर हात जोडून करतात. त्यामागे "तू ब्रह्म-मी ब्रह्म", माझ्यातील व तुझ्यातील ब्रह्म पदाला नमस्कार एवढा खोल अर्थ होता. 'राम राम' म्हणण्यात 'तू राम मी राम' हा भाव आहे. जोहारात मालक नोकर-वरिष्ठ-कनिष्ठ हा भाव लपलेला आहे. 'सवाया' राजदरबारी राजापुढे चाललेल्या आहेत. आमचा राजा "महाराजा श्रीरामराय" आहे म्हणून राजदरबारातील रिवाजानसार मुसलमानी पद्धतीचा कुर्निसात म्हणजे जोहार हा त्या पद्धतीला जवळकीचा आहे. राजाला प्रणाम म्हणून 'जोहार' असे हे जोहाराचे पद शेवटी घेतले जाते. ह्यात श्रीरामरायाचे अतिशय सुंदर वर्णन आहे. सर्वांनी खाली बसून आळवणीच्या सुरात हे पद म्हटले जाते. माझा राम कसा गुणसंपन्न, रूपसंपन्न आहे, ही स्तुतीही त्यात आहे.

## - जोहार -

परमसुंदर रूप शामल। इंद्रनीलकिळ कांतिकोमळ।
भयनिवारण भक्तवच्छळ। वरपराक्रम कीर्तिविमळ ।।१।।
भुवनकंटक दैत्यमारक। अमर मोचन दैन्यहारक।
दुरितनाशन पुण्यकारक। हरितसंकट दासतारक ।।२।।
विकटविषमताळछेदक। वरअनावरदैत्यभेदक।
दशमुखांतक सिरच्छेदक। ऋषिमुनीजनचित्तवेधक ।।३।।

अमरभूषण उत्तमोत्तम। भुवनपालक हा रघोत्तम।
वीरवीरांतक हा वीरोत्तम। असुरअंतक हा वरोत्तम ।।४।।
बहुतपीडकदैत्यभंजन। ऋषिमुनीजन योगिरंजन।
दूरितदानवदुष्टगंजन। अतुळकीर्तन वेस्तवेंजन ।।५।।

हे श्रीरामाचे वर्णन आहे. श्रीराम कसे आहेत? परमसुंदर त्यांच्या सौंदर्याला उपमाच देता येत नाही अनुपमेय लावण्य, सुकुमार–लावण्यसुंदर–सुकुमार–मदनाचा पुतळा. इतका कोमल, नाजूक की, शिवधनुष्य उचलण्यासाठी पुढे येत असताना सर्वांना प्रश्न पडला आहे, हा सुकुमार, कोमल तनु राजकुमार, ते अवघड धनुष्य कसे पेलेल? ह्याचे रूप कसे परमसुंदर, श्यामल वर्णाचा हा राम.

श्रीरामाचा वर्ण कसा आहे? श्यामल वर्ण–इंद्रनील मणि जसा, नीळसर असूनही तेजःपुंज असतो त्याप्रमाणे इंद्रनिलकीळकांती कोमळ असे शब्द समर्थांनी वापरले आहे. श्रीरामाचा रंग कसा? 'घनश्याम हा लावण्यखाणी' पावसाळी ढग जसे पंचमहाभूतांनी युक्त असतात त्यात आपतत्व, तेजतत्व, व्याप्ति म्हणजे आकाशतत्व, गतिमान म्हणून वायुतत्व व आकार आहे म्हणजे पृथ्वीतत्व. अशा पांच तत्वांनी भरले असूनही ते ना निराकार ना साकार, सर्वावर कृपादृष्टी करण्याचे ईश्वरासारखे सामर्थ्य त्या मेघात असते. म्हणून देवाचा रंग 'मघवर्णम्' घननीळ, घनश्याम, मनाचा मोरपिसारा त्या पाहून आपोआप फुलणारा असा आहे.

असा राजस सुकुमार श्रीराम, दिसायला कोवळा, कोमल कांतीचा वाटला, तरी महा पराक्रमी आहे. आपल्या पराक्रमाने त्याने भक्तांचे भय निवारण केले आहे. भयभीत भक्ताला तो भयमुक्त करतो. त्या पराक्रमात दुष्टांचे निर्दालन असून, त्याच्या हातून तसूभरही अनिष्ट घटना घडत नाही त्याच्या पराक्रमाची कीर्ति अत्यंत विमल–म्हणजे शुद्ध आहे. तिथे बिंदू इतकाही कलंक नाही. अत्यंत निर्मल म्हणजेच विमल. विमल=विगतः मलः यस्यसः ज्यामध्ये थोडासाही मल नाही. असा अत्यंत शुद्ध श्रीरामाची कीर्ति अशी अत्यंत शुद्ध आहे म्हणून आजही १०,००० वर्षानंतर ती गायली जात आहे.

दुसऱ्या कडव्यात, त्याला भुवनकंटक दैत्यमारक असे विशेषण लावून त्याची कीर्ति गाईली आहे. पृथ्वीवरच्या लोकांना काट्याप्रमाणे टोचणी देणाऱ्या दैत्यांचा श्रीरामानी नाश केला आहे. रावणासारखे दैत्य, दुष्ट आपल्या आचरणामुळे पृथ्वीवरील सज्ञनांना जीणेही नकोसे करत होते. त्यांना पीडा देत होते. ती पीडा, ते दुःख श्रीरामांनी अशा १४,००० राश्रसाचा वध करून, पृथ्वी निष्कंटक केली होती.

पृथ्वीवरील मानवाना पीडा देणारा रावण, अमरपुरीतील देवानाही त्याने सळो की पळो केले होते. त्यांना नजर कैदेत ठेवले होते. तिन्ही लोकी त्याची सत्ता होती. त्या अमरपुरीतील अमराचे म्हणजेच देवाचे दैन्य, त्यांची दीन अवस्था–त्यांना बंदीवासातून मुक्त करून, दूर केली. श्रीरामांनी मुळावरच घाव घातला. रावणाचा नायनाट केला, देव आपोआप बंधमुक्त झाले. अशा रीतीने माझा हा श्रीराम अमर=देवांची सुटका करणारा, त्यांचे दैन्य हरण करणारा असा 'अमरमोचन दैन्यहारक' आहे. अशा शब्दात गौरविले आहे.

त्याचे जे भक्त त्यांचे वरील दुरित – अरिष्ट–संकट, त्यांच्या समोरील अज्ञानाचा, अंधराचा मार्ग, त्यांना धीर देऊन, बुध्दी देऊन, त्यांचा वाटाड्या, दिलासा देणारा असा सखा बनून त्यांच्यावरील संकट सहज दूर झाले आहे, असे भासवून, तो आपल्या भक्ताचा तारक बनतो. व हे पुण्यदायी कृत्य करूनही, तो असे भासवतो की, माझे भक्त कसे पुण्यकारक आहेत. थोडक्यात भक्ताचा सखा होऊन, तो त्याच्या मदतीला धावून जातो. स्वतः संकटात होता तरी त्याने प्रथम सुग्रीवाचे संकट दूर केले. त्याचा रखा झाला.

पुढील कडव्यात, दुष्ट राक्षसांना केवढी मोठी बिरूदावली (जी त्यांच्या कृत्यांना पूरकच हे अशी) लावली आहे. स्वतःला भक्त म्हणवून देवाकडून 'वर' मिळवून त्या वरामुळे उद्दाम झालेला (वर अनावर दैत्य)आपल्या मूळ स्वभावानुसार, विकट, विषम, ताळ छेदक, भेदक अशी कृत्ये करत होता. भक्ताने भगवंताकडून वर मिळवून असे विपरित वर्तन करणे अयोग्यच. रावण महान शिवभक्त होता, तपस्वी होता. ज्ञानी होता, पण त्याने कैलासच उचलण्याने, पार्वतीला घेऊन जाण्याचे, शिवलिंग आत्मसात् करण्याचे प्रयत्न करून, वर देणाऱ्यालाच त्रास दिला, म्हणून इथे विकट, विषम, ताळतंत्र सोडलेला,

ताळछेदक, अशा अनावर झालेल्या त्या दशमुखी रावणाचा, श्रीरामानी शिरच्छेद केला आहे. ईश्वराने जीवाला १० इंद्रिये देऊन, त्या दशमुखांनी भगवंत स्तुती करावी, म्हणून दिली. त्याचा योग्य वापर, ऋषिमुनी–तपस्वी करत, धर्माचरण, सदाचरणाने राहात. त्यांनाच ह्या दशमुखी रावणाने उन्मत्त होऊन विनाकारण त्रास दिला, म्हणून श्रीरामांनी त्याची ही दहामुखे कापून काढली त्यांचा शिरच्छेद केला. ह्याचा अर्थ दशमुखातून होणाऱ्या अज्ञानाचे वर्तनाचा नायनाट केला. ही दहातोंडे अहंकाररूपी रावणामुळे उन्मत होतात. त्यांना हृदयस्थ रामाने वेळीच आवरले, तर ते ऋषिमुनीप्रत जातील, अन्यथा दशमुखी रावण बनायला जीवाला वेळ लागणार नाही. हा आध्यात्मिक अर्थही इथे घेता येतो."करंट्या सदेव होसी" तुला देवबनायचे आहे, दानव नाही. म्हणून श्रीराम अवतार जगता पुढे सर्व संतांनी ठेवला आहे. रावण ब्राह्मण तपस्वी कुळातला मानव, तर राम सूर्यवंशातील, रघुकुळातील मानव, दोघेही मानवच. सदाचरणाने देव बनता येते हे इथे समर्थांना सांगायचे आहे. अशा देवांचीच आपण पूजा करतो. "पूज्य पूजेसी अधिकार" माझा राम मानवतार आदर्श मानव कसा असतो? हे दाखवतो आहे. त्याने देवाचेही कार्य केले.

दानवाने देवांना कामाला लावले, बंदीत टाकले, त्या देवांचा सोडविता हा 'मानव' झाला. म्हणून त्याला अमरभूषण, उत्तमोत्तम ह्या शब्दांनी गौरवले आहे. तो देवांचाही लाडका झाला. नरामधील नरोत्तम, उत्तमोत्तम ठरला आहे. असा हा माझा श्रीराम, ह्या भुवनाचा पति आहे, ह्या भूमीचा पती आहे. हा त्रिभुवनाचा पालन कर्ता झाला. स्वर्गात देवलोक त्याला वाखाणतात, भूतलावर मानव व दानवाचा दुष्टपणा त्याने घालवला म्हणून तो पाताळतही प्रिय आहे. तिन्ही लोकांचा हा त्रौलोक्यपालक, भुवनपालक ह्या शब्दातून व्यक्त झाला आहे.

असा हा माझा परब्रह्म 'श्रीराम' मानव अवतार घेऊन, त्याने वीर पुरूष कसा असतो? हे शूरवीर रावणाचा वध करून, तो वीरांमधील उत्तम–विरोत्तम झाला आहे. (वीर वीरांतक हा विरोत्तम) ह्याने राक्षसांचा, दानवांचा नाश केला म्हणून हा असूर अंतक असून देव, दानव दोन्ही योनी, ज्यांना मायाबळ उपजतच प्राप्त असते, त्यांना ही एकाचा उध्दारकर्ता (देव) तर एकाचा नाशकर्ता (दानव) होऊन त्याने 'मानव' योनीची महती पटवून दिली आहे. म्हणून हा मानवातील उत्तम 'नरोत्तम' ह्या पदाने भूषित झाला आहे.

दैत्याकडून, बहुतपीडा सहन करून, जे ऋषिमुनी, योगी जीवनकंठत होते. त्यांची दुःखे माझ्या रामाने आपल्या पराक्रमाने ह्या खूप कष्ट देणाऱ्या, दैत्यांचा नाश करून योगी मुनी ऋषी यांना दिलासा दिला आहे. दुष्ट दानवाकडून येणारे संकट, आपल्या विमलकीर्तिने, मानव अवतार धारण करून सहज लीलेने त्याने दूर केले. आहे. मानव अवतार धारण करणे ही सुध्दा त्याची एक लीलाच.

व्यंजन–मूळाक्षरातील व्यंजने अपूर्ण असतात. स्वरामुळे त्यांना पूर्णत्व येते. तसेच 'माया' ही पण व्यंजनरूपच. ती मुळातच अपूर्ण आहे. पण तिचाच आधार घेत, तिला पूर्णरूपात भासवून हा पूर्णपुरूष ही सारी लीला खेळत असतो. 'व्यस्त – व्यंजन' मायेमधे पूर्ण रमलेला आहे, असे भासवतो. सीताविरहाच्या वेळचा रामचा शोक ही अशीच एक लीला होती. जिला प्रत्यक्ष पार्वतीपण फसली. पण ह्या पूर्णावताराने तिला ओळखून, आपले मूळ रूपाचे भान तिला दाखवले. त्या कथेसाठी 'व्यस्त – व्यंजन' 'अंतुलकीर्तन' हे शब्द आहेत.

असे हे श्रीरामाचे सुरेख वर्णन, ह्या जोहार पदातून, श्री समर्थांनी शब्दबध्द केले आहे. ह्यानंतर श्रीरामाचा जयजयकार करून हा 'सवाई' उपक्रम भाग संपन्न होतो.

"जय जय रघुवीर समर्थ"

## श्रीमत् दासबोध वाचन पध्दती

१) श्रीसमर्थ संप्रदायात दासबोधवाचनाला नित्यपाठात गणले आहे. रोज २ समासाचे वाचन करावे, हा नित्यनियम प्रत्येक रामदासी पाळतो. दासबोधवाचनाची संप्रदायाची एक पद्धत आहे. दासबोध ही श्रीसमर्थांची वाड;मयीनमूर्ति आहे, म्हणून ग्रंथाला आसन हवेच. ग्रंथ जमीनीवर कधीही ठेवू नये. तसेच त्याला वेष्ठन (कापडी–रेशमी) हवेच. त्याच भावनेने ग्रंथाला हाताळून त्याची निगा राखली पाहिजे. वाचन समाप्त होताच, ग्रंथाची आरती पण भक्तिभावाने करतात.

२) गणेश शारदाश्चैव सद्गुरू सज्जनस्तथा। आराध्यदैवतम् गुह्यम् सर्वम् मे रघुनन्दनः ।।१।। श्रीराम।।
गणेश शारदा सद्गुरू, संत, सज्जन कुळेश्वरू। सर्वही माझा रघूवीरू–सद्गुरूरूपे ।। श्रीराम।।
माझे आराध्य दैवत– परमगुह्य गुह्यातीत – गुह्यपणाची मात – न चले जेथे। श्रीराम।।

३) ग्रंथवाचनास सुरवात करताना, वरील मंगलाचरणाचे श्लोक प्रथम म्हणण्याची पद्धत आहे. श्रीसमर्थ सर्वोत्तम स्थान श्रीरामप्रभूनाच देतात. श्रीरामप्रभूनाच ते सर्व ठिकाणी पाहतात. परंपरेनुसार, गणपति, शारदा, सद्गुरू, संत, सज्जन ह्यांना प्रथम नमन करून, त्यांचे आशीर्वाद घेऊन त्यांच्या मार्गाने जाण्याचा प्रघात आहे. म्हणून सनातन धर्मात ह्या सर्वांना प्रथम वंदन करण्याची पद्धत आहे. सत्कर्माची सुरवात अशा नमनातूनच होते. श्रीसमर्थही त्याच मार्गाने जात असताना म्हणतात, हे सर्व माझ्या श्रीरामामध्येच मी पाहतो. तोच माझा गणपती, शारदा, म्हणजे बुध्दीदाता स्फूर्तिदाता, तसेच माझा सद्गुरूही तोच, साऱ्या संतसज्जनात मला तोच दिसतो. म्हणून त्या सर्व स्वरूपाचे स्मरण मला श्रीराम प्रभू वंदनातून घडते. एका रामाला नमस्कार केला की, ह्या साऱ्यांना वंदन होईल. कारण श्रीरामप्रभू हे आमचे कुलदैवतही आहेच, आराध्यदैवत, इष्टदैवतही आहेत, व शिवाय माझे सद्गुरू आहेत. प्रत्यक्ष श्रीरामजी छोट्या नारायणाला अनुग्रह दिला आहे.

श्रीसद्गुरू शिष्याला, गृह्यातील गुह्यज्ञान, म्हणजे आत्मज्ञान देतात. मुळात ते ज्ञान, रोकडे साक्षात् उघडे आहे. पण अज्ञान आवरणाने ते झाकलेले असल्यामुळे, सद्गुरू शिष्याच्या चित्रातील मल, विक्षेप, आवरण दूर करून आंत असलेले 'ज्ञान' उघडे करून देतात. श्रीसमर्थ सद्गुरू हेच ज्ञान दासबोधातून सर्वासाठी, वाचकासाठी खुले करत आहेत. त्या दासबोधाला व त्याच्या रचार्यत्याला पुढील श्लोकांनी सन्मानित करून, सादर वंदन करण्याची पध्दत आहे. तो श्लोक असा.

यो जातो मरूदंशजः क्षितितले संबोधनयन् सज्जनान्।
ग्रंथम यो रचयन् सुपुण्यजनकम् श्रीदासबोधाभिधम्।
यः कीर्व्या पठतेन सर्व विदुषाम् स्वांतापहारी सदा।
सौऽयम् मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरूः।।

श्रीमारुती रामाच्या अशांपासून पृथ्वीवर अवतीर्ण झालेले, जे माझे सद्गुरू श्रीरामदास यांनी दासबोध नामक जो ग्रंथ रचिला आहे. तो भाविकाला मुक्तिदेणारा आहे, अशी त्याची सर्वत्र कीर्ति आहे. त्याच्या श्रवण – वाचनाने माझ्या श्रीरामदास सद्गुरूंना माझा विनम्र प्रणाम असो, हा त्या श्लोकाचा थोडक्यात अर्थ आहे.

जो मारूतीरायाच्या अंशापासून जन्माला आला. त्या श्री समर्थ रामदासाना मी वंदन करतो. श्रीसमर्थाचा जन्म मारूती अंशापासून झाला. हे कल्याणस्वामीनी आपल्या आरतीतच गौरवले आहे. ते म्हणतात.–

"साक्षात शंकराचा अवतार मारूती–कलीयुगी तेचि झाली, रामदासांची मूर्ति" वर कै शंकर श्रीकृष्ण देव आपल्या आरतीत म्हणतात – मारूती अंशा सर्वेशा, जन्म तव रामनवमी दिवसा – श्रीसमर्थ चरित्रात तसा सर्वजणच उल्लेख करतात. त्या श्रीसमर्थ रामदासस्वामींनी हा ग्रंथ रचला आहे. हे ह्या ग्रंथाचे रचयिते आहेत. हा ग्रंथ बध्दचि सिध्द होती – असंख्यात मानवी ही फलश्रुती देणारा, पुण्यप्रद ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाच्या फलश्रुतीतच असे सांगितले आहे. इथे मनाला विश्रांती शांती, समाधान मिळते. कुठलाही सकामबुध्दीचा लाभ मिळेल, असे ऐहिक फल देणारा हा ग्रंथ नसून तो पारमार्थिक फळ देणारा ग्रंथ आहे. संपूर्ण अद्वैत प्रतिपादनाचा हा ग्रंथ, सर्व आश्रमातील लोकांसाठी खुला आहे. अज्ञानी ते योगी सर्व ह्या ग्रंथाचे अधिकारी आहेत. म्हणूनच हा ह्या पृथ्वीतलावर अजोड असा ग्रंथ झाला आहे. ह्याला ५ वा वेद व्यवहार असेही म्हणतात. समाजाला शिकवण देणारा असा हा त्रिकालाबाधित ग्रंथ आहे. म्हणून श्रीसमर्थ व हा ग्रंथ दोघांनाही पुनःपुनः वंदन करतो. व त्यांचा जयजयकार करतो.

पुढचा श्लोक श्रीसमर्थांना विनवणी आहे. "महाराजया सद्गुरू रामदासा" असे समर्थ शिष्य उध्दव रचित एक अष्टकच आहे. अनंतदास रामदासी हे उध्दव संप्रदायातील आहेत. त्यांच्या पुस्तकात हे संपूर्ण अष्टक आहे. दासबोध वाचायला सोपा ग्रंथ वाटला तरी, तो कळायला, समजायला अतिशय अवघड आहे. असे प.पू. हंसराज स्वामीच आपल्या संकेतकुबडी मध्ये म्हणतात. असा हा अवघड दासबोध हे श्रीरामदास...., आपणच माझ्या अंतरात वसती करून मला समजावून द्या. माझ्या अंतरी आपण असलात् की आपल्या अंतरातील जे गुह्यज्ञान आहे, ते मला आपोआपच समजेल. कारण 'अंतरी बसणे' म्हणजे एकरूप होणे. श्रीसमर्थांची भाषा साऱ्यांना समजेल अशीच आहे. आपण माझ्या सद्गुरू माऊली आई

जशी प्रेमळपणे, हळूवारपणे मुलाला घास भरवते व त्याचे पोषण करते तसेच हे गुहमज्ञान आपण मला हळूवारपणे शिकवाल. आई एका मोठ्या घासाचे, चार लहान लहान घास करून, मुलाला भरवते. श्रीसद्गुरूही हेच सांगतात– हा ग्रंथ सावकाश पहाः वीस दशक दोनशे समास–साधके पहावे. सावकाश –विवरता विशेषा विशेष कळो लागे म्हणून दोनच समास पण सतत, नित्य वाचनात संपूर्ण ग्रंथ असावा. श्रीसमर्थांची शिकवणही तशीच आहे. भराभर पारायणे करू नका–कसे? घासामागे घास घेतला. अवकाश नाही चावायला अवघा कोकणचि भरील असे वाचू नका मनन करून वाचावे म्हणून ही आपल्या चरणी हीच विनंती आहे की आपणच आपला ग्रंथ अपाल्यापरी घास भरवू मला समजावून घ्यावा. श्रीसमर्थच समजावून देणार आहेत. ही भावना असली की, तदाकारता लवकर साधेल व त्यांच्या मनातील गुह्यभाव सहज आकलन होतील. म्हणून अव्येन मनापासून श्लोक म्हणावा–

मला वाटते अंतरी त्वा वसावे। तुझ्या दासबोधासी त्वां बोधवावे।
अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा। महाराजया सद्गुरू रामदासा।।

श्रीसमर्थ ह्दयंतरी वसले की, अहं मी पणा आपोआपच जाईल अहं जाणे म्हणजेच आत्मज्ञानाची पहिली पायरी त्याचा भावार्थ हाच की अत्यंत निरासक्त, निरहंकारी होऊन वाचण्याइतपत साधकाची साधना व्हायला हवी ही ह्यातील मुख्य मेख आहे.

श्री सद्गुरूच अंतरी वसल्यावक त्याचेच अखंडध्यान लागते. त्यांचे वर्णन पुढील २ श्लोकात आहे. हे २ श्लोक गुरूगीतेतील आहेत. सद्गुरूचे स्वरूप ह्यातून स्पष्ट केले आहे. त्यातील गुह्यार्थ एवढा प्रचंड आहे की, प्रवचनकार हा एकच श्लोक महिनामहिना निरूपणासाठी घेतात. सर्वत्र सद्गुरूवर्णनासाठी हाच श्लोक म्हटला जातो.

ब्रह्मानंद–परमसुखदम् केवलम् ज्ञानमूर्तिम्।
द्वंदातीतम् गगनसदृशम् तत्वमत्सादिलक्ष्यम्।
एकम् नित्यम विमलमचलम् सर्वधिसाक्षीभूतम्।
भावातीतम् त्रिगुणरहीतम् सद्गुरूम् त् नमामि।।

सामान्य माणसालाही, त्याच्या पदार्थ निर्मितीचा आनंद, खूप वाटतो. तो ती निर्मिती साऱ्याना दाखवू पहाते. स्वतः आनंद घेतो, इतरानाही त्यात सहभागी करून घेतो. मग ज्याने हे अफाट विश्व, सहज, क्षणार्धात निर्माण केले, तेही केवळ ईच्छामात्रे, विनासायास, त्या अनंत ब्रह्माच्या निर्मात्याला केवढा आनंद होईल. त्याची गणनाच करता येत नाही. निर्मितीतील आनंद, ती निर्मित वस्तु, इतराना उपभोगासाठी, देतानाचा त्यागाचा आनंद,त्याहून जास्त. परमेश्वराने हे जग, असेच आनंदासाठीच निर्मित केले. व तो त्या जगाकडे साक्षीभावानेच पाहू लागला. त्यागातील सुखही मोठेच असते. दानामागची भावना मोठे परमसमाधान देऊन जाते. मग तो परमात्मा, तसाच असणार नां? जो सारखे देतोच आहे. तो एकटाच हे सर्व करतो आहे. व केवळ एकटे एकच परब्रह्म, हे सारे घडवत असूनही, आपल्या कृतीतूनच हे परमज्ञान साऱ्याना वाटतो आहे. असेच माझे सद्गुरू, ब्रह्मानंदाचे पुतळे, परमसुखाची खैरात करणारे परब्रह्मासारखेच केवळ, एकटे एक असून, सर्वासाठी ज्ञान देणारे प्रत्यक्ष ज्ञानमूर्तिच आहेत. हे परब्रह्मतत्व अचल, अत्यंतशुध्द, सर्वव्यापि सर्वत्र साक्षीरूपाने पाहणारे, सर्व द्वंद्वाच्या पलिकडील, सुखदुःख, भेद अभेदाच्या पलिकडील, गगनासारखे सर्वव्यापि आहेत. तेच तत्वमसि, आदि, अलक्ष्य असे एकमेव तत्व आहे ते एकम् एकटे एक नित्यम सर्वकालीन, विमलम् अत्यंतशुध्द, अचलम्–सर्वव्यापी, सर्वधी सर्वांना बुध्दी देणारे सर्वाठायी बुध्दीरूपाने वसणारे–सर्वाकडे साक्षीभावाने पाहणारे अलिप्त अकर्ता भावाने नित्य असणारे तत्व आहेत.

माझे सद्गुरूच मला ब्रह्मदेव, विष्णू–महेश रूपात येऊन जगपालनाचे कार्य करणारे, प्रत्यक्ष परब्रह्मत्वच आहेत. असे वाटते त्या सद्गुरूंना मी वंदन करतो. सद्गुरूच जीवातील स्फुल्लिंगाला जागृत करतात त्याला शिकवतात. अशा स्वरूपातील माझे जानकीपती श्रीराम हे सद्गुरू आहेत. अशा अर्थाचे पुढील दोन श्लोक आहेत.

गुरूर्ब्रह्मा, गुरूर्विष्णो गुरूदेवो महेश्वरा।
गुरूसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवेनमः।।
अनेनः प्रियताम् देवो– भगवान् जानकीपति।

श्रीरामचंद्रा पूर्वेषष् अस्माकम् कुलदैवतम्।

(श्रोता - वक्ता- श्रीरामसमर्थ)

असे हे सद्गुरू स्वरूपातील श्रीराम प्रभू आमचे पूर्वापार कुलदैवत आहे. समर्थ संप्रदायाची 'राम उपासना' च आहे. असा सर्वव्यापी श्रीराम श्रोता- वक्ता रूपाने ही तोच नटला आहे. म्हणून त्यानाही त्रिवार वंदन श्रोता-वक्ता (श्रीराम समर्थ) असे म्हणून ही वंदना पूर्ण होते.

ही प्रार्थना झाल्यावर १३ मनाचे श्लोक, म्हणून दासबोधाचे २ समास वाचतात. व २० दशक १० व्या समासातील शेवटच्या २६ ते ३७ ह्या ओव्या वाचण्याची प्रथा आहे. "जगदेश्वरे अनुक्रमे सकळ केले" तोच कर्ता ह्या भावनेने ग्रंथ वाचन समाप्त होते. ह्या नंतर मनोबोधाची - दासबोधाची आरती म्हणून पुढील ३ श्लोक म्हणतात. करूणाष्टकातील (रघुनायकामागणे हेचि आता ह्यातील) ४ था श्लोक आधी म्हणून म. श्लोकातील ३७ वा व ८७ वा श्लोक म्हणतात. ते असे -

सदासर्वदा योग तुझा घडावा-तुझे कारणी देह माझा पडावा।
नुपेक्षी मज गुणवंता अनंता - रघुनायका मागणे हेचि आता।।
सदा चक्रवाकासी मार्तंड जैसा- उडी घालतो संकटी स्वामी तैसा।
हरी भक्तिचा घाव गाजे निशाणी - नुपेक्षी कदा राम दासभिमानी।।
मुखी राम त्या काम बाधूं शकेना-गुंणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना।
हरिभक्त तो शक्त कामास मारी। जगी धन्य तो मारूती ब्रह्मचारी।।

ह्या तिन्ही श्लोकातून एकच भाव प्रगट झाला आहे. तो श्रीराम भक्तीची उपेक्षा करतच नाही. उलट संकटात वेळेवर मदत करून संकट दूर करतो. व मुख्य धारिष्ट-धैर्य - बळ देतो. या साऱ्याला उत्तम प्रमाण श्री हनुमंताचे आहे. ते अखंड रामनाम घेतात त्यामुळे त्याच्या कार्यात कोणतेच विघ्न त्रासदायक झाले नाही. त्यांनी त्यावर सहज मात केली. विषयवासना अशा भक्ताला उत्पन्नच होत नाही. सीताशोधनाचे वेळी श्रीहनुमंतानी जे काम केले. त्यातून हे स्पष्टच होते. तिन्ही श्लोकांचा सरळ अर्थ चटकन ध्यानात येतोच पण इथे हा भावार्थ आहे की, हनुमंतासारखी दास्यभक्ती महंतानी करावी श्रीरामरायााने अनुग्रह देऊन मारूती रायाच्या स्वाधीन श्रीसमर्थांना केले आहे. म्हणून हनुमंतानी त्यांचा वेळोवेळी सांभाळ केला आहे. त्याबद्दलचे श्लोक पुढे म्हणणयाची पध्दत आहे त्यात हनुमंताबद्दल कृतज्ञता आहे. हनुमंताची शक्ती व भक्ती कशी? हे दासबोधातून समजते. श्रीसमर्थांना जसे मारूतीरायानी सांभाळले, तसेच सर्व रामदासीयाना सांभाळावे, ही त्यामागील भावना आहे. ओव्या समर्पकच अशा आहेतय त्यातून श्रीराम उपासना, मारूती उपासना कां करायची? ते खोलवर रूजते. श्रीसमर्थांनी उपासनेच्या बळावरच, राष्ट्रोध्दाराचे भव्य कार्य केले. तीच प्रेरणा भक्तानाही मिळावी, अशी त्यामागे भावना आहे.

हनुमंत आमुची कुळवल्ली- राममंडपा वेली गेली - श्रीरामभक्तीने फळली।
रामदास बोले या नांवे।। आमुचे कुळी हनुमंत हनुमंत आमचे मुख्य दैवत।
तयावीण आमुचा परमार्थ- सिद्धीते न पवे सर्वथा।। साह्य आम्हासी हनुमंत।
आराध्य दैवत श्रीरघुनाथ-श्री गुरू श्रीराम समर्थ-काय उणे दासासी।।
दाता येक रघुनंदन- वरकडलंडी देईल कोण? तया सोडोन आम्ही जन।
कोणाप्रती मागावे।। म्हणौन आम्ही रामदास- श्रीरामचरणी आमुचा विश्वास।
कोसळोनी पडो हे आकाश-आणिकाची वास न पाहू।। स्वरूपसंप्रदाय
अयोध्यामठ -जानकीदेवी - श्रीरघुनाथ दैवत - मारूती उपासना नेमस्त-
वाढविला परमार्थ रामदासी।।

रामदासी संप्रदायात 'मारूती उपासना' महत्वाची आहे. भक्तीची तीच मुळवेल आहे. ह्या हनुमंतानीच आम्हाला भक्ति शिकवली म्हणून ती आमची उपासनेची मूळ कुळवल्ली तिच्या उपासनेतून आमची रामभक्ती फळाला आली, कारण राममंडपावर श्रीरामाच्या अधिष्ठानावरच ही वेल वाढली. व 'रामदास' हे फळ जगाला दिसले म्हणून प्रत्येक मठात हनुमंत उपासना होतेच तोच आमचा खरा मध्यस्थ आहे. प्रत्येक वेळी त्यानेच मदत केली आहे. समर्थचरीत्रात अशी खूप उदाहरणे आहेत. त्याच्या सहकार्यामुळेच, आम्ही आमच्या इष्ट आराध्य दैवत जो श्रीराम त्याची भक्ती करू शकलो, सगुण दशरथी

रामानेच, आम्हाला श्रीगुरूस्वरूपात, गुरूतत्व, आत्मज्ञान समजावून दिले. प्रत्यक्ष श्रीरामच आमचे सद्गुरू मग मला काय कमी आहे? त्याच्या सारख्या दाता असल्यावर, इतराजवळ आम्ही कां म्हणून मागावे? "आम्ही काय कुणाचे खातो? तो राम आम्हाला देतो." अशी श्रीरामदासाची धारणा होती. सर्वकर्ता तोच आहे ही दृढभावना इतकी पक्की होती की प्रत्यक्ष आकाश कोसळण्या इतपत संकट आले तरी आम्ही दुसऱ्याकडे मागणार नाही. आमचा स्वरूप संप्रदाय आहे. अद्वैतमत मांडत असलो, तरी सगुण उपासना, रघुनाथ उपासना सोडलेली नाही. आमचा देव, अयोध्येचा राम, म्हणून आमचा मुख्य मठ अयोध्या, सीतामाई व श्रीराम हे आमचे दैवत माऊलीच्या माध्यमातून आमची ही उपासना आम्ही वाढवतो. आहे. श्रीसमर्थांनी प्रत्येक गावी हनुमान मंदीर स्थापन करून लोकांना दिलासा दिला होता. मारूतीच का? अनुग्रह देऊन झाल्यावर श्रीरामानी छोट्या नारायणाला मारूतीरायच्या स्वाधीन केले होते. नारायणाने मनोभावे हाक द्यावी व मारूतीरायानी ती स्थिती निवारण करावी असे प्रसंग खूप आहेत. म्हणून हा श्लोक त्यासर्व प्रसंगाची आठवण देतो.

स्वधामासी जाता महाराज –हनुमंत तो ठेविला याच काता।
सदासर्वदा रामदासासी पावे – खळी गांजिता ध्यान सांडून धावे।

असे सांगत तो श्रीराम आम्हाला सर्व आपत्तीतून सोडवतो व आम्हाला सर्वसंपदा देतो, त्या लोकाभिराम श्रीरामची मी पुनः पुनः प्रार्थना करतो ह्या अर्थाचा रामरक्षेतील श्लोक म्हणतात– तो असा

आपदाम पहतीरम् दातारम् सर्व संपदाम्।
लोकभिरामम् श्रीरामम् भूर्या भूयो नम्याम्यहम्।।

पुनः पुनः वंदन करतच श्रीरामदासांनी आपली गुरू परंपरा पण पुढे स्पष्ट केली आहे. गुरूपरंपरा सांगण्याला कधीही विसरू नये. दिवसातून एकदा तरी त्याची आठवण करणे महत्वाचेच नव्हे ती नित्य स्मरणातच हवी.

नमो आदिबोधात्मरूपा परेशा– नमो हंस नारायणा निर्जरेशा।
नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रीरामा – नमो मारूती रामदासाभिरामा।।

सर्वात आधीच्या आदिरूप परमात्म्याने, परम ईश्वराने, परेशाने, हंसरूपाने ब्रह्मदेवाना ज्ञान दिले. ते हंस रूपही निर्जरेशा नेहमी तरूण कधी म्हातारे न होणारे, कधी नाश न पावणारे, चिरंतन, शाश्वत, अविनाशी अशा परेश स्वरूपातच आहे त्या निर्जरेशा, परेशारूपाने ब्रह्मदेवांना ज्ञान दिले ब्रह्मदेवांनी ते वसिष्ठांना दिले. वसिष्ठानी श्रीरामाना दिले. व श्रीरामानी, रामदासांना, मारूतीच्या समक्ष हे ज्ञान दिले. श्रीमारूतीरायानाही श्रीरामाकडूनच हे रहस्य ज्ञान आधी कळलेले होतेच. त्यांच्या स्वाधीनच श्रीरामानी श्रीरामादासाना सूपूर्द केले आहे व तशी आज्ञाही दिली आहे. हे 'स्वधामासी जाता' ह्या श्लोकातून व्यक्त झालेच आहे.

म्हणूनच ते ग्वाही देतात की, हा हनुमंत आमचा साहाय्यकारी आहे. म्हणूनच सर्व मठातून मारूतीची उपासना करण्याची पद्धत आहे. सज्ज्नगडावरही श्रीसमर्थांच्या समाधिवर मारूतीरायांच्या मूर्तिला ठेवूनच अभिषेक केला जातो. पादुकाही ठेवतात.

रामदासी संप्रदायाचा प्रचार करणारे, संप्रदाय स्विकारणारेही, मारुतीच्या मूर्तिचीच उपासना करतात. व त्याच्या माध्यमातून, त्याने दाखवलेल्या भक्तिच्या वाटेला अनुसरून, श्रीरामाचे ध्यान करतात. मारूतीरायाची दास्यभक्ती स्वीकारत, सिंहासनाधिष्ठित रामराजासमोर 'भवदैन्य देशोधडीला लाव' व प्रजाजनाना उरपूर्ण सद्‌भावना दे अशी भिक्षा मागतात. शांती–समाधान व विश्रांतीची भिक्षा मागतात. ह्या मागणीमागे विश्वव्यापिउपासना आहे. साऱ्या जगाची विश्वाची कळकळ, चिंता फक्त संत ह्दयातच असते. श्रीसमर्थांचे असे हे विशाल मागणे आहे. आम्ही सारे रामदासी, त्यांचेच अनुकरण करीत फक्त त्या रघुनाथाचे ध्यान–मन लावून करतो.इतके की ध्यानी मनी तो रामच आम्हाला, जिथे पाहू तिथे दिसावा. तो समोर सिंहासनारूढ आहे, तसेच ह्या ह्दयसिंहासनावरही आरूढ व्हावा. तो ह्दयात आला की मी व तो राम वेगळे राहणारच नाही. 'तोच मी सोऽहम' ही भावना दृढ होईल. तोच आमचे विश्रांतीस्थान. दास आणि राम एकरूपच होवोत, हीच कामना त्यामागे असते. कारण त्याचेच ठिकाणी फक्त विश्रांती शांती आहे. तीच लाभावी म्हणूनच हा शेवटचा अभंग म्हणायचा आहे.

ध्यान करू जाता– मन हरपले – सगुणी जाहले – गुणातीत ।
जेथे पाहे तेथे – राघवाचे ठाण – करी चापबाण – शोभतसे ।

राम माझे मनीं - राम माझे ध्यानी - शोभे सिंहासनी - राम माझ्या ।
रामदास म्हणे - विश्रांती मागणे - जीवीचे सांगणे - हितगुज ।।

हा अभंग म्हणत असतानाच, त्या रामरूपाचे चिंतन करत असतानाच, ज्यानी हा मार्ग दाखवला त्या सद्गुरूच्या चरणाना वंदन करणारा प्रसिद्ध श्लोक -

शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे - वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे ।
कवि वाल्मिकासारिखा मान्य ऐसा - नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ।।

म्हणतच, ही सायंउपासना (वाचनाची) संपन्न करतात.

थोडक्यात, दासबोध वाचण्यापूर्वी, समस्तामधे राम बघतच, श्री सद्गुरू विचाराशी एकरूप होण्यासाठी, त्यांना वंदन करून, प्रथम १३ मनाचे श्लोक म्हणायचे आहेत. त्यामगे हीच भावना आहे की, मनाचे श्लोकाची फलश्रुती. 'मतिमंद ते साधना योग्य होती' व त्याच्या अंगी ज्ञान वैराग्यासह भक्ती येऊ लागेल. दासबोध वाचनानंतर शेवटच्या १० ओव्यामधे, वाचनानन्तरची फलश्रुती स्पष्ट केली आहे. संसार सफल करायचा असेल, तर अंतरामधे निर्गुण, निश्चल परब्रह्म वसले पाहिजे. हीच खरी फलश्रुती आहे, तोच सर्वकर्ता आहे.

आरती नंतरच्या तीन श्लोकातूनही पुनः हेच सांगितले आहे. रामा, तुझा संयोगच नित्य राहू दे, तुझ्या कार्यातच देह झिजू दे. रामकार्यात ज्याचा देह झिजतो. त्याला राम अंतर देत नाहीत. संकट काळी त्याचे विघ्न निवारण करतात. हनुमंतानी तशी भक्ती करून दाखवली, व ते सर्वश्रेष्ठ रामदास झाले. त्यांच्या कार्याची प्रशंसा पुढील ओव्यातून करत, मारूती उपासनाच श्रीरामभक्तीची वाट दाखवते. आराध्य दैवत पूजनाने परब्रह्मापर्यंत, गुरूतत्वापर्यंत पोहोचता येते. सद्गुरूध्यानाचे सगुणातून निर्गुणतत्वाचा उलगडा ते अंतरी राहूनच करवून देतात. म्हणून शेवटचा श्लोकाने सद्गुरूंना वंदन करतच ही उपासना संपन्न होते. ज्याच्या कृपादृष्टीमुळे, मार्गदर्शनामुळे भक्ताला राममय होण्याचा मार्ग सापडतो. त्या सद्गुरूचरणी नित्य नतमस्तक होत. ही दासबोधवाचन उपासना संपन्न होते.

।। श्री सद्गुरूदेवतार्पणमस्तु।।
।। श्रीरामार्पणमस्तु।।
।। जय जय रघूवीर समर्थ ।।

श्रीराम

शिवथरघळीत शेवटच्या सवाई आधी घळीची सवाई म्हणतात. ही सवाई 'सीता' नामक समर्थ भक्ताने केलेली आहे. या सीताबाई अनंतदास रामदासी ह्यांच्या शिष्यपरंपरेतील आहेत. अनंतदासांनी रामदासी संप्रदायाचा खूपच प्रचार व प्रसार केला आहे. दासायनाचे ४ भाग व दासबोध प्रवेश नामक दासबोधावरील विवरणाचा उत्कृष्ट ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. विदर्भातील हिंगणघाट येथील गिरड गावातील हे महानसंत, उस्मानाबाद (धाराशिव)येथे त्यांनी समाधि घेतली आहे. धाराशिवला त्यांचे भव्य समाधिमंदिर आहे. त्यांच्या परंपरेतील ह्या सीताबाई आहेत. त्या वर्णन करतात -

काय वानू शिरथरग्रामी -जेथे पातले समर्थस्वामी।
स्फूरणालागी योग्यभूमी-देखोनिया स्थिरावले।।१।।
सवे लखकू योगीराज-मायबोलीला चढला साज।
निर्माण झाले ग्रंथराज-शोभे नाम दासबोध।।२।।
मनालागी केला बोध -आपला आपण घ्यावा शोध।
आवरावा कामक्रोध -दीक्षा महान बोलले।।३।।
गुरूकृपेचिने जाणे-पुण्यभूमीचे दर्शने।
उल्हासिल्या अंतकरणे - सीता वंदी पुनःपुनः।।४।।

।। म्हणावा जय जय राम।।

शिवथळघळीचा शोध कै. नानासाहेब देवांनी लावला त्यावेळी ह्या पुण्यभूमीत त्यांनी अक्षरशः लोटांगण घातले होते. आता तिथे श्रीसमर्थ व कल्याणस्वामींच्या मूर्ति रामपंचायतनासमवेत विराजमान आहेत. अत्यंत अवघड वाट, पण समर्थभक्त तिथे दर्शन घेण्यासाठी पूर्वीपासून आवर्जून जातात. ह्या शिवथरघळीचे वर्णन स्वतः श्रीसमर्थांनी "गिरीचे मस्तकी गंगा" ह्या पद्यात रेखाटले आहेच. त्यांच्या वाणीची गंगा ही अशीच धबाबा वाहिली आहे. सारा महाराष्ट्र त्या वाणीने ढवळून काढला. श्रीसमर्थ मुळातच निसर्गप्रेमी एकांतप्रिय ह्या काळातही शिवथरघळीचा निसर्ग मनाला मोह घालतो, मग समर्थकाली तर ते स्थान किती रम्य असेल.

अशा रम्य स्थळाचे पावित्र्य, त्या त्या विभूतिनी तेथे निवास केला म्हणून पूजनीय आहेच. ते पवित्र क्षेत्र म्हणून म्हटले जाते. श्री समर्थांची सज्जनगड, चाफळ, शिवथरघळ, टाकळी, जांब ही पूण्यक्षेत्रे म्हणून वाखाणली जातात. १९८४ सालापासून शिवथरघळीचा कायापालट झपाट्याने होतो आहे. सुरवातीला आदरणीय मामा गांगलानी ह्याच्या विकासाला प्राधान्य दिले. स्थळाचे पावित्र कायम रहावे म्हणून इथे स्वतः साधना केली. साधना करवूनच त्या साधनेच्या बळावर मिळालेल्या अर्थातून (वर्गणीतून) विकास घडवला. समर्थभक्त सीताबाई ही पूर्वी आपल्या गुरूसमवेत वा गुरूकृपेमुळे ह्या स्थानी आल्या असतील व ह्या पवित्र पुण्यभूमीच्या वर्णनाची ही सवाई सहज तयार झाली असेल.

श्रीसमर्थ इथे ८ वर्ष राहिले. त्या काळात दासबोधाची रचना (२०दशकी) झाली आहे. म्हणून घळीला दासबोधाचे जन्मस्थान मानतात. श्रीसमर्थांनी तो सांगितला, कल्याणानी लिहून घेतला. ह्या धर्मकार्याबरोबरच छत्रपतिसाठीचे पूरक राजकारणही श्रीसमर्थांनी गुप्तपणे केले. तो इतिहास सर्वांना माहिती आहेच. ह्या स्थानाला समर्थ 'सुंदरमठ' म्हणत असत. हे स्थानच असे रमणीय आहे की, इथे आल्यावर घरदार विसरले जाते. मन वेगळ्यातच स्थितीत जाते. आमच्या गुरू प.पू. आक्का वेलणकर म्हणत इथे 'आपान्तक' नावाचा अग्नि वास्तव्याला आहे. त्यामुळे इथे भक्ती ज्ञान वैराग्यासह प्रगट होते.

श्री दासबोध हा असाच भक्ती ज्ञान वैराग्य देणारा अद्वैत ग्रंथ आहे. वक्ता श्रीसमर्थ लेखक कल्याणस्वामी व श्रोता तेथील त्यावेळची जनता, असा हा त्रिवेणीसंगम कल्पनेनेच, मन मोहरते, मग ज्यांना अनुभव येतो, त्यांची गोष्टच वेगळी! श्री समर्थांना इथे हा ग्रंथ स्फूरला, हे ह्या जागेची देणगी आहे. म्हणून त्या म्हणतात "स्फुरणालागी योग्यभूमी"

उपनिषदे, वेद, वेदान्त, भागवत, सर्वगीता इत्यादीचा संस्कृत अभ्यास श्रीसमर्थांनी साधना काळात केलेला होताच. त्या साऱ्यांचे मंथन करून समाज प्रबोधनासाठी, त्यांनी हे दासबोधाचे 'लोणी' सर्व सामान्यांना 'प्राकृत' भाषेत सांगितले आहे. तिन्ही प्रचितीचा हा परिपाक आहे. अनुभवाचे बोल आहेत म्हणून ह्या ग्रंथाला समर्थांची वाड;मयीन मूर्ति म्हणतात.

एका वेड्या रामभक्ताने, रामदासाने, श्रीरामाचा उत्तम दास कसा व्हावे ह्याचे मार्गदर्शन ह्या दासबोधात केले आहे. एका दासाने उत्तम दास व्हावे म्हणून शिष्याला केलेला हा बोध आहे. उत्तम रामदासाची हा ग्रंथ म्हणजे घटना आहे. स्वतः त्यांनी दास्यभक्ती केली व महंताच्या शिष्यपरंपरा तयार करून, ती करवून दाखविली. कसे वागावे? हे त्रिकालाबाधित सत्य ह्या ग्रंथातून त्यांनी प्रगट केले म्हणून हा ग्रंथराज ह्या ग्रंथराजाच्या निर्माणाची ही जन्मभूमी म्हणून तिचा जयजयकार ह्या सवाईत आहे.

भक्तीला उजाळा मिळतो अशी ही जागा, इथे स्फूर्ति जागृत होते. साधकाला शक्ती मिळते असे जणू बॅटरी चार्ज करणारेच हे ठिकाण. म्हणून साधना करायला अनेक साधक इथे येतात.

मनोबोधातील, दासबोधातील मुख्य शिकवण हीच की आपला आपण शोध घ्यावा. सद्गुरूंना दोनच प्रश्न विचारावेत. मी कोण? देव कोण? सद्गुरू एकाच शब्दात उत्तर देतात. तूच देव, 'तत्वमसी' साधना करतांना षड्रिपूवर नियंत्रण येऊ लागते. तोच भाग तिसऱ्या चरणात सीताबाईनी व्यक्त केला आहे.

श्री सद्गुरूकृपेमुळे महावाक्याच्या उपदेशातील सार समर्थ भक्त सीताबाईना उमगले त्यांच्या कृपेमुळेच ही सुंदर सवाई निर्माण झाली. त्या स्थान महात्म्याला पूर्ण मान द्यावा, म्हणून ही सवाई शिवथर घळीत म्हटली जाते. इतर ठिकाणी ती म्हणत नाहीत.

सर्व तत्वांपेक्षा गुरूतत्व श्रेष्ठ कसे? हे साखरखेर्डा येथील प्रल्हाद महाराजांच्या मठात अशाच तऱ्हेने "सबसे बडा गुरू" ह्या पालुपदाने एक वेगळी सवाई म्हटली जाते. ती फक्त तिथेच म्हणतात.

दासबोधातून खऱ्या देवाचे-आत्मारामाचे दर्शन श्रीसमर्थांनी दाखविले आहे. तेही स्वतःच्या आचार-विचार-उच्चारातून खरा सेवक निष्काम असतो. त्याच्या नैष्कार्मातूनच खरी देव देश सेवा घडते. देव-देश-पूजा ह्यापेक्षा वेगळी नाही. हेच सूत्र दासबोधातून स्पष्ट होते. म्हणून ज्याला 'ग्रंथराज' म्हणतात. तोच शब्द इथे सीताबाईंनी प्रस्तुत केला आहे.

अशा ठिकाणांना पर्यटनस्थळे म्हणून प्राधान्य देण्याकडे वृत्ती वाढत आहे. पण क्षेत्री जे पावित्र्य असते ते पर्यटन स्थळी राहू शकत नाही. धर्मक्षेत्राचे पावित्र्य, अनमोल असे संस्कार जनमाणसावर करत असतात. शिवथरघळीचे मनोहर निसर्ग सौदर्य प्रार्थना करून ह्या सवाईच्या अर्थाला विराम देऊ या.

शेवटच्या सवाईनंतर जोहार म्हणून सवाया समाप्त होतात व शेवटी रामरायाचा जयजयकार करतात. तो असा

जय जय मार्तंड वंशावतंस -जय जय कैवल्यधाम।
जय जय भरताग्रज -जय जय सीतारमण।
जय जय सिंहासनाधीश्वर-जय जय सुरराजविराजित पद।
नमस्ते नमस्ते नमस्ते नमः।

'जोहार' म्हटल्यावर धन्याचा जयजयकार सेवक करतातच. श्रीराम सूर्यवंशातले, म्हणून प्रथम मार्तंडवंशावंतस उच्चारून त्यांचा जयजयकार केला आहे. मध्यान्ही तळपणाऱ्या सूर्याला 'मार्तंड' शब्द आहे. दुपारी १२ वाजता सूर्यतेज प्रखर असते. माझ्या रामाचे तेजही तसेच प्रखर आहे. प्रकाश म्हणजे ज्ञान. श्रीराम खरा ज्ञानदाता आहे. ह्यासाठी प्रथम हा जयजयकार, सूर्यवंशी श्रीरामाचा जय जयकार करून केला आहे.

हाच श्रीराम माझा परब्रह्मरूप सद्गुरू परब्रह्माइतकाच श्रेष्ठ त्याच्या नामामुळेच मला ते 'कैवल्यधाम' सर्वात श्रेष्ठ ठिकाण समजले. केवळ तोच सर्वत्र भरलेला असा अखंड अनुभव म्हणजे कैवल्य. त्याच्या व्यतिरिक्त इतर काहीच नाही. तो एकटाच हे गुह्य मला सद्गुरूकडूनच समजले त्यानेच ते मला दाखविले. मला ज्या पदी नेले. कैवल्यधाम तिथे दुजेपण नाहीच. तोच सर्वत्र म्हणून त्याचा 'जय जय कैवल्यधाम' म्हणून जयजयकार आहे. हे परब्रह्मपद भरताने तसेच सीतामाईने अनुभवले. तेही श्रीरामाचे निस्सीम भक्त होऊन अनुभवले. अद्वैत भक्तीचे दोघेही अग्रणी. १४वर्षे श्रीरामाची वनवासात पाठराखण करणारा लक्ष्मण, त्याच्याबद्दल भावाभावची जोडी कशी? 'रामलक्ष्मणासारखी' असे म्हणतात. पण भाऊ कसा असावा? तर भरतासारखा असेच म्हणतात. राम व भरत दिसायला वेगळे पण दोघांची स्थिती एकच म्हणून तिसरा जयजयकार भरताग्रज म्हणून केला आहे.

'जानकीजीवन राजाराम' जानकीचे जीवन राममयच. माझ्या हृदयात रामावाचून अन्य कोणालाही स्थान नाही. हे सिद्ध करण्यासाठी तिने दिव्य केले व ती भूमीगत झाली. भूमातेने तिला आपलेसे करून ते सिद्ध करून दाखविले. श्रीरामाशी तिचे असे ऐक्य 'सीतारमण' नामाने जयजयकार करून दाखवले आहे.

असा परब्रह्मरूप श्रीराम माझे आराध्यदैवत, माझे कुलदैवत व मुख्य म्हणजे माझे सद्गुरू आहेत. ते राजाधिराज असल्यामुळे ह्या सिंहासनावर बसले आहेत. राजाच्या आसनालाच 'सिंहासन' म्हणतात. वक्त्यासाठी व्यासपीठ इतरांना चौरंग वा पाटावर आसन म्हणून बसवतात. आता खुर्ची आली. सिंहासनाधिष्ठित श्रीरामापुढे हा भाट चारण- दरबारात श्रीरामाची स्तुती करतो आहे म्हणून सिंहासनाधीश्वर हा शब्द योजला आहे.

श्रीरामानी राज्यारोहण केले ते रावणवधानंतरच श्रीलंकेत लंकाधिपतीच्या पारिपत्यानंतर, सर्वदेव श्रीरामांची 'परब्रह्मअवतार' म्हणून स्तुती गात आहेत. देवगणांनी, सुरराजांनीसुद्धा स्तुती करून ज्याला गौरविले, त्यासाठी इथे 'सुरराजविराजितपद' शब्द योजला आहे. देवांनी त्याला सर्वश्रेष्ठ पद दिले. पण श्रीरामानी 'मी दाशरथीराम'च आहे, हे लघुपद नम्रपणे स्वीकारले आहे. एक सामान्य मानव, देवपद मिळवू शकतो, नराचा नारायण होतो हे श्रीरामांनी स्वतःच्या आचरणानी दाखवले आहे. मनुष्याने आचार-विचार-उच्चारातून हे दाखवावे म्हणूनच वरील सर्व विशेषणानी श्रीसमर्थांनी श्रीरामांना गौरवले आहे.

त्यानंतर त्रिवार वंदन केले आहे. त्रिवार वंदन सर्व त्रिपुटीतून, त्रिगुण निवारण्यासाठी, त्रिविध तापातून सुटण्यासाठी नव्हे नव्हे सर्वच जीवातून सुटका व्हावी म्हणून त्रिवारवंदन करतात.

हे त्रिवारवंदन ह्या भाट चारणाने कां केले? त्याला काय हव आहे? हा भाट साधारण नाही. विश्वकल्याणाची चिंता

करणारा आहे. तो म्हणतो आहे–

तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा ।
सदा स्वस्थ चिंचितसे गा महींद्रा ।
प्रजाधीश 'देवा' उरपूर्ण द्यावे ।
भवदैन्य हे देशोधाडी करावे ।

हे रामचंद्रा, दयाळा, तुझ्यापाशी हा भिक्षुक एवढीच भिक्षा मागतो आहे की, जगातील हे भवदैन्य दूर देशोधडीला लावून द्या. ह्या जगात हे दैन्य ठेवूच नकोस. दैन्य कोणते? दैन्य म्हणजे विचारदैन्य, आचारदैन्य, उच्चारदैन्य हे केवळ अज्ञानामुळेच येत. ते अज्ञान कृपा करून फक्त तूच दूर करू शकतो. तेही कसे? आत्मज्ञानाचे दान देवून. आत्मज्ञान फक्त सद्गुरूच देऊ शकतात. त्यांची अकारण कृपाच हे कार्य करते. तो देतो तेही भरपूर. ऊरभरला जावा इतका. त्या देण्याने छाती कौतुकाने कृतज्ञतेने प्रेमाने भरून यावी.

ह्या जगावेगळ्या भाटाला, स्वतःपुरते नकोच आहे. त्याची चिंता विश्वाची आहे. 'अवघे सुखी असावे ही वासना' आहे. साऱ्या संतांची हीच वासना असते. अगदी प्राचीन ऋषिमुनींनीही हेच मागितले आहे.

'सर्वेत्र सुखिनः सन्तु – सर्वे सन्तु निरामया ।

माउली पण हेच म्हणते –

"अवघाची संसार सुखाचा करीन – आनंदे भरीन तिन्ही लोक ।। म्हणून ह्यांचेही हेच मागणे आहे.

हे प्रजाधीशराजा, हे देवा, हे भवदैन्य देशोधडीला लाव. साऱ्यांना असा आनंद दे की, प्रेमाने साऱ्यांचा ऊर भरून येईल. तुझ्या दानतीला तोड नाहीच. स्वतःसाठी काहीच न मागणारे असे हे समर्थ–संप्रदायी महंततयार करणाऱ्या त्या विश्वचिंतकाला त्रिवार प्रणाम करून त्यांचा जयजयकार शेवटी केला आहे.

– सद्गुरू समर्थ रामदास स्वामी महाराज की जय –
– महारुद्र हनुमान की जय –
– श्रेष्ठ गंगाधर स्वामी महाराज की जय –
– जय जय रघुवीर समर्थ –

उपसंहाराचे श्लोक

उपसंहाराचे हे श्लोक २ भागात आहेत. हे सर्वात शेवटी म्हणतात. श्रीराम प्रभूशी ऐक्य जमवण्याचा उपासनेतील रोजचा अभ्यास चालू असला तरी, साधकाला, खऱ्या भक्ताला हे माहित असते की, आपला जीवभाव पूर्णपणे सुटलेला नाही तो सुटावा ही त्याची अखंड तळमळ आहे. परब्रह्म भेटीलागी जीव तळमळतो. मला केव्हा भेटशील? ही तळमळ वाटतच असते. खालील ४ श्लोकातून ती तळमळ व्यक्त झाली आहे.

सर्वोतम कै मज भेटी देशी।।
दुःखानळे मी संतप्त देही –तुजवीण रामा विश्रांती नाही।
आधार तुझा मज मी विदेशी – सर्वोत्तम कै मज भेटी देशी ।।१।।
प्रारब्ध खोटे, अभिमान आला–स्वामी समर्थासी वियोग झाला।
तेणे बहु क्षिती वाटे मनासी – सर्वोत्तम कै मज भेटी देशी ।।२।।
तुझिया वियोगे बहु वेदना रे विवेक नाही आम्हा दीना रे।
पडीला समंधु या दुर्जनासी सर्वोत्तम कै मजदेसी भेटी ।।३।।
संसार चिंता मज वाटते रे गमा प्रपंची मन जातसे रे।
संसर्ग आहे इतरा जनासी–सर्वोत्तम कै मजदेसी भेटी ।।४।।

साधकाच्या मनातील हे चिंतन आहे. स्वतःशीच झगडा चालू आहे. राममय होण्याचा प्रयत्न चालू आहे. पण त्यात

यश येत नाही. कारण जीवभाव लवकर सुटत नाही. ह्या देहाचा आसरा घेतला, देही झालो. जीवभावात आलो हे पहिले विरहाचे दुःख आहे. 'मी आत्मा आहे' हे शब्दज्ञानाने कळले आहे. पण मी जीव आहे, हा भाव सुटत नाही. मनाच्या ह्या रस्सीखेचाचा साधकाला फायदा होतो.

सामान्य माणूसही रामाचे नावं घेतो. त्याला साकडे घालतो संकटात आर्त होतो. काम होताच खुश होतो. पण साधकाला, श्री समर्थासारखी रामभेटीची ओढ, विवेक, आग्रह उत्पन्न व्हावा हा मूलभूत फरक ह्या श्लोकांचा अभ्यास करताना लक्षात घेतला पाहिजे. रात्री झोपताना साधकाने ह्या तळमळीतच, ह्या विचारातच झोपावे, म्हणून हे आत्मचिंतनाचे श्लोक, उपसंहारात घेतले आहेत.

दुःखानळे मी संतप्त देही ह्या पहिल्या चरणापासूनच चिंतन सुरू होते मुळात दुःखाचा अंकुर म्हणजेच जन्म सामान्यजीव वासनेमुळे जन्मचरण चक्रात अडकतो. ह्या देहभावात मी ह्या दुःखरूपी अग्निने होरपळून निघत आहे. द.३ स.१ मध्ये श्रीसमर्थ म्हणतात – जन्मसुखाचा विसर – जन्म चिंतेचे आगर – जन्म वासना विस्तार–विस्तारला ।।३–१–५।। आपल्या करूणाष्टकातूनही ते स्पष्ट म्हणतात–तुझिया वियोगे जीवीत्व आले. जीवाला प्राप्तीमुळे मला त्या रामाचा परब्रह्मांचा विरह सहन करावा लागतो आहे.  विरहाग्नि पोळूनच काढतो. सामान्यजीव वासनाबीजात अडकतो. त्यात अडकले नाही तर श्रीरामाचे परमधामी विश्रांची आहेच. ते समाधान प्राप्त व्हावे, हीच नरजनाची इतिकर्तव्यता आहे. पण मानवाच्या प्रारब्ध कर्मानुसार त्याला जन्म प्राप्त होतो. कर्मफळाचेही तीन प्रकार क्रियमाण, संचित–प्रारब्ध काही कर्माचे फळ लगेच प्राप्त होते. काहींचे त्याच जन्मात, पण कालांतराने प्राप्त होते. तर काही कर्माचे फळ जन्मांतरी भोगले लागते. कर्मफळे अनेक जन्मापर्यंत भोगावी लागतात. कर्म केले की, फळ भोगावेच लागते. कर्तृत्व घेतले की भोग्तृत्व भोगावेच लागते. तो भोग भोगण्यासाठीच जन्म प्राप्त होतो. प्रारब्धावशात जीव विदेशी येतो खरे तर त्याचे खरे धाम श्री भगर्वतच असते. पण प्रारब्धानुसार मी विदेशी झालो. तुझ्या शिवाय मला आधार नाही, विश्रांती नाही हे रामा मला लवकर भेट दे, असे पहिल्या कडव्यात म्हटले आहे.

२) प्रारब्ध भोगताना, वृदा अभिमानामुळे, विपरीत करणी हातून होते. कसला तरी अभिमान धरला जातो. अभिमानामुळे कर्म घडते. फळ भोगणे प्राप्त होते. जन्माला येताच अशा काही घटना घडतात. त्यावेळी सारासार विचार, सद्सद्विवेक बुध्दी कामच करीत नाही. काही वेळेला मनात नसतानाही, अविवेकाने वागले जाते. जीव प्रारब्ध भोगासाठी मृत्यू लोकात येतो, वासनेत अडकून पडतो. असा कोणता अभिमान वासनावश व्हायला लावतो. तो कसा निर्माण होतो? हे पण कळत नाही. वासनावश होणे म्हणजेच परब्रह्मस्थानापासून च्यूत होणे.जीवाला वाटते की, असे कोणते कर्म कारणीभूत झाले की, मी तुझ्यापासून दूर झालो. तुझ्या वियोगाला कारणीभूत झालो, ते प्रारब्ध मला समजत नाही. श्रीरामा, तुम्ही तर, खरे पाहता, अत्यंत निरभिमानी आहात. सारे करून कसलाच अभिमान नाही. प्रत्यक्ष सत्यस्वरूपच तुम्ही आहात. त्या सत्याचाच तुम्हाला अभिमान, त्यासाठीच सारी खटपट. "सत्याचा जो अभिमानी, तोच जाणावा निराभिमानी।।" आपण तसे– पण माझ्या बाबतीत तसे घडले नाही. मानवदेह प्राप्त झाला व भगवंतापासून दुरावलो, ह्याची खंत सारखी वाटते व तुझ्या भेटीची तळमळ लागून राहते.

३) देवा, तुझ्या धामी, तुझ्या सहवासात, शांती, विश्रांती, समाधान ह्यानी परिपूर्ण असणारे आम्ही, वासनावश होऊन, जन्म पावलो. तुझयापासून अलग झालो. ह्या मृत्युलोकी आलो. इथे आलो की, अविवेकाचे कार्य सुरू होते. ह्या मृत्युलोकी तुझ्याशिवाय सर्व आहे, पण मला त्याविषयी अजिबात ओढ नाही. विवेकाने पाहू गेले, तर इथे खोटेच वर्तन, वरवरची माया आहे. मुळात हे जग, त्या मायेचीच लीला आहे. इथे एक दिसते, इथे एक असते, दिसते दुसरेच. अशी दुहेरी भुमिका असलेल्या लोकांशी, दुर्जनाशी सतत संपर्क येतो. हे विषयाकडे, उपभोगाकडे वृत्ती वळवणारे, सारे जगत्, मला कळते आहे. त्यात गुंतू नये असे मनापासून वाटते, पण तशी क्रियाचघटत नाही. मग तुझी भेट कशी होणार?

संसारात वागतानाही, कांही लोकांशी असा कांही संपर्क येतो की, त्यावेळी सारासारविचार राहतच नाही, दुर्जन लोकांशी गाठ असते. हे दुर्जन सगे–सोयरे, आप्त, संबधी रुपाने दृश्य स्वरूपात असतातच. त्यामुळे विपरित कृत्य घडलेही जाते. अदृशरूपाने ही इंद्रिये, मनाचे न ऐकता, उपभोगासाठी, विषयसेवनासाठी, बाहेरची धाव घेतात. ही पण दुर्जनच–सोयरे–संबधी, जी अदृश्यरूपात आहेत. खरे तर मन, हे अंतःकरणातील एक सूक्ष्म इंद्रिय. त्याची सत्ता इंद्रियावर असते. भगवंताने हे मन, विवेकासाठी दिलेले आहे. त्याचा एक चांगला स्वभाव आहे, जे त्याला आवडते, ते त्याला चिकटते. ते

मन इंद्रिय संयमासाठी, इंद्रिय निग्रहासाठी, शम दमासाठी वापरायचे. अंतर्मुख करायचे ते निश्चयाकडे, बुद्धीतत्वाकडे वळवावे, एकरूप व्हावे म्हणून, एकाग्रतेकडे, चिताकडे वळवून, आपले कार्य यशस्वी व्हावे म्हणून कार्यरत ठेवावे लागते. हे एकाग्रमन म्हणजेच चित्त, भगवंतचरणी विलीन करायचे. त्यासाठी हा नरदेह लाभला आहे. चित्तात नारायण वस्ती करतो. पण आम्ही आमचे मन, प्रपंचाकडे, बाह्यजगाकडे दृश्याकडेच वळवतो. कारण हे दुर्जन–सगे–सोयरे–मला त्यांची चिंता करायला लावतात. त्यांच्या चिंतनातच मन जास्त रमते. ह्याच लोकांचा माझ्याशी सतत संपर्क, संसर्ग आहे. सहवास आहे व मुख्य मला त्यांच्याबद्दल ममत्व आहे. त्यांना मी माझे मानतो, व तुझ्यापासून दूर होतो. क्रिया घडून जाते, व मग कळते, हे सर्व निष्फळ आहे. खरे सुख रामसंयोगात आहे. पण तुझा वियोग झाला व हे सारे पदरी पडले. व मनात सारखे येते– "काये करू रे – क्रिया घडेना, काये करू रे – मन हे वळेना, तुजवीण रामा मज कंठवेना"

असे जरी असले तरी, तुझी भेट व्हावी, ही तळमळ सतत आहेच. जीवाचे खरे समाधान, जीव–शिव भेटीतच असते. जीवब्रह्म–ऐक्य हे साधणे, हेच खरे नरजन्माचे सार्थक आहे. त्यासाठीच हा नरदेह मिळाला आहे. नरदेह कां मिळाला? ह्याचेही चिंतन ह्यामुळे वाढते. इतर योनीत मुक्ति नाही, हे पटू लागते. व त्या परेशाने नरदेह देऊन माझ्यावर उपकारच केले आहेत. मला हा जन्म कां दिलास? हा विचार जाऊन ह्या देहाचे मी सार्थक करीन. तुझेच चिंतन करीन, असा विचार मनी येऊ लागतो. त्या प्रभू रामाचे आपल्यावर किती उपकार आहेत. त्याचे ऋण कसे फेडावे? हा विचार मनी घोळू लागतो. व पुढील श्लोक समुहाच्या चिंतनाकडे मन आपोआपच वळते.

।। श्रीरामाचे उपकार ।।

ह्या श्लोक समूहातून श्रीसमर्थांच्या शिकवणीचे सारच साधकाला उमगते. हा राम कसा आहे? तो कैवारी आहे, कनवाळू आहे, दाता आहे. हे पटते. समर्थाचे, साधकाचे मनोगतच ह्यातून स्पष्ट केले आहे. समर्थ म्हणतात. तुझा भक्त मी कसा उत्तीर्ण होऊ? मला कळतच नाही. माझ्या सारख्या हीन, दीन, पतिताला तू हाताशी धरलेस व कृपाळूपणे सर्व सुखे दिलीस हा दुर्लभ मानवदेह  देऊन, तू तुझे अनमोल जीवन आम्हाला दाखवलेस त्या देहाचा शेवटही चांगलाच व्हावा, अशी ह्या ५ श्लोकात प्रार्थना आहे. श्रीरामांचा मोठेपणा, औदार्य, महानता आकळणे ही अवघड, इतकी ती विशाल आहे. तुझ्यापुढे आम्ही सारे जीव क्षुद्रच! त्याची कल्पनाही करता येत नाही. मात्र तुझ्या नामामुळेच मला तुझी महती समजली. हे देवा, ते नाम मी सतत घ्यावे, हाच त्यावरील खरा उपाय आहे. हे नामच ह्या साऱ्या उपासनेचे खरे मूळ आहे. त्या नामानेच ह्या दिवसभराच्या उपासनेचा शेवट केला आहे.

पहिल्या २ श्लोकातून, भक्त, त्याची असहाय्यता, त्याची पात्रता नसतानाही, श्रीरामाने त्याजवर कृपा केली, ही कृतज्ञता व्यक्त करतो. श्रीराम सहवास, गुरूसहवास, सत्संग मिळाला तरी शिष्याला परिवर्तित व्हायला, त्याच्या गुणानुसार वेळ लागतोच मात्र त्याने, मनोभावे, गुरूसेवा, देवसेवा, संतसेवा केली की, त्याला श्रीराम श्रीगुरू सर्व सौख्य देतात. ती सुखप्राप्ती ३ व ४ श्लोक तून  व्यक्त करून, ह्या दुर्लभ देहाचा शेवटही, रामचिंतनात् त्या परमसुखातच व्हावा ही इच्छा ५ व्या श्लोकात व्यक्त केली आहे. पुढे पुनः मी कसा भवरोगी , तरी तुझा कृपांकित झालो, म्हणून तुझे नामातच दंग राहीन, म्हणून त्या गजराने, भजनाने पुढचे श्लोक पूर्ण केले आहेत. थोडक्यात रामदासी महंताने, त्या श्रीरामाचे उपकार स्मरून अखंड त्या नामातच रहावे, व नेहमी आत्मचिंतन करावे असे समर्थाचे सांगणे आहे.

।। श्रारामाचे उपकार।।

हीणाहून मी हीण, जैसा भिकारी–दिनाहून मी दीन माना विकारी।
पतितासी रे आणि हाती धरावे –समर्था, तुझे काम उतीर्ण व्हावे? ।।१।।

हे देवा, हे समर्था, हे रामा, इथे श्रीसमर्थ रामदासस्वामी श्रीरामाना समर्थ म्हणतात. तर आपण सारे रामदासी, त्या श्रीरामाची ओळख, ज्या श्रीरामदासानी आपल्या शिष्याना, महंताना करून दिली, त्या श्रीसदगुरू रामदास स्वामींना समर्थ म्हणतो. त्यांच्या उभयतांच्या तुलनेत, आपण सर्व हीन, दीन, दरिद्रीच आहोत. मुमुक्षु होऊ इच्छिणाऱ्याचे मनोगत, श्रीसमर्थांनी 'मुमुक्षु लक्षण' समासात विस्ताराने वर्णन केले आहे. तो म्हणतो आहे– म्हणे मी अभक्त–दुर्जन– म्हणे मी हीनाहीन हीन– म्हणे मी जन्मलो पाषाण या नांव मुमुक्षु ।।५–८–२९।।

आमचे सद्गुरू, श्रीसमर्थ (राम आणि रामदास) सर्व विद्यालंकृत आहेत. व आम्ही पापी कसे आहोत? याचे वर्णन,

कुविद्या लक्षणात श्रीसमर्थानी उत्तम केले आहे. आम्ही विद्याहीन, वैभवहीन,कुळहीन, लक्ष्मीहीन, शक्तिहीन, सामर्थ्यहीन, बळहीन, कळाहीन, मुद्राहीन, दीक्षाहीन, लावण्यहीन, लक्षणहीन अशा शारिरीक लक्षणानी हीन आहोत. तसेच युक्ति, बुद्धी, आचार, विचार, क्रिया, सत्व, भक्ति, भाव, ज्ञान, वैराग्य, शांती ह्या सद्‌गुणांचाही आमच्याजवळ दुष्काळ म्हणून सर्वतोपरी भिकारीच आहोत. हे सद्‌गुण नाहीत म्हणून आम्ही दःख करून घेत, आम्ही विकाराच्या स्वाधीन होतो. व ते षड्विकार आमच्यावर सत्ता गाजवून आम्हास विकारी बनवतात. मग आम्ही कामी, क्रोधी, लोभी, मत्सरी, मदांध मोही होतो. त्या अवस्थेतही आमची दैन्यावस्था प्रगटच होते. तू हृदयात असलास, तरी तुला विसरून जाऊन तुझ्यापासून दूर होतो. म्हणजे अंतर्यामी तू वसत असलास, तरी तुझा विसर पडून, आपल्या अहंभावातच गर्क होऊन, आपले पतन आम्हीच घडवून आणून, आम्ही पतित होतो. पण तू पतीतपावन आहेस. असे खोल गर्तेत आम्ही पडलो तरी तू आम्हाला आधार देतोस, त्यातून वर काढतोस. मग तुझ्या या उपकाराची उतराई आम्ही कशी करणार?

२) जनी भक्ती नाही-मनी भाव नाही। मला युक्ती ना बुद्धी कांहीच नाही।
कृपाळूपणे राज्य रंकासी द्यावे। समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे ।।२।।

तुझ्या भक्तीच्या मार्गाला लागलो, हे खरे. पण खरी भक्ती, भाव काय असतो? ते मला माहिती नाही. चित्तशुद्धी झाल्यावर खऱ्या भक्तीला सुरवात होते. ते चित्त कसे निर्मळ करायचे? ह्याचे ज्ञान युक्ति माहिती नसल्यामुळे, बुद्धी तिकडे वळतच नाही. पण तुझी माझ्यावर अकारण कृपा झाली, तू मला हाती धरलेस, ह्या मार्गाला वळवलेस. ज्या मार्गाने संत, सज्जन जातात, तो राजमार्ग मला दाखवलास, त्या संत सज्जनानी तुझी महती मला सांगितली तमुळे, हे श्रीरामा, तू मला भेटलास. तुझे उपकार कसे फेडू? खरे तर, मी एक रंक, पण तू मला जणू राज्यपदी बसवलेस. सज्जनाच्या पंक्तीला नेऊन घातलेस. तुझे अगणित उपकार आहेत.

३) बहुसाल अन्याय कोट्यानुकोटी - रघुनायके घातले सर्व पोटी।
किती काय गुणासी म्या आठवावे - समर्था तुझे काय उत्तीर्ण वहावे।।

तुझी भेट झाली. तू करुणाकर, दयाळू, पतीतपावन आहेस. त्यामुळे "माझ्या अपराधांच्या राशी - भेदून गेल्या गगनासी" अशी माझी अवस्था असली तरी, तू मला आपले म्हटलेस. माझे अनंत अपराध, कोट्यानुकोटी अपराध, तू सहज पोटात घातलेस. अरे, कितीतरी प्रकारानी तू माझ्या मदतीला धावून आलास, तुझे हे अगणित गुण मी कसे वर्णन करू? पुत्राचे सहस्त्र अपराध, माता काय मानी तयाचा खेद। तेवि तू कृपाळू गोविंद। मायबाप मजलागी।। हे देवा, तूच माझा आई बाप, बंधु-सखा झालास. त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव। तुझे उपकार कसे मानू? शब्द कमी पडतात. नुसत्या आठवणीनेच मन भरून येते. भक्तिमार्गात, संतसहवासात असताना, देव भक्ताचे कशा प्रकारे रक्षण करेल? संकटात धावून येईल, सांगता येत नसते. आपण म्हणतोही, "अहो काळ आला होता, पण वेळ आली नव्हती" देवाने आमचे रक्षण केले. देव भक्तावर संकटे घालून, त्याची परीक्षाही पाहातो. पण दुसऱ्या होताने तो आतून सांभाळत असतो. कुंभार जसा मडक्याला घडवताना वरून थोपटतो, पण आतून हात देत असतो. तसाच देव रक्षण करतो. त्या देवाचे उतराई कोणत्या तऱ्हेने व्हावे कळतच नाही.

४) पुढच्या श्लोकात म्हटले आहे. देवा, तुझे उपकाराचे काय वर्णन करू? अरे, तू मला काय दिले नाहीस? सर्व प्रकारचे सौख्य मला दिलेस. माझ्या आवडी निवडी पुरवल्यास. तू मूळचाच कृपाळू आहेस. दयाळू आहेस. म्हणून एकदा भक्ताला आपले म्हटले की, त्याच्याकरता तू स्वतः कष्ट घेतोस. भक्ताला कांही कमी पडू देत नाही. आमच्या गुरू 'आक्का' म्हणायच्या, बघ माझा देव कसा आहे? जिथे जाईल ते माझे घर. स्वतःच्या घरासारखी, त्या घरात माझी सोय केली जाते. कुठेही जायला यायला मला गाडीची सोय आहे. ह्या गाड्याही जणू माझ्याच आहेत. ही सारी मंडळी माझीच. माझ्यासाठी ते सोय करतात. माझ्या सुखाची, सोईची व्यवस्था हीच मंडळी पाहतात. तुम्ही लोक, हे माझे घर, ही माझी गाडी म्हणत बसा, पण तुमच्या दृष्टीने. माझे स्वतःचे कांही नसूनही, केवळ त्या मुरलीधराच्या कृपेमुळे तो मला अगदी ऐषआरामात ठेवतो आहेच ना? त्यामागे त्यांची विशाल भावना होय. त्यांची भावना हीच, देवच त्यांच्या रुपाने मला सुख देतो. कारण ह्या ऐहिक सुखापेक्षाही, तो अंतरी आहे, ही चिरंतन सुखाची अनुभूति त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच जिथे जातील तिथे त्या आनंद उत्पन्न करू शकत होत्या. तेच वर्णन इथे आहे. हा चौथा श्लोक त्याच वर्णनाचा आहे.

समर्थे दिले सौख्य नानापरीचे – सदा सर्वदा जाणसी अंतरीचे।
लळे पाळिले तूं कृपाळू स्वभावे – समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे।।

५) शेवटच्या कडव्यात कृतज्ञतापूर्वक मागणे मागितले आहे की, हे देवा हा अनमोल नरदेह दिलास, तो भक्तिमार्गाला वळवलास, कृपवंत होऊन कृपांकितही केलेस, साऱ्या सुखाचे सोहळे दाखवलेस, ऐहीक सुखात आम्ही रमलो नाही, तुझ्या नामातच दंग राहिलो. हेच परमसुख आहे, हे पटले आहे. आता ह्या देहाचे सांडणे म्हणजे मरण ही त्याच सुख समाधानात हेऊ दे. "सुखे सोडणे ह्या देहाचे करावे" म्हणजे तुझ्या स्मरणातच मृत्यु येऊ दे, मरतांनाही तुझा विसर मला पडू देऊ नकोस. नरदेह प्राप्त झाला साधना झाली. यश ही मिळाले. तरी शेवटी, जरा, व्याधि यामुळे विस्मरण होते हा प्रकृतीचा खेळ आहे. ती "विस्मृती" मला नको आहे.
मरताना तुझे रूप डोळे भरून पाहत तुझे नाव घेतच मृत्यू यावा. " इतना तो करना स्वामी–जब प्रण तमसे निकले" ह्या प्रसिध्द गीतात, खऱ्या भक्ताचे जे मगाणे आहे. तेच प्रत्येक साधकाने मागावे. भीष्माचार्य, गोपी यांनी तेच वरदान मागितले. श्रीसमर्थांनीही ह्या श्लोकातून तीच शिकवण, साऱ्या साधकांना दिली आहे. त्यांनी ते करूनही दाखवले आहे. त्यांचे निर्याणही श्रीरामाकडे पाहातच, त्यांची आत्मज्योत, त्या राममूर्तित विलीन झाली आहे. म्हणूनच सज्जनगडावरील रामदर्शनात, श्रीसमर्थांचेही दर्शन होते. ते जागृत स्थान आहे. म्हणूनच सारेच संप्रदायी, ह्या श्लोकाला तसेच ह्या उपसंहाराच्या संपूर्ण उपासनेला अत्यंत महत्व देतात. इतरवेळी बाकीच्या उपासनेत थोडी काटछाट कारणपरत्वे होईल, पण हे म्हटलेच जाते. खरा रामदासी हा श्लोक म्हणतच झोपी जातो. तसा परिपाठच आहे. इतका हा श्लोक महत्वाचा आहे.

दीनानाथ हे ब्रीदत्वासाच केले म्हणे दास भक्तासी से उध्दरिले।
सुखे सांडणे ह्या देहयाचे करावे–समर्था तुझे काय उतीर्ण व्हावे।।

तुझे दीनानाथ हे नाव तू खऱ्या अर्थाने सार्थ केले आहेस. पतित पावन हे श्रीरामांचे ब्रीद, खास विशेषण. पतिताचा उध्दार रामनामाने झालेला आहे. अशी कितीतरी उदाहरणे आहेत. रामकाळी होती नंतरही झाली व पुढे ही होतील श्रीरामाचा नाम महीमा अगाधच आहे. ते नाम घेतच हा पंचभूतात्मक देह धरणीवर पडावा, व चैतन्य, तुझ्या तत्वात विलिन व्हावे, हीच अखेरची इच्छा तुझ्यात विलिन होण्यासाठी, तुझी साकार मूर्ति समोर हवीच. हे श्लोक म्हणत असताना, श्री समर्थांचे सारे चरीत्र सहज डोळ्यासमोर येते मुखातून खालील श्लोक सहज बाहेर येतात. श्रीसमर्थांनी आम्हाला आपलेसे केले. मी कसा होतो?

अनाथ मी हीन, दीन, दरिद्री भजन नेणे कांही।
तुजवीण मज या जगी पाहता, कोणीच नाही।
ज्ञान कळेना, ध्यान कळेना, मन वळेना देवा।
विद्या नाही, वैभव नाही, ऐसा पूर्वील ठेवा।
युक्ति असेना, बुध्दी असे ना, शांती वसेना अंगी।
रामदास म्हणे दयाळा, ऐसा मी भवरोगी।।

श्रीसमर्थ परब्रह्मरूप सद्गुरू आहेत. ते व श्रीराम भिन्न नाहीत. तरीपण जीवभावात असलेल्या प्रत्येक भक्ताने, लीनता स्वीकारून श्रीरामांची भक्ती केली तर, अनाथ असणारा तो जीव, दीनानाथ श्रीराम सनाथ करतात त्याला आपलेसे करतात श्रीराम ऐश्वर्यसंपन्न असूनही अज्ञानामुळे हीनत्व प्राप्त झालेले भक्त त्याच्या दाराशी भिक्षा मागतात. भिक्षा मागण्या इतपत अज्ञान, दैन्य, दारिद्र्य, त्यांना षड्विकारानी गांजल्यामुळे प्राप्त होते. निर्विकारी श्रीराम अशा विकारी पतिताला हाताशी धरतात, कारण पतितपावन हे त्यांचे भूषण आहे. हा दीन दरिद्री आहे तो कशाकशात दरिद्री दीन आहे, तर त्याला ज्ञान नाही, ध्यान कशाचे, कोणाचे करावे? हे कळत नाही. त्याला मनाला आवरता येत नाही, विद्या नाही, किंवा जन्मजात वैभवही नाही, ती मिळवण्याती बुध्दी नाही, युक्ति नाही, कांहीच नाही. पण तो श्रीरामाला शरण आलेला आहे. श्रीरामाशिवाय मला कोणाचा आश्रय नाही. अशी त्याची अनन्यनिष्ठा, भक्ति, विश्वास आहे. श्रीसमर्थ म्हणतात, हेच नाम मी घेतले. मी तरून गेलो. तुम्हीही तरून जाल. तो दयाळू आहे. त्यांच्या दयेला दुसरी उपमाच नाही. हे श्रीरामनामच ह्या भवरोगाचे मुख्य औषध आहे. श्री ब्रह्मचैतन्य महाराजही हेच सांगतात–

सद्गुरू राजवेद्य पूर्ण – रामनामाचे रसायन।
स्वहस्ते मम मुख पातून –केले सावध स्वरूपी।।

त्या श्रीरामानेच, श्रीसमर्थांना, हे रामरसायन पाजले, तेच पुढे सर्व रामदासी संप्रदायी पण चालवतील. श्रीराम हा उघडा मंत्र आहे. म्हणून पुढे श्रीरामाचे भजन म्हणण्याची पध्दती आहे. हा श्रीराम रघुकुल भषण असून, जानकीचा नाथ आहे. विमलमति देणारा आहे. तो दीनवत्सल आहे, भक्तवत्सल आहे. तोच ह्या भवपाशाचे तारण करणारा आहे. हे घट्ट भवपाश, तोच सोडवणारा आहे. फक्त त्याला अनन्य भावाने शरण जावे. व मनापासून त्याचे नांव घ्यावे.

खालील भजनाने सुरवात करीत, सद्गुरूचा श्रीरामाचा कल्याणाचा जयजयकार करीत ही उपासना संपन्न होते.

रामा रामा रामा रामा – रघुनंदना–रामा रघुनंदना।
रामा रामा रामा रामा – कुलभूषणा।।
रामा रामा रामा रामा – जानकीपते –रामा – जानकीपते।
रामा रामा रामा रामा – विमलमते।।
रामा रामा रामा रामा – दीनवत्सला –रामा भक्तवत्सला।
रामदास म्हणे तुझी – अगम्य लीला।।
रामा रामा रामा रामा –रामा हो जय रामा हो।
तारी तारी तारी तारी – आम्हा हो।।
तोडी तोडी तोडी तोडी – भवपाश –रामा भवपाश।
अनन्यशरण –रामी रामदास।।
राम राम राम –जप सीताभिराम –जप सीताभिराम।
राम राम राम – जप सीताभिराम।। राजा ।।
असे तीन वेळा म्हणणे.

ह्या जयजयकारात, स्मरणात, रघुनंदना, कुलभूषणा, जानकीपते विमलमते, दीनवत्सल, भक्तवत्सल ही विशेषणे वापरली आहेत. भवपाशात अडकलेल्या नरदेहाला उत्तम मार्ग मिळावा, हीच त्यामागील सदीच्छा आहे. आपल्या कुलाचा उध्दार करणारा. कुलभूषण आपली प्रतिमा असावी. गृहस्थाश्रमी असलो तर, जानकीपते श्रीरामा सारखे, एकपत्नी, व्रत करून आदर्शपति व्हावे. त्या श्रीरामासारखे भक्तवत्सल, दीनवत्सल होण्यासाठी, परोपकारी जीवन अंगिकारता आले तरी, ह्या उपासनेतून खूपच काही मिळाले ह्याचे समाधान मिळेल.

नामयोगी श्रीब्रह्मचैतन्य महाराजानीही एका प्रवचनात, ह्याचा जणू थोडक्यात सारांशच दिला आहे. त्याची इथे आठवण होते. ते म्हणतात– त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थनाकरावी की, हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. आजवर जगाचा मी अनुभव घेतला, तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही, असे भासू लागते, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाहीत. माझ्या अज्ञानाने मी आत स्वतःच्याच आड येत आहे. तरी तुझी म्हणजे पर्यायाने माझीच ओळख मला पटावी, आणि त्यात मी तुला पहावे, हीच माझ्या जीवीताची शेवटची इच्छा आहे. तुझ्या कृपेशिवाय ही इच्छा पूर्ण होणार नाही, तरी हे भगवंता, माझे मन तुझ्या चरणी राहो असे कर. ह्याशिवाय मला दुसरे कांही नको. आता मी तुझा झालो. यापुढे जे कांही होईल ती तुझीच इच्छा मानून मी राहीन. आणि तुझे नाम घेण्याचा आटोकाट प्रयत्न करेन. तू मला आपला म्हण!

सारे संत, योगी, श्रीसद्गुरू हेच सांगतात. म्हणून त्यांना वंदन. त्या वंदनानेच ही उपासना संपन्न होते.

सज्जनगड निवासी माझे रामदासमाये–माझे
रामदासमाये–रामदासमाये माझे–रामदास माये।।
श्रमहरणीनिवास माझे कल्याणमाये–माझे
कल्याणमाये, माझे कल्याणमाये ।।
शरयूतीरनिवास माझे रामचंद्र माये–रामचंद्र माये।

रामचंद्र माये-माझे-रामचंद्र माये।।
।। सीताकान्तस्मरण जय जय राम ।।
।। सद्‌गुरू समर्थ रामदास स्वामी महाराज की जय ।।
।। महारूद्र हनुमान की जय ।।
।। श्रेष्ठ गंगाधर स्वामी महाराज की जय ।।
।। जय जय रघुवीर समर्थ ।।

श्रीराम ह्रदय - स्तोत्रम्

अध्यात्मरामायणातील बालकांडातील, उमामहेश्वर संवादात्मक असे हे स्तोत्र आहे. माता पार्वतीने श्रीशंकराना 'रामतत्व' समजावून द्यावे अशी विनंती केली आहे. व भगवान शंकरांनी ते इथे समजावून दिले आहे. एकूण ५६ श्लोकांचे हे स्तोत्र आहे. त्यातील पहिल्या पांच श्लोकात श्रीरामप्रभूच्या गुणगायनाने सुरवात करून श्रीरामप्रभूचेच 'मंगलाचरण' स्मरून स्तोत्राला सुरवात झाली. श्रीशंकराचे आराध्यदैवत 'श्रीराम' आहे व व्यासांचे आराध्यदैवत 'श्रीशंकर' आहे. श्रीशंकर हे रामतत्व समजावून देणार आहेत. म्हणूनच सुरवातीलाच चार श्लोकांत रामतत्वाचे गुणगान आहे. सहाव्या श्कोत उमामहेश्वर संवादाची प्रस्तावना आहे. सातव्या श्लोकापासून ते पंधराव्या श्लोकापर्यंत माता पार्वतीची विनंती व त्यांच्या मनातील अस्पष्टशी शंका व्यक्त केली आहे. सोळाव्या श्लोकापासून श्री महादेवांचे उत्तर आहे. त्यात हनुमंताला हे रामतत्व त्यांनी विचारल्यामुळे सांगितले गेले. पहिला संवाद सीता, राम व हनुमंतामधे झाला आहे. रामाच्या आज्ञेवरून, सीतेने हे रामतत्व हनुमंताला सांगितले. म्हणून ३२ ते ४४ असे श्लोक 'सीतोवाच' असे आहेत. त्यात स्वतः श्रीरामांनी नंतर भाग घेतला आहे. व मुख्य रहस्य ४५ ते ५२ पर्यंत श्रीरामाच्या मुखातून आलेले आहे. पुढचे ५३ ते ५४ श्लोक पुन्हा श्रीमहादेव उवाच असे असून ५५ व ५६ श्लोकातून त्याची फलश्रुती सांगितली आहे. ती ही श्रीरामाच्या उक्तीप्रमाणे आहे, हे श्रीशंकरानी स्पष्ट केले आहे.

श्रीशंकरजी सदैव रामनामातच गर्क झालेले, त्यांना ध्यान ही श्रीरामाचेच आवडायचे. थोडक्यात ते राममयच झालेले आहेत. ते रामनाम श्रीशंकराना इतके कां प्रिय असावे? त्यामागील कारण माता पार्वतींना जाणून घ्यायचे आहे. पती आज्ञा म्हणून त्या ही श्रीमहादेव समवेत रामनाम घेत असतच. पण ते निर्मळ मनाने नाही. लहानशी शंका त्यांच्या मनात सतत डोकावत होती. शंका निरसन झाल्याशिवाय मन शुध्दच होत नाही. म्हणून अध्यात्मज्ञानात पहिली पायरी आहे. 'शंका समाधान' करूण घेणे. तरच निःशंक मनाने साधना होईल.

ही शंका मनी असण्याचे कारण, त्यांना त्यांच्या पूर्वजन्मातही ही शंका होती. ती आपल्या स्पष्ट शब्दात त्यांनी पती समोर व्यक्तही केली होती की ज्याचे तुम्ही नाम घेता, तो तर पत्नी विरहात किती व्याकूळ होऊन शोक करतो आहे. तो साधारण मानव आहे. त्याला तुम्ही आपले दैवत कसे मानता? श्रीशंकरानी ही त्याची लीला आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला, पण पूर्वाश्रमीच्या 'सती' ला म्हणजे आताच्या पार्वती मातांना, ते तेव्हा ही पटले नाही, अजूनही त्या निःशंक झाल्याच नाहीत. खरे तर सीतेच्या रूपात जाऊन त्यांनी श्रीरामाची परीक्षाही घेतली होती व श्रीरामांनीही त्यांना मूळ रूपात ओळखले होते. त्यावरून हे सर्व नाटक आहे हे समजायला हवे होते. पण आपल्याला मूळ रूपात श्रीरामानी कसे ओळखले? ह्या संभ्रमातच त्या परतल्या होत्या. मनी संभ्रम होताच. गुरूपत्नीचे सोंग घेतले म्हणून माता म्हणूनच श्रीशंकराचे त्यांचेशी वागणे होते. त्यातच पित्याघरी यज्ञ झाला व पतिचा अपमान सहन न होऊन, सतीने यज्ञमंडपी योगाग्निने आपला देह भस्म करून घेतला. पुन्हा तप करून श्रीशंकराशी पुढील जन्मी म्हणजे आताच्या पार्वती रूपात त्या विवाहबध्द झाल्या. जन्मांतर झाले तरी, संभ्रम कायमच असतो. पार्वती हे प्रकृतीचे रूप जीवाला संभ्रम असतोच, तो शिवच दूर करू शकतो. म्हणून शंकरपार्वती संवादातून हे 'रामह्रदय' उलगडून दाखवले आहे. अशी ही स्तोत्राची पूर्वपीठीका समजावून घेतली की, अर्थ उकलणे अजून सोपे जाईल. ह्या उद्देशाने ही प्रस्तावना करीत आहे.

भगवान श्रीव्यासांनी पहिल्याच श्लोकात श्रीरामरायांना वंदन करून, मंगलाचरणाचा हा पहिला श्लोक लिहिला आहे. जन कल्याणार्थ जो मंगल आचरण करतो, त्याचे मंगलाचरण सुरवातीला करण्याचा प्रघात आहे. संस्कृत साहित्यात हे

कटाक्षाने पाळले जाते. म्हणून पहिला श्लोक श्रीरामचंद्राच्या गुणवर्णनाचाच आहे तो असा.

यः पृथ्वीभरवारणाय दिविजैः संप्रार्थिताश्चन्मयः।
संजातः पृथिवीतले रविकुले मायामनुष्यो ऽ व्ययः।
निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद्ब्रह्मत्वमाद्य् स्थिराम्।
कीर्तिं पापहरां विधाय जगतां तं जानकीशं भजे।।१।।

तं जानकीशं भजे, त्या सीतापतीचे ती भजन करतो, अशी सुरवातीचीच प्रार्थना आहे. त्या सीतापतीचे म्हणजे कोणाचे, त्या श्रीरामाचे सारे गुणवर्णन, बाकीच्या श्लोकात आहे. ज्या परब्रह्मरूप (चिन्मयः) श्रीरामाची सर्वांनी प्रार्थना केली आहे, कशासाठी? ह्या पृथ्वीवर होणाऱ्या दुष्टांच्या कृत्यांचे पारिपत्य करून तिथे पुन्हा शांतता प्राप्त व्हावी, म्हणून सर्व देवांनी, परब्रह्मरूपाची प्रार्थना केली आहे. त्यामुळे ह्या पृथ्वीतलावर आपल्या मायेने, त्यांनी मानवरूपात, सूर्यवंशात (रविकुले)जन्म घेतला (संजातः) त्या चिन्मय अव्यय स्वरूपी असलेल्या निराकाराने, साकाररूपात, मानवदेह धारण केला. रामरूप धारण करून, त्यांनी राक्षसांना ठार करून, पृथ्वीवर निष्कंटक असे रामराज्य स्थापन केले, त्या राज्याची कीर्ति अजूनही जगभर वाखाणली जाते. उत्तम राज्याला रामराज्य म्हटले म्हटले जाते. अशी दिगंत कीर्ति प्राप्त झालेल्या त्या सीतापतीचे मी भजन करतो, म्हणजे त्याची सेवा करतो, त्याचा दास होतो. भज म्हणजे सेवा असा अर्थ आहे. सेवक नेहमीच आपल्या धन्याचे गुणगान गात असतो. 'भजन' मनोभावे होते म्हणून ते सूक्ष्मरूप आहे.

ते श्रीरामप्रभू मुळात परब्रहरूपच आहेत. त्यांच्याच सत्तेवर ह्या विश्वाची उत्पत्ती–स्थिती–लय होतो. विश्वाच्या कल्याणाचा हेतू धरूनच, ते आपल्या मायेचा आश्रय घेऊन अवतार घेतात. खरे तर अचिंत्य, आनंदरूप, अमल म्हणजे अत्यंत शुद्ध असे असल्यमुळे, त्यांचे तोंडून जे तत्व सांगितले गेले, त्या परब्रह्मस्वरूप सीतापती श्रीरामाला मी वंदन करतो. वंदन साकाराला होते. ते साकारानेच करता येते. म्हणजे येथे शरिराने कृति आहे. 'मनसा–काया–वाचा' तिन्ही स्वरूपाने भगवंताचे पूजन होते. मनाने धन, शरीराने वंदन, अर्चन व वाणीने गुणगायन. म्हणून तिसरा श्लोक वाणीचा आहे. शरीरातील मुख्य ज्ञानेंद्रियाचा उल्लेख ३ऱ्या श्लोकात आहे. अध्यात्मविद्या ऐकून, मनन, चिंतनाने सिद्ध करायची असते. २रा व ३रा श्लोक असा आहे, दुसऱ्याचा अर्थ आपण पाहिला आता तिसऱ्या श्लोकाकडे वळू यात.

विश्वोद्भवस्थितिलयादिषु हेतुमेकम्, मायाश्रयं विगतमायमचिन्त्यमूर्तिम्।
आनंदसान्द्रममलं निजबोधरूपम्, सीतापतिं विदिततत्वमहं नमामि ।।२।।
पठन्ति ये नित्यमनन्यचेतसा शृण्वन्ति चाध्यात्मिकसंज्ञितं शुभम्।
रामायणं सर्वपुराणसंमतं निर्धूतपापा हरिमेव यान्ति ते ।।३।।

ज्यांना श्रीरामाचे अध्यात्मिक रूप समजावून घ्यायचे आहे, म्हणजेच रामतत्व समजावून घ्यायचे आहे, त्यांनी अनन्यचेतसा, अत्यंत अनन्य निष्ठेने, भक्तीने हे तत्व ऐकावे, पठण करावे. कारण अत्यंत शुभ, मंगल, कल्याण करणाऱ्या श्रीरामाचे हे रामायण सर्व पापाचा नाश करून, त्यांना धूवून टाकून (निर्धूतपापा) त्या 'हरि' च्या पदापाशी नेणारे आहे. नुसते 'राम' हे दोन अक्षरी नामच हे काम करते. मग संपूर्ण रामायण ऐकले, पठण केले तर किती लाभ होईल? असा हा ग्रंथ आङे. अशी प्रस्तावना करू पुढील श्लोकात त्याच्या नित्य पठणाची फलश्रुती पण सांगत आहेत.

अध्यात्मरामायणमेव नित्यं पठेद्यदीच्छेद्भवबन्धमुक्तिम् ।
गवां सहस्त्रायुतकोटिदानात् फलं लभद्यः शृणुयात्स नित्यम् ।।४।।

जो साधक हे अध्यात्म रामायण नित्य नियमाने वाचेल, पठण करेल, तर भवबंधनातून त्याची सुटका होऊन, तो मुक्त होईल. नुसती वाचण्याची इच्छा व्हायला हे खरे तर महत् पुण्य लागेल. ज्यांना हे ऐकण्याची इच्छा होईल, त्यांना हजार गाईंच्या दानाचे फल प्राप्त होईल. गो–दान हे सर्वश्रेष्ठ दान मानले आहे. पूर्वी गोधनावरच त्या माणसाचे ऐश्वर्य मानले जाई. प्रत्येकाचे घरी गोधन असायचे. गाई–गुरे सांभाळणारा शेती–जमीनीचा मालकही असणारच. हे ओघाने आले असो.

ही रामायण कथागंगा कशी आहे? तिने तिन्ही लोक पावन केले. ती स्वर्गातही गायली जाते. मृत्यूलोकातही व दानवातही ती प्रिय आहे. शतकोटी रामायणाची वाटणी, प्रत्यक्ष शंकरांनी त्या तिघांमधे केली आहे अशी कथा आहे. राम हे देवाचे अवतार, त्यांनी बंदीवासातून सर्व देवांची सुटका केली म्हणून ते देवलोकी प्रिय, मानववेषधारी राम, आदर्श मानव

म्हणून मृत्यूलोकी मानवात प्रिय, तर दुष्प्रवृत्तीमुळे आपण आपलाच नाश करून घेऊ नये, ह्या सद्भावनेने दानवातही रामकथा प्रिय आहे. दक्षिणेकडे 'रामनवमी' पेक्षाही त्या दिवशी "सीताकल्याणम्" म्हणून रामनवमी साजरी केली जाते.

अशी ही 'पुरारिगिरिसंभूता' म्हणजे पुरातन काळापासून चालत आलेली, श्रीरामाच्या गुणगायनाने, पराक्रमाने संपन्न झालेली श्रीरामार्णवसंगता, रामकथागंगा, तिन्ही लोकांना पवित्र करणारी आहे. गंगा हिमालयात उगम पावते व फक्त उत्तर भारतात वाहून त्या प्रदेशाला पावन करते. तिच्या आंघोळ–स्नान केले, तर शरीर शुद्धी होऊन, पातकाचा नाश होतो. पण ही रामकथागंगा कुठेही अवतीर्ण होते व त्या ठिकाणी असलेल्या पतितांना पावन करते असा महिमा ५व्या श्लेकात आहे.

पुरारिगिरिसंभूता श्रीरामार्णवसंगता।
अध्यात्मरामगंगेय पुनाति भुवनत्रयम् ।।५।।

असे पहिल्या पांच श्लोकात ग्रंथाचे, रामाचे, वाचणाऱ्याचे ऐकणाऱ्याचे साऱ्यांचे अभीष्टचिंतन करत प्रास्ताविक सिद्ध झाले आहे. आता मुख्य विषयाला सहाव्या श्लोकापासून सुरवात होत आहे.

कैलासाग्रे कदाचित् रविशतविमले मनिँदरे रत्नपीठे।
संविष्टं ध्याननिष्ठं त्रिनयनमभयं सेवितं सिद्धसङ्घैः।
देवी वामाङ्कसंस्था गिरिवरतनया पार्वती भक्तिनम्रा।
प्राहेदं देवमीशं सकलमलहरं वाक्यमानन्दकन्दम् ।।६।।

कैलासाच्या शिखरावर, जे कोटीसूर्यतेजासारखे, रत्नजडीत, मंदीर आहे, त्या मंदीरात, ध्यानमग्न, त्रिनयन शंकराच्या, डाव्या बाजूला, भक्तीने अत्यंत नम्र होऊन, हिमालयकन्या पार्वती, सर्व सिद्धजन, ज्याची सतत सेवा करण्याच्या इच्छेने, ज्याच्यापुढे विनम्र होऊन उभे आहेत, त्या सर्व पापाचे निर्मूलन करणाऱ्या, भगवान शंकराना, आनंददायी अशा वाक्यानी विचारती झाली. अत्यंत विनम्र भावाने पार्वतीमातेने श्रीशंकराना आपल्या मधुर वाणीने विचारले. सेवकाने अत्यंत नम्रतेने धन्यासी संभाषण करावे मृदुवचनाने काम लवकर होते. शंका तर विचारायची आहे, पण ती व्यक्तिगत नसावी. सर्वांच्या हिताची असली की, सद्गुरूंना आनंद होतो. व ते तितक्याच तत्परतेने, आनंदाने त्याचे प्रत्युत्तर देतात. म्हणून "भक्तिनम्रा गिरिवरतनया सकलमलहरम् देवमीशम्, आनंदकंदवाक्यम्, प्रादेहम्" असे शब्द योजले गेले आहेत. संस्कृतशब्दातून फार मोठा आशय व्यक्त करता येतो, म्हणून ती देववाणी, सूत्रात्मक, नेमके, नेटके, बोलणे होते.

: पार्वत्युवाच :

नमोऽ स्तु ते देव जगन्निवास सर्वात्मदृक् त्वं परमेश्वरो ऽ सि।
पृच्छामि तत्त्वं पुरूषोत्तमस्य सनातनं त्वं च सनातनो ऽ सि।।७।।

हे देवाधिदेवा, जगत्निवासा, जगन्नाथा आपण सर्वांतर्यामी निवास करणारे प्रत्यक्ष परम–ईश्वर आहात, मी आपणाला त्या पुरूषोत्तमाचे तत्व कोणते? हे विचारू इच्छिते. माझ्या दृष्टीने आपणच पुरूषोत्तम आहात, तरीपण, आपण नेहमी ज्या पुरूषोत्तमाचे चिंतन करता, त्या 'राम' तत्वाबद्दल मला उत्सुकता आहे. म्हणून विचारण्याचे धाडस करते. आपणही सनातन , पुरातन व ते ही तत्व तसेच सनातन पुरातन असणार. असे कोणते गुह्य आहे, त्या तत्वात?

गोप्यं यदत्यन्तमनन्यवाच्यं वदन्ति भक्तेषु महानुभावाः।
तदप्यहो ऽ हं तव देव भक्ता प्रियो ऽ सि मे त्वं वद यत्तु पृष्टम्।।८।।

आपण नित्य ज्याचा जप करता, त्या जपाबद्दल, मी तुमची प्रिया असूनही, तुमची भक्त आहे, म्हणून मला त्याबद्दलची माहिती सांगावी.

ज्ञानं सविज्ञानमथानुभक्ति वैराग्ययुक्तं च मितं विभास्वत्।
जानाम्यहं योषिदपि त्वदुक्तं यथा तथा ब्रूहि तरन्ति येन ।।९।।

आपण स्वतः भक्ती, ज्ञान, वैराग्य युक्तानी, विभूषित आहात, तरीपण आपण त्या तत्वाचा म्हणजेच 'राम' नामाचा सतत जप करता, त्याच ध्यानात असता, ते तत्व जाणून घेण्याची मला जिज्ञासा आहे. ज्या योगे मी ही आपणासारखी कृतार्थ

होईन. आपण सर्वांचे तारक असूनही, आपण ते नाम घेता, ते कां? हे रहस्य मला जाणून घ्यायचे आहे. असे पुढील श्लोकात सूचित करत आहे.

पृच्छामि चान्यच्च परं रहस्यं तदेव चाग्रे वद वारिजाक्ष।
श्रीरामचन्द्रे ऽ खिललोकसारे भक्तिर्दृढा नौर्भवति प्रसिद्धा ।।१०।।
भक्तिः प्रसिद्धा भवमोक्षणाय नान्यत्ततः साधनमस्ति किंचित् ।
तथापि हृत्संशयबन्धनं मे विभेत्तुमर्हस्यमलोक्तिभिस्त्वम् ।।११।।

हे (वारिजाक्ष) कमलनयना, आपणाला तर श्रीरामचंद्राशिवाय अन्य परम रहस्य श्रेष्ठ वाटत नाही, हे साऱ्या लोकांना ठाऊक आहे (अखिललोकसारे, दृढाभक्ती, भर्वात) हे प्रसिद्धच आहे. आपण सर्वश्रेष्ठ रामभक्त आहात आपली रामभक्ती प्रसिद्ध असून, ती रामभक्ती, भवबंधमोचक आहे, त्यासारखे अन्य साधन नाही, हे सर्वख्यात असले तरी माझ्या हृदयात एक संशय आहे, कदाचित माझी उक्ति थोडीशी मलीन म्हणजे अज्ञानयुक्त असेल, हे खरे आहे की,

वदन्ति रामं परमेकमाद्यं निरस्तमायागुणसंप्रवाहम्।
भजन्ति चाहर्निशमप्रमत्ताः परं पदं यान्ति तथैव सिध्दाः।।१२।।
वदन्ति केचित्परमो ऽ पि रामः स्वाविद्यया संवृतमात्मसंज्ञम्।
जानति नात्मानमतः परेण संबोधितो वेद परात्मतत्त्वम् ।।१३।।
यदि स्म जानति कुतो विलापः सीताकृते ऽ नेन कृतः परेण।
जानाति नैवं यदि केन सेव्यः समो हि सर्वैरपि जीवजातैः।।१४।।
अत्रोत्तरं किं विदितं भवद्भिस्तद्ब्रूत मे संशयभेदि वाक्यम्।।१५।।

आपणच सांगता की, जे 'राम' नामाचा उच्चार करताता, ते या माया नदीच्या दुस्तर प्रवाहातून सहज तरून जातात, कारण तेच एक आदि तत्व आहे ते 'राम' तत्व (परम् –ऐकम– आद्यम्) ते भजतात कसे? रात्रंदिन त्याचे परम मुदित होऊन भजन करतात, ते सिध्द लोक त्या परमपदापर्यन्त जातात. त्या 'राम' तत्वाचे वेदातही परमतत्व म्हणून गुणगान आहे, म्हणजे ते शास्त्रसंमतही आहे. आपण तर त्याचा ध्यासच घेतलेला आहे. त्यातच रंगून जाता, हे मी प्रत्यक्ष पाहते आहे, म्हणजे आपल्या त्याची प्रचिती आलेली आहे. परब्रह्मरूप जगणाऱ्या रामाने, सीता विरहाच्या वेळी, असा व्याकूळ विलाप शोक कां करावा? परब्रह्मरूप राम सामान्य जीवासारखा शोक कसा करू शकतो? तो तर सर्वव्यापी आहे, सर्व जीवांना सांभाळणारा आहे. परमतत्व आहे, मग असे वर्तन कसे होते? तेव्हा कृपा करून माझा संशय निवारण होईल, असे सुरेख उत्तर आपण मला सांगावे.

प्रत्यक्ष श्रीरामांनी माते, आपण एकट्याच आलात, आमचे पिताजी कुठे आहेत? असा प्रश्न सती जन्मात तिला विचारलेला आहे. तिला मूळरूपात ओळखले आहे. सीता विरहाच्या शोकप्रसंगी हे वाक्य श्रीरामाच्या तोंडी आहे. तेव्हाच खरे तर, हे मनुष्यरूपातले नाटक आहे, श्रीराम आपले परमब्रह्मरूप विसरलेले नाहीत. त्यांना त्याचे भान आहे. हे पार्वतीने समजायला हवे. इथे पार्वती ही प्रकृतीरूप जड स्वभावाची मानली आहे. पंचभूतात्मक प्रकृति जडच असते. ती अज्ञान मूलकच असते. हे अध्यात्म रामायणातून दाखवले आहे. जड+चैतन्य = सृष्टी. जीवभाव व पंचभूतात्मक प्रकृति मिळून देह झालेला आहे. चैतन्याच्या सहवासात असूनही जडाला चैतन्यस्वरूप समजत नाही. पण ते समजल्याचा भाव मात्र फसवा असतो. प्रत्येक जीवाला आपल्यातील शिवाला मी कोण? हा प्रश्न विचारायचा असतो. शिवाला माहित असते, आपण स्वतःच ते तत्व आहोत, तेच मी 'सो ऽ हं' ह्या भावातच तो नित्य असतो. देह धारण करणारा देहधारी जीव 'को ऽ हं' मी कोण? ह्याचा शोध घेत असतो. हा शिव पार्वती संवादही जीवाच्या कल्याणासाठीच आहे. त्यांच्या संवादातून जीवाला 'मी शिव आहे' हे ज्ञान मिळणार आहे. संभ्रमात असलेली सती, खजिल होऊन तशीच शंकराकडे परतली. सीतेच्या वेषात आपण रामप्रभूंची परीक्षा घेतली, पण प्रभूनी आपले मूळरूप ओळखले. थोडावेळा पुरते कां होईना 'सीतारूप' तिने धारण केले होते. संभ्रम व फजिती दोन्ही मुकाट्याने गिळावे लागले होते. त्या देहाचा त्याग झाला, पण शंकासमाधान झाले नाही. पुढील जन्मात खूप तपश्चर्येने महादेवजी पति मिळाले. पण संशय तसाच राहिला. पण आता भाषा मृदू लीनतेची आहे. थोडी सलगीचीही आहे.

पतिची रामतत्वाशी अनन्यता पाहून आदर आहे, प्रेम आहे, कुतुहलही आहे. तो मार्गही मान्य आहे. पण मनात थोडीशी सल आहे. शंका आहे. साधक संभ्रमित असला की, त्याने शंकानिरसन करून घ्यावे. तरच त्याचा पुढचा मार्ग निष्कंटक होतो. मृदु मधूर वचनाने सद्‌गुरूही प्रसन्न होतात. तसेच श्रीमहादेवजी प्रसन्न झाले आहेत व मोठ्या कौतुकाने तिचे प्रश्नाबद्दल अभिनंदन करून, सर्वांच्या हिताकरिता, तिने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देऊन, तिचे निमित्ताने साऱ्यांनाच 'रामहृदय' समजावून देणार आहेत म्हणून पुढे

: श्री महादेव उवाच :

असे लिहून व्यासांनी पुढील श्लोकरचना केल्या आहेत. १६ ते ३१ अशा श्लोकातून त्याचे विवरण स्पष्ट करीत आहेत. ते म्हणतात.

धन्या ऽ सि भक्ता ऽ सि परात्मनस्त्वं यद्–ज्ञातुमिच्छा तव रामतत्वम्
पुरा न केनाप्यभिचोदितो ऽ हं वक्तुं रहस्यं परमं निगूढम्।।१६।।

असा सुंदर प्रश्न करून, तु खरी भक्त आहेस, हे सिध्द झाले आहे. कारण तुला रामतत्व ऐकून घेण्याची प्रखर इच्छा झाली आहे. हे पाहून मला तुला ' तू धन्य आहेस' हे प्रथम म्हणावेसे वाटते आहे. हे निगूढ म्हणजे अतीशय गूढ असे रहस्य, यापूर्वी मला कुणीच विचारले नव्हते. खऱ्या भक्तालाच ही तळमळ लागते. अज्ञानी जीवाला त्याचा विचारही करावा वाटत नाही. आजपर्यंत मला असे कुणी विचारलेच नव्हते. तुझ्या प्रश्नामुळे मला पुन्हा त्या रामतत्वाबद्दल बोलताना अत्यंत आनंद होणार आहे. कारण ते तत्व खरे तर अनिर्वचनीय आहे, पण आता ते वाणीने प्रगट होणार, तुझ्या निमित्ताने ते मजकडून वदवले जाणार त्याची अशीच कृपा नित्य असू दे म्हणून प्रथम त्यांनी हृदयस्थ आत्मारामाला वंदन केले अशा अर्थाचा पुढील श्लोक आहे.

त्वया ऽ द्य भक्त्या परिनोदितो ऽ हं वक्ष्ये नमस्कृत्य रघूत्तमं ते।
रामः परात्मा प्रकृतेरनादिरानन्द एकः पुरूषोत्तमो हि।।१७।।

"वक्षे नमस्कृत्य रघूत्तमं ते" ह्या शब्दातून श्रीमद्‌व्यासांनी त्या सर्वांतर्यामी वसत असलेल्या हृदयस्थ रामाची महती गाईली आहे. प्रत्येकाच्या हृदयात वसत असलेल्या त्या आत्मातत्वाला " आत्माराम" हा शब्द आहे. जो प्रत्येक आत्म्यामध्ये रमतो तो आत्माराम तो राम कसा आहे? 'परात्मा राम' आहे. आनंदी, अनंत असूनही तो सृष्टीला आनंद देणारा असा एक मात्र पुरूषोत्तम आहे. त्याला उत्तम पुरूष म्हटले आहे. १५ व्या अध्यायात ह्या उत्तम पुरूषाचेच वर्णन भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. क्षर–अक्षर–उत्तम, जीव–शिव परमः असे तीन प्रकार स्पष्टपणे तिथे विशद झाले आहेत. स्वतःच्या वक्षस्थली हात जोडून, हृदयाला स्पर्श करून ते प्रणाम करतात. हृदयस्थ शिवाशी, हातातील अंगठ्यात वसत असलेले ब्रह्मतत्व स्पर्श करते. दोन्ही ब्रह्मरूपाचे मीलन अशा नमस्कारातून होते. ते आत्मतत्वच मग सहज बोलू लागते. ते तत्व सत् चित् आनंद रूप आहेच. तेच ह्या नभासारखे सर्वव्यापी आहे, ते सर्वांतर्यामी आहे. अंतर्बाह्य व्यापून असणारे ते आत्मतत्वच स्वतःच्याच मायेने म्हणजे स्वतःतील पहिल स्फुरण एको ऽ हं त्या अहं स्फुरणेतून ह्या जगाच्या उत्पत्तीस कारणीभूत होते. तेच उपादान कारण, तेच निमित्त कारण निर्मितीला त्रिपुटी लागते. तीन कारणे कार्य–कारण – कर्तृत्व जसे कुंभार मडके घडवितो. कुंभार कर्ता, मडके कार्य, माती कारण. इथे दोनच कारणे, उपादान–निमित्त. दोन्ही तोच. मग निर्मिती होते कां? नाही. निर्मिती करणारा, निर्माण कार्यापासून वेगळा असतो. म्हणून हे जग झालेच नाही.

"अगा जे जालेचि नाही–त्याची वार्ता पुससी काई" असा श्रीसमर्थ विचार हा सारा विवर्त–आभास आहे. हेच भासमान दृश्य त्या भगवंताने स्वमायया निर्माण केले. हे पुढील श्लोकात विशद करत आहेत.

स्वमायया कृत्स्नमिदं हि सृष्ट्वा नभोवदन्तर्बहिरास्थितो यः।
सर्वान्तरस्थो पि निगूढ आत्मा स्वमायया सृष्टमिदं विचष्टे।।१८।।
जगन्ति नित्यं परितो भ्रमन्ति यत्संनिधौ चुम्बकलोहवध्दि।
एतन्न जानन्ति विमूढचित्ताः स्वविद्यया संवृतमानसा ये।।१९।।

भगवंताच्या या भासमान मायाजालात सापडून सारे जग एका भ्रमात फिरते आहे. चुंबकाभोवती लोखंड कसे ओढले

जाते, तसे या खोट्या मायेत गुरफटून, हे जग भ्रमिष्ट होऊन फिरते आहे. ते एकाच भावनेने की मी देह आहे, मी याचा कर्ता आहे. देहबुध्दीच्या खोट्या अज्ञानात गुरफटल्यामुळे, जी अष्टधाप्रकृति परमेश्वराच्या आधीन आहे, परावलंबी आहे, नाशिवंत आहे, तिला आपली मालमत्ता समजून, तिच्यातून निर्माण झालेल्या संसार, पुत्र, कांता यांच्या साठीच कष्ट करू लागतात. संसारातच गुरफटून जातात. ते अज्ञानी या रामतत्वाला कसे जाणू शकणार? अज्ञानाचे, देहबुध्दीचे जाड आवरण त्यांच्या अंतस्थ रामतत्वावर पडले असल्यामुळे, जवळ रामतत्व असूनही ते त्याला ओळखू शकत नाहीत. पाहू शकत नाहीत. जाणू शकणार? "स्व अविद्यया, संवृतमानसा, विमूढचित्ताः ये एतत् न जानन्ति" असे स्पष्टच श्री व्यासमुनी शंकरमुखातून विदित करत आहेत. पुढचा श्लोक ते कसे संसारात गुरफटतात, ह्याचे वर्णनाचा असून, त्याचा अर्थ वर स्पष्ट झालाच आहे. तो श्लोक असा आहे.-

स्वाज्ञानमप्यात्मनि शुध्दबुध्दे स्वारोपयन्तीह निरस्तमाये।
संसारमेवानुसरन्ति ते वै पुत्रादिसक्ताः पुरूकर्म युक्ताः।।२०।।

कारण गाढ अज्ञानामुळे ते जाणूच शकत नाही. हे पुढील चरणात स्पष्ट केले आहे.

जानन्ति नैवं हृदये स्थितं वै चामीकरं कष्ठगतं यथा ऽ ज्ञा ः।

आपल्या हृदस्थ परमेश्वराला अज्ञानावरणामुळे, तो सतत असल्याची क्षणोक्षणी जाणीव देत असूनही, कळत सवरत असणारे पढतमूर्खही केवळ अभिमानाच्या, दंभ, दर्पाच्या वचनामुळे त्याला जाणू शकत नाहीत. च- आमीकरं, आमय म्हणजे व्याधि, रोग, जीवाला एकच रोग लागलेला असतो. त्याची पहिली व्याधी भूक, तदनंतर तहान सुरवातीला पोटाची भूक, मग द्रव्याची, ज्ञानाची, सत्तेची, इर्षेची ही भूक वाढतच जाते. जीव त्यात गुरफटला जातो. आजकालच्या घोटाळ्याचे वृत्ते आपण ऐकतो, वाचतो, किती पैशाची भूक वाढलेली आहे. आमय जीवन म्हणजे  व्याधिग्रस्त जीवन. व्याधी फक्त शरीराच्या नाहीत, शारिरिक व्याधी औषधाने बऱ्या होतील पण ह्या ईर्षा, असूया, सत्ता, पैसा, आधिकार ह्यांच्या व्याधी सर्वनाशच करतात. श्रीसमर्थ म्हणतात, अज्ञानाला एकवेळ सांगून शहाणे करता येईल, पण ज्याने कळत असूनही अज्ञानाचे सोंग घेतले आहे, त्यांना कसे समजावयाचे?

जे दृश्य आहे ते सर्व नाशिवंत आहे, त्याच्यामागे फार जाऊ नये. पण ही संसाराची माया पुत्र, स्त्री, संपत्तीस सत्ता ह्याच्यामागे धावायला लावते व जसे समुद्र लाटा, पाणी-सर्व एकच तत्व आहे, तरी पण दृश्य असल्यामुळे अज्ञानी ते तिन्ही रूपात आहे असे समजतो. प्रत्येकाला वेगळे अस्तित्व, त्या क्षणापुरते असले तरी ते सर्व एकच आहे. एकच व्यक्ति निरनिराळी नाती निभावत असते. त्या त्या प्रसंगी, त्या त्या नात्याच्या भूमिकेतून ती व्यक्ति वागत असते पण शेवटी ती एकच व्यक्ति आहे, ही गोष्ट स्पष्टपणे समजावून घ्यायलाच हवी.

विद्वान आपल्या कंठातून शास्त्र समजावून देत असतात. पण प्रसंग आला की विपरीत वागतात. त्यांच्या बोलण्याला त्यामुळे वजन नसते. अशा मूर्ख व पढतमूर्ख, शहाणे असून करंट्याला हे तत्व कसे समजेल? कारण अज्ञानाचे दाट आवरण त्याच्या आत्म्यावर पडलेले असते.

सूर्याची महती सांगायला पणतिने जावे. सूर्य आणि प्रकाश दोन्ही अभिन्नच आहेत. सूर्य असला की प्रकाश असणारच पण पणती म्हणते मी सूर्याचा शोध लावला. सूर्य, सूर्यकिरण, प्रकाश तिन्ही एकरूपच आहेत. सूर्यकिरणाद्वारे सूर्यबिंबाचे प्रगटन होते. सूर्याला अंधार माहितीच नसतो. सूर्य स्वतःच तेजस्वी आहे. तसेच मानवावतारात असले तरी, श्रीरामप्रभू स्वयं परब्रह्मच आहेत. त्या प्रसंगाच्या भूमिकेशी तादाम्यता दाखवण्यासाठी, त्यांनी शोक करीत असल्याचे दाखवले असले, तरी ते त्यांचे नाटक आहे, ती त्यांची लीला आहे. रामप्रभू स्वतः परब्रह्मरूप असल्यामुळे ते विशुद्ध, विज्ञानघन, ज्ञान परिपूर्णतेने पचवलेले असल्यामुळे, त्यांच्या हातून अविद्येने शोक करणे, मोहात पडणे हे कसे होईल? त्यांचे रूप शोक, मोह रहीत आहे. जगताच्या कल्याणसाठी, ऋषि-मुनींच्या रक्षणासाठी, धर्मसंस्थापनेसाठी व मुख्य दुष्टांचे निर्दालन करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला व ती भूमिका त्यांनी मानवाने कसे वागावे? ह्याचा आदर्श स्थापित करण्यासाठी यथायोग्य आचरणात आणली आहे. ते परब्रह्मरूपच आहेत हे खात्रीने सांगतो. म्हणून २१व्या श्लोकात तसे वर्णन आहे.

यथा ऽ प्रकाशो न तु विद्यते रवौ ज्योतिः स्वभावे परमेश्वरे तथा।
विशुद्धविज्ञानघने रघूत्तमे ऽ विद्या कथं स्यात्परतः परात्मनि ।।२१।।

श्रीरामचंद्राना परतः, परात्मनि, विशुद्ध, विज्ञानघन, रघुत्तम अशी खास विशेषणे देऊन त्यांचे परब्रह्मरूप स्पष्ट केले आहे व स्पष्टच विचारतात त्या रघुत्तमावर 'कथं अविद्या स्यात' त्या रामावर अविद्येचा प्रभाव कसा पडेल? अज्ञानी मनुष्य कसा वागतो ह्याचे एक दृष्टांत देऊन स्पष्टीकरण करतात,मजेशीर दृष्टांत आहे.

यथा हि चाक्ष्णा भ्रमता गृहादिकं विनष्टदृष्टेर्भ्रमतीव दृष्यते।
तथैव देहेन्द्रियकर्तुरात्मनः कृतं परे ऽ ध्यस्य जनो विमुह्यति ।।२२।।

जसा डोळस माणूस आपल्याच घरात आंधळ्या माणसासारखा हिंडूफिरू लागला की वेगळाच दिसतो. तसा, ज्या देह-इंद्रियाचा कर्ता आत्मा आहे, तो त्या देह इंद्रियाच्या मागे लागून, त्यांना अनुसरून वागू लागतो तेव्हा आंधळ्यासारखाच दिसेल. डोळे असून आंधळे. "तुका म्हणे ऐसे आंधळे हे जन, गेले विसरोन खऱ्या देवा."

आपण त्या परमात्म्याचे अंश आहोत, तीच शक्ती आपल्यात आहे, हे माहित असूनही परावलंबीत्व प्रकट करीत असमर्थता दाखवली तर तो अज्ञानीच नाही कां? इंद्रियांचा दास होऊन, विषय लोभात मानव पडतो व मोहात अडकतो. कळून सवरून असे करू नये पुढे म्हणतात -

नाहो न रात्रिः सवितुर्यथा भवेत्प्रकाशरूपाव्यभिचारतः क्वचित्।
ज्ञानं तथा ऽ ज्ञानमिदं द्वयं हरौ रामे कथं स्थास्यति शुद्धचिद्घने ।।२३।।

अग, सूर्याला ना दिवस माहिती, ना रात्र तो सतत तळपतच राहतो. नित्य प्रकाश देणे हेच त्याचे काम, पृथ्वीच्या स्वतः भोवती फिरण्यामुळे हे दिवसरात्र मापन सुरू आहे. कुठल्याना कुठल्या भागात सूर्यप्रकाश तळपत असतोच. त्या भागावरून सूर्य दिसत नाही, म्हणून त्यावेळी रात्र अशी आपली कल्पना. पण सूर्याचे असणे जसे निर्विवाद तसेच ज्ञान व अज्ञानामुळे भगवंताबद्दलचा संशय वा त्याचे निराकरण हे ज्ञानी, अज्ञानी प्रवृत्तीवर अवलंबून आहे. ज्ञानी माणसाला 'राम' परब्रह्मच आहे हे पटणार, तर अज्ञानी माणूस त्याला मानवावतार मानून त्याच्यावर माणसासारखे आरोप करणार. त्या शुद्ध चिद्घन रामप्रभू हरिवर अशी दोन रूपे कशी असतील? तो शुद्ध चिद्घनच आहे म्हणून,

तस्मात्परानन्दमये रघूत्तमे विज्ञानरूपे हि न विघते तमः।
अज्ञान साक्षिण्यरविन्दलोचने मायाश्रयत्वान्न मोहकारणाम् ।।२४।।

तस्मात्-म्हणून, त्या परमानंदमय रघूराजावर, जो अध्यात्मज्ञानाने परिपूर्ण आहे, ज्याच्यामधे ही अध्यात्मविद्या परिपूर्ण भरली आहे, त्या विज्ञानरूप रामराजावर, तम म्हणजे अविद्येचा-अज्ञानाचा पगडा कधीच बसणार नाही.म्हणून तू ही त्या अज्ञानमायेचा आश्रय घेऊन, मोहवश न होता, अज्ञानसाक्षिणी-अज्ञानाचे सावट पांघरून, हे कमललोचने, श्रीरामचंद्राकडे पाहू नकोस. मनातला संशयच काढून टाक (तो खोटा आहे). तुझा मोह जावा म्हणून,मी तुला, हनुमंत, सीता, श्रीराम ह्यांच्यात झालेला, मोक्ष मिळवून देणारा, दुर्लभ असा संवादच सांगतो व ते रहस्य तुला उलगडूनच सांगतो. असे म्हणून संवाद कसा घडला, तो प्रसंग सांगू लागले.

अत्र ते कथयिष्यामी रहस्यमपि दुर्लभम्।
सीता राममरूत्सूनुसंवादं मोक्षसाधनम् ।।२५।।

कृत, त्रेता, द्वापार, कली ही चतुर्युगे पुन्हा पुन्हा होत असतात. चार युगाचा एक असे असे हजार फेरे झाले की, ब्रह्मदेवाचा एक दिवस, ब्रह्मदेवाची रात्र म्हणजे कल्पांत दिवसाला कल्प म्हणतात. कालगणनेच्या कल्पनेनुसार सांगत आहेत की, ज्या पूर्वीच्या त्रेतायुगात, श्रीराम-सीता-हनुमंत आदी झाले, त्या वेळची गोष्ट सांगतो. श्रीराम विष्णुचे अवतार व हनुमंत शिवाचे अवतार. हरि आणि हर यांचे अतूट प्रेम आहे. श्री शिव त्यावेळी हनुमंत रूपात आहेत. त्यावेळी सांगितली गेलेली व मी स्वतः ऐकलेली कथाच तुला सांगतो.

फार पूर्वीच्या त्रेतायुगात हा श्री-सीता-राम-हनुमंत संवाद झालेला आहे. त्यावेळी-

पुरा रामायणे रामो रावणं देवकण्टकम्।
हत्वा रणे रणश्लाघी सपुत्रबलवाहनम् ।।२६।।
सीतया सह सुग्रीव लक्ष्मणाभ्यां समन्वितः।

अयोध्यामगमद्रामो हनुमत्प्रमुखैर्वृतः ।।२७।।

अभिषिक्तः परिवृतो वसिष्ठाद्यैर्महात्मभिः।

सिंहासने समासीनः कोटिसूर्यसमप्रभः ।।२८।।

त्यावेळी, म्हणजे श्रीरामांनी, रावणाला त्याच्या युद्धखोर बलवान पुत्रासह रणांगणात हारवून, देवता बंदीवासातून सोडवून, बिभीषणाला राज्यदान देऊन, सुग्रीव-लक्ष्मण-बिभीषणासह पुष्पक विमानात बसून, अयोध्येला परतल्यावर त्यांचा राज्याभिषेक झाला. हनुमंतही त्यावेळी त्यांच्यासमवेत आहेच. एकदा असेच सिंहासनावर श्रीरामप्रभू सीतेसह बसलेले आहेत. वसिष्ठादी मुनी भोवताली आहेत, रामाचे बंधू पण आहेत. श्रीराम कोटिसूर्याप्रमाणे तेजस्वी, शांत दिसत आहेत. व त्यांच्यापुढे श्री हनुमंत कसे विराजमान झाले आहेत, कसे बसले आहेत, ह्याचे वर्णन पुढील श्लोकात आहे.

दृष्ट्वा तदा हनूमन्तं प्रांजलिं पुरतः स्थितम्।

कृतकार्यं निराकाङ्क्षं ज्ञानापेक्षं महामतिम् ।।२९।।

श्रीरामाच्या पुढे हनुमंत हात जोडून बसलेले आहेत. ते कसे दिसतात? कृतकार्यम्-श्रीरामाचे काम केले आहे, पूर्णत्वास नेले आहे, व पुढेही रामकार्य करावे अशी इच्छा असून, रामाज्ञेची वाट पाहताहेत, अशा अविर्भावात ते (महामति) अतिशय बुद्धीमान असे, मनात कोणतीच आकांक्षा नाही (निरिच्छ) असे, निरिच्छ वायुसूत, सदा निमग्न रामरूपी अशा स्वरूपात आहेत. व श्रीरामचंद्र काही आत्मज्ञानाच्या गोष्टी सांगतील अशी अपेक्षा ठेवून श्रीरामाकडे पाहात आहेत. त्यावेळी श्रीरामचंद्र सीतामाईला सांगत आहेत की,

रामः सीतामुवाचदं ब्रूहि तत्वं हनुमते।

निष्कल्मषो ऽ यं ज्ञानस्य पात्रं नौ नित्यभक्तिमान् ।।३०।।

ह्या निष्पाप हनुमंताला, हा आपला परमभक्त असल्यामुळे, निष्कलंक असल्यामुळे, व मुख्य ज्ञानग्रहण करण्याला पात्र असल्यामुळे, त्याला 'रामतत्व' समजावून सांग. आता स्वतः तत्वविवरण न करता, सीतेकडून ते वदवले जात आहे. सीता रामाची शक्ती आहे. श्रीराम अनिर्वचनीय तत्व आहे. ते शब्दाने प्रगट करायचे म्हणजे मायेत येऊनच करावे लागते. शब्दाशिवाय ते प्रगट करता येत नाही. व शब्द मायेच्या अधीन आहेत. माया परमेश्वराचे गुणगान करायला सिद्धच आहे. अनिर्वचनीय तत्व, हजारो शब्द वापरून, फुलवून व्यक्त केले तरी, 'अगणित गुणखण', श्रीरामाचे वर्णन अपुरेच राहील, इतके बहुगुणी आहे. निर्गण-बहुगुण. परमेश्वराचे प्रगटीकरण पहिल्यांदा शब्दब्रह्म ओंकारातूनच आले आहे. त्याची चिद्शक्ती-श्रीसीताच श्रीरामाचे यथार्थ वर्णन करू शकते. म्हणून आपल्या शक्तीला आज्ञा केली आहे.

तथेति जानकी प्राह तत्त्वं रामस्य निश्चितम्।

हनूमते प्रपन्नाय सीता लोकविमोहिनी ।।३१।।

त्याप्रमाणे त्या नम्र हनुमंताला, लोकविमोहिनी सीता, रामाची चिद्शक्ती, महामाया, भार्या, रामाचे निश्चित असे रामतत्व सांगती झाली. म्हणजे सुरवातीला शब्दामधूनच, कुणाच्या तरी माध्यमातून हे आत्मज्ञान समजावून घ्यावे लागते. श्रीसद्गुरूच्या माध्यमातूनच ते श्रवणीय होते. ऐकल्याशिवाय कोणतेच ज्ञान प्राप्त होत नाही. आता पुढे सीतेच्या मुखातील निरूपण आहे.

: सीतोवाच :

रामं विद्धि परं ब्रह्म सच्चिदानन्दमद्वयम्।

सर्वोपाधिविनिर्मुक्तं सत्तामात्रमगोचरम् ।।३२।।

आनंद निर्मलं शान्तं निर्विकारम् निरंजनम्।

सर्वव्यापिनमात्मानं स्वप्रकाशमकल्मषम् ।।३३।।

श्रीराम हे सच्चिदानंद, अद्वय असे परमब्रह्मच आहे. ते. सर्व उपाधिरहीत, निरूपाधिक, कोणत्याही उपाधित बांधलेले

नाहीत. ते इंद्रियानी समजू न शकणारे, अगोचर असे तत्व आहे. सर्व इंद्रियांना त्या तत्वामुळे शक्ती प्राप्त होते. म्हणून साऱ्या जगताचे ते सत्ता स्थान आहे. त्यांच्या मुळेच, ते साऱ्या सृष्टीत विराजमान झालेले जगदीश्वर असून, जगताला व्यक्तदशा देणारे असे जगताचे सत्तास्थान असूनही, ते कोणाला दिसत नाही. त्याचे स्वरूप आनंदरूपच आहे. साऱ्या जगताला आनंदी स्वरूपात ते नटवतात. ते निर्मल, त्यांना मल नाही, ते अत्यंत शुध्द, पवित्र असून शांत, निर्विकार-विकाररहीत असून ते निरंजन आहेत, त्यांना पाहण्यासाठी कोणते वेगळ्या प्रकारचे अंजन लागत नाही. ते स्वयं आहेत. सर्वव्यापी आहेत, सर्वत्र तेच भरलेले म्हणून अचल, ते नाही अशी जागाच नाही. ते स्वयं प्रकाशी आहेत. त्यांना दाखवायला दुसरा प्रकाश नको. पापाचा स्पर्शही त्यांच्या ठिकाणी नाही. कल्मष म्हणजे पाप. ते अत्यंत शुध्द, पवित्र आहेत.

मां विध्दि मूलप्रकृतिं सर्गस्थित्यन्तकारिणीम्।
तस्य संनिधिमात्रेण सृजामीदमतन्द्रिता।।३४।।

त्याच्यातच त्याची मूळ शक्ती सुप्तरूपात नित्य असते. उत्पत्ती-स्थिती-लय सहज लीलया करणारी ही शक्ती त्याच्या ठिकाणी सहजस्वरूपात आहे. मूळपूरूष व मूळप्रकृती दोन्ही त्यांचीच रूपे. त्यामुळे प्रकृतिरूपाने ती प्रगट होते, ते अप्रगटच राहतात. त्यांच्या सत्तेमुळे, साहचर्यामुळे, त्यांच्या 'असणे' पणामुळेच, मूळप्रकृती हा सारा जगत पसारा मांडू शकते. मी त्यांची मूलप्रकृती आहे, हे जाणून घे (मां विध्दि), सीता व राम प्रकृती-पुरूषरूपात आहेत. हे प्रथम समजून घ्यायचे आहे. जगताचा सारा पसारा प्रकृतिसन्निध्यातच होतो. व्यवहारातही एकटा पुरुष असला की, फार प्रपंच नसतो. एकटा जीव, सदाशिव पण लग्न झाले की संसार वाढू लागतो. पसारा बाईमुळे वाढत असतो. तिच्यामुळे घराला घरपण, पण घर कर्त्या माणसाचे मानले जाते. तसे सीतामाई सांगत आहेत, की परब्रह्म श्रीरामाच्या सत्तेमुळेच मी हे सारे रामयाण घडवून आणले. शक्तीच कार्य करू शकते, ह्या शक्तीही चार प्रकारच्या द्रव्य, इच्छा, ज्ञान, क्रिया. ईच्छाही हवी, त्याचे ज्ञानही हवे, त्यासाठी साहित्यही हवे व तशी क्रियाही करायला हवी, ह्या चारी शक्तींनी युक्त ती प्रकृती आहे. म्हणून-

तत्सन्निध्यान्मया सृष्टं तस्मिन्नारोप्यते ऽ बुधैः।
अयोध्यानगरे जन्म रघुवंशे ऽ तिनिर्मले।।३५।।

त्यांच्या अधिष्ठानावर मी हे घडवून आणते. माझ्याकडून ते घडविले जाते. व त्यांनी ते केले, असा त्यांच्यावर आरोप केला जातो. मायेमुळे क्रिया घडते पण 'देव' करतो असेच सर्वजण मानतात. म्हणून " ईश्वरेच्छा बलियसि" असे म्हणतात. त्यांची योगमाया, चित्शक्ती, भार्या सर्व सीतामाईच आहेत. त्यामुळे सीतामाईच्या मुखी हे शब्द आहेत. अतिनिर्मल अशा रघुवंशात, ह्या अयोध्यानगरीत त्यांचा जन्म झाला. २२-२२ पिढ्यांची पुण्याई पाठीशी, अशा अत्यंत निर्मल, विशुध्द वंशात व तो ही अयोध्यानगरीत, जेथे योध्दे असूनही ज्यांना युध्द करायची पाळीच आली नाही, अशी समंजस प्रजा आहे. वादविवाद, तंटाब खेडा नसलेले सदाचारी नगरात प्रभूचा जन्म झाला आहे.

३५व्या श्लोकापासून ४२ व्या श्लोकांपर्यंत संपूर्ण रामायण थोडक्यात विशद केले आहे. सीता रामाची चिद्शक्ती आहे, हे प्रथम जाणले की, मायाच सर्व घडवते. ह्या अर्थाचे पुढील श्लोक समजायला सोपे जातात. पुढे सांगत आहेत.

विश्वामित्रसहायत्वं मरवसंरक्षण तथा।
अहल्याशापशमनं चापभङ्गो महेशितुः।।३६।।
मत्पाणिग्रहणं पश्चाद्भार्गवस्य मदक्षयः।
अयोध्यानगरे वासो मया द्वादशवार्षिकः।।३७।।
दण्डाकारण्यगमनं विराधवध एव च।
माया मारीचमरणं मायासीताहृतिस्तथा।।३८।।
जटायुषो मोक्षलाभः कबन्धस्य तथैव च।
शबर्याः पूजनं पश्चात्सुग्रीवेण समागमः।।३९।।
वालिनश्च वधः पश्चात्सीतान्वेषणमेव च।
सेतुबन्धश्च जलधौ लंकायाश्च निरोधनम्।।४०।।
रावणस्य वधो युध्दे सपुत्रस्य दुरात्मनः।

बिभीषणे राज्यदानं पुष्पकेण मया सह।
अयोध्यागमनं पश्चाद्राज्ये रामभिषेचनम्।।४१।।
एवमादीनि कर्मणि मयैवाचरितान्यपि।
आरोपयन्ति रामे ऽ स्मिन्निर्विकारे ऽ खिलात्मनि।।४२।।

अयोध्यानगरीत, रघुवंशात जन्म, विश्वामित्रासाठी यज्ञरक्षण त्यानंतर अहिल्येची शापमुक्ती, शिवधनुष्यभंग करून माझे पाणिग्रहण, भगवान परशुरामाचा (भार्गव) गर्वहरण, त्यानंतर १२ वर्षे अयोध्यानगरीत माझ्यासह वास्तव्य, पित्राज्ञामुळे दंडकारण्यात गमन करते वेळी, विराधाचा वध, मायारूपी हरिणवेष घेतलेल्या मारिच वध, मायारूपी सीतेचे हरण, जटायूला मोक्षलाभ, त्याचा अत्यंसंस्कार, कबंधाला ही मुक्तिदान, शबरीकडून श्रीरामांचे पूजन, सुग्रीवाशी मैत्री, वालीवध, सीतेचा शोध, त्यासाठी समुद्रावर सेतू बांधणे, लंकेत प्रवेश, रावणाचा त्याच्या पुत्रासह रणामधे वध करून, लंकेचे राज्य बिभिषणाला देऊन, माझ्यासह पुष्पक विमानात बसून अयोध्येत परतणे, त्यानंतर रामराज्याभिषेकाचा सोहळा ही सारी कर्मे श्रीरामच्या अधिष्ठआनावर, माझ्याकडून अचरणात, प्रत्यक्षात आली आहेत. खरे तर श्रीरामचंद्र मुळात अखिलात्मनी, सर्वांतर्यामी वसत असून विकाररहीत आहेत. स्वतःकडे कर्तेपण न घेताही, त्यांनाच ह्या सर्व कर्माचा लोक कर्ता मानतात. मुळात राम परब्रह्मरूपीच आहेत. ते काहीच करत नाहीत. पण मायेचा आश्रय घेतल्यासारखे भासवून तेच कर्ता असे भासवतात.

रामो न गच्छति न तिष्ठति नानुशोच
त्याकाङ्क्षते त्यजति नो न करोति किंचित्।
आनन्दमूर्तिरचलः परिणामहीनो
मायागुणाननुगतो हि तथा विभाति।।४३।।

श्रीराम हे परब्रह्मतत्वच असल्यामुळे सर्वत्र तेच भरून उरले आहेत त्यामुळे ते कुठे जाणार? कुठेच जात नाहीत, सर्वत्र त्यांची वस्ती, मग त्यांचे वेगळे वसतिस्थान कसे? (न तिष्ठति) निर्विकार असल्यामुळे (न शोचति) शोक करत नाहीत, कुठली इच्छा करीत नाहीत. (आकांक्षाते) किंवा कशाचा त्याग ही करत नाहीत, (न त्यजति, न करोति किंचित) खरे तर ते काहींच करत नाहीत, ते स्वतः सर्व चराचरात भरलेले आहेत. सर्वांना सर्वदा आनंद देणारे असे आनंदमूर्ती, अचल असल्यामुळए त्यांच्यावर परिणामही होत नाही. कारण ते निर्विकारी आहे. विकार त्यांना स्पर्शच करू शकत नाही, तरी पण मायेचे अनुसरण केल्यामुळे, काही न करता, तेच सर्व करीत आहेत, असे सर्वजण समजतात. सीतेचे बोलणे इथे संपले. तेव्हा श्रीमहादेव पुनः पार्वतीला सांगतात –

श्रीमहादेव उवाचः

ततो रामः स्वयं प्राह हनूमन्तमुपस्थितम्।
शृणु तत्त्वं प्रवक्ष्यामि ह्यात्मानात्मपरात्मनाम्।।४४।।

श्री सीतामाईचे हे कथन संपत येताच, हे पार्वती (हनुमंत स्वरूपात उपस्थित असलेल्या, त्या मला उद्देशून) स्वतः श्रीरामांनी जे आत्म, अनात्म व परात्म तत्व सांगितले ते आता ऐक श्रीराम परब्रह्म आहेत, हे सीतेच्या मुखातून ऐकलेल्या ज्ञानावर, आता श्रीरामांनी स्वतःच सांगितल्यामुळे शिक्कामोर्तब होणार आहे. सीतामाईंनी ते तत् पद समजावून दिले. ते तत्व कसे आहे? आता श्रीराम स्वतः सांगत आहेत. " अहं ब्रह्मासि " मीच ते तत्व आहे व तेच तत्व सर्वत्र असल्यामुळे तूंही तेच आहेस, तत्वमसि पहिल्यांदा "प्रज्ञानब्रह्म" ब्रह्मतत्वाची माहिती, मग 'अहं ब्रह्मास्मि' मग 'तत्वमसि' त्यानंतर आलेली अनुभूति ' अयमात्माब्रह्म' ह्या चार महावाक्याचा संदर्भ ह्या एका श्लोकातून अध्याहत झाला आहे. ते तत्व कसे?

: श्रीरामोवाचः

आकाशस्य यथा भेदस्त्रिविधो दृश्यते महान्।
जलाशये महाकाशस्तदवच्छिन्न एव हि।
प्रतिबिम्बारव्यमपरं दृश्यते त्रिविधं नभः ।।४५।।

विशाल जलाशय–सरोवर आहे. ते शांत आहे. स्वच्छ आहे. त्याकडे पाहिले की, त्याने व्यापलेल्या अथांग आकाशाचे स्वरूप ध्यानात येते. जलाशयात पाहिले तर, तेच आकाश उताण्या बशी सारखे, खोलगट पसरलेले आहे असे वाटते. वर पाहिले तर, तेच आकाश पालथ्या बशी सारखे अर्धवर्तुळाकार वाटते. उताणे, पालथे, अथांग अशा तीन स्वरूपात ते आकाश तीन प्रकारात आपल्याला स्पष्ट दिसत असते. खरे तर आकाश एकच आहे, पण बुध्दीत पडलेल्या प्रतिबिंबामुळे,

ते असे तीन विभागात दिसते. मूळात आत्मतत्व आकाशासारखेच व्यापक, विस्तीर्ण आहे. आकाश सर्व वस्तुला, जगाला व्यापते म्हणून ते व्यापक पण तेही दृश्यात आहे. निळसर रंगाचे भासते. शून्यातून–तमोगुणातून त्याची निर्मिती म्हणून सप्त गुणांनी युक्त. आकाशाच्या निरव शांततेत काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर व अज्ञान हे सप्तगुण सुप्तरूपात आहेत. वरती पालथे, जलाशयात उताणे व जलाशयावर समांतर अशा तीन स्वरूपातून त्याची व्याप्ती समजते तरी, ते असे भासले तरी तसे नसते, ते ऐकच रुपात आहे.

तसेच आत्म्याचेही आहे. त्या चैतन्याचे प्रतिबिंब जीवात्म्यात असते. जलाशयात चंद्राचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. वरती आभाळात चंद्रबिंब असतेच. आभाळातल्या चंद्राच्या प्रकाशामुळे, चंद्राचे प्रतिबिंब, स्वच्छ जलशयात दिसते. जलाशय गढूळ, मलीन असेल, तर स्वच्छ प्रतिबिंब दिसणार नाही. त्यात तरंग असतील, तर ते प्रतिबिंब हलणारे दिसेल व जलाशयावर दाट वेलींमुळे आवरण आले असेल, तर शेवाळामुळे पाणीच झाकले जाते, आंत स्वच्छ पाणी आहे हे पण कळत नाही. ते शेवाळ दूर करावे लागते. शेवाळयुक्त जलाशयात प्रतिबिंब पडणारच नाही. म्हणून, आत्म्यावरही मल, विक्षेप, आवरण अशी तीन प्रकारची अज्ञान अवस्था आली, तर त्याला खरे तत्व समजतच नाही. सूर्य–किरण–प्रकाश तिन्ही मिळून खरे ज्ञान, पाणीच सर्वत्र पण तेच नदी, प्रवाह, समुद्र या स्वरूपातून दिसते. ते आत्मतत्व असेच मूळ रुपातच सर्वत्र आहे, ते एकच आहे, पूर्ण आहे, अवच्छिन्न आहे तरी पण मायेमुळे, तीन स्वरूपात प्रगट होते. ह्यालाच त्रिपुटी म्हणतात. सर्व जग ह्या तीन गुणांनीच दृष्य होते. ह्या गुणामुळेच त्या आत्म्याचे तीन प्रकार मानले जातात. जीवात्मा जो अल्पज्ञानी आहे, सिमित आहे, विनाशी आहे. शिवात्मा–सर्वज्ञानी, असीम असला तरी विनाशीच आहे. जीवात्मा प्रकृतीच्या, मायेच्या प्राधान्याने विलसित, तर शिवात्मा पुरुष तत्वाचा, ईश्वरतत्वाच्या प्राधान्याने सुशोभित, पण दोघेही उत्पन्न झालेत म्हणून विनाशीच.

जड–चंचल–निश्चल अशा तीन स्वरूपाने आत्मतत्व सांगीतले जाते. अष्टधाप्रकृतीने युक्त शरीर जडामधे येते अगदी पंचमहाभूतेही जडात मोडतात. कारण ती व्यक्त आहेत. चंचल तत्वात अव्यक्त आत्मतत्व आहे. पंचमहाभूतांपैकी पृथ्वी, आप, तेज, व्यक्त रूपात आहेत, तर वायु–आकाश अव्यक्त रूपात आहेत. सर्व देव वायूतत्वातील, मनही वायूतत्वाचेच, अंतरात्मा जो शरीर धारण कर्ता आहे, तो ही चंचलच. त्यामुळे जीव, शिव दोघांनाही नाश आहे. मात्र तिसरे निश्चल, त्याला नाश नाही. ते सर्वत्र आहेच आहे, सर्वकाळ आहे म्हणून सत्, सर्वकाळ ज्ञान देणारे आहे म्हणून जाणीव देणारे चित् व त्याचा स्वभाव सर्वांना आनंद देणारा म्हणून तो सच्चिदानंदरूप. प्रत्येक जीव सच्चिदानंदरूपच आहे पण त्याचा जीवभाव, मल–विक्षेप–आवरण ह्या अज्ञान प्रवृत्तीमुळे प्रखर होतो व तोच स्वतःला कर्ता समजू लागतो. 'मी आत्मा' हा भाव लोप पावतो व 'मी देह' प्रकृतीला प्राधान्य देतो. व अविद्याप्रधान कार्य होऊ लागते. पूर्ण, अविच्छिन्न चैतन्य, मी देह अशी विपरित करणी त्या अविद्याप्रधान त्रिदोषामुळे करू लागतो. हेच पुढील श्लोकातून स्पष्ट केले आहे. सारे अद्वैत प्रतिपादन करणारे ग्रंथ हेच पंचीकरण, आत्मनिवेदन, ईश्वर–माया परमात्मा–आत्मा–अनात्मा–परात्मा ह्या विवरणातून स्पष्ट करतात. आत्मा–चालक–अविनाशी, अनात्मा–शरीर––जगत–विनाशी व ह्या दोघांच्या पलीकडील परात्मा, क्षर–अक्षर–उत्तम, जड–चंचल–निश्चल वगैरे भाषेतून समजावून देतात. हे सद्गुरू कडूनच समजावून घ्यावे लागते. ते श्लोक पुढील प्रमाणे आहेत.

बुद्ध्यवच्छिन्नचैतन्यमेकं पूर्णभयापरम्।
आभासस्त्वपरं बिम्बभूतमेवं त्रिधा चितिः ।।४६।।
साभासबुद्धेः कर्तुत्वमविच्छिन्ने ऽ विकारिणि।
साक्षिण्यारोप्यते भ्रान्त्या जीवत्वं च तथा ऽ बुधैः ।।४७।।
आभासस्तु मृषाबुद्धिरविद्याकार्यमुच्यते।
अविच्छिन्नं तु तद्ब्रह्म विच्छेदस्तु विकल्पतः ।।४८।।
अविच्छिन्नस्य पूर्णेन ह्येकत्वं प्रतिपाद्यते।
तत्वमस्यादिवाक्यैश्च साभासस्याहमस्तथा ।।४९।।

अविच्छिन्न, चैतन्यस्वरूप परब्रह्म, पूर्ण, सर्वत्र तेच एकटे असे असते. तरी 'त्वं' पदात, जीवभावात, ते प्रतिबिंबरूपात वरील तीन रूपामुळे वेगळे दिसायला लागते. जीवभाव आला (आभासबुद्धे) की कर्तुत्व भाव येतो. मुळात तो अकर्ता आहे, अविनाशी आहे, पण अविद्या मायेमुळे, मी देह, मी कर्ता, असा भाव तेथे प्रगटतो व मुळात साक्षी भाव असलेल्या त्या आत्म्यावर, तो कर्ता आहे असा वृथा आरोप केला जातो. (तथा अबुध्ये भ्रान्त्या साक्षिणी जीवत्वम् आरोप्यते) व अशी विपरित (मृषा) खोटी बुद्धी धारण केल्यामुळे, त्या ब्रह्मावर पांघरून पडून, 'मी ब्रह्म' ही भावना लोप पाऊन, 'मी देह', 'मी जीव' असा विपरित भाव निर्माण होतो. हा भाव फक्त सद्गुरूच दूर करू शकतात व ते ही 'तत्वमसि' आदी महावाक्याच्या

साहाय्याने. ४४व्या श्लोकात त्या महावाक्याचा निर्देश करून पद्धतशीर रित्या, अरे, जे तत्व माझ्या आहेत, तेच तुझ्यात आहे, नव्हे सर्वत्र तेच आहे. असे समजावून देतात. त्यासाठीच सारी उपनिषदे, जी गुरू शिष्य संवादात्मक आहेत. सद्गुरू–मुखातून श्रवण, त्यावर मनन–चिंतन केले की, शिष्याला निजध्यास लागून साक्षात्कार होतो. व 'मी ब्रह्म' ह्याची अनुभूती त्याला येते. गुरू–शिष्य आत्मभावाने एक होतात. व शिष्याच्या प्रयत्नामुळे, त्याचेच त्याला ज्ञान होऊन, त्याची अविज्ञामाया नाश पावते. व 'मी ब्रह्म' हा साक्षात्कार त्याला होतो. तिथे 'दुसरे' नसतेच. 'मी' जातो, ब्रह्मच राहते. "अहं गेले ब्रह्म ठेले" असा साऱ्याच संतांचा अनुभव आहे. कारण तेच सर्वत्र आहे, त्याच्याशिवाय दुसरे काहीच नाही, "मेरे तो गिरिधर गोपाल, दूजा न कोई" श्रीकृष्ण भावनेने भक्त परिपूर्ण होतो. "तो गे तो चि तो राम सर्वत्र पाहे" असे रामभक्त म्हणेल. हाच भावार्थ पुढील श्लोकात आहे.

ऐक्यज्ञानं यदोत्पन्नं महावाक्येन चात्मनोः ।
तदा ऽ विद्या स्वकार्यैश्च नश्यत्येव न संशयः ।।५०।।

पुढील २ श्लोकात श्रीरामराय गुह्य प्रकट करताना महत्वाचा इशारा देतात की, ज्यांना माझी भक्ती प्रिय नाही, त्यांची गती कशी होईल? देवभाव 'सम' असला तरी, अभक्ताला तिथे थाराच नसतो. कारण अभक्ताच्या हृदयात देवच नसतो. 'भाव तिथे देव'. देवाशी नाते जोडावेच लागते. शास्त्राभ्यास करणारे पंडित, भाव नसेल तर त्याची बडबड, पोपटपंचीच होईल. अभक्तातच त्याची गणना केली गेली आहे. तसे स्पष्ट वचनच ५१व्या श्लोकात दिले आहे.

एतत् विज्ञाय मद्भक्तो मद्भावायोपपद्यते ।
मद्भक्तिविमुखानां हि शास्त्रगर्तेषु मुह्यताम ।
न ज्ञानं नच मोक्षः स्यात्तेषां जन्मशतैरपि ।।५१।।

हे समजून, म्हणजे मी जे वर विवरण केले आहे, त्याचा नीट अभ्यास करून, श्रवण, मनन, निदिध्यास मार्गाने साक्षात्कार होऊन मलाच येऊन मिळतील. मात्र माझ्याप्रति अनन्यभाव, निष्ठा, श्रद्धा, विश्वास असेल तरच, त्याला ते प्राप्त होईल. मद्भक्ती विमुख असे जे अभाविक आहेत, त्यांना शास्त्रानुसार, त्याच्या कर्माची फळे भोगावी लागतील. शंभर जन्म घेतले तरी त्यांना ते ज्ञान प्राप्त होणार नाही. व मोक्षही मिळणार नाही. कारण फक्त एकच. परमेश्वरावर विश्वास नाही, अनन्य भक्ती नाही.म्हणून शास्त्रात खरा भक्त, खरा देव ह्यावर सखोल चर्चा आहे. सारे अद्वैत ग्रंथ 'खरा देव' स्पष्टपणे दाखवतात. म्हणून सर्व विद्यात 'अध्यात्मविद्या'च श्रेष्ठ. अद्वैत प्रतिपादन करतो तोच ग्रंथ, इतर पुस्तके, अशी व्याख्या समर्थांनी केली आहे.

पुढच्या श्लोकात स्पष्ट सूचना आहे की, तुला जरी समजले, तरी मी सांगितलेले हे गुह्यज्ञान, माझी भक्ती नसणाऱ्यांना, दांभिक लोकांना अगदी इंद्रपद द्यायला ते तयार असले तरी, सांगू नकोस, हे गुह्य आहे. ज्यांना त्याची जिज्ञासा आहे, त्यांनाच सांग. गीतेतही भगवान १८व्या अध्यायात सांगतात, की अभाविकांना सांगू नका. अथर्वशीर्षातही शेवटी म्हटले की, अश्रद्ध लोकांना हे शिकवू नका. तसेच इथे सूचना देतात.

इदं रहस्यं हृदयं ममात्मनो
मयैव साक्षात्कथितं तवानघ ।
मद्भक्तीहीनाय शठाय न त्वया
दातव्यमैन्द्रादपि राज्यतो धिकम् ।।५२।।

देवांचा राजा इंद्र, हा पण लोभी, राज्यपद जाऊ नये म्हणून खटपट करणारा,त्याच्या सारखा लोभी, सत्तालोलुप, अभाविकाला हे रहस्य सांगूच नका असा स्पष्ट इशारा आहे. श्रीराम परब्रह्मरूप आहेत. इंद्र, चंद्र, वरूण इत्यादी लोकपाल, त्यांचीच निर्मिती, म्हणून तेही अपूर्णातच गणले गेले आहेत, चंचलातच तपसामर्थ्याने इंद्रपद मिळवता येते. असे देव श्रीरामाच्या पुढे खिजगणतीतले होत.

जगी द्वादशादीत्य हे रूद्र आक्रा। असंख्यात संख्या करी कोण शक्रा।
जगी देव धुंडाळिता आढळेना। जनी मुख्य तो कोण कैसा कळेना ।।१७६।।

असो. श्रीमहादेव पुढे म्हणतात–

: श्रीमहादेव उवाच :

एतत्ते भिहितं देवि श्रीरामहृदयं मया।

अतिगुह्यतमं हृद्यं पवित्रं पापशोधनम् ।।५३।।
साक्षात् रामेण कथितं सर्ववेदान्तसंग्रहम्।
यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो नात्र संशयः ।।५४।।

असे हे प्रत्यक्ष श्रीरामप्रभूंनी सांगितलेले अतिगुह्य, पवित्र, पापनाशी, मनाला जाऊन भिडणारे श्रीरामहृदय स्तोत्र, मी तुला सर्वांच्याच हितासाठीच सांगितले आहे. प्रत्यक्ष श्रीरामांनी सांगितले असल्यामुळे सर्व वेदांनी जे तत्व सांगितले, ते वेदाचे सारच असे हे स्तोत्र, जो नेहमी भक्तीपूर्वक पठण करेल, त्याला मुक्ती मिळणारच, यात संशय नाही.

ह्या स्तात्राचे आणखी कोणकोणते लाभ, फळ आहे ती फलश्रुतीही पुढे सांगत आहेत ५५ व ५६ ह्या दोन्ही श्लोकात ती स्पष्ट केली आहे.

ब्रह्महत्यादिपापानि बहुजन्मार्जितान्यपि।
नश्यन्त्येव न संदेहो रामस्य वचनं यथा ।।५५।।
यो तिभ्रष्टो तिपापी परधनपरदारेषु नित्योद्यतो वा।
स्तेयी ब्रह्मघ्नमातापितृवधनिरतो योगिवृन्दापकारी।।
यः संपूज्याभिरामं पठति च हृदयं रामचंद्रस्य भक्त्या।
योगींद्रैरप्यलभ्यं पदमिह लभते सर्वदेवैः सुपूज्यम् ।।५६।।

ब्रह्महत्या, ज्याचे हातून झाली आहे, ते पाप अनेक जन्म प्राप्त झाले तरी त्या पापाचा नाश होत नाही. जन्मोजन्मी त्या पापाचे फळ भोगावे लागते असेमहापाप ही नुसते ह्या स्तोत्रपठणाने नाहिसे होते. इतके ह्या रामवचनात सामर्थ्य आहे ह्यात शंका नाही.

जो अत्यंत भ्रष्ट आहे, अतिशय पापी आहे, दुसऱ्याच्या धनावर, दुसऱ्याच्या स्त्रीवर ज्यांची दृष्टी आहे, अशा दृष्कृत्यातच जे सतत रत आहेत, चोरी (स्तेयी), ब्रह्महत्या करणारे मातापिता यांचा वध ज्याच्या हातून झालेला आहे किंवा योगी लोकांचा, संतलोकांचा ज्यांच्याकडून अपमान झालेला आहे, असे महापापी, अशा लोकांना, जर पश्चाताप झाला, रामभक्ती उत्पन्न झाली व त्यांनी हे रामहृदय स्तोत्र, अत्यंत भक्तीभावाने म्हटले तर, सर्वदेव त्यांचे पूजन करतील व योगी लोकांत त्यांना सर्वश्रेष्ठ पद प्राप्त होईल. थोडक्यात अत्यंत महापापी लोक सुद्धा अत्यंत पुण्यवान म्हणून परिवर्तित होतील.

श्रीरामाचा हृदयात जन्म झाला, तरच हे स्तोत्र म्हणावे वाटेल. जिथे रामप्रभू वस्ती करतात, तिथे गैरवर्तन होणारच नाही. कारण श्रीरामचरीत्र तसेच परिणामकारकच आहे.

सध्या सर्वत्र जे विदारक दृश्य पाहायला मिळत आहे, त्यामागे हेच सूत्र आहे की, आता चंगळवादींना 'राम' नकोच आहे. त्यांच्या हृदयात रामच नाही. मग भक्ती कशी येणार? जिथे 'राम'च नाही तिथे गोडी कशी येणार? ती उत्पन्न होण्याचे अवघड कार्य, सज्ञनांना ह्या कलीयुगात करायचे आहे. त्यासाठी अशा अभ्यासाची निकड, गोडी उत्पन्न करण्याचे कार्य श्रीरामप्रभूंनीच प्ररणा देऊन करवून घ्यावे. सर्वांच्या हृदयस्थ रामाला प्रणाम करून, त्यानीच ही जागृती घडवून आणावी, ही विनम्र प्रार्थना करून हे पुष्प श्रीरामचरणी वाहू यात.

।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।।
।। श्रीसद्‌गुरूदेवदत्तात्रयार्पणमस्तु ।। गुरूदेवदत्त ।।

वरील रामहृदयाचाच थोडक्यात सारांश, श्रीसमर्थांनी "श्रीराम राम हे म्हणा" या काव्यात केला आहे. 'महेश पार्वतीप्रती– विशेश गुज सांगती' हे चरण, तसेच, 'देहे धरूनि वानरी – अखंड दास्य मी करी' हा त्यांचा निर्वाळा, मला हनुमंतरूपातच हे गुह्य समजले, ही धन्यता त्यात प्रगट झाली आहे.

• • •